वामन निंबाळकर



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय विविध
सं. क्र. 3400

REFBK-0026286

क्रांतीकारी विचारांची दिशा

२५ फ्री निषेध
३४०८
२६२८६
८५२९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

20 MAR 1991

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

आंबेडकरी विचारांची दिशा

वामन निंबाळकर


REFBK-0026286

प्रकाशन क्र. १५

प्रथम आवृत्ती :
१४ ऑक्टो. १९९०

© सौ. स्नेहलता वामन निंबाळकर

मुखपृष्ठ : प्रा. प्रमोद रामटेके
मुखपृष्ठ अक्षरे : अनिल ढेंगळे
पृष्ठे : ८+१३८


मूल्य : ४८ रु.

प्रकाशक :
प्रबोधन प्रकाशन,
१/१० एम. आय. जी., कॉलनी,
८४, रामबाग, नागपूर–४४० ००३

मुद्रक :
मधुसूदन पां. बनहट्टी
नारायण मुद्रणालय,
धंतोली, नागपूर–१२

विद्येविना मती गेली;
मतीविना नीती गेली;
नीतीविना गती गेली;
गतीविना वित्त गेले;
वित्तविना शूद्र खचले;
इतके अनर्थ एका अविद्येने केले.

–महात्मा जोतीबा फुले



प्रास्ताविक

'आंबेडकरी विचारांची दिशा' आपल्या हाती देतांना मला आनंद होत आहे. या पुस्तकातील सर्व लेख वेळोवेळी लिहिलेले आणि प्रकाशित झालेले आहेत. यात दोन भाषणांचाही मुद्दाम समावेश करण्यात आला आहे. त्यातील 'आंबेडकरवाद पुनरुज्जीवित करून तेवत ठेवता येईल का ?' या विषयावर एका कर्मचारी संघटनेने देशातील काही प्रमुख शहरांमध्ये परिसंवाद आयोजित केले होते. नागपूरमध्येही त्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या परिसंवादाचे मला निमंत्रण होते. त्यावेळचे भाषण, टाचणांवरून तयार करण्यात आले आहे. दुसरे भाषण हे चंद्रपूर येथे ४,५,६ मार्च ८९ ला भरलेल्या ९ व्या अ. भा. दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेले आहे. ते त्यावेळी छापील स्वरूपातही होते. याशिवाय दोन पुस्तिकांचा समावेश करण्यात आला आहे. 'अस्मितादर्शची नऊ वर्षे' ही पुस्तिका १९७७ साली प्रकाशित झाली. दलित साहित्याच्या इतिहासाचा संदर्भ या पुस्तिकेला असल्याने या पुस्तिकेचा समावेश करणे अभ्यासाच्या दृष्टीत अपरिहार्य होते. तसेच 'बौद्धांच्या सवलती व पंतप्रधानाचे वक्तव्य' आणि 'मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव का ?' या दोन विषयांवरील एक पुस्तिका १९७७ साली प्रकाशित झाली होती. हे दोन्हीही विषय आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचे, जिव्हाळ्याचे होते. त्यासाठी दलित पँथर या संघटनेने त्या काळात मोठे आंदोलन केले. त्या आंदोलनात अस्मादिक आघाडीवर होते. त्यात मला अनेकदा कारावासात जावे लागले, पोलिसांचा जीव जाईस्तोवर मार खावा लागला. त्यासाठी असंख्य कार्यकर्त्यांनीही अतिशय मोलाचे व त्यागाचे कार्य केले आहे.

आता बौद्धांच्या सवलतींचा प्रश्न सुटल्यासारखाच आहे. मागासवर्गीय जाती-जमातींना मिळणाऱ्या सवलती, १९५६ व नंतर झालेल्या बौद्धांना मिळाव्या या मागणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी जोरदार लढा दिला. ही मागणी सतत लावून धरली, तिचे महत्त्व आणि आवश्यकता प्रतिपादन केली. तरी काल परवापर्यंत सत्तेवर असलेल्या काँग्रेस आणि मध्ये सुमारे दोन वर्षे असलेल्या जनता शासनने या मागणीकडे गांभीर्याने पाहिले नाही. उलट दुर्लक्ष केले. परंतु आता केन्द्रात सत्तेवर आलेल्या राष्ट्रीय आघाडीच्या सरकारने (जनता दल

व इतर घटक पक्ष) यांनी हा प्रश्न निकालात काढण्यासाठी पाऊले टाकली आहेत. १२–४–९० ला बौद्धांना सवलती जाहीर झाल्या आहेत. तरीही त्या काळात पंतप्रधानपदी असलेल्या जबाबदार व्यक्तीनी कशी सामान्य माणसासारखे वक्तव्य केले होते, त्याला पँथरने कृती आणि लेखणीने कसा प्रतिकार केला हा इतिहास ताजा असला; तरी त्याला चळवळीच्या दृष्टीने ऐतिहासिक संदर्भमूल्ये असल्यामुळे या लेखाचा समावेश या पुस्तकात केला आहे. नामांतराचा प्रश्न अजून सुटलेला नाही. नामांतरांने दलितांचे सर्व प्रश्न सुटणार आहेत असे मानणारा कोणीही नाही. परंतु नामांतराचा प्रश्न, जातीयवाद किती कमी झाला हे मोजणारा मापदंड आहे. जातीयवादापुढे आमच्या लोकशाही मूल्यांची सुद्धा पायमल्ली होऊ शकते याचे नामांतर हे उत्तम उदाहरण आहे. कारण राज्याच्या विधीमंडळ सभागृहात सर्वानुमते पारित झालेल्या ठरावाला जातीयवाद्यांपुढे मान तुकवावी लागते. हे नागडे सत्य आज आम्ही पाहत आहो. मी तरी तो लोकशाहीचा पराभव मानतो.

नामांतराच्या प्रश्नावर फार मोठे आंदोलन झाले. त्यात सर्वांचाच सहभाग होता आणि अजूनही आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव का द्यावे, या प्रश्नाचे उत्तर १९७७ साली प्रसिद्ध झालेल्या त्या पुस्तिकेत देण्याचा प्रयत्न केला आहे. तोच लेख जशाच्या तसा येथे घेतला आहे. या पुस्तकात शेवटी राखीव जागांविषयीचा एक दीर्घ लेख आहे. पाच–सहा वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या या लेखाचे मी पुनर्लेखन केले. त्यात मागासवर्गीय जाती, जमाती, विमुक्त, भटके व इतर मागासवर्गीयांच्या जातीची राज्य शासनाने प्रकाशीत केलेली यादी जोडली आहे. त्या यादीत आता काही कमी जास्त झाले असण्याची शक्यता आहे. तसेच या लेखात भारतीय राज्य घटनेतील अनुसूचित जाती-जमाती, भटके, विमुक्त व इतर मागासवर्गीय यांना मिळणाऱ्या सवलती, व अधिकार मूळ घटनेतील आहेत. घटनेतील तरतुदी वाचकांना कळाव्या हा त्यामागील उद्देश आहे. याच लेखातील काही माहितीसाठी कृष्णा इंगळे, अध्यक्ष कास्ट्राईब यांच्या लेखाचा संदर्भ घेतला आहे.

उर्वरीत लेख वेगवेगळ्या नियतकालिकांमधून प्रकाशित झालेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य, विचारांचा आढावा घेण्याचा या लेखांमधून अल्पसा प्रयत्न केला आहे. अस्पृश्य ठरविलेल्या समाजाच्या मनातील न्युनगंड काढून, त्याना स्वाभिमानी बनविण्याचे महान कार्य बाबासाहेबांनी केले. त्यासाठी त्यांनी रूढी, परंपरा, देव, धर्म, कर्मकांड यांच्या दुष्ट चक्रातून बाहेर काढण्यासाठी समाजाला विज्ञानवादी, निरिश्वरवादी, भौतिकवादी, दृष्टीकोन दिला. नितीवाद, प्रगतीवाद, समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य, प्रज्ञा, शील, करुणा

इत्यादी मानवीमूल्ये सांगणारा बुद्धाचा धम्म दिला. त्यांच्या अमूल्य विचारांचा मागोवा घेणारे हे सर्व लेख आहेत. अन्तर्मुख होवून समाजमनाची शस्त्रक्रियाही करण्याची जेथे आवश्यकता वाटली, तेही केली आहे. या सर्वांचा शुद्ध हेतू समाजाच्या प्रबोधनाचा आहे. तो करण्याचा प्रामाणिक हेतू साध्य झाला की नाही हे वाचकांनी ठरवावयाचे आहे. काही मुद्यांची पुनरावृत्ती झाली आहे याची मला कल्पना आहे. ती पुनरावृत्ती काढता आली असती पण ती मुद्दाम काढली नाही.

या पुस्तकातील लेख ज्या नियतकालिकात पूर्वी प्रकाशित झाले आहेत, त्या संपादकांचे मी आभार मानतो. पुस्तकरूपाने हे लेख एकत्रित यावे म्हणून माझी पत्नी सौ. स्नेहलता निंबाळकर हिचा तगादा पाठीमागे होता म्हणून हे शक्य झाले. नारायण मुद्रणालयाचे बनहट्टी बंधूंचे प्रेम व्यवहारापलिकडचे. त्यांच्या रेखीव, सुबक छपाईने पुस्तकाचे सौंदर्य वाढले आहे. त्यांचे आभार मानल्याचे त्यांना आवडणार नाही. मुखपृष्ठावरील बाबासाहेबांचे चित्र प्रा. प्रमोद रामटेके यांचे. ते नामवंत चित्रकार आहेत. त्यांच्या चित्राचे मोल नाही. शेवटी, या कामात मदत करणारे, अनिल नितनवरे, धनराज पाटील, प्रा. आशा धावडे, अनिल ढेंगळे यांचे आभार मानतो.

□

अनुक्रमणिका

लेख	पूर्वप्रकाशन	पृष्ठ
• आंबेडकरी विचारांची दिशा	जनवाद १९८९	१
• सामाजिक लोकक्षाहीचे शिल्पकार	लोकमत १९८९	७
• आंबेडकरवाद पुनरूज्जीवित करून तेवत ठेवता येईल का ?	परिसंवाद १९८०	१२
• बौद्धांच्या सवलती व पंतप्रधानाचे वक्तव्य	पँथर प्रकाशन (पुस्तिका) १९७९	१७
• मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव का ?	पँथर प्रकाशन (पुस्तिका) १९८९	२२
• दलित पँथर	१९८९	२७
• धर्म, धम्म आणि लोकशाही	जन्मशताब्दी विशेषांक १९९०	३४
• शासनकर्ते होणे आवश्यक	सुगावा, दिवाळी अंक १९८९	३९
• नीती हा दलित साहित्याचा गाभा	९ वे अ.भा. दलित सा. संमे. अध्यक्षीय भाषण ४-३-८९	४६
• दलित चळवळ : काल, आज आणि उद्या	आंबेडकर शताब्दी गौरव ग्रंथ ११९०	५७
• अस्मितादर्शची नऊ वर्षे	प्रबोधन प्रकाशन (पुस्तिका) १९७७	६७
• आंबेडकरी चळवळीचा कृतिकार्यक्रम	सुगावा, दिवाळी अंक १९९०	९१
• राखीव जागा : काही प्रश्न काही उत्तरे		१०१



विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर

जन्म : १४ एप्रिल १८९१ महापरिनिर्वाण : ६ डिसें. १९५६

आंबेडकरी विचारांची दिशा

१४ ऑक्टोबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांसोबत 'बुद्धधम्मा 'चे समतावादी तत्त्वज्ञान स्वीकारले आणि हजारो वर्षांच्या हिंदू धर्मातील गुलामगिरीच्या शृंखला खळखळा तुटून पडल्या. तो दिवस आमच्यासाठी नवयुगाची पहाट झाला. त्या दिवसाने जीवनाच्या वाटचालीसाठी नवा मार्ग दाखविला.

बौद्ध झालो म्हणजे काय झालो ?

दीक्षेच्या वेळी केलेल्या आपल्या भाषणात बाबासाहेब म्हणाले होते, 'मी भारत बौद्धमय करीन.' तो एका युगप्रवर्तकाचा शब्द होता. भारत बौद्धमय करण्यासाठी लागणारी बौद्धिक, मानसिक शक्ती त्यांच्याजवळ होती. भारत बौद्धमय करण्याच्या घोषणेमागे त्यांच्या विचारांच्या, आचारांच्या दिशा ठरलेल्या होत्या. येथील अडाणी जनतेला डोळस करून त्यांच्यात हक्क, अधिकारांची जाणीव निर्माण करणे आणि राष्ट्राचे ऐक्य आणि स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी लागणारी कर्तव्यभावना निर्माण करणे असा दुहेरी हेतू त्यांच्या समोर होता. परंतु ६ डिसें. १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले. बुद्धधम्माचे तत्त्वज्ञान स्वीकारल्यानंतर फक्त १ महिना २२ दिवसांनीच ते आम्हा अनुयायांना सोडून गेले. आम्ही पोरके झालो. बाबासाहेबांनी धम्म तर दिला होता पण त्यांच्या वाणीतून भविष्यासाठी दिग्दर्शन व्हायचे होते ते राहून गेले. किंवा जे झाले होते ते समजण्याची आमची तेव्हा तरी फारशी कुवत नव्हती. अशा परिस्थितीत आम्ही बौद्ध झालो होतो. आम्ही बौद्ध झालो म्हणजे काय झालो याचे उत्तर आम्ही आमच्यापरीने (कुवतीनुसार) शोधू लागलो. आज आमची स्थिती, 'हत्ती कसा आहे ?' या प्रश्नाचे उत्तर शोधणाऱ्या सात आंधळ्यांसारखी झाली आहे. परंतु अशी स्थिती होण्याचे कारण नव्हते. बुद्धधम्माचे शास्त्रशुद्ध सखोल आणि प्रत्येकाला समजेल अशा सोप्या भाषेत तत्त्वज्ञान बाबासाहेबांनी 'बुद्ध ॲण्ड हिज

धम्म' या ग्रंथात सांगितले होते. त्या ग्रंथाचे वाचन करून आणि तो विचार समजावून घेऊन त्याप्रमाणे आचरण करण्याची गरज होती, आजही आहे. एवढेच नव्हे तर धम्मदीक्षेच्या वेळी त्यांनी ज्या बावीस प्रतिज्ञा सांगितल्या होत्या, त्या प्रतिज्ञेप्रमाणे जरी आम्ही आचरण केले असते तर 'बौद्ध झालो म्हणजे काय झालो!' याचे उत्तर आम्हाला मिळाले असते आणि इतरांनाही देता आले असते. त्या बावीस प्रतिज्ञा येथे मुद्दाम देत आहे.

(१) मी ब्रह्मा, विष्णु व महेश यांना देव माननार नाही व त्यांची उपासणाही करणार नाही.

(२) मी राम, कृष्ण यांना देव मानणार नाही व त्यांची उपासनाही करणार नाही.

(३) मी गौरीं गणपती इत्यादी हिंदुधर्मातील देवदेवतेस देव मानणार नाही, अगर त्यांची उपासनाही करणार नाही.

(४) देवाने अवतार घेतला यावर माझा विश्वास नाही.

(५) भ. बुद्ध विष्णुचा अवतार होय. हा खोटा व खोडसाळ प्रचार आहे, असे मी मानतो व त्याचा धिक्कार करतो.

(६) मी ब्राह्मणाचे हातून श्राद्ध पक्ष करणार नाही व पिंडदान करणार नाही.

(७) मी बौद्ध धर्माचे विरुद्ध किंवा विसंगत असे वर्तन वा आचरण करणार नाही.

(८) मी कोणतेही क्रिया कर्म ब्राह्मणाचे हातून करणार नाही.

(९) चातुर्वर्ण्य व जातिभेद मी निराधार समजतो.

(१०) सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी समजतो. त्या सर्वांना समानतेने वागविण्याचा मी प्रयत्न करीन.

(११) भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचे मी व्यवहारात अवलंबन करीन.

(१२) मी भ. बुद्धाने उपदेशीलेल्या दहा पारामिता पाळीन.

(१३) मी प्राणीमात्रावर दया करीन व मैत्री करीन.

(१४) मी चोरी करणार नाही.

(१५) मी व्यभिचार करणार नाही.

(१६) मी खोटे बोलणार नाही.

(१७) मी दारू पिणार नाही.

(१८) ज्ञान, शील व करुणा या बौद्ध धर्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून मी माझे जीवन घालवीन.

(१९) माझ्या जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानीकारक ठरणाऱ्या आणि मनुष्यमात्राला हीन व असमान मानणाऱ्या हिंदु धर्माचा मी त्याग करतो व बुद्ध धर्माचा स्वीकार करतो.

(२०) बौद्धधर्म हा सद्धर्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.

(२१) माझा नवा जन्म होत आहे, असे मी मानतो.

(२२) इतःपर बुद्ध शिकवणुकीप्रमाणे मी वागेन अशी मी प्रतिज्ञा करतो.

'बुद्ध ॲण्ड हिज धम्म' या ग्रंथांतील तत्त्वज्ञानाच्या भागाचा संदर्भ आणि वरील बावीस प्रतिज्ञा पाहिल्या की एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट होते की आम्ही बौद्ध झालो म्हणजे आम्ही हिंदू असणे सोडून दिले, हिंदू मानसिकतेचा संपूर्ण त्याग केला. हिंदू धर्म, त्यातील देव, आत्मा, चमत्कारावरील विश्वास, कर्मकांड, जन्माच्या फेऱ्यावरील विश्वास, पूजा–अर्चा, नवस, उपास–तापास, भूताची संकल्पना, अंगात येणे इत्यादी व अशाच अठरा पगड भंपक गोष्टी बाबासाहेबांनी आम्हांस सोडून देण्याचे आणि त्यांच्यावर विश्वास न ठेवण्याचे सांगितले. तसेच बुद्धधम्म तत्त्वज्ञानातील पंचशीलाचे पालन करावयास सांगितले. पंचशील हे नुसते तोंडाने म्हणण्यासाठी नाही तर ती आचरणात आणण्याची आचार–संहिता आहे. पंचशीलाचे पालन केले तर माणसाचे जीवन सुखकर होते. बाबासाहेबांनी आम्हाला विज्ञाननिष्ठा जोपासायला सांगितली. व्यक्तिपूजा नाकारून गुणांचा गौरव करावयास सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरील आचारसंहिता सांगतांना स्वतः त्यांनी आयुष्यभर विचार आणि कार्य यांची सांगड घातली. तत्त्वज्ञान हे आचरणात आणायचे असते, पुस्तकात ठेवण्यासाठी नव्हे ही गोष्ट त्यांनी स्वतःच्या कार्य कर्तृत्वाने दाखविली.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर येथे राजकीय लोकशाही स्थापन झाली. परंतु ती सुदृढ व्हावी म्हणून सामाजिक लोकशाहीचे महत्त्व त्यांनी प्रतिपादन केले. सामाजिक लोकशाही रूजविण्यासाठी बुद्धी प्रामाण्यवादी नागरिक निर्माण होण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी बुद्धधम्माची कास धरली. स्वतःपासून सुरू करून त्यांनी आपल्या लक्षावधी अनुयायांना त्या मार्गाने जाण्याचा सल्ला दिला. हा मार्ग समता, माणूसकी, नीती, बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञाननिष्ठा दाखविणारा होता. बुद्धधम्माचा हा जीवनमार्ग आहे. या जीवनमार्गाने आपण गेलो तर

आपण आपले, शेजाऱ्याचे पर्यायाने देशाचे आणि विश्वाचे हित करू शकतो. यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

परंतु त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर या त्यांच्या जीवनमार्गाचा व्हावा तसा शिस्तशीरपणे, जाणीवपूर्वक, अभ्यासपूर्वक आणि जिद्दीने प्रसार व प्रचार झाला नाही. त्यांच्या पश्चात त्यांचा अनुयायी वर्ग विभक्त झाला. या धम्म-प्रसाराच्या कामी ध्येयवादी आणि जीवनभर वाहून घेणारे हुशार, बुद्धीवान अनुयायी पुढे आले नाहीत. राजकारणातील फुटीचे अनुकरण इथेही झाले. त्यांच्या पश्चात्त बाबासाहेबांच्या ऊंचीएवढा नेता मिळणे शक्यच नव्हते. पण समाजाला संघटितपणे बांधू शकणाराही नेता झाला नाही. धम्म सांगायला नेतृत्वाच्या गुणांपेक्षा विद्वत्ता, अभ्यास, जीद्दी आणि त्याग इत्यादी गुण असणारा महापुरुष हवा होता. बुद्धाचे निरीश्वरवादी तत्त्वज्ञान समजावून घेणारा आणि इतरांना प्रभावीपणे सांगणारा प्रतिभावंत पुरूष हवा होता. पण तसे झाले नाही. त्यामुळे प्रत्येक जण आपआपल्या सोयीनुसार बुद्धाचे निरीश्वरवादी, अनात्मवादी तत्त्वज्ञान सांगू लागला. स्वीकारू लागला. कर्मकांड करू लागला. प्रार्थनेच्या जागी वंदना म्हणू लागला. शंकर, विष्णू, राम, कृष्ण इत्यादी देवांच्या जागी बुद्ध, बाबासाहेब म. फुले आणि सोवतीला विक्तुबाबा, ताजुद्दीनबाबा, गजाननबाबा, सतीमाय यांची पूजा करू लागला. फक्त फोटो (चित्र) बदलले फ्रेम त्याच राहिल्या. तो आचार व विचार यांच्या परस्पर विरोधात जगू लागला. आपण बौद्ध आहोत असे तोंडाने सांगत असता दुसऱ्या बाजूला दसऱ्याच्या दिवशी दीक्षाभूमीवर बाबासाहेब, बुद्धाच्या पुतळ्यांसमोर तो नवस सांगू लागला व फेडू लागला. अंगारे धुपारे करू लागला. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले निरीश्वरवादी तत्त्वज्ञान त्याने पार गुंडाळून ठेवले. बौद्ध होऊनही तो हिंदू मानसिकतेतच जगू लागला आणि स्वतःसाठीच तो 'डिफॉल्टर' सिद्ध झाला. ज्या ऐतिहासिक मैदानावर बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली त्या जागेवर (दीक्षाभूमीवर) दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी लक्षावधी लोक जमा होऊन आपल्या आदरणीय नेत्याच्या स्मृतीस अभिवादन करतात. ज्या मैदानावर दीक्षेचा क्रांतिसोहळा होऊन विचारांची प्रचंड महाशक्ती घेऊन येथून लक्षावधी माणसे देशाच्या, कानाकोपऱ्यात गेली होती त्याच दीक्षाभूमीवर आजही तितकीच गर्दी होते, पण ही गर्दी प्रबोधनाचा कोणता विचार घेऊन गावाकडे जाते ? समाजमनाला विचारांचे खतपाणी मिळते का ? पुस्तकांची दुकाने सोडली तर इतर जत्रा (यात्रा) आणि येथे काय वेगळे आहे ?

कुणी याचे उत्तर असे देतील की, या निमित्ताने लक्षावधी लोक एकत्रित येतात आणि त्यामुळे एका विराट शक्तीचे प्रदर्शन होते. हे जरी खरे मानले तरी

या शक्तीला शिस्तबद्ध कार्यक्रम, विधायक कार्याची जोड, दृष्टी दिली जात नाही तोपर्यंत या महाशक्तीचा उपयोग काय? या दिशेने विचार व्हावयास हवा.

धम्मचक्र प्रवर्तन दिन कोणता?

एक मुद्दा मुद्दाम येथे चर्चेला घेत आहे, तो धम्मचक्र प्रवर्तन दिवसाचा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून तथागत बुद्धाचे जीवनवादी तत्त्वज्ञान, नागपूर मुक्कामी, १४ ऑक्टो. १९५६ ला स्वीकारले. त्याला आम्ही 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणतो. त्या १४ आक्टो. ५६ ला अपघाताने हिंदू धर्मातील 'दसरा' किंवा 'विजया दशमी' हा सण होता. आज आम्ही हा दिवस १४ ऑक्टो. १९५६ ला पाळत नाही तर तो दसऱ्याला पाळतो. वास्तविक हाच दिवस निवडण्याचे कारण शोधताना एक गोष्ट लक्षात येते की यामागे बाबासाहेब आंबेडकरांचा स्पष्ट व्यवहारी व विज्ञानवादी दृष्टिकोण होता, त्या दिवशी सार्वजनिक सुटी होती व दुसऱ्या दिवशीही रविवारची किंवा इतर सुटी असावी. दोन दिवसाच्या सुटचांमध्ये नोकऱ्या करणाऱ्या अनुयायांना सुद्धा या दीक्षासमारंभास येता यावे हा त्या मागील अतिशय स्पष्ट व्यावहारिक दृष्टिकोण होता. परंतु आज काय होते? आम्ही दसऱ्याच्या दिवशी दीक्षाभूमीवर जमतो आणि १४ ऑक्टो. हा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक दिवस विसरत चाललो. काही मंडळी दसऱ्याच्या दिवसाचे समर्थन करताना म्हणतात की, या दिवशी अशोक विजयादशमी असते. सम्राट अशोकाने या दिवशी आपल्या मुलीला व मुलाला बौद्धधम्माच्या प्रसाराकरिता पाठविले. मग दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो की आम्ही १४ एप्रिल, ६ डिसें. हे बाबासाहेब यांचे जयंती व महापरिनिर्वाण दिवस का पाळतो? या दिवसासाठी बौद्ध कॅलेन्डर का शोधित नाही? अर्थात याचे उत्तर त्या मुद्याचे समर्थन करणारांजवळ नाही. यामुळे १४ आक्टो. या तारखेचे आम्हाला विस्मरण होईल आणि कालांतराने बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची दीक्षा कोणत्या तारखेला घेतली होती हा संशोधनाचा विषय होईल.

भिख्खूसंघ काय करतो?

बुद्ध धम्मातील भिख्खूसंघ हा अतिशय अभ्यासू, विद्वान, समाजाच्या हिताचे निर्णय घेणारा व समाजाचा विश्वास संपादन करून त्यासाठी काम करणारा, सामाजिक तळमळ असणारा, शीलवान प्रबुद्ध विचारांनी समाजाला प्रकाश देणारा व पुढे नेणारा असा असावा असे बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. परंतु तो तसा नसल्याने दीक्षेच्यावेळी बाबासाहेब 'संघ सरणम् गच्छामि' हे त्रिसरणातील एक सरण म्हणणार नव्हते. परंतु त्यांना अभिप्रेत असलेलाच संघ या सरणात आहे असे सांगून त्यांची मनधरणी करावी लागली होती. ही गोष्ट

आपण आपले, शेजाऱ्याचे पर्यायाने देशाचे आणि विश्वाचे हित करू शकतो. यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

परंतु त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर या त्यांच्या जीवनमार्गाचा व्हावा तसा शिस्तशीरपणे, जाणीवपूर्वक, अभ्यासपूर्वक आणि जिद्दीने प्रसार व प्रचार झाला नाही. त्यांच्या पश्चात त्यांचा अनुयायी वर्ग विभक्त झाला. या धम्म-प्रसाराच्या कामी ध्येयवादी आणि जीवनभर वाहून घेणारे हुशार, बुद्धीवान अनुयायी पुढे आले नाहीत. राजकारणातील फुटीचे अनुकरण इथेही झाले. त्यांच्या पश्चात्त बाबासाहेबांच्या ऊंचीएवढा नेता मिळणे शक्यच नव्हते. पण समाजाला संघटितपणे बांधू शकणाराही नेता झाला नाही. धम्म सांगायला नेतृत्वाच्या गुणांपेक्षा विद्वत्ता, अभ्यास, जीद्दी आणि त्याग इत्यादी गुण असणारा महापुरुष हवा होता. बुद्धाचे निरीश्वरवादी तत्त्वज्ञान समजावून घेणारा आणि इतरांना प्रभावीपणे सांगणारा प्रतिभावंत पुरूष हवा होता. पण तसे झाले नाही. त्यामुळे प्रत्येक जण आपआपल्या सोयीनुसार बुद्धाचे निरीश्वरवादी, अनात्मवादी तत्त्वज्ञान सांगू लागला. स्वीकारू लागला. कर्मकांड करू लागला. प्रार्थनेच्या जागी वंदना म्हणू लागला. शंकर, विष्णू, राम, कृष्ण इत्यादी देवांच्या जागी बुद्ध, बाबासाहेब म. फुले आणि सोबतीला विक्तुबाबा, ताजुद्दीनबाबा, गजाननबाबा, सतीमाय यांची पूजा करू लागला. फक्त फोटो (चित्र) बदलले फ्रेम त्याच राहिल्या. तो आचार व विचार यांच्या परस्पर विरोधात जगू लागला. आपण बौद्ध आहोत असे तोंडाने सांगत असता दुसऱ्या बाजूला दसऱ्याच्या दिवशी दीक्षाभूमीवर बाबासाहेब, बुद्धाच्या पुतळ्यांसमोर तो नवस सांगू लागला व फेडू लागला. अंगारे धुपारे करू लागला. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले निरीश्वरवादी तत्त्वज्ञान त्याने पार गुंडाळून ठेवले. बौद्ध होऊनही तो हिंदू मानसिकतेतच जगू लागला आणि स्वतःसाठीच तो 'डिफॉल्टर' सिद्ध झाला. ज्या ऐतिहासिक मैदानावर बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली त्या जागेवर (दीक्षाभूमीवर) दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी लक्षावधी लोक जमा होऊन आपल्या आदरणीय नेत्याच्या स्मृतीस अभिवादन करतात. ज्या मैदानावर दीक्षेचा क्रांतिसोहळा होऊन विचारांची प्रचंड महाशक्ती घेऊन येथून लक्षावधी माणसे देशाच्या, कानाकोपऱ्यात गेली होती त्याच दीक्षाभूमीवर आजही तितकीच गर्दी होते, पण ही गर्दी प्रबोधनाचा कोणता विचार घेऊन गावाकडे जाते ? समाजमनाला विचारांचे खतपाणी मिळते का ? पुस्तकांची दुकाने सोडली तर इतर जत्रा (यात्रा) आणि येथे काय वेगळे आहे ?

कुणी याचे उत्तर असे देतील की, या निमित्ताने लक्षावधी लोक एकत्रित येतात आणि त्यामुळे एका विराट शक्तीचे प्रदर्शन होते. हे जरी खरे मानले तरी

या शक्तीला शिस्तबद्ध कार्यक्रम, विधायक कार्याची जोड, दृष्टी दिली जात नाही तोपर्यंत या महाशक्तीचा उपयोग काय ? या दिशेने विचार व्हावयास हवा.

धम्मचक्र प्रवर्तन दिन कोणता ?

एक मुद्दा मुद्दाम येथे चर्चेला घेत आहे, तो धम्मचक्र प्रवर्तन दिवसाचा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून तथागत बुद्धाचे जीवनवादी तत्त्वज्ञान, नागपूर मुक्कामी, १४ ऑक्टो. १९५६ ला स्वीकारले. त्याला आम्ही 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणतो. त्या १४ आक्टो. ५६ ला अपघाताने हिंदू धर्मातील 'दसरा' किंवा 'विजया दशमी' हा सण होता. आज आम्ही हा दिवस १४ ऑक्टो. १९५६ ला पाळत नाही तर तो दसऱ्याला पाळतो. वास्तविक हाच दिवस निवडण्याचे कारण शोधताना एक गोष्ट लक्षात येते की यामागे बाबासाहेब आंबेडकरांचा स्पष्ट व्यवहारी व विज्ञानवादी दृष्टिकोण होता, त्या दिवशी सार्वजनिक सुटी होती व दुसऱ्या दिवशीही रविवारची किंवा इतर सुटी असावी. दोन दिवसाच्या सुट्यांमध्ये नोकऱ्या करणाऱ्या अनुयायांना सुद्धा या दीक्षासमारंभास येता यावे हा त्या मागील अतिशय स्पष्ट व्यावहारिक दृष्टिकोण होता. परंतु आज काय होते ? आम्ही दसऱ्याच्या दिवशी दीक्षाभूमीवर जमतो आणि १४ ऑक्टो. हा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक दिवस विसरत चाललो. काही मंडळी दसऱ्याच्या दिवसाचे समर्थन करताना म्हणतात की, या दिवशी अशोक विजयादशमी असते. सम्राट अशोकाने या दिवशी आपल्या मुलीला व मुलाला बौद्धधम्माच्या प्रसाराकरिता पाठविले. मग दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो की आम्ही १४ एप्रिल, ६ डिसें. हे बाबासाहेब यांचे जयंती व महापरिनिर्वाण दिवस का पाळतो ? या दिवसासाठी बौद्ध कॅलेन्डर का शोधित नाही ? अर्थात याचे उत्तर त्या मुद्याचे समर्थन करणारांजवळ नाही. यामुळे १४ आक्टो. या तारखेचे आम्हाला विस्मरण होईल आणि कालांतराने बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची दीक्षा कोणत्या तारखेला घेतली होती हा संशोधनाचा विषय होईल.

भिख्खूसंघ काय करतो ?

बुद्ध धम्मातील भिख्खूसंघ हा अतिशय अभ्यासू, विद्वान, समाजाच्या हिताचे निर्णय घेणारा व समाजाचा विश्वास संपादन करून त्यासाठी काम करणारा, सामाजिक तळमळ असणारा, शीलवान प्रबुद्ध विचारांनी समाजाला प्रकाश देणारा व पुढे नेणारा असा असावा असे बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. परंतु तो तसा नसल्याने दीक्षेच्यावेळी बाबासाहेब 'संघ सरणम् गच्छामि' हे त्रिसरणातील एक सरण म्हणणार नव्हते. परंतु त्यांना अभिप्रेत असलेलाच संघ या सरणात आहे असे सांगून त्यांची मनधरणी करावी लागली होती. ही गोष्ट

आजही त्यावेळी अतिशय जवळ उपस्थित असलेली मंडळी सांगते. भिख्खूसंघाने सतत समाजात मिळून–मिसळून कार्य करावे, असे बाबासाहेबांना वाटे. भिख्खू–संघ समाजाला मार्गदर्शक विचार देणारा असावा, तो पुजाऱ्यासारखे एका जागी बसून काम करणारा नसावा असे त्यांना वाटे. याबाबत ऐकलेली गोष्ट येथे सांगायला हरकत नाही. आम्ही औरंगाबाद येथे शिकत असताना प्राचार्य म. भि. चिटणीस हे ही घटना सांगायचे.

बाबासाहेब मिलिंद महाविद्यालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर भेट द्यावयास आले. कॉलेज पाहून झाल्यावर त्यांना भेटणाऱ्यांमध्ये पुतळे बनविणारे एक नामवंत कारागीर (मूर्तीकार) सुद्धा होते. त्यांना पाहताच बाबासाहेब म्हणाले, 'अरे मला या कॉलेजच्या लायब्ररीत ठेवण्यासाठी तथागत बुद्धाचा चांगला पुतळा हवा.' दुसऱ्या भेटीत पुतळा तयार झाल्याचे त्या मूर्तीकाराने बाबासाहेबांना सांगितले. बाबासाहेब पुतळा पाहावयास गेले. मूर्तीकाराने अतिशय मोठा, सुंदर, कमळात बसलेला बुद्धाचा पुतळा तयार केला होता. पुतळा पाहून बाबासाहेब आनंदीत होतील असे मूर्तीकारास वाटले होते. पण घडले वेगळेच. पुतळा पाहताच बाबासाहेब त्याच्या अंगावर ओरडून म्हणाले, 'अरे मला कमळात, सुख चैनीत बसणारा बुद्ध नको होता, चालणारा बुद्ध पाहिजे होता.' सांगायचे तात्पर्य हे की, बाबासाहेब समाजाला एक क्षणही विसरत नव्हते. भिख्खू संघानेही समाजासाठीच कार्य करावे, फक्त पुजाऱ्याचे काम करू नये, असे त्यांना वाटत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे कार्य व विचारांची दिशा जनसामान्याच्या हितासाठी, सुखासाठी होती हे स्पष्ट होते.

□

सामाजिक लोकशाहीचे शिल्पकार

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळून ४२ वर्षे झाली आहेत. परंतु अजूनही या देशातील सामाजिक उच्चनीचता, माणसामाणसातील भेदाभेद कमी झालेला नाही. तो वेगवेगळचा स्वरूपात, कमी अधिक प्रमाणात वेळोवेळी दृष्टोत्पत्तीस पडतो किंवा उफाळून येतो त्यामुळे भारतीय समाजात सामंजस्य आलेले नाही. ही परिस्थिती बदलणे सोपे नव्हते म्हणून सामाजिक समतेसाठी सर्व स्तरांतून नेटाने व जाणिवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सतत वाटे. सामाजिक समतेसाठी परिषदा घेतल्या जातात. मोर्चे काढले जातात किंवा सामाजिक आंदोलनाची भाषा बोलली जाते, तरी त्याबाबत व्हावा तसा गंभीर विचार सर्व स्तरातून अजूनही होत नाही, असे स्पष्ट जाणवते.

हे चित्र आमच्या राजकीय लोकशाहीला भक्कम करणारे नाहीच, उलट अशक्त करणारे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक लोकशाहीची अपरिहार्यता आणि मौलिकता सुमारे साठ-पासष्ट वर्षांपूर्वीच प्रतिपादिली होती. १९२१ ते १९५६ या पस्तीस वर्षाच्या काळात बाबासाहेबांनी पददलितांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने केलेल्या चळवळी व कार्य आणि मांडलेले विचार भारतीय लोकशाहीच्या विकासासाठी व राष्ट्रीयत्वाची भावना भारतीय नागरिकांच्या मनात प्रबळ करण्यासाठी होते. त्याचवेळी त्यांनी सामाजिक लोकशाहीच्या आत्यंतिक गरजेची देशाला जाणीव करून दिली होती.

सामाजिक समता व बंधूभाव

जातीप्रेम व धर्मप्रेम हे लोकशाहीला मारक आहेत. त्या दोहोंमुळे लोकशाहीचा गळा घोटला जाणार आहे, हे बाबासाहेबांनी आपल्या कार्याच्या सुरुवातीपासूनच ओळखले होते. त्यांच्या मते भारतात लोकशाही खऱ्या अर्थाने रूढ करायची असेल तर हिंदू समाजाचा कणा असलेल्या चातुर्वर्ण्य व जातीभेद यांना

मुळापासून नष्ट करणे आवश्यक आहे. म्हणूनच त्यांनी आपल्या आयुष्यभर या दोहोंचा अतिशय कडवटपणे आणि सर्वशक्तीनिशी विरोध केला. त्यांचे ठाम मत होते की, सामाजिक समता, बंधूता आणि न्याय ही तीन मूल्ये स्वातंत्र्याइतकीच लोकशाहीला बळकटी आणण्यासाठी आवश्यक आहेत. भारतीय राज्यघटना घटनासमितीला सादर करताना त्यांनी म्हटले होते, "आपण आपली राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाहीच्या दिशेने नेली पाहिजे. सामाजिक लोकशाही-शिवाय राजकीय लोकशाही टिकणार नाही. या लोकशाहीचा असा अर्थ आहे की, स्वातंत्र्य, समता व बंधूता ही तत्त्वे ज्या जीवनात अंतर्भूत आहेत ते जीवन.

२६ जानेवारी रोजी आपण ज्या जीवनाला प्रारंभ करणार आहोत ते विरोधाने भरलेले आहे. राजकारणात आपणाला समता मिळाली आहे. पण सामाजिक व आर्थिक जीवनात विषमताच दिसेल. हे विरोधात्मक जीवन आपण आणखी किती दिवस जगणार आहोत ! आर्थिक आणि सामाजिक जीवनात समतेचा मार्ग आपण किती दिवस खुंटवून धरणार आहोत ? समतेशिवाय राज-कीय लोकशाही संकटात आल्याखेरीज राहणार नाही. आपण ही विषमता ताबडतोब नष्ट केली पाहिजे. नाहीतर विषमतेने गांजलेले लोक या घटना परिषदेने मोठ्या परिश्रमाने उभे केलेले हे राजकीय लोकशाहीचे मंदिर उद्ध्वस्त केल्यावाचून राहणार नाहीत."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे प्रतिपादन सामाजिक लोकशाहीसाठी आत्यं-तिक कळकळीने मांडलेले मूलभूत विचार होते.

'सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकणार नाही' हे त्यांचे ठाम मत होते. म्हणून त्यांनी आपल्या हयातीत जे जे कार्य केले ते त्यांच्या विचारांना पुष्टी देणारे म्हणूनच राष्ट्रहिताचे व लोकशाहीला पोषक असे होते. लोकशाहीच्या या महान उपासकाने सामाजिक लोकशाहीचा जो मार्ग दाखविला त्याचा विचार करणे अशा अंधारलेल्या वेळी क्रमप्राप्त होते. सामाजिक लोक-शाहीचा हा मार्ग म्हणजे बुद्धाचा धम्म. हिंदू धर्मातील सामाजिक आर्थिक विषमता सांगणारी विचारसरणी ही जशी बुद्धाचा धम्म स्वीकारण्यामागील भूमिका होती, तद्वतच हा विचार येथील सामाजिक लोकशाहीला पोषक असा होता. बौद्ध धम्मापेक्षा लोकशाहीला उपकारक असा दुसरा पर्याय नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. या धम्माने बुद्धिवाद, तार्किकता, अनिश्वरवाद, अनात्मवाद, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व नीतीप्राधान्य या सर्व मूल्यांचा केलेला स्वीकार ही लोकशाही समाजरचनेला आवश्यक, आदर्शरूप अशी तत्वे आहेत. जीवनाचा

व्यवहार्य मार्ग दाखविणारा तो विचार आहे. त्यांच्या 'बुद्ध ॲंड हिज धम्म' या मौलिक ग्रंथात यासंबंधीचे त्यांचे चिंतन अभ्यासकांना या दिशेने मार्गदर्शक ठरते.

धर्म आणि धम्म

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्म आणि धम्म या दोहोंचे केलेले तुलनात्मक स्पष्टीकरण त्यांच्या सामाजिक नीतीभानाचे बोलके उदाहरण आहे. ते म्हणतात, 'धर्म ही वैयक्तिक बाब आहे. सार्वजनिक जीवनाशी त्यांचा संबंध नाही व ते त्याचे कार्यक्षेत्रही नाही. उलट धम्म म्हणजे सद्भाव, सदाचार व माणसामाणसातील चांगुलपणाचे सर्वक्षेत्रांतील संबंध. एकटया माणसाला धम्माची आवश्यकता नाही. परंतु दोन किंवा त्यापेक्षा जास्त माणसे एकत्र येत असतील तर मात्र त्यांना धम्माशिवाय जीवन जगणे कठीण आहे. समाजाला व लोकशाही शासनाला सर्व व्यवहार व शासन सुरळीत चालण्यासाठी धम्माचा स्वीकार हा अपरिहार्य आहे. म्हणूनच बाबासाहेब म्हणाले होते, 'मी भारत बौद्धमय करीन' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्धधम्म' स्वीकारण्यामागील ही भूमिका लक्षात घेतली तर बऱ्याच बाबी स्पष्ट होत जातात. हा धम्म स्वीकारण्यामागे सामालोकशाहीची बळकटी हे कारण तर आहेच पण दुसरेही महत्त्वाचे कारण म्हणजे लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला हक्कांबरोबरच कर्तव्याची जाणीव असावयास हवी. ही कर्तव्याची जाणीव धम्म करून देतो आणि त्या कर्तव्याच्या जाणिवेस तात्त्वीक अधिष्ठानही देतो. या संबंधात बाबासाहेब म्हणाले होते की, "मी माझ्या लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली आहे. आता त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देणे आवश्यक आहे. कर्तव्याशिवाय हक्क हे असुरक्षित असतात."

हक्क व कर्तव्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे वरील विधान फक्त त्यांच्या अनुयायांसाठीच नाही तर लोकशाहीवर दृढविश्वास असणाऱ्या प्रत्येक नागरिकांसाठी आहे, राष्ट्राला व प्रत्येक नागरिकाच्या मनात राष्ट्रवाद निर्माण करण्यासाठी कर्तव्यांची जाणीव असावयास हवी. ती कर्तव्ये व नीतीमत्ता बौद्धधम्मात सांगितली आहे. कारण नीतीला धम्मात प्रथम स्थान आहे. इतर धर्मात देव, आत्मा, पूजापाठ, प्रार्थना, यज्ञ व इतर कर्मकांड इत्यादींना प्रथमस्थान आहे. नीतीला दुय्यम स्थान आहे. धम्मातील नीती ही माणसाला माणसावर प्रेम करायला सांगते. तसे झाले नाही तर समाजातील दुःख निवारण होणार नाही. एकमेकांचे वैर संपणार नाही. या जाणिवेपोटी ही नीती जन्माला आलेली आहे, देवाच्या

आज्ञेने नाही. देवाला संतुष्ट करण्यासाठी नव्हे किंवा मोक्ष मिळावा म्हणूनही नव्हे. समाजहितासाठी एकमेकांवर प्रेम करावे. त्यामूळेच बंधुभाव वाढून राष्ट्रीय निर्माण होईल व जाती, धर्म पंथाला पर्यायाने विषमतावादी वृत्तीला मूठमाती मिळेल. समता, बंधूता, न्याय ही नीतीचीच दुसरी नावे आहेत, असे बाबासाहेबांचे धम्माच्या बाबतीत विश्लेषण आहे.

बाबासाहेबांनी सामाजिक लोकशाहीला पूरक असणारी दुसरी महत्त्वाची कोणती गोष्ट केली असेल तर ती भारतीय राज्यघटनेचे लिखाण होय. ज्या देशात सामाजिक विषमतेला तेथील धर्माचे प्रशस्तीपत्र आहे, ज्या देशात व्यक्तीचे मोल त्याच्या जन्मजातीने मोजल्या जाते, अशा देशात एका माणसाला एक मत व त्या मताची किंमतही सारखीच ही ऐतिहासिक तितकीच मौलिक गोष्ट राज्यघटनेत नमूद करून राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीची जोड देण्याचे अपूर्व काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशातील सामाजिक प्रश्न आपोआपच सुटतील किंवा आम्ही ते तात्काळ सोडवू असा भ्रम काही नेत्यांचा त्या काळात होता. पण केवळ स्वातंत्र्य मिळाल्याने सामाजिक विषमता नष्ट होईल, जातपात संपेल व भारतीय समाज एकजिनसी होऊन लोकशाही शासनास अनुरूप होईल, असा समज करणे सपशेल चुकीचे होते. चातुर्वर्ण्य व जातीभेदाने आपल्या देशाला शेकडो वर्षे पारतंत्र्यात राहावे लागले. आपले स्वातंत्र्य आपणास कधीही दीर्घकाळ टिकवून धरता आले नाही. ही वस्तुस्थिती डोळ्याआड करून चालणार नाही.

राजकीय लोकशाहीत समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना समान वाटेकरी करता यावे म्हणून जातीयतेने जोपासलेली विषमता समूळ नष्ट करण्यासाठी स्वातंत्र्यासारखे जनआंदोलन येथे उभे राहावयास हवे होते असे बाबासाहेबांना वाटे. पण तसे घडले नाही किंवा तसा लक्षणीय प्रयत्नही झाला नाही. वास्तविक हा प्रश्न काही मागास जाती-जमातीकरिता मर्यादित नव्हता. या देशातील प्रत्येक नागरिकाचा हा प्रश्न होता. कारण माणसांमाणसांमध्ये द्वेष पसरवून त्यांना एकमेकांपासून तोडण्याचे राष्ट्रघातकी प्रयत्न येथे सतत होत होते. आजही या लोकशाहीत धर्माच्या नावावर मते मिळविण्याचे कटकारस्थान सुरू आहे. येथील अशिक्षित, गरीब, भाबड्या जनतेला धर्माच्या नावाने गुंगी आणून या लोकशाहीला सुरुंग लावण्याचे, अराजकता माजविण्याचे काम प्रयत्नपूर्वक चालत आहे. बाबासाहेबांनी जातीची उच्चनीचता न पाहता सारख्या गुन्ह्यांना सारख्या शिक्षा देण्यासाठी इंडियन पिनल कोडची तरतूद व अस्पृश्यता मानणे हाही कायद्याने गुन्हा ठरविला.

बनारस हिंदू विद्यापीठातील विद्यार्थ्यांसमोर नोव्हेंबर ५६ मध्ये बोलताना बाबासाहेब म्हणाले होते, 'प्रत्येक भारतीय नागरिकास समान मूल्य आणि समान प्रतिष्ठा देणारी राज्यघटना आणि जन्मजात वर्ण व जातीवर उच्चनीचता ठरविणारे धर्मग्रंथ ही दोन्हीही एकाच देशात एकत्र नांदू शकत नाहीत.

या विधानावरून प्रत्येक भारतीय नागरिकासही समान सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सामाजिक लोकशाही बळकट करण्यासाठी चाललेले प्रयत्न हे त्यांच्या जाज्वल्य राष्ट्रवादाचे उदाहरण म्हणून देता येईल.

□

आंबेडकरवाद पुनरुज्जीवित करून तो तेवत ठेवता येईल का ?

मित्रहो ! परिसंवादासाठी हा विषय ठेवताना संयोजकांनी थोडासा विचार करावयास हवा होता, तो केलेला दिसत नाही म्हणून या परिसंवादाच्या संयोजनाबद्दल आणि मला त्यात सहभागी केल्याबद्दल मी संयोजकांचे आभार मानणार नाही. मी असे का म्हणतो याचे उत्तर माझ्या भाषणातून देण्याचा प्रयत्न करतो.

वरील विषयात आंबेडकरवादाला पुनरुज्जीवित करण्याचे काम संयोजकांनी आपणावर टाकले आहे. याचा अर्थ असा की आंबेडकरवाद हा मेलेला, विझलेला आहे आणि त्याला पुन्हा जीवंत करून ती विझलेला आंबेडकरवाद तेवत ठेवण्याचा विचार आम्ही या परिसंवारात करणार आहोत. परंतु आंबेडकरवाद मेलेला आहे का ? हाच खरा प्रश्न आहे. माझे स्पष्ट मत आहे की आंबेडकरवाद मेलेला किंवा विझलेला नसून आमचे मेंदूच मेलेले आहेत. आमची विचारबुद्धी कुंठीत झाली आहे. आमच्यातील कर्तव्य आणि कर्तृत्व विझलेले आहे. मग जो मेलेला अथवा विझलेला नाही, त्याला जीवंत करण्याचा व नंतर तेवत ठेवण्याचा प्रश्नच कुठे येतो ?

मित्रहो ! आम्हाला आंबेडकरवाद समजलेला नसल्याने तो मेला आहे असे आम्हास वाटते. यात आंबेडकरवादाची काय चूक ? सूर्य माध्यान्हावर तळपत असूनही आंधळचाला जसा सर्वत्र अंधारच दिसतो तशी आमची स्थिती झालेली आहे. आम्ही आंधळे, बहिरे झालो आहोत.

आम्ही वरील विषयासारखे विषय चर्चेला का घेतो ? याचे कारण आम्ही डोक्याला फारसा ताण देत नाही. आंबेडकरी विचारसरणी कोणती याचे भान आम्हाला नाही. त्यामुळे आमच्या हातून अशाप्रकारच्या चुका होतात. म्हणून

'आंबेडकरवाद' म्हणजे काय हे प्रथम समजवून घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

'आंबेडकरवाद' नावाचे तत्त्वज्ञान किंवा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत: कधीही सांगितलेला नाही. परंतु त्यांच्या सामाजिक, आर्थिक धार्मिक आणि राजकीय कार्यातून आणि वेळोवेळी मांडलेल्या विचारांतून, त्यांच्या विपुल मौलिक लिखाणातून जी विचारसरणी विकसित होत गेली त्याला आपण 'आंबेडकरवाद' म्हणतो.

प्रामुख्याने त्यांनी केलेले सामाजिक लढे, आंदोलने, स्वतंत्र भारताची त्यांनी लिहिलेली घटना, लोकशाहीचा भक्कमपणे केलेला स्वीकार, धम्मचक्र प्रवर्तन आणि त्यांनी लिहिलेला 'बुद्ध अँण्ड हिज धम्म' आणि इतरही ग्रंथ या सर्वाकडे चिकित्सक, अभ्यासू, व जिज्ञासू दृष्टीने पाहिले की यात एका सूत्रबद्ध विचारांची शृंखला दिसून येते. आणि तीच पुढे विकसित होत जाते. याच विचारसरणीला आपण आंबेडकरवाद म्हणतो. आंबेडकरवाद म्हणजे जीवनाच्या गतीशीलतेशी आणि नीतीशीलतेशी निगडीत असलेली जीवनाच्या विज्ञानाची समीकरणे. विज्ञानाची समीकरणे तिन्हीही काळात सत्य असतात. जसे हैड्रोजन आणि ऑक्सीजनच्या संयोगीकरणाने ($H_2+O_2=2H_2O$) पाणी होते, हे समीकरण जसे त्रिकालबाधित सत्य असते त्याप्रमाणे 'आंबेडकरवाद' या जीवनवादी विज्ञानाच्या समीकरणाचे आहे. आंबेडकरवाद हा त्रिकालाबाधित सत्य आहे. तो माणसाला पुढे नेणारा विचार आहे. माणसाला गती व नीती देणारा विचार आहे. काळ कसाही बदलला तरी त्याचे महत्त्व, सत्यता कमी होणार नाही किंवा त्यात फरकही पडणार नाही.

आंबेडकरवाद आत्मा व परमात्म्याचे अस्तित्त्व नाकारतो. आंबेडकरवादाने जन्माचे फेरे आणि स्वर्ग, नरकाची कल्पना खुळी व कपोलकल्पित ठरविली आहे. आंबेडकरवादाला अंधश्रद्धा, चमत्कार, कर्मकांड मान्य नाही. आंबेडकरवाद विषमता, गुलामगिरी, अन्याय, आप–आपसातील वैर द्वेष नाकारतो. सामाजिक विषमतेचा पुरस्कार करणारा ब्राह्मण्यवाद तद्वतच आर्थिक विषमतेचा पुरस्कार करणारी भांडवलशाही यांना आंबेडकरवाद अग्रकमांकाचे शत्रू मानतो.

समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय ही जीवनमूल्ये आंबेडकरी विचारसरणीचा गाभा आहेत. आंबेडकरवादात प्रज्ञा, शील आणि करुणेला अग्रस्थान आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीतील हा वरील नकार व स्वीकार माणसाला विकासाकडे झेपावत नेतो. त्याला सुख, शांती प्रदान करतो.

असे हे चिरकाल चैतन्यशील असलेले तत्त्वज्ञान मेलेले आहे असे गृहीत धरणे हा शुद्ध अविचार, वेडेपणा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या विचारांनी आम्ही वागावे म्हणजे आम्ही आंबेडकरवाद पुनरुज्जीवित करून तेवत ठेवू शकू कारण त्याखा आपली गरज निर्माण झाली आहे, असा अर्थ या विषयात ध्वनीत होतो. अर्थातच असा विचार करणे चूक आहे. आज आंबेडकरवादाला आपली गरज नाही. आपणास आंबेडकरी विचारसरणीची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. आंबेडकरवाद आपण आचरणात आणला तरच आपला वर्तमान व भविष्य उज्ज्वल होईल. आपण त्याप्रमाणे वागलो नाही तर मात्र भूतकाळासारखे आपण काळचाकुट्ट अंधारात वर्तमान आणि भविष्यकाळात चाचपडत राहू. आंबेडकरी विचारसरणीने आपणास जगण्याची नवी दिशा दाखविली आहे. जीवनाचा सरळ, समृद्ध, धोपट मार्ग आधोरेखित केला आहे त्याच्याप्रमाणे आचरण केले नाही तर मात्र आपणच जिवंतपणी आयुष्यभर मरत राहू. आपल्या हजारो पिढचा जशा भूतकाळात बर्बाद झाल्यात, त्याचीच पुनरावृत्ती होईल. म्हणून आंबेडकरवादाला पुन्हा जीवंत करण्याची भाषा करण्यापेक्षा आता आपण आपल्यातच प्राण ओतू, चैतन्यमय होऊ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले तत्त्वज्ञान आचारात, विचारात आणू. कारण आज आम्हालाच त्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. बाबासाहेबांच्या हयातीत आम्हाला कशाचीच काळजी नव्हती. कारण बाबासाहेबांना सर्व समाजाची आणि या देशाचीही काळजी होती. बाबासाहेब स्वतःच चैतन्य होते. एक आंदोलन होते. या मेलेल्या समाजात त्यांनी प्राण ओतला. अस्तित्वहीन समाजाला युगव्यापी, विश्वव्यापी अस्तित्व दिले. आंधळचा, मुक्या, बहिऱ्या समाजाला डोळस केले, त्याला वाचा दिली आणि जगातील महान तत्त्वज्ञान समजण्याचे व ऐकण्याचे तारतम्य दिले. सद्विचार मरत नसतो, परंतु तो न समजणारे आणि सुखकर विचार आचरणात न आणणारे क्षणोक्षणी, पदोपदी मरत असतात. या अर्थाने आम्ही मेलेले आहोत. आम्हालाच जीवंत होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार हा माणसाच्या सुखासाठी, शांती आणि प्रगतीसाठी असल्याने तो काळाच्या अंतापर्यंत जीवंत राहणारा आहे.

मित्रहो ! मी अगोदर म्हटल्याप्रमाणे आज बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे आचरण करण्याची गरज का निर्माण झाली याचा विचार झाला पाहिजे. आज आम्हीच आम्हाला कठोरपणे तपासण्याची, अन्तर्मुख होऊन आत, बाहेर आणि मागे–पुढे पाहण्याची वेळ आली आहे, नव्हे आम्ही ती आणली आहे, स्वतःवर

ओढवून घेतली आहे. कारण बाबासाहेबांनी सांगितलेली मार्गदर्शक तत्त्वे आम्ही पूर्णपणे विसरलो आहोत. आपण पुन्हा रुढी, परंपरेप्रमाणे वागू लागलो आहोत. आपण पुन्हा मागील देवा–धर्माच्या पूजा अर्चा सुरू केल्या आहेत. फरक एवढाच की बाबासाहेब व बुद्धाच्या प्रतिमाही त्या पूजेत आम्ही ठेवतो. हे आम्ही पार विसरलो की बाबासाहेब किंवा तथागत बुद्ध हे इतर देवांप्रमाणे पुजेची साधने नाहीत तर त्यांचे विचार रोजच्या आचरणात आणल्यानेच त्यांची पूजा होणार आहे. त्यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त होणार आहे. आमचे अंगारे–धुपारे, उपास तापास सुरू झाले आहेत. ते बंद झाले पाहिजेत. चमत्काराकडे पुन्हा आम्ही ओढल्या जाऊ लागलो. विक्तुबाबा, सैलानी बाबा, ताजुद्दीनबाबा किंवा तत्सम वेडच्या माणसांची भक्ती आणि पूजा करू लागलो. हे सारे सोंग–ढोंग थांबले पाहिजे. हे आमचे आचरण आम्हाला अधोगतीकडे, अंधाराकडे, पराभवाकडे नेणारे आहे. मला तर असेही समजले की कुणा मधुकर गजभीये नावाच्या माणसाच्या अंगात बुद्ध आणि आंबेडकर येतात. अंगात येणे हा फसवेगिरीचा, भोंदूपणाचा प्रकार आहे. अशा ढोंग-धतुऱ्यांना आम्ही फसू लागलो आहोत. या गजभीयेने अशा फसवेगिरीने चांगली माया जमवून गावाला शेती–भाती घेतली. बाबासाहेबांनी आमच्या भल्यासाठी ज्या गोष्टींचा आम्हाला त्याग करायला सांगितला होता त्या गोष्टी आम्ही अद्याप पूर्णपणे सोडू शकलो नाही, जे करायला सांगितले होते तेही आम्ही पूर्णपणे करू शकलो नाही. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणविणारे शिकले सवरलेले लोकसुद्धा नवस, उपास–तापास करतात. असे प्रसंग पाहिले की मन विदीर्ण होते, ओक्सावोक्सी रडू लागते. आणि अनावर रागही येतो. एका बाजूला आंबेडकरवादी म्हणायचं आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्या विचारांच्या विरोधात वागायचं, अशा दुटप्पी वागणाऱ्यांना धडा शिकविण्याचंही धाडस आमच्यात आलं पाहिजे. तोही आंबेडकरवादी होण्याचा एक भाग आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा संदेश दिला. या संदेशाचे आम्ही पालन करतो का ? आमची मुले, मुली नियमित शाळेत जातात का ? त्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण काय ? गुणात्मक टक्केवारी किती ? या व अशाच प्रश्नांचे भान आम्हास असावयास हवे. शिक्षणाचं महत्त्व बाबासाहेबांना समजलं होतं. शिक्षणाशिवाय येथील दीन दलितांना तरणोपाय नाही हे बाबासाहेबांनी नेमकं हेरलं होतं. शिक्षणाने माणूस शहाणा होतो, त्याला जगाकडे पाहण्याची दृष्टी प्राप्त होते, हेही त्यांना उमगलं होतं. म्हणूनच त्यांनी आपल्या समाजाला बंद असलेली शिक्षणाची दारं उघडून

दिली. तद्वतच त्यांनी संघटीत होण्याचे महत्त्वही आम्हांला सांगितले. त्यांच्या हयातीत आमची अभेद्य, पोलादी संघटना होती. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर मात्र आमच्या संघटनेचे तीन-तेरा व नऊ-अठरा झाले. अनेक गटागटांत अनेक पुढारी झाले. त्यामुळे संघटनेची विरोधकांवर असलेली जरब नष्ट झाली. विघटनामुळे आम्ही अशक्त झालो, विरोधक आपोआपच सशक्त झाले. या अशक्ततेमुळे आमच्यातील संघर्ष नष्ट झाला आणि म्हणून आमच्यावरील अन्याय अत्याचार वाढलेत. सामाजिक अत्याचार वाढलेत. अनेक पातळ्यांवर आमची आर्थिक कोंडी करण्यात आली, अजूनही ती करण्यात येत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांअन्याय वाढलेत. कितीही मोठा अधिकारी का असेना, त्यांचे विरुद्ध गोपनीय अहवाल लिहिणे, त्यांच्या पदोन्नत्या रोखणे, त्यांच्या अडचणीच्या जागी बदल्या करणे, त्यांच्यावर विभागीय चौकशा लादणे, त्यांचा परीविक्षाकाल वेळेवर न संपविणे ह्या व अशाच त्रासदायक गोष्टींना मागासवर्गीय जाती, जमातीच्या लोकांना सतत तोंड द्यावे लागते. त्यांच्या राखीव जागांची टक्केवारी तर भरल्या जातच नाही उलट, सरकारचे जावई म्हणून त्यांना हिणविल्या जाते, त्यांचा छळ होतो. ही कागदावरची, मानसिक जातीयता पहिल्या जातीयतेपेक्षा तसूभरही कमी नाही. या सर्वांवर आंबेडकरवादाजवळ उपाय आहे. माणसाच्या जगण्यामरण्याच्या प्रश्नांची शास्त्रशुद्ध उत्तरे आंबेडकरवादात सापडतात. म्हणून आंबेडकरवाद समजावून घेण्याची आणि तो आचरणात आणण्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या पिढीवर आहे.

अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचेही बाबासाहेबांनी सांगितले होते. त्यासाठी त्यांनी आम्हास स्वाभिमान शिकविला स्वत्वाची जाणीव करून दिली. तद्वतच आमच्या दास्याची, गुलामगिरीचीही जाणीव करून दिली. बाबासाहेब हयात असतांना अशा संघर्षाच्या अग्रभागी, कप्तानपदी ते असायचे. त्यांच्यात एकांगी लढण्याची शक्ती होती. परंतु आम्ही संघटीतपणे लढलो पाहिजे, कारण आमचा शत्रू फार शक्तिशाली आहे आणि आम्ही अशक्त, दुर्बल आहोत. आमच्यातील संघर्षाची धार पार बोथट झाली आहे. आम्ही विभक्त असल्याने विजयाचे निकाल आमच्या बाजूने लागत नाहीत.

शेवटी मला नम्रपणे सुचवायचे आहे की आपणास आणि या देशांस सुस्थितीत ठेवायचे असेल, प्रगतीपथावर नेऊन शांती प्रस्थापित करायची असेल तर सर्वांनीच सच्चे आंबेडकरवादी झाले पाहिजे. त्याचीच आज आम्हाला गरज आहे.

□

बौद्धांच्या सवलती व पंतप्रधानांचे वक्तव्य

बौद्धांना सवलती देता येणार नाहीत, अशा आशयाचे निवेदन करून पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी अल्पसंख्यांक, दुर्बल घटकांबाबतची स्वत:ची व जनतापक्षाची भूमिका जाहीर केली की काय असे वाटते. बौद्धांना सवलती का मिळाव्या, नव्हे त्या आवश्यक आहेत यावरील मुद्देही मांडून झाले आहेत. हा प्रश्न बौद्धांच्यादृष्टीने किती जिव्हाळ्याचा आहे हेही त्यांनी काढलेल्या ठिकठिकाणचे हजारोंचे मोर्चे, जाहीर सभा, सर्व बौद्ध संघटनांच्या नेत्यांची निवेदने, वक्तव्ये यांनी सिद्ध केले आहे. मध्यंतरी पंतप्रधान महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले असतांना त्यांच्यापुढे दलित पँथरने निदर्शने केली. दुसऱ्या काही संघटना व पक्षांच्या बौद्ध नेत्यांनी निवेदने दिलीत. त्यावेळी पंतप्रधानांनी लोकसभेचे अधिवेशन संपल्यावर चर्चेला बोलाविते असे म्हटले होते व त्याप्रमाणे दिनांक १७-८-७७ ला त्यांनी ती बैठक बोलाविली. त्या बैठकीत पंतप्रधान मोरारजी देसाई जे बोलले व त्याचा जो वृत्तांत प्रकाशित झाला किंवा त्या बैठकीस उपस्थित असलेल्या बौद्ध प्रतिनिधींकडून आम्हाला कळला तो अत्यंत खेदजनक व मनस्वी चीड आणणारा आहे.

पंतप्रधानाचे वक्तव्य

"तुम्ही बौद्ध व्हा असे तुम्हाला कोणी सांगितले होते. मी डॉ. आंबेडकरांना चांगले ओळखत होतो. ते जिवंत असते तर त्यांनी सवलतींची व हक्कांची मागणी केलीच नसती. तुम्ही हिंदु धर्मास शिव्याही देता आणि त्यांच्याकडून सवलतीही मागता, तुम्ही एकाच वेळी दोन फायदे पदरात पाडून घेऊ शकत नाही." ही विधाने पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी शिष्ट मंडळाच्या बैठकीत केली. या विधानांनी पंतप्रधानांच्या मनातील प्रतिगामी वृत्तीच स्पष्ट होते. 'तुम्ही बौद्ध व्हा असे तुम्हाला कोणी सांगितले होते ?' या वाक्याने हे सिद्ध होते की कोणीही हिंदू धर्म न सोडता अस्पृश्य म्हणून तेथेच तुम्हो राहा, चातुर्वर्ण्याच्या विरोधात कोणतीही पाऊले उचलू नका, झालेले अन्याय

अत्याचार निमूट सहन करा, असाच त्याचा अर्थ निघतो. वरील वाक्य उच्चारून पंतप्रधानांनी अप्रत्यक्षपणे धर्मनिरपेक्षताही झुगारून दिली आहे. आणि म्हणून चातुर्वर्ण्याला प्रोत्साहन देणारे व धर्मनिरपेक्षता झुगारून देणारे हे वक्तव्य घटनेच्या विरोधात आणि लोकशाहीच्याही विरोधात आहे हे सिद्ध होते.

मागसवर्गीय जाती-जमातींच्या यादीत बौद्धांना समाविष्ट करण्याचा व नंतर त्यांना सवलती देण्याचा विचार पंतप्रधानांनी बोलून दाखविला, हा विचारही अत्यंत चुकीचा आहे. मागास जाती-जमातींच्या यादीत बौद्धांना समाविष्ट केले तर त्यांना मिळणाऱ्या सवलतींचे प्रमाण विभागल्या जाईल व ते अतिशय अल्प असेल. अर्थातच बौद्धांना सरळ सरळ, फसवण्याचा हा प्रकार आहे. तसे करणेही गैर आहे. पूर्वी अस्पृश्य ठेवलेले जे १९५६ नंतर बौद्ध झाले म्हणजे त्यांची आर्थिक स्थिती एकदम पालटली असा त्याचा अर्थ होतो काय ? बौद्ध विद्यार्थ्यांनी किंवा इतरांनी सवलती घेण्यासाठी बौद्ध ऐवजी 'महार' लिहिले तर मात्र सवलती देण्यास सरकार तयार आहे. यावरून सरकारची जातीयवादी दृष्टी स्पष्ट जाहीर होते.

बौद्ध होणे म्हणजे हिंदु धर्मातील चातुर्वर्ण्याचे जोखड झुगारून देऊन अंधश्रद्धा, पुनर्जन्म, पूर्वजन्म, चमत्कार, देव-धर्म, रूढी, परंपरा आदि गोष्टी नाकारणे व विज्ञानवाद, तर्कवाद, नीतिवाद, अनिश्वरवाद, तसेच समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय आदींचा स्वीकार करणे होय. ही क्रांती आज भारतीय स्वातंत्र्य, एकात्मता, व लोकशाही दृढ करण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असूनही पंतप्रधानांसारख्या अतिशय जबाबदार लोकप्रतिनिधींनी 'तुम्हाला बौद्ध व्हा असे कोणी सांगितले होते ?' असे उद्‌गार काढावे म्हणजे त्याचे आश्चर्य वाटत नाही, तर अनावर संताप येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सवलती

भारतीय दीनदलितांच्या उत्थानासाठी सामाजिक, शैक्षणिक, व आर्थिक समता असणे आवश्यक होते. म्हणून चातुर्वर्ण्य सांगणारा, पर्यायाने विषमता सांगणारा हिंदू धर्म सोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली आपल्या लाखो अनुयायांसोबत 'बौद्ध धम्म' स्वीकारला आणि सामाजिक समतेचा मार्ग मोकळा केला.

अस्पृश्य म्हणून ज्या कोटयवधी लोकांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. त्यांना शैक्षणिक सवलती मिळवून देऊन आयुष्यभर त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी

ते झगडले आणि मग ते आज असते तर त्यांनी सवलतींची व हक्कांची मागणी केली नसती, असे म्हणणे हास्यास्पद नाही काय ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाची मौलिक मागणी मागे घेऊन आणि पुणे करारात म. गांधींना जीविताचे दान देऊन आपल्या समाजाला या सवलती मिळवून दिल्या. वास्तविक पाहता या सवलतींमुळे स्वतंत्र मतदार संघाने मिळणारे फायदे मिळणार नव्हते, हे बाबासाहेबांना ठाऊक होते. परंतु जोपर्यंत या समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आदी प्रश्न सुटत नाही, पर्यायाने जीवनाच्या सर्वांगांनी त्याचे उत्थान होत नाही, तोपर्यंत या देशात सामाजिक लोकशाही येऊ शकणार नाही आणि जोपर्यंत या देशात खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय अशी बुद्ध तत्त्वज्ञानावर आधारित सामाजिक लोकशाही येत नाही, तोपर्यंत येथील राजकीय लोकशाहीला अर्थ राहत नाही, असे बाबासाहेबांचे ठाम मत होते. म्हणून येथे हजारो वर्षांचा जो जुलूम काही जाती-जमातींना सोसावा लागला व मागासलेपणा त्यांच्या वाटचाला आला अशा समाजघटकांना त्यांनी सवलती मिळवून दिल्या. या सवलती ह्या समाजाला मिळतात म्हणजे त्यांच्यावर कोणी त्या देऊन उपकार करतो असे नाही. तर भारतीय समाज शरीराचा हा हेतुपुरस्सर दुर्बल ठेवलेला भाग आज सबल करणे आवश्यक आहे. त्या शिवाय देशाच्या प्रगतीचा गाडा पुढे गेला असे म्हटल्या जाणार नाही.

भारतीय स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव साजरा झाला. त्यावेळी एका प्रसिद्ध विचारवंताने म्हटलेले मला आठवते की, स्वातंत्र्याचे रौप्य महोत्सव विद्युत दिवे लावून साजरे होत नसतात तर गरिबांच्या झोपडीत उजेड आहे की नाही, त्यांच्या अंगावर त्यांची अब्रू झाकायला पुरेसा कपडा आहे की नाही, त्यांना पोटभर अन्न मिळते की नाही व त्यांचे जीवित व अब्रू सुरक्षित आहे की नाही, तसेच त्यांना माणूसकीची वागणूक मिळते की नाही हे जेथे पाहून त्यांच्या हक्कांची जपणूक होते तेथेच स्वातंत्र्याचे महोत्सव साजरे करण्याचा शासनाला अधिकार असतो.

तसेच निवडणुका घोषित करून व त्या पार पाडून देशात लोकशाही आहे, असेही म्हणता येत नाही. जोपर्यंत येथील अल्पसंख्याकांच्या सर्व हक्कांचे संरक्षण होत नाही. शोषक व शोषित हा भेद नष्ट होत नाही तोपर्यंत राजकीय लोकशाहीच्या कक्षाही रुंदावत नाहीत. दलितांचे उत्थान किती झाले यावरच आपल्या राष्ट्राच्या प्रगतीची मोजणी व्हावयास पाहिजे. तळागाळाचा माणूस

वर यावा हे शासनाचे ध्येय असेल आणि त्याप्रमाणे शासनयंत्रणा व कायदे रावत असतील, तरच या देशाचे भवितव्य उज्ज्वल आहे.

परंतु आज तरी तसे होतांना दिसत नाही. येथे संपूर्णक्रांतीची भाषा नुसती बोलली जाते. पण ही संपूर्णक्रांती कोणती हे बोलणारांनाही ठाऊक नाही. त्या क्रांतीची रुपरेखाही त्यांच्या डोळ्यासमोर स्पष्ट नाही. नुसते निवडणुकीपुरते जनतेची दिशाभूल करणारे चांगले फसवे जाहीरनामे, घोषणा व भुरळ पाडणारी भाषणे तयार आहेत. परंतु दलितांच्या कोणत्याच भल्याचा विचार येथे होतांना दिसत नाही. आज पददलित समाज व बौद्धांची आर्थिक स्थिती सुधारली आहे काय ? त्या समाजात शिक्षणाची टक्केवारी किती झाली ? आजपर्यंत देण्यात आलेल्या सवलतीप्रमाणे सर्व खात्यातील राखीव जागा व सवलती त्यांना मिळाल्या आहेत का ? या व अशाच प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे पंतप्रधानांनी अगोदर शोधावयास हवी होती व नंतर जबाबदारीने वक्तव्य करावयास हवे होते, पण तसे काही झाल्याचे दिसत नाही.

बौद्धांची आजची स्थिती

हजारो वर्षे देवाधर्माच्या नावाखाली चातुर्वर्ण्याच्या माध्यमातून भरडल्या गेलेल्या या समाजाची आजची स्थिती जीवनाच्या कोणत्याही अंगाने पाहिली तर ती समाधानकारक तर सोडाच, अत्यंत दयनीय अशी आहे. जे सामाजिक अन्याय, अत्याचार कित्येक वर्षापासून होत होते ते स्वातंत्र्योत्तर काळातही चालू आहेत, नव्हे वाढले आहेत. त्याचे कारण असे की आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली शिकवणूक, तत्त्वज्ञान हा समाज समजू लागला, त्याप्रमाणे वागू लागला. त्याचा स्वाभिमान जागृत झाला. म्हणून तो अन्याय, अत्याचार सहन करून घेण्यास तयार नाही. त्याला स्वत्वाची जाणीव झाली आहे. आणि त्यांच्या या वागण्यामुळे ज्यांच्या हातात सत्ता, संपत्ती आहे व जो हिंदुत्वनिष्ठ जातीयवादी आहे त्यांचा अहं दुखावू लागला आहे. म्हणून आज भारतात काय आढळते तर ठिकठिकाणी दलितांवर व बौद्धांवर अन्याय, अत्याचार, बहिष्कार, जुलूम, त्यांची कत्तल. रोजचा उगवणारा सूर्य आपल्या प्रकाशकिरणांबरोबर याच बातम्या घेऊन येतो. आणि या सर्वांबद्दल येथील शासन मात्र काहीच करीत नाही.

बेलछी हत्याकांड

उदाहरणच द्यावयाचे झाल्यास बेलछी हत्याकांडाचे देता येईल. बेलछीला दलितांना जिवंत जाळण्यात आले. त्यावर केंद्रीय गृहमंत्र्यांसारख्या जबाबदार

व्यक्तीने 'ती घटना म्हणजे दोन गुंडांच्या टोळीचे भांडण होते' असे बेजबाबदारपणाचे उद्‌गार काढावे अशा प्रकारच्या अत्त्याचाराची हजारो उदाहरणे देता येतील. यावरून हे सरकार किती जातीयवादी आहे हे सिद्ध होते, असो.

बौद्धांच्या सवलती आणि पँथरचे आंदोलन

पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी बौद्धांना सवलती नाकारण्याचे उद्‌गार काढताच इतर भारतीय बौद्धांसारखे किंवा त्यांच्या पुढे जाऊन दलित पँथरने त्वेषाने झेप घेतली. त्यासाठी १३ जुलै १९७७ पासून सुरू केलेल्या आंदोलनाचा एक भाग म्हणून नागपूर, वर्धा, हिंगणघाट, यवतमाळ, औरंगाबाद, नांदेड, बीड, उस्मनाबाद, वैजापूर, पुणे, मुंबई, कोल्हापूर इ. ठिकाणी मोर्चे, जाहीर सभा, घेराव, शहरे व महाविद्यालये बंद करून निषेधाची पहिली सलामी दिली. त्यांनी आपल्या दहा मागण्यांमध्ये 'बौद्धांना सवलती मिळाल्याच पाहिजेत' या मागणीला अग्रक्रम दिला आहे. पँथरच्या या आंदोलनात भारतीय बौद्ध आणि हक्कांसाठी डावलल्या जात असलेले इतरही अल्पसंख्यांक सहभागी होत आहेत, होणार आहेत. जर पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी आपल्या या अविचारी धोरणाचा फेरविचार करून बौद्धांना त्वरित सवलती जाहीर केल्या नाहीत तर मात्र आंदोलनाचा भडका उडाल्याशिवाय राहणार नाही. हा प्रश्न सर्व बौद्धांच्या जीवन–मरणाचा प्रश्न असल्याने आपापसांत त्यांचे कितीही मतभेद असले तरी ते एकत्रित आल्याशिवाय राहणार नाहीत. मग मात्र पेट घेतलेल्या त्या आंदोलनाचे स्वरूप व दिशा कशा राहतील हे आताच सांगता येत नाही.

□

मराठवाडा विद्यापीठाला
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव का ?

दलित पँथरने गेल्या १३ जुलै १९७७ पासून जे राज्यव्यापी आंदोलन सुरू केले आहे, त्याचा वेग वाढत आहे. १२ ऑगष्ट ७७ मुंबईला मंत्रालयावर एका विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्यापूर्वी पँथरने औरंगाबाद, नांदेड, बीड, उस्मानाबाद, वैजापूर, पुणे, मुंबई, नागपूर, अमरावती, हिंगणघाट, वर्धा इत्यादि ठिकाणी मोर्चे, घेराव, जाहीर सभा व जेल भरो कार्यक्रम करून आंदोलनाची सुरवात केली आहे. पँथरच्या या आंदोलनातील मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. (१) अनुसूचित जाती–जमातींना मिळणाऱ्या सर्व सवलती बौद्धांना मिळाल्याच पाहिजेत, (२) मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिलेच पाहिजे, (३) महागाई निर्देशांकानुसार दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीत वाढ झालीच पाहिजे, (४) दहा + दोन + तीन हा जनताद्रोही अभ्यासक्रम रद्द झालाच पाहिजे, (५) सर्व शासकीय–निमशासकीय संस्थांमधून मागास वर्गीयांच्या राखीव जागा भरल्याच पाहिजे, (६) वर्णव्यवस्थेला प्रोत्साहन देणाऱ्या सर्व ग्रंथांवर बंदी घातलीच पाहिजे, व वर्णव्यवस्थेला पोषक असलेला भाग अभ्यासक्रमातून काढून टाकला पाहिजे, (७) दलितांच्या हस्तांतरीत वतनी जमिनी त्यांना परत मिळाल्याच पाहिजेत. (८) दलितांवर होणाऱ्या अन्यायांच्या चौकशीसाठी स्वतंत्र न्यायालये, स्वतंत्र पोलीस पथके यांची प्रस्थापना झालीच पाहिजे, (९) शेत मजुरांना किमान वेतन रोजी रु. आठ मिळालेच पाहिजे, (१०) तालुकानिहाय शासकीय वसतीगृहे झालीच पाहिजेत.

रास्त व न्याय्य मागण्या

वरील सर्व मागण्यांचा खोलवर, पूर्वग्रहदूषित भावना न ठेवता जर विचार केला तर प्रत्येकाला हे समजू शकेल की, पँथरच्या ह्या मागण्या रास्त,

न्याय्य आहेत. त्यात काहीही वावगे नाही. या सर्व मागण्या रास्त कशा हे जागे-अभावी या लेखात सांगता येणार नाही. परंतु या मागण्यांमधील अनुक्रमे दुसरी जी मागणी आहे. 'मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिलेच पाहिजे, 'ती न्याय्य व बरोबर कशी आहे, याबद्दलची भूमिका या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

निजाम राजवटीतील शिक्षण

आजचा मराठवाडा हा भाग निजामाच्या राजवटीत होता. १९४८ साली निजाम संस्थान त्यावेळचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कारकीर्दीत खालसा करण्यात आले. निजाम राजवटीत सर्वसामान्य जनतेला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यामुळे शाळा, महाविद्यालये खूपच कमी होती. आणि होती ती बंद होण्याच्या बेतात होती. शिक्षणाचा प्रसार–प्रचार नव्हताच. स्त्रियांची संख्या तर नव्हतीच.

मिलिंद महाविद्यालयाची स्थापना

अशा परिस्थितीत मागासवर्गीय मुलामुलींच्या शिक्षणाचे काय हाल असतील याची कल्पना करता येते. जवळजवळ नाहीच्या बरोबरच त्यांच्या शिकणाऱ्यांची संख्या होती. आणि म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४९ साली मिलिंद महाविद्यालयाची स्थापना औरंगाबाद येथे केली. त्याचे सुरवातीचे नाव पिपल्स एज्युकेशन सोसायटीज कॉलेज असे होते. मराठवाड्यातील ते एकमेव महाविद्यालय होते जेथे पदवीपर्यंत शिक्षण उपलब्ध होते. त्यावेळी असलेल्या शासकीय कॉलेजात फक्त इंटर मिजियट पर्यंतच शिक्षणाची व्यवस्था होती.

द्रष्टे बाबासाहेब आंबेडकर

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, डोक्यावर कर्जाचे ओझे घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे कॉलेज काढले. समाजाच्या तळागाळातील मुलांना उच्चशिक्षण मिळावे, ती सुसंस्कृत व्हावी ही त्यांची कॉलेज काढण्यामागची भूमिका. तसेच औरंगाबाद हे महाराष्ट्रात मध्यभागी पडते, तेथे सर्वांना शिक्षणासाठी येता येईल हाही बाबासाहेबांचा दृष्टिकोन होता. तो पुढे कसा सफल झाला, हे आपणास ठाऊक आहे.

मिलिंद महाविद्यालयाच्या स्थापनेच्या वेळची एक घटना येथे सांगणे मी उचित समजतो. एकदा बाबाबाहेब औरंगाबादेतील काही प्रतिष्ठित व्यक्तींना, स्थानिक पुढाऱ्यांना आपली कॉलेज स्थापनेची भूमिका समजावून सांगत होते. त्यावेळी तेथील एक मान्यवर कार्यकर्ते माणिकचंद पहाडिया हे बाबासाहेबांना

म्हणाले, 'येथे एक कॉलेज असताना दुसरे काढण्याच्या भानगडीत कशाला पडता ? त्यावर बाबासाहेब उत्तरले, 'अहो ! येथे नुसती एका कॉलेजचीच गरज नाही तर युनिव्हर्सिटीची आवश्यकता आहे.' ही घटना १९४९ सालची आहे. आणि आपणाला हेही दिसून येते की बाबासाहेबांचे हे उद्‌गार किती द्रष्टेपणाचे होते. कारण १९५८ साली म्हणजे या घटनेनंतर नऊच वर्षांनी औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली.

मिलिंद कॉलेज म्हणजे विद्यापीठच

सुरवातीला मिलिंद महाविद्यालयात विद्यार्थी–विद्यार्थिनींची संख्या फारच कमी होती. परंतु लवकरच ती परिस्थिती बदलली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या या महाविद्यालयात दलित व दलितेतर हजारो विद्यार्थी, विद्यार्थिनी येऊ लागल्या. आणि थोड्या कालावधीत महाविद्यालयाने नावलौकिक मिळविला. बाबासाहेब आंबेडकरांनी जो प्राध्यापकांचा संघ निवडला होता तो अतिशय हुशार, कर्तबगार असा होता. बाबासाहेबांना माणसांची पारख होती आणि विद्वानांची कदरही. प्राध्यापक घेतांना फक्त आपल्याच जातीतील ते असावे असा त्यांचा दृष्टिकोन केव्हाही नव्हता. तर अभ्यासू विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे शिकविणाऱ्या व विद्वान अशा दलित समाजातील प्राध्यापकांबरोबर ब्राह्मण आणि इतरांचाही त्यात समावेश होता. आज महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्राबाहेर विचारवंत, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, कर्तबगार प्रशासक या ना त्या कारणांनी ज्यांचा नावलौकिक आहे असे प्रा. म. भि. चिटणीस, डॉ. म. ना. वानखेडे, प्रा. मे. पु. रेगे, प्रा. डॉ. भालचंद्र फडके, प्रा. डॉ. श्री. म. पिंगे, डॉ. म. ला. शहारे, प्रा. आर. पी. नाथ, प्रा. रा. ग. जाधव हे आणि इतरही बरेचसे अध्यापक मिलिंदचे होत. त्यातील प्रा. म. भि. चिटणीस तर मिलिंदचे पहिले प्राचार्य व मराठवाडा विद्यापीठाचे पहिले रजिस्ट्रार राहिले आहेत हे सर्वांना ज्ञात आहे.

मिलिंद महाविद्यालयाने मराठवाडा विद्यापीठाला उत्तम प्राध्यापकवर्ग दिला. आज मराठवाड्यात जी अनेक महाविद्यालये आहेत त्यातही मिलिंदमध्ये शिकलेल्या विद्यार्थ्यांचीच प्राध्यापक म्हणून जास्तीत जास्त संख्या आहे. तसेच महाराष्ट्र राज्य व केन्द्र सरकारच्या शासकीय यंत्रणेतही अनेक उच्च पदावर मिलिंद महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक विराजमान झाले आहेत, त्या जागा समर्थपणे सांभाळीत आहेत. ही मिलिंदची पर्यायाने बाबासाहेबांची देणगी नव्हे काय ?

जगात सर्वात जास्त दलित विद्यार्थी

पुढे विद्यार्थ्यांचा लोंढा एवढा वाढला की मिलिंदच्या वेगवेगळ्या शाखा करणे भाग पडले. आज मिलिंद कला महाविद्यालय, मिलिंद विज्ञान महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय इतकी महाविद्यालये, मिलिंद मल्टीपरपज हायस्कूल, मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल ही विद्यालये, मुलांचे तीन प्रचंड वसतीगृहे, एक मुलींचे वसतीगृह, समृद्ध ग्रंथालये, सुसज्ज प्रयोग शाळा आणि या सर्वांच्या १६९ एकरातील स्वतंत्र भव्य व सुंदर वास्तू पाहिल्या म्हणजे ते एक विद्यापीठच आहे की काय असे वाटायला लागते. या सर्व संस्थांमधून सुमारे बारा ते पंधरा हजार दलित विद्यार्थी–विद्यार्थिनी आज शिक्षण घेत आहेत. एकाच संस्थेत एकाच ठिकाणी इतक्या मोठ्या संख्येने शिक्षण घेत असलेले दलित विद्यार्थी जगात इतरत्र कोठेच नाहीत.

मिलिंदची देणगी

आज मराठवाडा विद्यापीठाला सुमारे पंचाण्णव–शहाण्णव महाविद्यालये संलग्न आहेत. त्यातही दलित विद्यार्थ्यांची संख्या बऱ्याच प्रमाणात आहे. ही महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिलिंद महाविद्यालयाच्या प्रेरणेने उदयास आली हा मुद्दाही विस्तृत करता येईल.

मिलिंदचे बहुसंख्य विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. म्हणजे विद्यापीठातही दलित विद्यार्थ्यांची टक्केवारी जास्त आहे. तसेच मराठवाडा विद्यापीठाला एक कुलगुरू, पहिले रजिस्ट्रार, अनेक विषयाचे विभाग प्रमुख व प्राध्यापकही मिलिंदनेच पुरविले आहेत. मराठवाडा विद्यापीठाचे एक कुलगुरू राहिलेले अँड. शंकरराव खरात हेही बौद्धच आहेत, हेही सर्वांना माहित आहे.

बाबासाहेबांच्या नावाने विद्यापीठाचाच गौरव

अजिंठा, वेरूळ व औरंगाबादच्या परिसरात असलेल्या लेण्या ह्या बौद्ध लेण्या आहेत. या लेण्यांमुळे हा परिसर जगात प्रसिद्ध आहे. हजारो परदेशी पर्यटक या लेण्या पाहायला दरवर्षी येत असतात आणि बौद्ध संस्कृतीचा अभिमान वाटावा असे मत घेऊन जातात. 'मिलिंद' हे नाव बौद्ध आहे. या परिसराचे 'नागसेन वन' हे नावही बौद्ध आहे. आणि बाबासाहेब हे जगातील सर्व बौद्धांमध्ये सर्वोच्च भागी होते हेही सर्वमान्य आहे.

फक्त वर सांगितलेल्या कारणांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठास द्यावे हे जसे उचित आहे, तसेच सर्वात महत्त्वाचे कारण

म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांचे सबंध जीवन भारतातीलच नव्हे तर जगातील प्रत्येक विद्यार्थ्यास आदर्श समोर ठेवावे असेच होते. आयुष्यभर आपण विद्यार्थी आहोत असे सांगून ज्याने शिक्षणाची कोणतीही व्यवस्था नसताना एम्. ए., पीएच्. डी., डी. एस्. सी., एल् एल्. डी., डी. लिट., बार ॲट लॉ या सारख्या सर्वोच्च पदव्या मिळविल्या. पदव्यांनीही या महामानवासमोर नतमस्तक व्हावे अशी ही बाब आहे. त्यांनी स्वतंत्र भारताची घटना लिहिली. भारतालाच नव्हे तर संबंध जगाला स्वातंत्र्य समता, बंधुता व न्याय या महान मानवी मूल्यांचा संदेश दिला. बाबासाहेबांचे ग्रंथालय, त्यांची अभ्यासाची, वाचनाची आवड हे भारतवासीयांना नव्याने सांगण्यासारखे विषय नाहीत. त्यांचे प्रकांड पांडित्य, दीन दलितांच्याच नव्हे तर भारताच्या उत्थानाची कळकळ तर अपूर्वच. सर्व भारतीय समाज हा आदर्श मानवी समाज व भारत हे महान राष्ट्र बनण्याची स्वप्ने बाबासाहेबांनी पाहिली होती, नव्हे तर त्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले होते. बाबासाहेबांचा परदेशी पाहुण्यांशी परिचय करून देतांना नेहरूजी म्हणायचे, 'हे आमच्या मंत्रीमंडळातील बहुमोल रत्न आहे' हे सारे पाहिल्यावर बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला दिल्याने बाबासाहेबांचे नाव मोठे होणार नाही तर उलट बाबासाहेबांच्याच नावाने जगातील कोणत्याही विद्यापीठाला गौरवच प्राप्त होईल. मात्र स्वत:ला पुरोगामी म्हणविणारे महाराष्ट्र शासन का मूग गिळून बसले याचे आम्हाला आश्चर्य वाटते. महाराष्ट्रात काहीही न शिकलेल्या माणसाचे नाव विद्यापीठाला दिल्या गेले आहे, असे असताना डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्यास मात्र विलंब लागतो.

रास्त मागणी : विद्यापीठ कार्यकारिणीचा ठराव

काहीही असो, आमच्या रास्त मागण्यांसाठी दलित पँथरने आता आंदोलनाचा मार्ग चोखाळला आहेच. त्यासाठी आतापर्यंत जनमत तयार करणे, मोर्चे काढणे, कॉलेजेस व शहरे बंद करणे, मंत्र्यांना घेराव करणे हे मार्ग अवलंबिल्या जात आहेत. ही न्याय्य मागणी असल्याने व सर्व पददलित, बौद्ध जनतेच्या भावनांशी निगडीत असल्याने मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यावे, असा ठरावही मंजूर केला आहे. एवढे होऊनही आता शासन कशासाठी थांबले आहे हे कळत नाही. महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाला आमचे एवढेच सांगणे आहे की ही मागणी व इतरही सर्व मागण्या मान्य होईपर्यंत दलित पँथर आपले आंदोलन थांबविणार नाही. मग त्यासाठी काहीही किंमत द्यावी लागली तरी चालेल.

□

दलित पँथर

गेल्या दीड-दोन तपाच्या सुरुवातीस, म्हणजे १९६० ते १९७० या काळात, महाराष्ट्रात एक असंतोष पेटत होता. तो असंतोष महाराष्ट्रातील आंबेडकरवादी तरुणांच्या मनात धगधगत होता. त्या असंतोषाचं नाव १९७२ मध्ये ठेवण्यात आलं–'दलित पँथर'. दलित पँथरचा जन्म, पँथर चळवळीच्या दिशा, पँथर चळवळीचे यशापयश इत्यादी बाबींचा विचार करण्याअगोदर पँथर पूर्वकाळाचा आढावा घ्यावा लागेल.

१९२७ ते १९५७ हा कालखंड डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाचा, त्यांच्या आंदोलनाचा व तत्त्वज्ञानाचा ठसा उमटविणारा होता. बाबासाहेबांच्या कार्याने व विचाराने भारतीय समाजमनावर दूरगामी चांगले परिणाम झाले. भारतीय दलितांची अभेद्य संघटना निर्माण झाली. संघटनेचे एकमेव नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होते. त्यांनी येथील मृतप्राय समाजाला 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा प्रेरणादायी संदेश दिला. त्यांच्या वाणी-करणीने तळगाळातील तरुण मन हे स्वाभिमानी, अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी तयार झाले. दलितांची अस्मिता जागृत झाली. बाबासाहेबांच्या इतिहासाने एका क्रांतीला जन्म दिला. १९५६ पर्यंत बाबासाहेबांच्या हयातीत दलित समाजावर अन्याय करण्याची कुणाची छाती नव्हती. तसे अन्याय, अत्त्याचार झालेही असतील पण त्याचे स्वरूप भीषण नव्हते. आणि झालेल्या अन्यायाला प्रत्युत्तर देण्यास डॉ. आंबेडकर ही शक्ती समर्थ होती.

बाबासाहेबांच्या संदेशानुसार दलितांच्या पिढ्या शिकायला लागल्या होत्या. दलित तरुण पदवीधर झाला. मोठमोठ्या हुद्यांवर यशस्वी प्रशासक म्हणून काम करू लागला. जीवनातील सर्व आघाडयांवर तो डोळसपणे उभा झाला. दलित तरुणाला साहित्याची जाण येऊ लागली होती. तो आपला नायक त्या साहित्यात शोधू लागला. त्या साहित्यात आपण कुठेही नाही, आपण नायक नाही आणि

आपणास येथे कुरूप करण्यात आले आहे, ही समज त्याला आंबेडकरी विचारांनीच प्राप्त झाली. म्हणून तो वेगवेगळ्या पातळ्यांवर समाजासाठी काम करण्यासाठी धडपडत होता.

६ डिसें. १९५६ हा भारतीय दलित समाजासाठी अत्यंत दु:खाचा दिवस. या दिवशी बाबासाहेबांचे महानिर्वाण झाले. समाजप्रबोधनाचा सूर्य अस्तास गेला. दलित समाज या दिवशी धाय मोकलून रडला. बाबांच्या निर्वाणानंतर थोड्याच काळात लहान–मोठ्या पुढाऱ्यांची तात्त्विक खोली, कर्तृत्वाची उंची समाजाला पाहावयास मिळाली. ते अतिशय लहान निघाले, स्वार्थी निघाले. पुढारीपणासाठी त्यांची आपापसात भांडणे सुरू झाली. समाजाला पुढे नेण्याचा विचार तर सोडाच, उलट बाबासाहेबांनी निर्माण केलेली एकजूट त्यांनी फोडली. संघटना फुटली. हे नेतृत्व गटागटांत विभक्त झाले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. समाज नेतृत्वहीन, दिशाहीन झाला. संघटना दुर्बल झाली. त्यामुळे खेड्यापाड्यांतून दलितांवर अन्याय–अत्याचार वाढले. कधी नव्हे एवढ्या भयंकर अत्याचारांची मालिकाच सुरू झाली. बावडा, बामणगाव, शिरसगाव, बेलछी, धाकली इत्यादी ठिकाणी माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना घडल्या. त्यामुळे सबंध समाज खडबडून जागा झाला आणि अगोदरच धगधगत असलेले दलित तरुण या घटनांनी पेटून उठले. त्यांच्यातील संघर्षशक्ती उफाळून वर आली. अगोदरच समाजासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करणाऱ्या सर्व दलित तरुणांना कोठेतरी एकत्र येण्यासाठी संधी हवी होती. या घटनांनी ती चालून आली. तो लेखणीने धडधडू लागला, वाणीने आग ओकू लागला.

औरंगाबादला वामन निंबाळकर यांनी संपादित व प्रकाशित केलेला १४ एप्रिल १९७२ चा 'प्रबोधन 'चा अंक जप्त झाला. १५ ऑगस्टला राजा ढाले यांनी पुण्यावरून प्रकाशित होणाऱ्या साधना साप्ताहिकात 'काळा स्वातंत्र्य दिन' हा लेख लिहून राष्ट्रध्वजापेक्षा आयाबहिणींची इज्जत महान असते, हे अतिशय प्रखर शब्दात मांडले. या लेखावर महाराष्ट्रभर व देशभर प्रतिक्रिया उमटल्या. अन्यायाविरुद्ध सर्वत्र सभा, मोर्चे, निदर्शने होऊ चांगली. कोणत्याही पुढाऱ्याच्या नेतृत्वाशिवाय हजारो तरुण एकत्र येऊन आपल्या विराट शक्तीचे प्रदर्शन करू लागले. याच काळात कवी वामन निंबाळकर याच्या अध्यक्षतेखाली औरंगाबादला गुलमंडी या मध्यवस्तीत एक विराट सभा झाली. या सभेत राजा ढाले व कवी नामदेव ढसाळ यांची समाजव्यवस्थेचे विश्लेषण करणारी अतिशय प्रभावी भाषणे झाली. तरुणांच्या मनातील खदखदणारा विद्रोहाचा ज्वालामुखी या ना त्या रूपाने बाहेर पडू लागला. मुंबई–पुण्याच्या व महाराष्ट्रातील सर्वच

वृत्तपत्रांत याबद्दलच्या बातम्या अग्रक्रमाने प्रकाशित होऊ लागल्या. महाराष्ट्रातील आंबेडकरवादी तरुण मनात अन्यायाच्या विरुद्ध उफाळणाऱ्या या ज्वालामुखीचे नामकरण ढसाळ–ढाले यांनी केले–'दलित पँथर.' या संघटनेला 'दलित पँथर' हे नाव जरी ढसाळ, ढाले, चेंदवणकर, डांगळे वगैरे मित्रांनी दिले होते, तरी ते मी गौण मानतो. अगोदर महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थी-तरूण वेगवेगळ्या संघटनांच्या नावाखाली काम करीत होते-जसे रिपब्लिकन स्टुडंटस् फेडरेशन, दलित समता दल, युवक क्रांती दल, इत्यादी. नाव महत्त्वाचे नव्हते, उद्रेक महत्त्वाचा होता. तरुणांचे एकत्रित येणे महत्त्वाचे होते. अन्यायाची चीड महत्त्वाची होती.

याच काळात गंगाधर गाडे, ॲड. प्रीतमकुमार शेगावकर, वामन निंबाळकर इत्यादींच्या नेतृत्वाखाली औरंगाबादला शिष्यवृत्ती–वाढीचे आंदोलन झाले. त्यात काही दलितेतरांनी घुसून आंदोलनात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. नंतर ढाले-ढसाळ आणि इतर तरुणांनी औरंगाबादला येऊन या आंदोलनात आंबेडकरवादी तरुणांमध्ये फूट होऊ नये यासाठी महत्त्वाचे प्रयत्न केले.

मुंबई, औरंगाबाद, नागपूर इत्यादी ठिकाणी तरुणांचे कार्य चालूच होते. आता त्या सर्वांनी 'दलित पँथर' नाव धारण केले. शहरा-शहरांतून, खेड्या-पाड्यांतून दलित पँथरच्या छावण्या स्थापन होत होत्या. कार्यकारिण्या निवडल्या जात होत्या. सभा होत होत्या. जहाल भाषणे होत होती. सभांना गर्दी होत होती. जिथे कुठे अत्याचार होत होता, कार्यकर्ते धावून जात होते. निषेधसभा, मोर्चे, निदर्शने यांचा भडिमार होत होता.

याचवेळी दलित साहित्य लिहिले जाऊ लागले. आंबेडकरी प्रेरणेचे हे साहित्य अन्यायाविरुद्धचा बुलंद आवाज झाले. माणसाच्या समतेसाठी साहित्याच्या पातळीवर त्याचा लढा सुरू झाला.

सम्यक् परिवर्तनासाठी हवा असलेला विचार व कृती या दोन्ही पातळ्यांवर काम सुरू झाले. भारतीय समाजपरिवर्तनाचे झुंजमुंजू झाल्याचे दिसू लागले. सबंध समाज मोठ्या आशेने डोळ्यांत प्राण आणून या तरुणांच्या कृतीकडे पाहू लागला. पुढाऱ्यांचे धाबे दणाणले. समाजात आलेली मरगळ गेली. समाज चैतन्यमय झाला. गटागटात विभागल्या गेलेल्या पुढाऱ्यांचीही झोप उडाली. फुटलेले पुढारी एकत्रित येण्यासाठी पँथरने पवित्रा घेतला आणि धाकाने पुढारी एकत्र आले. त्यांची मुंबईला चैत्यभूमीवर सभाही झाली. पण या सर्व उद्रेकाला दिशा नव्हती. या महाशक्तीला शिस्त नव्हती. परिपक्व नेतृत्व नव्हते. होता फक्त जोश, धडपड, आणि अन्यायाची चीड आणि या सर्वांमध्ये प्रामाणिकपणा.

सर्वत्र काम चालू असूनही प्रसिद्धी मात्र निव्वळ मुंबईकरांच्या वाटचाला येत होती. ढाले-ढसाळ आपोआपच नेते झाले होते. सबंध महाराष्ट्रभर दलित पँथरच्या छावण्या स्थापन झाल्या होत्या. कार्यकर्ते काम करीत होते. ते काम म्हणजे अन्याय–अत्याचाराच्या विरुद्ध लोकशाही मूल्यांचा स्वीकार करून संघर्ष करणे. कुठे तर मारामाऱ्याही झाल्या. पँथर कार्यकर्त्यांवर खटले भरले जाऊ लागले. कार्यकर्ते जेलमध्ये जाऊ लागले. बेडरपणे व बेदरकारपणे त्यांचे कार्य चालू झाले होते. पँथरच्या नावाने एक दबदबा, वचक निर्माण झाला. तो वचक समाजाला हवा होता. समाज त्यामुळे काहीसा सुखावला होता. पण...पण या तरुणाईला शिस्त नव्हती, परिपक्व नेतृत्व नव्हते, कार्याची दिशा नव्हती आणि समोर प्रबोधनाचा विधायक स्पष्ट कार्यक्रम नव्हता. त्यामुळे जे व्हायचे तेच झाले. ढाले–ढसाळांचे फाटले, ढसाळने पँथरचा जाहीरनामा लिहिला. तो 'नामा जाहीर' म्हणजे कम्युनिस्टधार्जिणा असल्याचा आरोप ढालेने ढसाळवर केला. नामदेव ढसाळ-राजा ढाले असे पँथरचे दोन गट पडले. १९७४ ला नागपूरला पँथरचे प्रथम अधिवेशन झाले. नामदेवला कम्युनिस्ट म्हणून बाहेर फेकले. या समाजातील पुढाऱ्यांमध्ये एक अतिशय वाईट खोड आहे, ती म्हणजे ज्याला बदनाम करायचे व बाजूला फेकायचे त्याला सतत कम्युनिस्ट म्हणायचे. या संकुचित पुढाऱ्यांनी समाजाचा असा गैरसमज करून दिला आहे की, कम्युनिस्ट हा आपल्या समाजाचा पहिल्या क्रमांकाचा शत्रू आहे, ते जातीयवादी आर. एस्. एस्. पेक्षाही जास्त भयंकर आहे. या समाजात 'कम्युनिस्ट' ही शिवी समजली जाते, असो. याप्रमाणे पँथरचीही शकले (आर. पी. आय. सारखी) होण्यास सुरुवात झाली. पण एक मोठा गट काम करीत होता. त्यात ढाले, गाडे (औरंगाबाद), लव्हात्रे (नागपूर), निंबाळकर, शेगावकर व इतर बरेच कार्यकर्ते होते. पण नंतर लगेच १९७६ साली राजा ढाले यांनी पँथर बरखास्त झाल्याची घोषणा केली. ढालेंनी कुणाही सहकाऱ्यांशी सल्ला–मसलत केली नाही, कार्यकारिणीत ठराव केला नाही, की कुणालाच विश्वासात घेतले नाही. ढालेला पँथर बरखास्त करण्याचा अधिकार कुणी दिला, असा प्रश्न सर्वत्र विचारला जाऊ लागला. लगेच गंगाधर गाडेने औरंगाबादला बैठक बोलाविली. सर्व महाराष्ट्रातून कार्यकर्ते गोळा झाले. तेथे साधकबाधक चर्चा झाली आणि नवीन कार्यकारिणी निवडली गेली. अरुण कांबळे यांना अध्यक्ष करण्यात आले. गंगाधर गाडे सरचिटणीस व ॲड. प्रीतमकुमार शेगावकर, एस्. एम्. प्रधान, नाना रहाटे, रामदास आठवले, वामन निंबाळकर इत्यादींची प्रमुख पदांवर निवड करण्यात आली आणि ते जोमाने कामाला लागले.

त्याच सुमारास ढालेने 'मास मूव्हमेंट' नावाची संघटना काढली. रिपब्लिकन पक्षाचे जसे गटगटांत विभाजन झाले तसेच पँथरचे गट पडले. नामदेव ढसाळची पँथर, राजा ढालेची मास मूव्हमेंट व इतर सर्व प्रमुख कार्यकर्त्यांची दलित पँथर.

नामांतराचे आंदोलन

दलित पँथरने सुरुवातीपासून आपल्या कार्यासाठी आक्रमक भूमिका घेतलेली होती. त्यामुळे पँथरची दखल सर्व क्षेत्रात घेतली जात होती. पँथरचे कार्यकर्ते तळमळीने काम करीत होते. सामाजिक अन्याय-अत्याचाराविरुद्ध वाघासारखे धावून जात होते. अशाच एका बैठकीतील चर्चेतून गंगाधर गाडे याने 'मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे' अशी सूचना केली. पुढे ती मागणी विद्यापीठाच्या कार्यकारिणीत आली व तसा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला. त्याला अंतिम रूप देण्यात यावे म्हणून दलित पँथरने ही मागणी पुढे रेटली. त्यासाठी ठिकठिकाणी मोर्चे, सभा, निदर्शने, चर्चासत्र सुरू झाले. त्यावेळी महाराष्ट्रात काँग्रेसचे (आय) शासन होते. मा. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. या मागणीस सर्व क्षेत्रांतील विचारवंत, साहित्यिक, पुरोगामी संघटना इत्यादींनी पाठिंबा व्यक्त केला. मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी जी कारणमीमांसा होती किंवा आहे, ती खालीलप्रमाणे–

(१) मराठवाडा विभागात १९४९ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पदवीपर्यंतचे शिक्षण देणारे महाविद्यालय काढले. त्याचे नाव सुरुवातीला 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीज् कॉलेज' असे होते व नंतर ते मिलिंद महाविद्यालय असे ठेवण्यात आले. म्हणजेच मराठवाडा विभागात उच्च शिक्षणाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच केली. आता त्यानंतरच हा शिक्षणाचा वृक्ष फोफावला, बहरला, फुलारला आहे.

(२) महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांना अनेक थोर पुरुषांची नावे दिली गेली आहेत. जसे कोल्हापूर विद्यापीठास शिवाजी विद्यापीठ, राहुरी कृषी विद्यापीठास म. जोतिबा फुले कृषी विद्यापीठ, अकोला कृषी विद्यापीठास पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, इत्यादी.

(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर ज्ञानसाधना केली. त्यांनी कष्टाने, प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणक्षेत्रातील अत्युच्च पदव्या संपादन केल्या व आपल्या ज्ञानाने व प्रतिभेने जगाला दिपविले. प्रज्ञा, करुणा व शील या तिन्ही

गुणांचा संगम त्यांच्या ठिकाणी होता. राज्यघटनेच्या लिखाणाने व इतरही कार्याने त्यांचे राष्ट्रप्रेम किती बावनकशी होते, हे सिद्ध होते.

या व अशाच समर्पक कारणांमुळे बाबासाहेबांचे नाव मराठवाडा विद्यापीठास देण्याचा दलित पँथरचा आग्रह सर्वांनाच पटू लागला. त्यामुळे आंदोलनाला तीव्रता आली, धार आली. कार्यकर्त्यांच्या पायांना चाके बांधली. महाराष्ट्रातील गावोगाव, खेड्यान्‌खेड्यापर्यंत ही मागणी पोहचली, आंदोलन पोहचले. कधी नव्हे एवढा दलित समाज चैतन्यमय झाला. याच आंदोलनात पँथरच्या प्रमुख व इतरही कार्यकर्त्यांना पोलिसांकडून भयंकर त्रास झाला. अनेकांना कित्येक वेळा जेलात जावे लागले. या मधल्या काळात वसंतदादा जाऊन शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. काँग्रेस जाऊन पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. येतायेताच शरद पवार यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत नामांतराचा ठराव मांडला व तो एकमुखाने पारीत झाला. सत्ताधारी आणि विरोधी आमदारापैकी कोणीही या ठरावाला विरोध केला नाही, परंतु जातीयवाद्यांच्या मनात या पारीत झालेल्या ठरावाने आग भडकली. मराठवाड्यात दलितांच्या विरोधात सर्वच जातीयवादी एकत्र आले. त्यांनी तेथे अनन्वित अत्याचार सुरू केले.

संबंध महाराष्ट्रात ठिकठिकाणी याच्या प्रतिक्रिया उमटल्या. नागपूरला वामन निंबाळकरांच्या नेतृत्वाखाली हा लढा अत्यंत प्रखरपणे लढविला गेला. पोलिसांनी लाठीमार आणि गोळीबार केला. माणसे मारली गेली. वामन निंबाळकर यांच्यासहित अनेक पँथर कार्यकर्ते जखमी झाले. त्यांना जेलात जावे लागले. मराठवाडा तर धगधगू लागला होता. त्याचे प्रतिसाद देशभर सर्वत्र उमटले आणि तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी कच खाल्ली. ते माघारी फिरले. दोन्ही सभागृहांत पारीत झालेल्या नामांतराच्या ठरावाचे बिल विधिमंडळात आलेच नाही, मग अंमलबजावणी तर दूरच राहिली. या लढाईत पँथर आघाडीवर होती. आणि आजही ती आपल्या मागणीला चिकटून आहे. दलित पँथरने हे एक आंदोलन आपल्या ताकदीनिशी लढविले. केवळ वरवर पाहून यात पँथरला अपयश आले असे म्हणता येणार नाही. या आंदोलनात पँथरची खरी शक्ती पणाला लागली होती. या आंदोलनाने पँथर कार्यकर्त्यांना एक दिशा मिळाली, असे माझे ठाम मत आहे. प्रत्येक कार्यक्रम ठरविण्याअगोदर विचारपूर्वक पाऊल उचलले पाहिजे, कोणतीही मागणी करतांना तिच्या उपयुक्ततेचा, यशापयशाचा, व्याप्तीचा व परिणामांचा विचार झाला पाहिजे याचे भान या आंदोलनाने पँथरला दिले.

या आंदोलनाने पँथर परिपक्व झाली. आजही नामांतराचा लढा संपलेला नाही. इतक्या प्रदीर्घ काळपर्यंत आंदोलन रेटण्याची शक्ती फक्त दलित पँथरमध्येच आहे हेही या आंदोलनाचे वैशिष्ट्य आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

या आंदोलनाने पुन्हा एकदा हे सिद्ध झाले की, महाराष्ट्रात, पर्यायाने भारतात जातीयता नष्ट झालेली नाही. जातीयता संपली असे कुणीही, कितीही म्हटले तरी ती मनामनात रुतून बसलेली आहे, हेच खरे.

दलित पँथरने या आंदोलनाव्यतिरिक्त भूमिहीनांचा लढा, बौद्धांना सवलती, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीवाढ ही लहान–मोठी आंदोलने केली. दलित पँथरचा प्रवास असा चालू आहे. या काळात पँथरच्या नेतृत्वात अनेक बदल झाले.

सुरुवातीला जे वाटले होते की, पँथर भारतभर पोहचेल, तसे झाले नाही. नाही म्हणायला काही राज्यांत पँथरच्या छावण्या निघाल्या. असा हा दलित पँथरचा संक्षिप्त इतिहास.

दलित पँथरचे भवितव्य

दलित पँथर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आधारभूत मानत असल्याने तिची जबाबदारी वाढते. धर्म, जातीविरहित सर्व समतावादी तरुणांची संघटना कशी बांधता येईल यावर विचार होणे आवश्यक आहे. अल्पसंख्यांकांमधील ज्या इतर जाती आहेत, त्यांना या प्रवाहात आणण्याचा गंभीर विचार व प्रयत्न झाले पाहिजेत. हे प्रयत्न पँथर करीत आहे हे जरी खरे असले तरी त्यात सातत्य नाही. पँथरने निवडणुकीच्या संदर्भात गंभीर विचार करून, त्यातल्या त्यात जवळच्या पक्षाशी युती करून आपल्या वास्तव शक्तीचे भान ठेवून जागांची तडजोड केली पाहिजे व आपले प्रतिनिधी विधिमंडळात कसे निवडून येतील याकडे लक्ष दिले पाहिजे. आर्थिक कार्यक्रम घेऊन लढ्याची व्याप्ती वाढविली पाहिजे. बाबासाहेबांचा विचार रुजविण्यासाठी लोकशाहीची पाळेमुळे खोल कशी जातील याकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष दिले पाहिजे, तरच पँथरला भविष्य आहे !

धर्म, धम्म आणि लोकशाही

१५ ऑगस्ट १९४७ साली आमचा देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर आम्ही लोकशाही शासनप्रणाली स्वीकारली. २६ जाने. १९५० साली प्रजासत्ताक भारताची राज्यघटना लागू झाली. ही राज्यघटना लिहितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय विचारपूर्वक, अभ्यास करून लोकशाहीला पूरक असलेली कलमे राज्यघटनेत टाकली, कारण बाबासाहेबांच्या विचारात, आचारात स्पष्टता होती. लोकशाहीला बळकटी आणणारे, राष्ट्राचे ऐक्य अबाधित ठेवणारे आणि सर्वसामान्य नागरिकाला संरक्षण देणारे कायदे घटनेच्या रूपाने आम्हास मिळाले.

या देशात सर्व धर्माचे लोक राहतात म्हणून आपला देश 'Secular State' म्हणजे 'धर्मातीत राज्य' असावे असा बाबासाहेबांचा आग्रह होता व तोच त्यांनी घटनेत मांडला. धर्मा-धर्मातील भांडणांमुळे राष्ट्राचे ऐक्य आणि स्वातंत्र्य धोक्यात येते ही वस्तुस्थिती त्यांनी निर्भयपणे सर्वांच्या लक्षात आणून दिली. धर्माचे स्तोम माजविले तर आपली लोकशाही संकटात येऊ शकते हा त्यांचा विचार त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतो. कारण आज आम्ही पाहतो की धर्माच्या नावावर या देशात राजकारण सुरू झाले आहे. देव आणि धर्माचे भांडवल करून शिवसेना, भारतीय जनता पक्ष, विश्व हिंदू परिषद आणि तत्सम पक्ष व संघटना जाणीवपूर्वक सामान्य माणसाला वेठीस धरू पाहत आहेत. हेतुपुरस्सर त्याची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे आमच्या लोकशाहीस लागलेली ही कीड आहे असे म्हटले तर थोडी देखील चूक होणार नाही. म्हणून आता धर्म, धम्म आणि त्यांचा लोकशाहीशी संबंध या विषयी समजावून घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

धर्म आणि लोकशाही शासनप्रणालीचा परस्पर दूरान्वयावेही संबंध नाही. लोकशाहीत सामाजिक मूल्यांची जपणूक महत्त्वाची असते. धर्मात सामाजिक मूल्यांचे भान आवश्यक नाही. देव, आत्म्यावरील विश्वास, कर्मकांड, पूजा-विधी

इत्यादी बाबी धर्मात महत्त्वाच्या मानल्या जातात. लोकशाहीत राष्ट्र, राष्ट्राचे ऐक्य, राष्ट्राचे स्वातंत्र्य, देशातील सर्वसामान्य नागरिकाला संरक्षण व सामाजिक, आर्थिक न्याय इत्यादी गोष्टी आवश्यक आणि अति महत्त्वाच्या समजल्या जातात, समजाव्या लागतात, त्यामुळेच समाजजीवनाचा विकास होऊन संपूर्ण देशात शांतता, सुव्यवस्था नांदते आणि राष्ट्र शक्तिशाली होते.

धर्माच्या नावावर राष्ट्र कधीच बलवान होत नाही, उलट ते कमजोर होते. आजही आपल्या देशाच्या अवती-भोवती धर्माचा आधार घेऊन उभ्या असलेल्या राष्ट्रांकडे पाहिले की याची प्रचिती येते. धर्मांधतेने समाज एकसंघ होत नाही, तर तो दुभंगतो. समाज जर दुभंगला तर राज्यात अराजकता निर्माण होते. धर्मांध असलेली व्यक्ती ही स्वतःला समाजाचा घटक समजत नाही. व्यक्तीने स्वतः समाजापासून नाळ तोडण्याचा प्रयत्न केला तर तो समाज अशक्त होत जातो आणि समाजापासून व्यक्ती तुटत गेली तर ती व्यक्ती अस्तित्वहीन बनते. एकसंघ समाजासाठी व्यक्ती आणि समाज एकजीव झाले पाहिजेत. त्यांना वेगवेगळे करता येत नाही. समाजगाडयाच्या विकासाच्या गतीला खीळ घालण्याचे काम धर्म करीत असतो. तो समाजाच्या प्रगतीसाठी सर्वात मोठा अडथळा असतो. कारण त्याची तत्त्वे घट्ट व पक्की झालेली असतात. त्यापेक्षा वेगळी, पुढे नेणारी, जीवनाला वेग देणारी तत्त्वे धर्माला मान्य नसतात. धर्म परिवर्तनशीलतेला थारा देत नाही. साचलेपणा हे धर्माचे वैशिष्टय असते. धर्मात प्रश्न किंवा शंका विचारता येत नाहीत. आहे त्यावर विचार न करता विश्वास ठेवावाच लागतो. तसे करणे म्हणजे धर्माचे पालन करणे होते. विश्वास ठेवला नाही तर तो अधर्म होतो. शंका किंवा प्रश्न विचारणारा पापी ठरतो. शब्दप्रामाण्य हे धर्माचे अमोघ शस्त्र आहे. बुद्धिप्रामाण्यवाद हा शब्दप्रामाण्याला मारक असल्याने तो धर्माला ग्राह्य किंवा मान्य नसतो. धर्मातील शब्दप्रामाण्य या शस्त्राच्या भीतीमुळे कार्य करणारी माणसे तोंड असूनही मुकी असतात, कान असून बहिरी आणि डोळे असूनही आंधळी असतात. कार्ल मार्क्सने धर्माला 'अफूची गोळी' म्हटले आहे; ते यथार्थ आहे. धर्म अफूपेक्षाही माणसाला जास्त गुंगवितो. अफूची नशा काही वेळाने उतरते. धर्मांच्या नशेत माणूस मरेपर्यंत राहतो. त्यातून जी माणसे आपली सुटका करून घेतात ती धर्मातीत होतात, ती बुद्धिप्रामाण्यवादी असतात ती मूर्तीभंजक असतात, नास्तिक असतात. म्हणूनच ती जीवनाच्या चाकाला गती देऊ शकतात.

धर्मात बंधुभाव सांगितला जातो तो देवाच्या भीतीपोटी. आपण सर्व एकाच देवाची लेकरे आहोत, असे तोंडाने म्हटल्या जाते. व्यवहारात आचरण

मात्र त्याविरुद्ध असते. प्रत्यक्ष ही जातीयवादी मंडळी बंधुद्वेषाची कृती करीत असतात. कोणतीही चांगली गोष्ट सांगितली तर ती धर्माच्या नावावर आणि देवाच्या भीतीपोटी करावयास सांगितली जाते, समाजात सामंजस्य, बंधुभाव, शांतता न्याय व समता नांदावी यासाठी नाही. म्हणून या समाजात सामाजिक मूल्ये रुजली नाहीत, असे म्हटले तर वावगे ठरत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, धर्म ही व्यक्तीपुरती मर्यादित स्वरूपाची बाब असल्याने ज्याने त्याने ती आपल्या स्वतःपुरती मर्यादित ठेवावी. धर्माचा समाजजीवनावर कोणताच चांगला परिणाम होत नाही. उलट धर्माने आयुष्य एककल्ली, स्वार्थी होते. धर्मात नीतीला महत्त्व नाही. परंतु सामाजिक मूल्ये जोपासण्यासाठी नीती ही आत्यंतिक महत्त्वाची, आवश्यक बाब ठरते. आणि सामाजिक मूल्ये काटेकोरपणे पाळल्या गेली तर समाजात समता, बंधुता आणि न्याय यांचे राज्य येते आणि लोकशाही सुदृढ होते.

धर्म पाळणारी माणसे लोकशाही दुर्बल करण्यास कळत न कळत हातभार लावीत असतात. एखादा माणूस सकाळी उठून पूजापाठ करीत असेल. मंदिरात जाऊन मोठमोठ्याने घंटा वाजवून प्रार्थना म्हणत असेल, भाळावर मोठा गंधाचा टिळा लावून मुंग्यांना साखर घालीत असेल तर तो माणूस धार्मिक वृत्तीचा म्हणून सर्वत्र ओळखला जातो. मग त्याचे दैनंदिन व्यवहार कितीही वाईट, अनैतिक, भ्रष्टाचारी असले तरी त्याकडे लोकांचे दुर्लक्ष होते.

धर्मातील सत्ता केन्द्रीत असते. ती त्यातील एका व्यक्तीकडे असते. ती व्यक्ती, रूढी, परंपरा, कर्मकांड इत्यादींचे काटेकोरपणे समाजाने पालन करावे, यावर नियंत्रण करते. कारण रूढी, परंपरा, कर्मकांड यांचे काटेकोरपणे पालन करणे म्हणजेच धर्माचे पालन होते. समाजाने आंधळेपणाने जे वर्तन स्वीकारलेले असते त्यास रूढी म्हणतात. ह्या रूढी आणि परंपरा माणसाच्या मनात खोल-खोल रुजलेल्या असतात. त्यावर विचार करणे, त्यांना त्याज्य ठरविणे किंवा त्यांच्याविरुद्ध बंड करणे हे धर्ममार्तंडांच्या दृष्टीने शहाणपणाचे लक्षण मानल्या जात नाही. रूढी. परंपरा ह्या प्रगतीला, जागृतीला मारक असतात. रूढी आणि परंपरा ह्या काळ्या, कठीण दगडासारख्या असतात. त्या व्यक्तीला समाजात एकजीव होऊ देत नाही. रूढी, परंपरा धर्माच्या आधाराने कालांतरापासून चालत आलेल्या असतात. मागील शेकडो पिढ्यांपासून चालत येणे हेच त्यांचे वैशिष्ट्य असते. पूर्वजांनी केलेली आणि ठरविलेली कामे जशीच्या तशी करणे म्हणजे रीतीरिवाज, रूढी, परंपरा यांचे पालन करणे होते. रूढी, परंपरांना वर्तमान दिसत नाही, त्या सतत भूतकाळात वावरत असतात. त्यामुळे त्या गतीहीन

असतात. सद्‌विचार हा पुढे नेणारा, विकासाला गती देणारा आणि वर्तमानात भविष्याचा वेध घेणारा असतो. म्हणूनच रूढी, परंपरा आणि सद्‌विचारांचे वाकडे असते. समाजाचा विवेकी आणि प्रगतीशील विचार रूढी, परंपरांशी सतत संघर्ष करीत असतो. तात्पर्य धर्माचे आणि प्रगतीशीलतेचे, सामाजिक समतेचे, स्वातंत्र्याचे, न्यायाचे वाकडे असते.

जेथे सामाजिक मूल्यांची गरज निर्माण होते तेथे धम्माचा जन्म होतो. एका माणसाचे दुसऱ्या माणसाशी उत्तम आचरण, व्यवहार म्हणजेच धम्म. दोन किंवा अधिक माणसे जेव्हा एकत्रित येतात तेथे धम्माची आवश्यकता निर्माण होते. म्हणजेच धम्म हा सामाजिक आहे. वैयक्तिक नाही. म्हणूनच लोकशाही शासनप्रणालीला धम्म हा पूरक असतो. जो समाज धम्माचा पुरस्कार शासनासाठी करणार नाही तो लोकशाही टिकवू शकणार नाही. धम्म नसला तर अराजकतेची प्रचंड सोय होते आणि हुकूमशाहीचा उदय होतो.

अराजकता आणि हुकूमशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याला स्थान नसते. फक्त लोकशाहीतच माणसाच्या स्वातंत्र्याची, न्यायाची हमी असते. स्वातंत्र्याचा, समतेचा, न्यायाचा अधिकार किंवा हक्क ज्यांना पाहिजे त्यांना धम्माच्या आचरणाची आवश्यकता असते.

प्रज्ञा आणि करुणा ह्या धम्माच्या महत्त्वाच्या दोन बाजू आहेत. प्रज्ञा सखोल बुद्धी (Knowledge) जेथे प्रत्येक बाबीचा विवेकाने आणि तार्किकतेने विचार होतो आणि अंधःश्रद्धेला थारा नसतो, ती बुद्धी. करुणा म्हणजे प्रेम (Love). समाजाचा भौतिक विकास होण्यासाठी करुणेची नितांत गरज असते. करुणेशिवाय समाजात शांतता आणि सुव्यवस्था नांदूच शकत नाही.

धर्मात जे स्थान देवाला आहे तेच स्थान धम्मात नीतीला आहे. नीतीचा उगम बंधुभाव, समता, स्वातंत्र्य आणि न्यायात आहे. समाजाचा गाडा नीट चालण्यासाठी नीतीचीच गरज असते. नीतीनेच सामाजिक मूल्यांना जन्म दिला आहे.

समाजाचे ऐक्य आणि विकास हा सामाजिक मूल्यांच्या आधारावरच होत असतो. सामाजिक मूल्ये ही समाजाला शक्ती देण्यासाठी पौष्टिक पदार्थाचे काम करीत असतात. सामाजिक नीतीमूल्यांनीच समाजात जीवंतपणा, चैतन्य येते. समाज हाच मूल्यांचा जन्मदाता आहे, आणि तोच त्याचे पालनपोषण करतो. मूल्ये समाजाचे कवच असतात. ज्या समाजात नीतीमूल्यांचा ऱ्हास होतो तेथे

अराजकता माजते. म्हणूनच भारतीय समाजात आज नीतीमूल्याची म्हणजे धम्माची तीव्र आवश्यकता निर्माण झाली आहे. भारतीय लोकशाही बलशाली करावयाची असेल तर प्रत्येक भारतीय नागरिकाला धम्माप्रमाणे आचरण करणे भाग आहे.

□

शासनकर्ते होणे आवश्यक

पहिल्या प्रथम मी 'सुगावा'कारांचे आभार मानतो की, आजपर्यंत त्यांनी आपल्या विशेषांकांमधून निरनिराळ्या ज्वलंत विषयांवर चर्चा घडवून आणल्या. जिव्हाळ्याचे विषय घेऊन त्यावर साधकबाधक चर्चा झाल्याने समाजाचे प्रबोधन व्हावे हा त्यांचा त्यामागील मूळ उद्देश असतो. त्यांचा हा उद्देश सफल होतो असे मला तरी मनापासून वाटते. आजही त्यांनी असाच एक ज्वलंत प्रश्न चर्चेला घेतलेला आहे. 'आंबेडकरी चळवळीतील दलबदलू' हा विषय चर्चेसाठी खुला करताना त्यांनी काही प्रश्न चर्चेत भाग घेणारांसाठी दिले आहेत, जेणेकरून त्या अनुषंगाने चर्चेत सविस्तर, समर्पक उत्तरे देता येतील. वरील विषयावर लिहिण्याअगोदर थोडे प्रास्ताविक केले तर वावगे ठरणार नाही असे मला वाटते.

मी सार्वजनिक जीवनाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने केली आणि आजही माझी प्रेरणा तीच आहे. बाबासाहेबांच्या सहवासात काम करण्याची किंवा त्यांना जवळून पाहण्याची संधी मात्र उशीरा जन्मास आल्यामुळे मिळाली नाही. परंतु त्यांचे जीवन–विचार आणि कार्य वाचण्यासाठी घेता येतील तेवढे कष्ट घेतले. लागणारा वेळ, पैसा खर्च केला. एवढेच नव्हे, तर ज्याला रूढ अर्थाने आंबेडकरी चळवळ म्हणतात, त्या आंदोलनात जेलात गेलो, पोलिसांचा मरेस्तोवर मार खाल्ला आणि कोर्टात अनेक केसेस लढलो. कुवतीप्रमाणे जेवढा करता आला तेवढा त्यागही केला. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाढीचा लढा, नामांतराचे आंदोलन, भूमिहीनांचे आंदोलन, मागासवर्गीयांच्या राखीव जागा भरल्या जाव्या, बौद्धांना सवलती मिळाव्या इत्यादी मागण्यांसाठी झालेल्या आंदोलनात सक्रिय भाग घेतला व घेत आहे. खेड्यापाड्यांतून दलितांवर झालेल्या अन्याय-अत्याचारांच्या वेळी धावून गेलो. शासनकर्त्यांसमोर निदर्शने केली, निवेदने दिली, मोर्चे काढले, निषेधसभा

घेतल्या. खेड्यापाड्यातून ऊन–वारा–पाणी–पाऊस न पाहता दीन–दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी फिरलो. म्हणूनच या विषयावर माझे बोलणे हे अधिकृतपणाचे ठरेल असे मला नम्रपणे सांगावेसे वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार त्रोटक आहेत, सिद्धांत अपूर्ण आहेत, तत्त्वज्ञान एकांगी आहे किंवा व्यवहार्य नाही, म्हणून मी किंवा माझ्यासारखे काही काँग्रेस पक्षात गेलो असे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले तत्त्वज्ञान आणि मांडलेले सिद्धांत हे गुलामीचे जोखड फेकून देऊन स्वाभिमानाने जगण्यास भक्कमपणे उभे करणारे, माणसाला माणुसकीला लढण्यास शिकविणारे, जीवनातील हक्क व कर्तव्ये यांची स्पष्ट जाणीव करून देणारे व त्या दोहोंची सांगड घालणारे आहेत. असे असताना मग आम्हाला इतर पक्षात किंवा संघटनेत जाण्याची काय गरज होती असा प्रश्न येणे साहजिकच आहे. त्याचे उत्तर पुढे वाचावयास मिळेलच.

'आंबेडकरी चळवळीतील दलबदलू' या विषयात दोन शब्द आहेत. एक आंबेडकरी चळवळ व दुसरा दल बदलणे. आता प्रश्न असा उपस्थित होतो की आंबेडकरी चळवळ म्हणजे काय ? महारांनी महारांसाठी केलेली चळवळ म्हणजे आंबेडकरी चळवळ काय ? जाती मोडाव्या की जतन कराव्या यापैकी बाबासाहेब आंबेडकरांना काय अभिप्रेत होते ? माझ्या मते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या देशात सामाजिक, राजकीय, आणि एकूणच सम्यक् समता प्रस्थापित करावयाची होती. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. विचार मांडले, लेखन केले. चळवळी उभ्या केल्या. हे करीत असतांना त्यांनी ध्येयप्राप्तीसाठी तत्त्वांशी तडजोड न स्वीकारता वेगळचा पक्षाच्या मंचावरून सुद्धा कार्य केले.

उदाहरणार्थ, ते पहिल्या मंत्रिमंडळात मजूरमंत्री व नंतर काँग्रेसच्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री राहिले. त्याठिकाणी त्यांनी भारतीय राज्यघटना लिहिली आणि तळागाळातील माणसांच्या हिताचे रक्षण केले. जात, धर्म, पंथ विरहित समाज निर्माण करून शोषणमुक्त समाजाचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. या त्यांच्या ध्येयपूर्तीसाठी त्यांच्या विचारांनी केलेले कार्य म्हणजे आंबेडकरी चळवळ असे मी मानतो.

मग प्रश्न असा निर्माण होतो की, वरील कार्य करण्यासाठी आज एखादी प्रबळ संघटना किंवा पक्ष अस्तित्वात आहे का ? असेल तर कोणता ? नसेल तर का नाही ? या प्रश्नांची उत्तरे शोधताना एक गोष्ट लक्षात येते की आजतरी अशाप्रकारची एकही संघटना किंवा पक्ष अस्तित्वात नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीत या संबंध समाजाची एक संघटना होती. बाबासाहेब एकमेव नेते होते आणि ते सांगतील तो एकच पक्ष होता. क्वचित बोटावर मोजण्याइतकी नगण्यच माणसे पक्षाबाहेर किंवा संघटनेबाहेर जात होती, कारण बाबासाहेब हे आपले खरे-खुरे एकमेव उद्धारक आहेत एवढा विश्वास त्यांच्या नेतृत्वावर सर्वांचाच होता. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना फक्त एका महार जातीलाच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक चिखलातून बाहेर काढायचे नव्हते, तर भारतातील सर्व तळागाळातील समाज, ज्याला (अस्पृश्य) शूद्र आणि अतिशूद्र म्हणून येथे त्याचे जगण्याचे अधिकारच नाकारले गेले होते, त्या सर्वांना माणुसकीच्या पातळीवर आणून, त्यांना स्वाभिमानी बनवून, त्यांच्या हक्काची व कर्तव्यांची जाणीव करवून या देशातील कोटचवधी जनतेला त्यांच्या दास्यशृंखलांतून मुक्त करायचे होते. हे काम त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात आणि आपल्या जीवनभर केले. त्यांचे परिणामही झाले. हा तळागाळातील सर्व समाज जागा झाला. त्याला त्याच्या अधिकाराची जाणीव झाली. तो स्वाभिमानाने जगण्यासाठी धडपडू लागला. बाबासाहेबांचे सर्वंकष नेतृत्व हा त्याचा एकमेव आधार होता.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशात लोकशाही शासनप्रणाली स्वीकारली गेली. ती भक्कमपणे टिकावी म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना लिहितांना काळजी घेतली. ही लोकशाही द्विपक्षीय असावी-म्हणजे एक सत्ताधारी पक्ष व दुसरा विरोधी पक्ष असे त्यांचे मत होते. लोकशाहीत विरोधी पक्ष हा प्रबळ असावा. म्हणजे सत्तेवर असलेल्या पक्षाला तो अंकुश असतो व त्यामुळे सत्ताधारी पक्ष सुरळीत काम करतो, असे बाबासाहेबांनी प्रतिपादिले होते. त्यासाठी त्यांनी त्याकाळातील विरोधी, पुरोगामी, डाव्या विचारसरणीचे नेते डॉ. राममनोहर लोहिया वगैरे नेत्यांशी चर्चा व पत्रव्यवहार करून एका प्रबळ विरोधी पक्षाची संकल्पना मांडली होती. मात्र त्यांना त्यांच्या हयातीत हे काम करता आले नाही. कदाचित ते अजून काही काळ जगले असते तर तेही करण्यात त्यांना यश आले असते असे मला वाटते. वर सांगितलेली बलाढ्य विरोधी पक्षांची संकल्पना म्हणजे रिपब्लिकन पक्षाची स्थापना असे त्यांचे विचार होते. त्यासाठी आवश्यक असलेली जुळवाजुळव, बोलणी सुरू झाली होती. तो पक्ष म्हणजे एका विशिष्ट जातीचा, धर्माचा किंवा पोटजातीसाठी नसणारा व सर्वांसाठी खुला असणारा, व्यापक विचारांच्या पायावर आधारलेला पक्ष असावा असा विचार त्यांनी व्यक्त केला होता.

पण बाबासाहेबांचे महानिर्वाण झाले आणि द्विपक्षीय लोकशाहीतील त्यांची विरोधी पक्षाची कल्पना कुणी पुढे रेटली नाही. किंवा एवढे मोठे काम करणारा दुसरा समर्थ नेताही त्या कल्पनेला मूर्तरूपास आणण्यासाठी मिळाला नाही. कारण ते काम, ज्याच्या अंगी विद्वत्ता आहे, संघटना बांधण्याची शक्ती आहे, विचारांची-आचारांची स्पष्टता आहे आणि ज्याचे नेतृत्व सर्वमान्य आहे अशीच व्यक्ती करू शकली असती, पण एवढी गुणसंपदा असलेला नेता बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर नव्हता व झाला नाही. त्यामुळे हा सम्यक् क्रांतीचा विचार पूर्ण करण्यासाठी पक्ष किंवा संघटना निर्माण झाली नाही. उलट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर त्यांनी बांधलेल्या बलाढ्य संघटनेत फूट पडली. लहान-लहान नेत्यांच्या स्वार्थीपणामुळे, खोट्या अंहकारामुळे, स्वतःच्या मर्यादांची जाणीव नसल्यामुळे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणीचा आपल्या सोयीनुसार अर्थ लावल्यामुळे संघटनेचे लहान-लहान तुकडे झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला सर्वसमावेशक 'रिपब्लिकन पक्ष' अस्तित्वात आला नाही. मात्र फक्त महारांचा 'रिपब्लिकन पक्ष' बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर १९५७ साली स्थापन झाला. त्यात सुरुवातीपासूनच नेतृत्वासाठी रस्सीखेच निर्माण झाली असल्याने पुढे त्या पक्षात पोटजातीनिहाय गट पडले. हा इतिहास ताजा व सर्वज्ञात आहेच नंतर कालानुरूप निर्माण झालेल्या दलित पँथर, मास मूव्हमेंट, मुक्तीसेना इत्यादी संघटना स्थापन झाल्या. परंतु त्यांच्यातही अनेक बारीक-बारीक गट निर्माण झाले आणि अशा अशक्त संघटनांना खऱ्या अर्थाने कोणतीच चळवळ उभी करता आली नाही.

हा सर्व इतिहास आणि संदर्भ पाहिला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीत असलेली पोलादी संघटना फुटलेली व चळवळ थांबलेली दिसते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन रिपब्लिकन पक्षाचे वेगवेगळे गट, उदा. रिप. (खोब्रागडे), रिप. (गवई), रिप. (प्रकाश आंबेडकर), रिप. (कांबळे), इत्यादी, तद्वतच बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन 'दलित पँथर.' मास मूव्हमेंट, दलित मुक्तीसेना, इत्यादी संघटना हौशी नाट्य मंडळांसारख्या कार्यरत आहेत. विचारांचा केन्द्रबिंदू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान असूनही या संघटना एकत्रित येत नाहीत. किंवा एकोप्याने काम करीत नाही. यापैकी कुणीही आपल्या पक्ष किंवा संघटनेसाठी व्यापक भूमिका स्वीकारलेली नाही किंवा तसे प्रयत्नही केले नाहीत. त्यामुळे स्वतःच्या जातीत व पोटजातीत विभागलेल्या या संघटनांनी शक्तिशाली चळवळ उभारला, जिच्यामुळे भारतीय इतिहासात दूरगामी परिणाम झालेत, असे कुठे दिसते ?

'दलबदलू' म्हणजे एका पक्षातून दुसऱ्या पक्षात किंवा एका संघटनेतून दुसऱ्या संघटनेत जाणारा असा तो. शिवीसारखा या शब्दाचा उपयोग करतात. आमच्या देशात पक्ष आणि संघटना ह्या जातीजातींवर आधारल्या आहेत. थोड्याफार फरकाने त्यांच्यात जातींची बीजे खोलवर रुजलेली असतात. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जातींचा आधार घेऊन निवडणुका लढविल्या जातात. ज्या मतदार-संघात ज्या जातीचे जास्त मतदान आहे, त्या जातीच्या उमेदवाराला तिथे तिकीट दिले जाते. या अलिखित नियमाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी अपवाद नाहीत. ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतेचा पुरस्कार करणारा धर्म व जाती तोडण्यासाठी आयुष्यभर चळवळ उभी केली, संघटना बांधली त्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी त्यांना आपल्या जाती-पुरते संकुचित करून चळवळीसाठी जातीचा उपयोग केला. त्यामुळे ज्यांनी थोडी व्यापक भूमिका घेतली, त्यांना 'दलबदलू' म्हणून हिणवण्यात आले. त्यांच्यावर 'जातीपासून दूर' गेला असा आरोप करण्यात आला. डॉ. आंबेड-करांच्या चळवळीतील कार्यकर्ते, नेते इतर संघटनात जातात, ते बाबासाहेबांचा विचार किंवा व्यवहार अपूर्ण आहे म्हणून नाही, तर ते विचार आणि सिद्धांत राबविण्यासाठी लागणारी संघटना अशक्त व दुबळी आहे म्हणून.

हे कार्यकर्ते व नेते ज्या पक्ष व संघटनेत जातात, त्या संघटनेचे ध्येयधोरण आंबेडकरी विचारांशी समांतर असायला हवे. त्यांनी त्या संघटनेत आंबेडकरी विचारांचा पाठपुरावा करायलाच पाहिजे. काँग्रेस पक्षात जाणारे कार्यकर्ते व नेते यासंबंधी जागरूक असतात असे माझे मत आहे. आणि इतर कोणत्याही पक्षापेक्षा काँग्रेस (इं) हा पक्ष आंबेडकरी चळवळीला 'दगडापेक्षा वीट मऊ' या उक्तीप्रमाणे जवळचा आहे. मागासवर्गीयांसाठी बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या घटनात्मक सवलतींबद्दल आणि इतरही प्रश्नांबद्दल काँग्रेस त्यातल्यात्यात सकारा-त्मक विचार करते. पक्ष, संघटना बदलल्यानंतर आंबेडकरी विचारांचा पाठपुरावा करून त्याचा प्रभाव त्या पक्ष संघटनेवर पाडणे हे त्या कार्यकर्त्यांच्या, नेत्यांच्या व कार्यांच्या कुवतीवर अवलंबून आहे. संघटना बदलतांना कोणता स्वार्थ त्यामागे दडलेला आहे हे पाहण्यापेक्षा त्या 'दलबदलू'ने सामाजिक हिताचा विचार कायम मनांत ठेवला पाहिजे, असे माझे स्पष्ट मत आहे.

आंबेडकरी चळवळीतील काही कार्यकर्ते व नेते यांनी पक्ष बदलल्यानंतर त्यांच्या मागे बाबासाहेबांचे अनुयायी गेले नाहीत हे सत्य जरी निर्विवाद असले, तरी एवढ्यानेच मागे न जाणारांचे बाबासाहेबांचे अनुयायित्व सिद्ध होत नाही. इतर पक्षात जाणे म्हणजे आंबेडकरी विचारांशी गद्दारी होतेच असे नाही. उलट,

बाबासाहेबांचे नाव घेऊन त्यांच्या विचारांना काळिमा फासणारे, त्यांच्या नावावर आपली दुकानदारी चालवून शोषण करणाऱ्या त्यांच्या 'नकली' अनुयायांची संख्या दिवसेंदिवस गाजरगवतासारखी वाढत आहे, पक्ष बदलणाऱ्या नेत्याची कृती बाबासाहेबांच्या सामान्य अनुयायांना मान्य नाही, हे जरी खरे असले तरी बाबासाहेबांचा खरा पक्ष व संघटना कोणती याचेही उत्तर त्यांच्याजवळ नसते, हेही तेवढेच खरे आहे. इतर पक्षात खरा आंबेडकरवादी गेल्याने आंबेडकरी चळवळीचे नुकसान होत नाही, मात्र त्या पक्ष बदलणाराने आंबेडकरी विचारांची नाळ तोडता कामा नये. पक्ष बदलतांना बदलणाराने याचेसुद्धा भान ठेवावयास पाहिजे की तो पक्ष प्रतिगामी नको, भांडवलशाहीचा पुरस्कर्ता नको. तात्पर्य, तो पक्ष किंवा संघटना बाबासाहेब आंबेडकरांच्या किमान मूलभूत विचारांशी फारकत घेणारी नको. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत राहून ती चळवळ मोठी करणे हे प्रत्यक आंबेडकरवादी कार्यकर्त्याचे प्रथम कर्तव्य आहे. या चळवळीला मुळातच दुहीचा (फुटीचा) इतका भयंकर रोग जडलेला आहे की, त्यावर उपाय होऊच शकत नाही. आपण पाहतो की, आजपर्यंत दलित नेत्यांचे ऐक्य साधण्यासाठी कितीतरी प्रयत्न झाले. अनेक वेळा आणाभाका झाल्या. पण ते ऐक्य पाण्यावरची रेष ठरली. म्हणून जी गोष्ट शक्य नाही. त्यासाठी वेळ व सर्व शक्ती खर्ची घालण्यापेक्षा वर सांगितल्याप्रमाणे इतर पुरोगामी पक्षांच्या मंचावरून आंबेडकरी चळवळच उभारता येत असेल तर पक्ष किंवा संघटना बदलण्यात चूक नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'मी माझी जमात शासनकर्ती बनवीन,' याचाच अर्थ असा आहे की शासनात आमचे लोक असले तर गोरगरीब समाजाला न्याय मिळेल, त्यांचे अधिकार, हक्क सुरक्षित राहतील आणि एकूणच समाजाला पुढे नेता येईल. हे सर्व करण्यासाठी शासनात घुसणे महत्त्वाचे आहे. परंतु असंघटित असलेल्या व छिन्न-भिन्न झालेल्या आंबेडकरी चळवळीत राहून ते शक्य नाही. तेथे असून स्वतःसाठी काय किंवा समाजासाठी काय, कुणासाठी काहीच करता येत नाही. म्हणून कोणत्या का शिडीने होईना, शासनाच्या खुर्चीवर चढणे हे आज तरी महत्त्वाचे आहे. तरच समाजासाठी काही करता येईल. 'सत्तेपुढे शहाणपण चालत नाही' असे म्हणतात, ते काही खोटे नाही. आंबेडकरी विचारांची बांधिलकी ठेवून सत्ता मिळत असेल तर समाजासाठी चांगले काम करता येईल.

आज देशात अत्यंत विकट परिस्थिती निर्माण झाली आहे. पुनरुज्जीवनवादी शक्ती उफाळून वर आल्या आहेत. बाबासाहेब आंबेडकरांचा समतावादी विचार मुळापासून उपटून टाकण्याचे कट-कारस्थान रचले जात आहे. अशा

स्थितीत प्रत्येक आंबेडकरवाद्याचे कर्तव्य आहे की, अतिशय सावधपणे आपल्या हातून कृती व्हावयास हवी. या बलाढ्य प्रतिगामी शक्तीला तितक्याच कणखरपणे उत्तर देण्यासाठी आम्हाला आमची संघटना मजबूत करावी लागेल. त्यासाठी आमच्या विचारांच्या बाजूनी जे पक्ष व संघटना उभ्या राहत असतील किंवा राहू इच्छीत असतील त्यांना बरोबर घेऊन देशात एक मोठी शक्ती उभी करणे किंवा निर्माण करणे आवश्यक झाले आहे. तरच आम्हाला सत्ता हस्तगत करून या प्रतिगामी शक्तीस चोख उत्तर देता येईल.

□

नीती हा दलित साहित्याचा गाभा

समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या जीवनमूल्यांचा स्वीकार केलेल्या माझ्या प्रिय बंधुभगिनींनो !

अ. भा. दलित साहित्य सम्मेलनाचे अध्यक्षपद देऊन आपण मला जे सन्मानित केले त्याबद्दल मी तुमचा ऋणाईत झालो आहे. माझा सन्मान करून आपण दलित साहित्याच्या चळवळीतील एका कार्यकर्त्याच्या कार्याची पावती दिली आहे. दलित साहित्यनिर्मितीला मी चळवळ मानतो. म्हणून किती लिहिले यापेक्षा काय लिहिले यावर तुम्हा सर्वांची बारीक नजर आहे हे यामुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. यापूर्वी डॉ. म. ना. वानखडे, प्रा. गं. बा. सरदार, हिंदीचे जीवनवादी प्रख्यात लेखक कमलेश्वर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, भाई माधवराव बागल, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. यशवंत मनोहर यांच्यासारख्या विद्वान, अभ्यासक, साहित्यिक व विचारवंतांनी हे पद भूषविले आहे. त्यांच्यामुळे दलित साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदाची उंची एव्हरेस्टपेक्षा जास्त झाली आहे. या महायोद्धचांच्या ओळीत माझ्यासारख्या एका सामान्य सैनिकाला आणून बसवलं यातच तुमच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो.

या चंद्रपूर नगरीत हे साहित्य सम्मेलन भरत आहे, ही माझ्या दृष्टीने अतिशय मौलिक, ऐतिहासिक म्हणून आनंदाची घटना आहे. या नगरीवर आणि या परिसरात कधी काळी गोंड राजांनी राज्य केलं. म्हणून हा प्रदेश गोंडवण या नावानेही ओळखला जातो. असूर, नाग, द्रविड हे या प्रदेशाचे आद्य रहिवाशी. त्यांचे कर्तृत्व व शौर्य या प्रदेशाने पाहिले आहे. त्यांच्या गौरवगाथा त्या काळाने मुक्तकंठाने गायिल्या आहेत. येथील जवळच्या प्रदेशात, भद्रावती क्षेत्रात बौद्धांचं राज्य होतं, हे आज तेथे सापडलेल्या अवषेपांवरून सिद्ध होते. तशीच दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे या नगरीने दलितांचे थोर नेते

बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या कार्याचा इतिहास आपल्या पहिल्या पानांवर लिहून ठेवला आहे. या नगरीत सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १६ ऑक्टोबर १९५६ रोजी बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची आपल्या हजारो अनुयायांना दिशा दाखविली. अशा या ऐतिहासिक नगरीत दलित साहित्य सम्मेलन भरावं ही सुद्धा औचित्यपूर्ण घटना मी मानतो.

महाराष्ट्रात १९७६ पासून १९८९ च्या या आरंभापर्यंत दलित साहित्याची ही नऊ सम्मेलने, इतर मेळावे, काही परिषदा, काही जिल्हा सम्मेलने व काही प्रादेशिक सम्मेलने झाली. यावरून दलित साहित्याच्या प्रवाहाचा वेग किती प्रचंड आहे हे सिद्ध होते. देशाच्या इतरही राज्यात समर्थपणे वेगाने हा प्रवाह पसरू लागला आहे.

दलित साहित्य विश्वातील एक सर्जनशील कलावंत व सामाजिक कार्यकर्ता म्हणून मी साहित्यनिर्मितीच्या चळवळीकडे प्रबोधनाच्या दृष्टीने पाहतो. या चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले व तथागत बुद्ध या युगप्रवर्तक महामानवांच्या तत्त्वज्ञानाचा भक्कम पाया लाभला असल्याने ही युगप्रबोधनाची चळवळ युगप्रवर्तनाची चळवळ झाली आहे. ही चळवळ येथील सामाजिक, आर्थिक व इतर सर्व विषमतेविरुद्ध आणि शोषणाविरुद्धची चळवळ आहे. भारतीय इतिहासाच्या हजारो वर्षांच्या पानांवर शोषणांचे अध्याय काळ्याकुट्ट अक्षरांनी गच्च लिहिले आहेत. हे शोषण इतके गुंतागुंतीचे केलेले आहे की कधी ते सामाजिक वाटते, कधी आर्थिक आणि सांस्कृतिक, तर कधी शैक्षणिक वाटते. परंतु खऱ्या अर्थाने या शोषणाचा पाया सामाजिक विषमताच आहे. त्यावर आर्थिक व इतर शोषणाचे मजले उभारले आहेत. अशा या शोषणाच्या किल्ल्याभोवती देव–धर्माच्या महाकठीण भिंती उभारल्या आहेत. या महाभयंकर किल्ल्यात आपण हजारो वर्षे बंदी होतो, आजही आहोत. प्रकाशाचा कोणताच किरण आमच्यापर्यंत येऊ न देण्याची प्रचंड दक्षता बाळगण्यात आली होती. शोषणाच्या या किल्ल्याचे दरवाजे उघडण्याचे व तो किल्ला पाडण्याचे काम म. फुले, आगरकर, गाडगे महाराज, राजर्षी शाहू महाराज इत्यादी महापुरुषांनी आपआपल्या परीने केले. परंतु हा अत्यंत अवघड अजोड किल्ला उद्ध्वस्त करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या तत्त्वज्ञानाचे व कार्याचे सुरुंग पेरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण आयुष्य मानव मुक्तिलढ्याचे प्रतीक होते. हजारो वर्षे ज्यांना ज्ञानार्जन व अर्थर्जनापासून वंचित ठेवले होते. ज्यांना दैन्य, दास्य व लाचारी याशिवाय कशाचाच अधिकार नव्हता अशा दगडात पडलेल्या समाजाला जागृत करून त्यांच्यात स्वाभिमानाची ज्योत

पेटवून त्यांना शिकण्याचा मार्ग बाबासाहेबांनी मोकळा केला. यासाठी आपल्या पासष्ट वर्षांच्या आयुष्यात त्यांनी हाडांची काडं केली, रात्रीचा दिवस केला; क्षणाचीही उसंत, विसावा या महामानवाने घेतला नाही. एका बाजूला जातीयवादी धर्ममार्तंड, दुसऱ्या बाजूला गरिबांच्या रक्तावर पोसलेले सरंजामशाही भांडवलदार, तिसऱ्या बाजूला रुढीवादी, परंपरावादी, स्वार्थी राजकारणी अशा बलाढ्य शत्रूंशी सर्व आघाड्यांवर डॉ. बाबासाहेब एकाकी लढत होते. विज्ञानवादी, बुद्धिप्रामाण्यवादी, जडवादी जीवननिष्ठा स्वीकारून त्यांनी आपल्या लढाईच्या दिशा स्पष्ट केल्या. हा लढा जीवनमूल्यांसाठी होता. तो सामाजिक, आर्थिक व इतर सर्व विषमतेविरुद्ध होता. तसाच तो समता, बंधुता, न्याय यांच्या बाजूने होता. त्यासाठी त्यांनी देव, धर्म, कर्मकांड, अध्यात्म इत्यादींना नकार देऊन विषमता पसरविणाऱ्या त्या विषवल्लींच्या मुळावर घाव घातला. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले विद्रोही लेखक झाले. त्यांनी शब्दांची ताकद ओळखली होती. या मृतप्राय समाजाला जागृत करण्यासाठीही त्यांनी याच शब्दसामर्थ्याचा उपयोग केला. दलितांच्या मुक्तीसाठी व शक्तीसाठी त्यांनी आयुष्यातील प्रत्येक क्षण क्रांतीपर्व म्हणून वापरला. त्यांच्या अफाट कर्तृत्वाने व जाज्वल्य विचारांनी या देशातील तमाम शोषित माणसांच्या बौद्धिक व मानसिक स्वातंत्र्याचा विचार केला. त्यांच्या उत्थानासाठी त्यांच्या हातात जडवादी, विज्ञानवादी, नीतीवादी, पर्यायाने मानवतावादी तत्त्वज्ञानाच्या मशाली दिल्या. बाबासाहेबांनी आपल्या तत्त्वज्ञानात तळागाळाच्या माणसाच्या प्रगतीचा आलेख मांडला. या मानवमुक्तीच्या आंदोलनाने भारतीय दलितांच्या जीवनजाणिवा बदलल्या. या आंदोलनातूनच दलितांना गतिमान जीवन जगण्याच्या दिशा मिळाल्या, आशा आणि प्रेरणा मिळाल्या. या प्रेरणेतूनच दलित साहित्याचा जन्म झाला.

असे हे दलित साहित्य दलित जाणिवेतून निर्माण झालेले एका नकाराचे व एक स्वीकाराचे साहित्य आहे. दलित साहित्य देव, धर्म, आत्मा, कर्मकांड, चमत्कार, पूर्वजन्म, पुनर्जन्म यांना कठोरपणे नाकारते. दलित साहित्य हे वर्ण व वर्गवादाच्या विरोधात वाङ्मयीन आवाज उठविते. समाजातील सामाजिक, आर्थिक विषमतेचा ते कडाडून विरोध करते व समतेचा तद्वतच माणसाच्या नीतीमान प्रवृत्तीचा ते स्वीकार करते. माणसाला केंद्रबिंदू, मानून त्याच्या प्रगतीचा ते आलेख मांडते. त्यासाठी ते समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि प्रज्ञा, शील, करुणा या मानवी मूल्यांचा भरभक्कमपणे पुरस्कार करते. दलित साहित्य हे समाजवादी, जीवनवादी, नीतीवादी जडवादी भूमिका घेऊनच

प्रकटते. दलित साहित्यिकांची भूमिका वरवर नकाराची दिसत असली तरी त्या नकारामागे नवनिर्माणाचा स्पष्ट दृष्टिकोन आहे. म्हणूनच दलित साहित्य मराठी साहित्यापेक्षा निश्चितच वेगळे आहे. याची उंची, व्याप्ती, खोली मराठी साहित्याच्या पारंपरिक मानदंड व मोजमापांनी मोजता येणार नाही. ते एका भाषेपुरते मर्यादित नाही. म्हणून कोणत्याही एका भाषेत दलित साहित्याचा प्रवाह सामावून जाणार आहे असे भाकीत करणे हे चुकीचे ठरेल. याचे उदाहरणच द्यावयाचे झाल्यास तिसऱ्या अ. भा. दलित साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष हिंदीचे विख्यात जडवादी पुरोगामी लेखक माननीय कमलेश्वर हे होत. ही घटना दलित साहित्याच्या कक्षा किती रुंद आहेत हे दाखविणारी ठरते. आज या संमेलनात सक्रिय भाग घेण्यासाठी इतर राज्यांतून लेखक आले आहेत. तसेच वरीलपैकी दलित सा. सं. चे काही अध्यक्ष जातीने दलितही नव्हते. दलित साहित्याला भाषेच्या, राज्याच्या किंवा राष्ट्राच्या सीमा बंदिस्त करू शकत नाहीत. ते जगातील सर्व शोषित जनतेचा विचार करते. त्यांच्या बाजूने उभे राहते. त्यांच्या मुक्तिलढ्यांचे क्रांतीगीत गाते.

'माणसांसाठी आरती गाणारं' दलित साहित्य, ग्रामीण, शहरी, आदिवासी, ख्रिस्ती असं वेगवेगळं असूच शकत नाही. जे जे माणसांच्या समतेसाठी लढणारे, मानवमुक्तीचे क्रांतीगीत गाणारे ते सर्व दलित एक, अशी त्याची व्याप्ती आहे. काही मित्र 'दलित' या शब्दाला घाबरून जनवादी, ग्रामीण, आदिवासी, वगैरे शब्दप्रयोग करून निराळे होतात. त्या मित्रांना माझे स्पष्ट सांगणे आहे की, 'दलित' हा शब्द जातीवाचक नाही. तो कालचा 'शोषित' व आजचा 'संघर्षशील' या अर्थाने आम्ही वापरतो. त्याने जर संघर्षाची धार बोथट किंवा संकुचित होत असेल तर उद्या दलित साहित्यिक 'दलित साहित्य' हा शब्द फेकून 'फुले आंबेडकरी विचारांचे साहित्य' हे शब्दप्रयोग करतील.

दलित साहित्य मानवतावादाची नव्याने मांडणी करून जगाला ओळख करून देत आहे. आजपर्यंत साहित्यिकांनी कल्पनारम्य साहित्याला जीवंत ठेवण्यासाठी प्रयोग व प्रयत्न केले, आज आम्ही माणसाला जीवंत ठेवण्यासाठी साहित्याचा प्रयोग करीत आहोत. त्यांनी फक्त साहित्याला सुंदर केले. दलित साहित्याने माणूसच सुंदर केला. त्यांनी भोगवादी कल्पनारम्य साहित्याचा सत्कार केला. दलित साहित्याने माणसांच्या सभ्यतेचा सत्कार केला. त्यांनी कलेच्या शुद्धतेसाठी मानवतेची हत्या केली. दलित साहित्यिक मानवतेच्या शुद्धतेसाठी साहित्याचा व कलेचा उपयोग करीत आहेत. दलित साहित्य

भूतकाळातील जगण्याला गौरव मानीत नाही, तर ते त्याचा तिरस्कार करते, धिक्कार करते, भविष्यातील कल्पनारम्य सौंदर्यवादावर त्याचा मुळीचा विश्वास नाही, तर ते वर्तमानातील प्रकाशमान जीवन अधोरेखित करते. ज्यांचा वर्तमान स्वतःच्या हातात नाही त्यांचे भविष्य अंधःकारमय असते असे आमचे ठाम मत आहे. सुंदर भविष्यासाठी वर्तमानात धडाडीने, तार्किकतेने व विवेकाने जगणे ही महत्त्वाची तेवढीच आवश्यक अट आहे. यावर दलित साहित्यिकांचा पूर्ण विश्वास आहे. दलित साहित्यिक भूतकाळाचे राखणदार नाहीत. ते वर्तमानाचे शिल्पकार आहेत, घटनाकार आहेत आणि भविष्याचे मार्गदर्शक आहेत. कारण आम्ही आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे पाईक आहोत. हे तत्त्वज्ञान माणसाला माणूस होण्याचे शिकविते. माणसाला एकमेकाचे भाऊ व्हायचे शिकविते. फक्त भारतीय होण्याचे शिकविते आणि त्याचप्रमाणे 'गर्वसे कहो हम भारतीय है।' असं म्हणायला शिकविते. 'बाबासाहेबानं म्हटल्याप्रमाणे आम्ही प्रथमतः भारतीय व अंतीमतःही भारतीय आहोत. आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा गाभा मानवतावाद व राष्ट्रवाद आहे. काही मंडळी या देशातील माणसांच्या पेंढ्या बांधायला निघाली आहेत. काही धर्माच्या दोराने, काही प्रादेशिक सीमांच्या दोराने काही वंश व पैशाच्या दोराने, जातीच्या, पंथाच्या दोराने. हे सर्व दोर आम्ही आमच्या आंबेडकरी राष्ट्रवादाच्या तीक्ष्ण शस्त्राने कचाकच कापून काढू व सर्व माणसे मोकळी करू. बंधमुक्त करू. सम्यक् भारताचे चित्र आंबेडकरी सूर्य-प्रकाशाने प्रकाशमान करू. आमचे राष्ट्र प्रकाशमान करू. या प्रकाशात आम्ही सारे न्हाऊन निघू.

धर्माच्या नावावर मतांचा जोगवा मागण्यासाठी काही लोक निघाले आहेत, त्यांना मते मिळूही शकतील. पण धर्माच्या नावावर राष्ट्र बांधल्या जात नाही. ते बळकट होत नाही. धर्माचा आग्रह ही लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारी कुऱ्हाड आहे. मग हे लोकशाहीचे झाड तोडायचे की त्याला एकात्मतेचे खतपाणी घालून बलदंड करायचे याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

या देशाच्या स्वातंत्र्याला चाळीस वर्षे झाली. पण अजूनही आमचा संघर्ष संपलेला नाही. पारतंत्र्यात असताना आमचा लढा स्वातंत्र्यासाठी परकियांशी होता. आजही आमचा लढा स्वातंत्र्यासाठीच आहे पण तो स्वकीयांशी ! चाळीस वर्षांच्या अगोदर आम्हाला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. पण हजारो वर्षांच्या या लढ्यात अजूनही आम्ही सामाजिक स्वातंत्र्य मिळवू शकलो नाही. जो समाज स्वतःचे सामाजिक आणि मानसिक स्वातंत्र्य मिळवू शकत नाही तो राष्ट्राचे स्वातंत्र्य कसा टिकवू शकेल हा प्रश्न सदैव आमच्या डोळ्यापुढे उभा राहतो.

आता तर विघटनवादी, पुनरुज्जीवनवादी शक्ती धर्माच्या, जातीच्या नावावर देशाचे तुकडे पाडण्यास सरसावल्या आहेत. त्या आक्रमक झाल्या आहेत. अशावेळी लेखक म्हणून आमचे काही कर्तव्य असणार की नाही ? मला वाटते, लेखकाला नुसतं लेखक असून चालणार नाही, त्याला कार्यकर्त्याचे हात–पाय लावावे लागतील, तर कार्यकर्त्याला नुसतं कार्यकर्ता असून भागणार नाही तर त्याला कवी, लेखकाचे डोळे लावावे लागतील. नुसतं लेखक असणं किंवा नुसतं कार्यकर्ता असणं हे दोघांनाही आज परवडणारं नाही. कारण माझ्या बंधुंनो ! आज आम्ही वादळात उभे आहोत. आमच्या भोवती सारेच पेटलेले आहे. धगधगते आहे. अशावेळी सुखाने, चैनीने आम्हाला गप्प व स्वस्थ बसता येणार नाही. तसा प्रयत्न जर कोणी केला तर ते वादळात उन्मळून पडतील किंवा आगीत जळून त्यांची राख तरी होईल. आम्हाला स्वतःही कोसळायचे नाही, आणि जळायचे नाही. तसेच दुसऱ्या कुणालाही पडू द्यायचे नाही, जळूही द्यायचे नाही.

आज या मंडळींनी जाती, वर्ण धर्म, देव, यांच्या नावावर भारतीय लोकशाही विचारप्रवाहाला अशुद्ध व अशुद्ध करण्याचा विडा उचललेला आहे. आम्हीही राष्ट्रीय एकात्मता, एकसंघता, धर्मातीतता, समता यांना जनमानसात रुजविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करणार आहोत. या देशाचे सुंदर, देखणे, निकोप, चित्र सदैव पाहण्याची आमची इच्छा आहे. त्यासाठी येथील दलितांचे सर्वांगीण उत्थान होणे जरूरी आहे. येथील दलित जर सशक्त झाला तरच देश बलवान होईल. दलित अशक्त राहिला तर देशाचे स्वातंत्र्य रसातळाला जाईल, लोकशाही धोक्यात येईल आपणासमोरील मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. जोपर्यंत मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिल्या जात नाही, तोपर्यंत या देशात निकोप लोकशाही आहे, ती लोकशाही रुजली आहे, असे म्हणता येणार नाही. कारण नामांतराचा ठराव हा विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने पारीत झालेला आहे. नामांतराने दलितांचे प्रश्न सुटणार नाही हे जरी खरे असले तरी नामांतर हे येथील मनामनात असलेली जातीयता मोजण्याचा मापदंड आहे असे आमचे स्पष्ट मत आहे.

आजही काही मानवतेचे शत्रू ठिकठिकाणी दलितांवर हल्ले करीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा विद्रूप करून आपला अघोरी, क्रूर आनंद असल्या कृती करून व्यक्त करीत आहेत. ही रानटी अवस्था केव्हा संपणार आहे ? त्यांनी देशाला धर्माची दारू पाजून गुंगविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत, ते देशाला गुंगीत, धुंदीत व अशक्त पाहू इच्छितात. आम्ही देशाला जागृत व

सशक्त पाहू इच्छितो. ते या देशाचे चिटोरे पाडू इच्छितात, आम्ही या देशाला एकसंघ पाहू इच्छितो.

या विघटनवादी शक्तींजवळ पैसा आहे, सत्ता आहे आणि महत्त्वाचे म्हणजे मेंदूनं काम न करणारी व आस्तिक्याने बधीर झालेली बहुसंख्य डोकी आहेत. आस्तिक्याने मेंदूचं काम करणे ठप्प होते. आस्तिक्य माणसाच्या गतिमानपणाला Speed–breaker चं काम करते. नास्तिक्य हे मेंदूला चॅनलाईज करते. नास्तिक्य हे सम्यक क्रांतीच्या गाडीला वेग देणारे गेअर आहे. आस्तिक्य माणसाच्या आतील लाईट ऑफ करणारे बटन आहे. नास्तिक्य लाईट ऑन करणारे बटन आहे. आम्हाला नास्तिक्याचे महत्त्व, त्याची क्रिया समाजातील प्रत्येक घटकाला समजावून सांगावी लागेल. अर्थातच हे काम अतिशय कठीण आहे. हे काम करणारी मंडळी अल्पसंख्यच असणार आहेत. पण त्याला नाईलाज आहे. कोणतेही चांगलं काम सुरू करायला काही ठराविक माणसंच असतात. कालांतराने त्यांचे अनुयायित्व वाढते.

या लढाईत आम्हाला सर्व शोषितांना सामावून घ्यावे लागेल, त्यात मागास जाती, जमाती, आदिवासी, विमुक्त भटक्या जमाती सर्व पुरोगामी शक्ती व स्त्रिया असतील. स्त्रिया तर या देशातील सर्वात पीडित व शोषित आहेत. त्यांच्या सामाजिक, मानसिक मुक्तीसाठी विशेष प्रयत्न करावे लागतील आणि त्यांनाही खंबीरपणे जगण्यासाठी उभे करावे लागेल. आज त्यांची अस्मिता जागृत झाली आहे, त्यांनी स्वतःचा मार्ग शोधण्यासाठी संघटना बांधून चळवळी उभ्या केल्या आहेत. त्यांच्या कार्यशक्तीला आम्हाला सक्रिय सहकार्य करावे लागेल.

दलित साहित्य त्याच्या सर्वांगाने मोहरून आले आहे. कविता, कथा समृद्ध होत आहे. कादंबरी, नाटक मंदगतीने, पण पुढे पुढे जात आहे. सर्वात लक्षणीय प्रांत आज दलित आत्मकथनांचा झाला आहे. दलित आत्मकथने व मराठी आत्मकथा यात कोठेही साम्य आढळत नाही. ते वाङ्मयप्रकाराचे नवे दालन आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. लक्ष्मण माने, दया पवार, लक्ष्मण गायकवाड, यांच्या उपरा, बलुतं व उचल्या या कृतींनी पारितोषिकांचे नवे कीर्तिमान स्थापन केले आहेत.

गतजीवनाच्या एका भीषण सत्याचा मागोवा घेणारी दलित आत्मकथने दाहकतेची धगधगती कुंडं आहेत. या आत्मकथनांनी काही प्रश्नही स्वतःसाठी निर्माण केले आहेत. जखमांवर कोरलेली ही लेणी पाहतांना व वाचतांना हृदय

पिळवटून जाते, भळभळा वाहू लागते. भूतकाळातील आमची अगतिकता, लाचारी, आमच्या आयाबहिणींच्या अब्रूचे धिंडवडे, जीवघेणे, दारिद्र्य, पशुप्रमाणे जगावे लागलेले जीवन, हे नागडे सत्य सांगत व वाचत असताना शिसारी येते, त्वेष येतो आणि राग अनावर होतो. हे सबंधच किळसवाणे बीभत्स आयुष्य पाहू नये असं वाटतं आणि ओरडून सांगावसं वाटतं की, 'बंद करा हे सारं.'

दलित कवितेची समृद्धता, संपन्नता आता मान्य पावली आहे. दलित कवितेचा गुलमोहर फुलारून आग, आग झाला आहे. उत्थानगुंफा, गोलपिठा, उत्खनन, गावकुसाबाहेरील कविता या कवितासंग्रहांनी मैलांचे दगड उभे केले आहेत. यातील अनेक कवितांची जगाच्या अनेक भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. अभ्यासक्रमात विद्यापीठीय स्तरापर्यंत यांचा अंतर्भाव आवश्यक झाला आहे. अनेक संशोधकांनी पीएच. डी. सारख्या सर्वोच्च पदव्या या विषयांवर घेतल्या आहेत, घेत आहेत. प्रचंड प्रमाणात दलित कविता लिहिल्या जात आहे. याशिवाय अनेक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत, होत आहेत. दलित कवितेचा अभ्यास करताना त्यांना डावलता येणार नाही. मात्र काळाच्या निकषावर किती टिकते ते बघावे लागणार आहे. परंतु दलित कवितेचे रक्ताचे नाते आंबेडकरी प्रेरणेशी, विचारांशी असल्याने ती विद्रोहाचा ज्वालामुखी होते, एकूणच विषमतेविरुद्ध ती बंदुकीची गोळी होते, माणसाला माणूसपण प्रदान करण्यासाठी ती पाणी होते, आग होते आणि झोपलेल्यांसाठी ती पहाटेची जागही होते.

बाबुराव बागूलांच्या कथांची उड्डाणे सातासमुद्र पार गेली आहेत. बाबुरावांच्या कथांचे नायक वादळवेडे आहेत. त्यांच्याजवळ आंबेडकरी विचारांचे शस्त्रसाठे असतात. ते कमालीचे अस्वस्थ असतात. आणि समाजातील विषमतेविरुद्ध लढण्यासाठी सदैव सज्ज असतात. बाबुराव बागुलांव्यतिरिक्त अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, योगीराज वाघमारे, सुखराम हिवराळे, वामन होवाळ, योगेन्द्र मेश्राम, अमिताभ, बंधु माधव, प्रकाश ओंकार खरात, दयानंद मस्के, इत्यादि कथाकारांनी आपल्या लेखण्या परजलेल्या आहेत. श्रीमंत दलित कथेचे ते पहिले मानकरी आहेत.

नाटक हा अत्यंत महत्त्वाचा प्रांत दलित नाट्यकृतींनी वेगवाही होत आहे. राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, बाबासाहेब आंबेडकरांची तार्किकता व डोळस बुद्धिप्रामाण्यवाद या रचनात्मक गुणांनी दलित नाट्यकृती अत्यंत प्रभावी ठरत आहेत. दलित कलाकारांनी आपल्या अभिनयाच्या जोरावर या समर्थ कलाकृती जीवंत उभ्या केल्या आहेत. प्रा. दत्ता भगत, प्रभाकर दुपारे, प्रेमानंद गज्वी,

भि. शी. शिंदे, टेक्सास गायकवाड, प्रा. अविनाश डोळस, कमलाकर डहाट या व इतर नाटककारांनी या प्रांतात भक्कम पाय रोवले आहेत.

कादंबरीचा प्रदेश समृद्ध नसला तरी रिकामा नाही. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल या कादंबरीकारांबरोबर अनेक लेखक कादंबरीलेखन करीत आहेत.

वैचारिक लेखनाने विरोधकांचे तावुत थंड पडले आहेत. म. भि. चिटणीस, डॉ. म. ना. वानखडे, प्रा. रा. ग. जाधव, डॉ, रावसाहेब कसबे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. भालचंद्र फडके, राजा ढाले, ताराचंद्र खांडेकर इत्यादींनी ही वाजू समर्थपणे सांभाळली आहे.

दलित साहित्याच्या चळवळीत नियतकालिकांची भरीव कामगिरी दुर्लक्षिता यायची नाही. डॉ. म. ना वानखडे, प्रा. रा. ग. जाधव, सुखराम हिवराळे, प्रा. ल. बा. रायमाने, वामन निंबाळकर आणि इतर अनेक मित्रांच्या प्रयत्नाने व कष्टाने उभे राहिलेले 'अस्मितादर्श' प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे निष्ठेने व जिद्दीने चालवीत आहेत. डॉ. भाऊ लोखंडे यांच्या कुशल संपादनाखाली चाललेले 'निकाय' व डॉ. यशवंत मनोहर यांचे अभ्यासपूर्ण 'समुचित' यांनी दलित साहित्याची कूस किती समृद्ध व श्रीमंत आहे हे दाखविले आहे. याशिवाय भीमसंदेश, जयभीम, सिंहगर्जना, प्रवोधन, धम्मलिपी, लोकायत, प्रजासत्ताक इत्यादि नियतकालिकांनी या क्षेत्रात ऐतिहासिक कार्य केले आहे.

सर्वच क्षेत्रात इतरत्र दुर्लक्षिलेल्या स्त्रिया दलित साहित्य व चळवळीत तसूभरही मागे नाहीत. दलित साहित्यात हिरा बन्सोडे, ज्योती लांजेवार, सुगंधा शेण्डे, सुरेखा भगत, उर्मिला पवार, वेबी कांबळे इत्यादि भगिनी आपल्या ताकदीनिशी लिहीत आहेत.

अलिकडे दलित साहित्यावर अश्लीलतेचा आरोप होतो. दलित साहित्याला अश्लीलता, लैंगिकता मान्य नाही. काही मंडळी स्वस्त प्रसिद्धीसाठी बाजारात लैंगिकतेची दुकाने मांडत असतील तर त्यांची नाळ आपोआपच आंबेडकरी साहित्यापासून तोडली जाते. या साहित्याचा प्राण नीती आहे.

बंधूंनो, मागासवर्गीयांच्या सवलतींच्या विरोधात मागे गुजराथ, बिहारात आंदोलने झालीत. अजूनही बरीच जातीयवादी मंडळी याविरुद्ध मधूनमधून कुरबुर करीत असतात. त्यांना या सवलती का दिल्या जातात, त्यांचे प्रमाण काय, ते भरल्या जाते किंवा नाही, सवलती कोणा, कुणाला दिल्या जातात या किंवा या संदर्भात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास केलेला नसतो. गैरसमजुतीने व

अभ्यास नसल्याने ते या सवलतींना विरोध करतात. घटनात्मक दिलेल्या जाणाऱ्या सवलती ह्या सवलती नसून अशक्त असलेल्या भारतीय समाजघटकांना सशक्त व इतरांच्या बरोबरीत आणण्याचा तो मार्ग आहे असे त्याचे स्वरूप आहे त्यांचा तो अधिकार आहे. त्याला विरोध करणे म्हणजे राष्ट्र बलवान करण्यास विरोध करणे होते, हे विरोधकांनी समजावून घ्यावयास हवे.

केन्द्र सरकारने बौद्धांच्या सवलतींचाही प्रश्न तावडतोब निर्णय घेऊन सोडवावयास हवा, हजारो वर्ष चातुर्वर्ण्याच्या कचाट्यात जी मंडळी सापडली होती व त्यामुळे सामाजिक व आर्थिक दृष्टचा जे मागे राहिले तेच आजचे बौद्ध होत. बुद्धाचे विचार स्वीकारल्याने त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत एकाएकी कसा बदल होईल ?

बंधूंनो ! सामाजिक समतेचे प्रणेते महात्मा जोतिबा फुले यांच्याविषयी गरळ ओकणारे लिखाण, एका कवडीमोलाचे अस्तित्व नसलेल्या माणसाने केले. या लिखाणात काही तार्किकता, काही संशोधन, काही परिपक्व विचार असते तर आम्ही त्या लेखकाच्या लेखनस्वातंत्र्यासाठी त्याच्या बाजूने उभे राहिलो असतो. परंतु ते नुसतं गलिच्छ, घाणेरडं, शिव्याशाप देणारं, पूर्वग्रहदूषित व बिनबुडाचं लेखन आहे. ही वृत्ती राष्ट्रद्रोही, समाजघातकी आहे. गांगल, बेहरे या वृत्तींनी पुरेपूर पछाडलेले आहेत हे सिद्ध होते. कारण त्यांनी हे लेखन व प्रकाशन जाणीवपूर्वक केले आहे. मनातील विष हळूहळू ओकत राहणं ही या मंडळींची खास शैली आहे. यांना सामाजिक परिवर्तन नको आहे. परंपरा, जाती, धर्म यांच्या नावावर आपआपसात भांडणं लावून आपलं वर्चस्व कायम ठेवणं हा यांचा सततचा डाव आहे. हा डाव आम्ही नुसताच उधळून लावण्याने भागणार नाही तर या वृत्तींच्या मुळावर घाव घालण्यासाठी तयार होण्याची गरज आहे.

मी वर म्हटल्याप्रमाणे आम्ही लेखनस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य म्हणजेच अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे समर्थक आहोत. पण आंधळे समर्थक नाही. डॉ. बाबासाहेबांच्या 'रिडल्स'च्या बाजूने आम्ही का उभे राहिलो ? सफदर हाशमीच्या हत्येचा आम्ही का धिक्कार करतो ? या प्रश्नांची उत्तरे अशी की मानव समाजाला हितकारक, सामाजिक विषमता दूर करणारे, तर्कावर आधारित, संशोधनपर अभ्यासपूर्ण लेखकांचे, कलावंतांचे, स्वातंत्र्य अबाधित राहिलेच पाहिजे.

बंधूंनो, दलित साहित्याचा भाविकाळ उज्ज्वल आहे, दलित लेखकांच्या पहिल्या पिढीने दलित साहित्याला जागतिक कीर्ती मिळवून दिली. त्याचे स्वरूप व भूमिका सिद्ध केली. पुढील पिढीच्या साहित्यिकांनी आता त्या पुढचा प्रवास करायला हवा आहे. प्रत्येक पिढीने पुढचे पाऊल टाकले तर दलित साहित्याची

झेप खाली कदापि येणार नाही. ही प्रतिज्ञा आजउद्याच्या दलित साहित्यिकांनी करावी ही सदिच्छा !

आणि या साहित्यिकांना मोकळ्या मनाने आविष्कृत होता यावे यासाठी महाराष्ट्र शासनाने दलित साहित्य व कलांना उत्तेजन देण्यासाठी दलित साहित्य अकादमीची स्थापना करावी. या अकादमीतर्फे दलित साहित्य, दलित रंगभूमी व इतर ललित कलांना भरभक्कम आर्थिक मदत करावी. त्यामुळे ही उपेक्षित दालने समृद्ध होतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मशताब्दी १९९१ साली येत आहे. तसेच महात्मा फुले यांची निर्वाण शताब्दी १९९० साली येत आहे. ही दोन्ही वर्षे शासनाने सामाजिक परिवर्तनाची वर्षे म्हणून घोषित करावी असे माझे आग्रहाचे सांगणे आहे. या दोन्ही वर्षातील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आतापासून शासनाने तयारी सुरू करावी. यासाठी विचारवंत, कलावंत, तज्ज्ञ व साहित्यिक यांची एक समिती तयार करून शासनाने कार्यक्रम ठरवावे. मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद या चार प्रादेशिक केन्द्रांवर संकुले उभारावी. या ठिकाणी साहित्यकलांचा अभ्यास होईल. कला–साहित्य निर्मिती व संशोधन यांच्या वाढीसाठी उत्तेजन मिळेल. हा मुहूर्त साधून शासनाने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करून त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव द्यावे ही माझी कळकळीची विनंती आहे.


वृद्ध दलित लोककलावंतांची एक सूची शासनाने तयार करावी व जन्मतारखेची अट न ठेवता त्यांना उदरनिर्वाहासाठी मानधन मिळावे.

दलित साहित्य कला या जीवनवादी भूमिका घेऊन प्रकटतात. त्यांनी सामाजिक समतेची नीतिमूल्ये स्वीकारण्याने भारतीय लोकशाही प्रबळ करण्यासाठी या दलितसाहित्यकलांचा उपयोग होईल, असे मला वाटते.

भारतीय साहित्याच्या जगात भारतीय आणि महाराष्ट्रीय शासनाने जपावी अशी दलित साहित्य ही महनीय वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सर्व स्तरांवरून तिच्या वृद्धीसाठी प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे.

बंधूंनो, समाज, साहित्य आणि संस्कृती यांच्या उन्नतीच्या अनुषंगाने मला जे योग्य वाटले ते मी आपणापुढे मांडले आहे. आपण त्याचा विचार करावा अशी विनंती करतो, या संमेलनाचे अध्यक्षपद देऊन माझा सन्मान केला त्याबद्दल संसदेचे मनापासून आभार मानतो आणि आपली रजा घेतो. जयभीम ! जयभारत !

□



दलित चळवळ : काल, आज आणि उद्या

दलित चळवळीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यप्रारंभापासून होते. तत्पूर्वी दलितांसाठी काही व्यक्तींनी मनापासून भरीव कार्य केले. त्या संदर्भात म. जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांची नावे घ्यावी लागतील. त्यांनी मौलिक स्वरुपाचे आणि गौरव वाटावे असे कार्य केले आहे. परंतु ज्याला आपण चळवळ म्हणतो, ती मात्र १९२७ पासूनच सुरू झाली. कारण या चळवळीत स्वत: दलित बहुसंख्येने सहभागी होते आणि या चळवळीचे नेतृत्व सुद्धा दलित जातीत जन्मलेल्या, अन्याय अत्याचाराचे चटके स्वत: अनुभवलेल्या महामानवाकडे होते. त्यामुळे ही चळवळ मुळातच तीव्रतर आणि निर्णायक होती. दलित चळवळीचा विचार करतांना तिचे १. सामाजिक २. शैक्षणिक ३. राजकीय व ४. आर्थिक असे भाग करावे लागतील.

सामाजिक चळवळ

या देशातील धर्मव्यवस्थेने, माणसामाणसांमध्ये जातींच्या नावाखाली विषमता निर्माण करून जगण्याचे, सुखचैनीचे, ज्ञानार्जनाचे, अर्थार्जनाचे सर्व अधिकार काही मूठभर लोकांच्या स्वाधीन केले आणि बहुसंख्य समाजाला लाचारी, दारिद्र्य, अपमान, अज्ञान अशा भयंकर दु:खाच्या खाईत हजारो वर्षे लोटून दिले. आपल्या या कृत्याला धर्म, देव, अध्यात्म, जन्मोजन्मीचा फेरा, कर्मकांड, इत्यादींचा आधार व मुलामा दिला. त्यामुळे हजारो वर्षांची ही कुरूप विषमतावादी सामाजिक व्यवस्था अतिशय टणक झाली होती. या व्यवस्थेविरुद्ध लढण्याचे प्रयोग इथे झाले. पण त्याचा व्हावा तसा परिणाम झाला नाही. या देशात आणि जगात राजकीय पातळीवर अनेक स्थित्यंतरे झाली पण येथील सामाजिक व्यवस्थेत फारसा फरक पडला नाही. या व्यवस्थेविरुद्ध खऱ्या अर्थाने एकोणविसाव्या शतकात आवाज उठविला तो महात्मा जोतिबा फुल्यांनी. त्यांनी आपल्या विचारांना कृतीची जोड दिली व चळवळ उभी करण्यासाठी सत्यशोधक

समाजाची स्थापना केली. ब्राह्मण व भटशाहीकडून शूद्र अतिशूद्रांची होणारी सामाजिक, आर्थिक पिळवणूक थांबवून, त्यांना (शूद्र व अतिशूद्रांना) धार्मिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणे आणि त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे असा व्यापक उद्देश घेऊन फुल्यांनी हा लढा उभारण्याचा भक्कम प्रयत्न केला. सर्वसामान्य माणसांच्या सर्वांगीण आणि सर्वंकष उन्नतीसाठी त्यांनी लेखणी, वाणी व कृतीने आपल्या हयातभर प्रयत्न केले. त्यांच्या या कार्याला फार व्यापक प्रमाणात त्यावेळी प्रतिसाद मिळावयास हवा होता. कारण त्यांनी मांडलेला विचार हा जाती व वर्गविहीन समाजरचनेचा होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना असे वाटत होते की, महात्मा फुल्यांची हो सत्यशोधक चळवळ भारतभर पसरावयास हवी होती. सामाजिक व आर्थिक समतेचा हा विचार त्यावेळी ब्राह्मण नेतृत्वाने फोफावू दिला नाही. स्वातंत्र्याच्या चळवळीत या सामाजिक प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले की काय अशी शंका व्यक्त करायला मोठाच वाव आहे. कारण टिळकांदींचे नेतृत्व हे जातीयता मजबूत करणारे, आर्थिक व धार्मिक विषमतेचा पाठपुरावा करणारे असे होते.

नंतरच्या काळात स्वातंत्र्यचळवळीचे नेतृत्व करणारे व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रपिता ठरलेले महात्मा गांधी सुद्धा धर्म व जाती चौकटीच्या मर्यादा ओलांडू शकले नाहीत. जन्माने आलेला जातीनिहाय व्यवसाय बदलू नये, तो टिकविला पाहिजे असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. चातुर्वर्ण्याला आदर्श मानणारे गांधीजी सामाजिक समतेविरुद्ध होते. त्यांनी उभारलेली राजकीय स्वातंत्र्याची चळवळ ही उच्चवर्णीयांच्या हितांचे रक्षण करणारी आणि सामाजिक शोषणाला एक प्रकारे मदत करणारीच होती. राजकीय स्वातंत्र्यासाठी बलाढ्य इंग्रज सरकारशी अहिंसा आणि सत्याग्रह या शस्त्रांनी लढणारे गांधीजी सामाजिक गुलामीच्या विरुद्ध मात्र एका अक्षरानेही स्पष्टपणे बोलावयास तयार नव्हते. अस्पृश्य म्हणून त्यांच्याच धर्मबांधवांना मिळणारी अमानुष, अघोरी, क्रूर आणि असंस्कृत वागणूक गांधीजी उघड्या डोळ्यांनी पहात होते. अस्पृश्यता घालविण्यासाठी त्यांच्या जवळ मूलभूत विचारच नव्हता. उलटपक्षी आपल्या सवर्णहिंदू धर्मबांधवांना ते संरक्षण देत होते. हे त्यांच्या "राउंड टेबल कॉन्फरन्स" व "पुणे करार" या घटनांतील वागणूकीने आणि त्यावेळी त्यांनी घेतलेल्या भूमिकेने स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदय

राजकीय स्वातंत्र्यासाठी जनआंदोलन उभे करणारे लो. टिळक आणि नंतरचे महात्मा गांधी सामाजिक स्वातंत्र्याच्या संदर्भात मात्र विचार करावयास

तयार नव्हते. याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भारतीय सामाजिक, राजकीय क्षितिजावर उदय ही घटना अपूर्व होती. जोपर्यंत सामाजिक गुलामगिरी संपुष्टात येत नाही तोपर्यंत या राजकीय स्वातंत्र्याला काहीही अर्थ नाही हे बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. देशातील आजची भयावह सामाजिक परिस्थिती पाहिली म्हणजे बाबासाहेबांचे द्रष्टेपण लक्षात येते.

येथील माणसांची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता हा त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू होता. सामाजिक गुलामीतून मुक्त झालेला माणूस नंतर जीवनाच्या सर्व पातळ्यांवर स्वतंत्र होण्यासाठी क्रियाशील आणि बलशाली होईल असा त्यांचा रास्त मूलगामी विचार होता. आपल्या सामाजिक गुलामीची पाळेमुळे देव, धर्म व धर्मग्रंथात असल्याने त्यांना प्रथम नाकारून जातीयतेच्या मुळावरच त्यांनी घाव घातला.

ज्या माणसाचे संपूर्ण शोषण झालेले होते त्या, पिडलेल्या, नाडलेल्या माणसाला प्रथम त्याच्या गुलामीची जाणीव करून देणे, त्याला संघटीत करणे व त्याला आपल्या हक्कांसाठी संघर्ष करण्यास उभे करण्याचे काम डॉ. बाबासाहेबांनी केले. १९२७ ला महाडच्या चवदार तळ्याच्या पाण्याच्या सत्याग्रहापासून त्यांनी या सामाजिक समतेच्या लढ्याचे रणशिंग फुंकिले. नंतर मनुस्मृतीदहन, काळाराम मंदिराचा सत्याग्रह, १९३५ ची येवले येथील धर्मांतराची घोषणा, १९५६ ला नागपूर येथे बौद्ध धम्माचा स्वीकार या सर्व घटना बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीचे महत्त्वपूर्ण ऐतिहासिक टप्पे होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पासष्ट वर्षांच्या आयुष्यात सुमारे चाळीस-पंचेचाळीस वर्षे हा सामाजिक परिवर्तनाचा लढा यशस्वीपणे लढविला. ही लढाई लढतांना अडाणी जनतेला सुबुद्ध करण्याचा बाबासाहेबांचा अखंड प्रयत्न होता. त्यांच्यापुढे हे अतिशय कठिण काम व मोठे आव्हान होते. हजारो वर्षे या सामाजिक विषमतेने माणूस आंधळा, मुका, बहिरा झाला होता. त्याला डोळस, आणि बोलता करून जगाचे भौतिकवादी तत्त्वज्ञान ऐकण्याची क्षमता त्याच्यात निर्माण करायची कल्पनातीत कठीण जबाबदारी बाबासाहेबांनी स्वीकारली होती. कुरूप समाजाला सुरूप करायचे होते. हा अडाणी समाज अंधश्रद्धा, चमत्कार, परंपरा, रूढी यांच्या चिखलात पुरता जाऊन फसला होता. आपल्या वाटचाला आलेले दास्य, लाचारी आणि अस्पृश्यता ही आपल्या मागील जन्माच्या पापांची फळे होत असा त्याचा पक्का समज होता. या सर्व अंधकारातून त्याला बाहेर काढून त्यांच्यात ज्ञानलालसा निर्माण करणे, त्यांच्यासाठी शिक्षणाचे दरवाजे खुले करणे

आणि शिक्षणासाठी सर्व सोयी व सवलती उपलब्ध करून देणे हे जिकीरीचे काम करणे आवश्यक होते.

शैक्षणिक चळवळ

म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाजाला पहिला संदेश कोणता दिला असेल तर तो होता "शिका". नुसते शिका म्हणूनही भागणारे नव्हते. शिक्षणाने माणूस कसा मोठा होतो, डोळस होतो, शिक्षणाची आवश्यकता, उपयुक्तता आणि जीवनात शिक्षणाचे महत्त्व इत्यादी विषयांच्या अनुषंगाने बाबासाहेबांनी या समाजात जागृती निर्माण केली. त्यामुळे या समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटले. ज्या समाजाला शिक्षणाचे दरवाजे हजारो वर्षे बंद होते, ते उघडल्याने त्यांच्या उत्साहाला उधाण येणे स्वाभाविकच होते. मुले, मुली शाळेत जाऊ लागली. गरिबी त्यांना ज्ञानलालसेपासून थांबवू शकली नाही. उच्च शिक्षणासाठी गरीब पालकांनी घरावरील टीनाचे पत्रे, भांडीकुंडी, किडूक-मिडूक गहाण ठेवले, विकले आणि आपल्या मुलामुलींना शिकवून बाबासाहेबांचा संदेश तंतोतंत पाळला. शिक्षण घेऊन आलेली ही मुले वाचू लागली, बोलू लागली. बाबासाहेब एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी या तळागाळातील समाजासाठी १९४५ ला पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि त्या संस्थेच्यावतीने मुंबईस सिद्धार्थ कॉलेज आणि औरंगाबाद येथे १९४९ साली मिलिंद महाविद्यालय काढले. आज या संस्थेची बरीच महाविद्यालये, विद्यालये, वसतीगृहे इत्यादी शैक्षणिक संस्था आहेत. या संस्थांमधून हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या विषयात उच्च शिक्षण घेत आहेत. हजारो विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात उच्च, अतिउच्च, महत्त्वपूर्ण पातळ्यांवर, पदांवर कार्यरत आहेत. या शैक्षणिक चळवळीचा फायदा सामाजिक, साहित्यिक आणि एकूणच सांस्कृतिक जाण येण्यास झाला. समाज प्रबुद्ध झाला. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांच्या अनेक शैक्षणिक संस्थाही आहेत.

शैक्षणिक चळवळीमुळे या समाजात स्वत्वाची जाण व स्वाभिमान या दोहोंची निर्मिती आणि वाढ झाली. बाबासाहेबांच्या या शैक्षणिक चळवळीतून प्रेरणेतूनच पुढे विश्वसाहित्याच्या क्षितिजावर मानवतावादी दलित साहित्याचा जन्म झाला.

राजकीय चळवळ

स्वातंत्र्याच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेचे महत्त्व तत्कालीन नेत्यांना पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु गांधीजीं-

सह सर्व नेत्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले नाही. गांधीजींनी उभारलेल्या हरिजन सेवक संघाचे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य हे वरवरचे व तकलादू होते. देशाला स्वातंत्र्य मिळाले की या प्रश्नाकडे पाहता येईल असे काही काँग्रेसी नेत्यांना वाटे. पण तसे होणे शक्य नव्हते. म्हणून स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात बाबासाहेबांनी सामाजिक समतेसाठी राजकीय चळवळीचा उपयोग हत्त्यार म्हणून केला. "सत्तेपुढे शहाणपण चालत नाही" ही म्हण त्यांना पूरेपुर ठाऊक होती. म्हणून त्यांनी "अस्पृश्यांना सत्तेत योग्य वाटा" मिळाला पाहिजे या मागणीवर वेळोवेळी भर दिला. तद्वतच मिळालेल्या संधीचा, अधिकारांचा जास्तीत जास्त उपयोग पददलितांना त्यांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीतून वर आणण्यासाठी केला.

१९४२ च्या जुलैमध्ये व्हाइसरॉयच्या हुकमान्वये गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर बाबासाहेबांची नियुक्ती झाली व त्यांना मजूरखात्याचे मंत्री करण्यात आले. तेव्हा त्यांनी मजूरांच्या विकासासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या. मालक मजूरांचे संबंध आणि मालकांनी मजूरांचे हित पाहणे या संबंधीच्या मार्गदर्शक सूचना दिल्या. परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्या दिल्या. अस्पृश्यांची लष्करात बंद झालेली भरती सुरू केली. या व अशा प्रकारच्या किती तरी गोष्टी त्यांनी सत्तेत सहभागी होऊन केल्या.

त्यापूर्वी १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्ष व नंतर १९४२ साली शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना ही काळानुरूप बदलत्या राजकीय परिस्थितीची दर्शक ठरतात. भारतीय राज्य घटना लिहिण्याची जबाबदारी स्वीकारून ती लिहितांना आर्थिकदृष्टचा गोरगरीब व सामाजिकदृष्टचा दलित असलेल्या समाजाचा व स्त्रियांचा विसर त्यांना पडला नाही. त्यांच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक हक्कांबद्दल ते अतिशय जागृत होते आणि म्हणून त्यांनी त्याबाबत घटनेत अनेक तरतुदी केल्या. घटना लिहितांना त्यांच्या पुढे भारताची अखंडता, लोकशाहीची बळकटी इत्यादी मुद्दे अग्रक्रमाने होते. ह्या वेगवेगळचा राजकीय भूमिका वठवितांना बाबासाहेबांची दलितांच्या उत्थानाची भूमिका मात्र कोठेही बदललेली दिसत नाही. जोपर्यंत दलित सामाजिक व आर्थिकदृष्टचा इतरांच्या बरोबर येत नाही तोपर्यंत आमच्या देशाची प्रगती झाली, असे मान्य करायला बाबासाहेब तयार नव्हते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात येथे द्विपक्षीय लोकशाही असावी. डावे आणि उजवे असे दोनच पक्ष असावे असे त्यांचे मत नंतर झाले होते. सत्तास्थानी असलेल्या काँग्रेसच्या विरोधात डाव्या विचारसरणीचा एकच बलाढ्य

विरोधी पक्ष असावा व त्याचे नाव रिपब्लिकन पक्ष असावे, असा विचार त्यांनी डॉ. राममनोहर लोहिया व इतर डाव्या पक्षीय नेत्यांना बोलून दाखविला होता. त्यानंतर त्यांचे लवकर झालेल्या महापरिनिर्वाणामुळे हा विचार पुढे अंमलात आला नाही हे निराळे.

ह्या सर्व राजकीय चळवळीत त्यांची भूमिका स्पष्ट होती. त्यांना सर्वांची बलाढ्य एकजूट अभिप्रेत होती. सामाजिक आर्थिक समता प्रस्थापित करून भारतीय लोकशाही आणि धर्मातीत राष्ट्र बलशाली करणे ही ध्येय उद्दिष्टे त्यांच्या समोर होती. धर्मांधता आणि जातीयता यामुळे या देशाचे तुकडे होऊ शकतात व हा देश जसा हजारो वर्षे पारतंत्र्यात राहिला तसा पुन्हा गुलाम होऊ शकतो, हा त्यांचा स्पष्ट व ठाम विचार होता. त्याच्या प्रत्यंतराची चिन्हे आज आपणास दिसू लागली आहेत.

आर्थिक चळवळ

या देशातील आर्थिक परिस्थिती अतिशय गुंतागुंतीची व जगातील परिस्थितीपेक्षा वेगळी आहे. येथे धर्माने प्रत्येक जातीला काम वाटून दिले असल्याने काहींना अर्थप्राप्तीचा धंदा मिळाला व काहींना त्यांच्यावर आर्थिकदृष्ट्या अवलंबून राहावे लागले. त्यामुळे हजारो वर्षे काही लाचार दरिद्री तर काही सुखचैनीत लोळणारे श्रीमंत असा फरक राहिला. याचे अत्यंत मूलगामी विवेचन आपल्या लेखन भाषणांतून बाबासाहेबांनी केले आहे. म्हणून त्यांनी आपल्या समाजाला परंपरेने व धर्माने सांगितलेले व्यवसाय आणि धंदे सोडावयास सांगितले. ज्या कामाला प्रतिष्ठा नाही व ज्यामुळे आर्थिक परिस्थितीत कोणताच बदल होत नाही, उलट लाचारी, दारिद्र्य वाढते व गुलामीची वागणूक मिळते ती कामे करू नका असा बाबासाहेबांचा संदेश मिळताच दलित समाजाने परंपरेने आलेली गावकीची कामे नाकारली. त्यासाठी त्यांना सवर्ण हिंदूंकडून भयानक छळ सोसावा लागला. तो छळ सहन करूनही बाबासाहेबांनी उभारलेल्या या आर्थिक लढ्यात दलित समाज सहभागी झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमोर देशाच्या आर्थिक विकासाबद्दल निश्चित विचार होते. देशाची आर्थिक धोरणे, चलनवाढ, भाववाढ, शेतीच्या समस्या, शेतीतील उत्पन्नावरील निर्धारित किंमती इत्यादींविषयी त्यांनी मूलभूत विचार मांडले. गरिबी, लोकसंख्येचा प्रश्न यांबाबतही त्यांनी स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. परंतु येथील सामाजिक व्यवस्था आर्थिक परिस्थितीचा पाया आहे, असे त्यांचे ठाम मत होते. म्हणून त्यांनी राज्यघटनेत, समाजातील सर्व स्तरांना कोणताही

व्यवसाय, धंदा करण्याची समान संधी दिली. यातच त्यांच्या आर्थिक ध्येय-धोरणाचा व चळवळीचा मूळ हेतू लक्षात येतो.

आजची दलित चळवळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित चळवळीचे मात्र सर्व पातळ्यांवर तीन-तेरा व नऊ-अठरा झाले. बाबासाहेबानंतर तेवढ्या उंचीचा नेता समाजाजवळ नव्हता. नेतेपदाच्या स्पर्धेत अनेक उमेदवार असल्याने भांडणे अपरिहार्य होते. म्हणून बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर १९५७ साली स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षाला "प्रेसिडीयम" करावे लागले. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला "रिपब्लिकन पक्ष" स्थापन झालाच नाही. उलट महारांचा एक पक्ष स्थापन झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर झालेल्या निवडणूकांमध्ये या पक्षाचे आमदार विधानसभेत निवडूनही गेले. परंतु पुढे त्यांना ती स्थिती टिकविता आली नाही. नाही म्हणायला बाबासाहेबांनंतर कर्मवीर दादासाहेब गायकवाडांनी, समंजस व लोकमत ज्यांच्याबाजूला आहे असे, नेतृत्व दिले. बाबासाहेबांच्या तालमीत दादासाहेब गायकवाड तयार झालेले असल्याने त्यांच्यापुढे या चळवळीची सामाजिक, आर्थिक ध्येयधोरणे होती. म्हणून त्यांनी १९६४-६५ साली उभारलेला भूमीहीनांचा लढा (सत्याग्रह) अभूतपूर्व यशस्वीपणे लढविला गेला. आर्थिक धोरण राबविल्यामुळे दादासाहेबांना काही पुढाऱ्यांनी (बी. सी. कांबळे वगैरे) कम्युनिस्ट म्हणून बदनाम करण्याचा कुटील प्रयत्न केला व पक्षात फूट पाडली. दादासाहेबांनी केलेल्या काँग्रेस युतीमुळे पुन्हा पक्षाची विभागणी झाली. व बॅ. खोब्रागडे वगैरे मंडळी वेगळी झाली. पुढे भंडारे, रूपवते हे सरळ काँग्रेसमध्ये गेले. रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट पडले आणि दादासाहेबांच्या निर्वाणानंतर तर कुणाला कशाचाही धरबंद राहिला नाही. अनेक गट संघटना अस्तित्वात आल्या. पुढे १९७२ मध्ये तरुणांच्या दलित पँथर संघटनेचा जन्म झाला. लगेच तिच्यातही फूट पडून "मास मुव्हमेन्ट" ही वेगळी संघटना निघाली. दलित पँथरने मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे या मागणीसाठी यशस्वीपणे लढा लढविला. नामांतर झाले नाही. पण पँथरने दबदबा निर्माण केला. काही ताकद दिली.

दादासाहेब गायकवाड यांच्या निर्वाणानंतर रा. सु. गवई यांच्याकडे त्या गटाचे नेतृत्व आले. पुढे त्यातही गट पडले आणि काही काळानंतर प्रकाश यशवंतराव आंबेडकर (बाबासाहेबांचे नातू) यांचाही रिपब्लिकन पक्षातील (भारतीय रिप. पक्ष) एक गट अस्तित्वात आला. या कोणत्याही रिपब्लिकन गटाजवळ समाजासाठी कोणताच भरीव कार्यक्रम नव्हता. म्हणूनच यापैकी कुणाचा

एकही उमेदवार (अपवाद वगळता) विधान सभा किंवा लोकसभेत निवडून गेला नाही. अशा रीतीने रिपब्लिकन पक्षाचे राजकीय चळवळीत काहीही अस्तित्व उरले नाही. ही सर्व फाटाफूट कोणत्याही तात्त्विक मुद्यांवर झालेली नव्हती. नेतेपदाची हाव, स्वार्थी वृत्ती आणि महारांमधील पोटजातीचे वैमनस्य ही कारणे या गटबाजीच्या मुळाशी होती. या वेगवेगळ्या गटांचे एकत्रीकरण करण्यासाठी अनेक व्यक्ती, संस्था, संघटना यांनी वेळोवेळी प्रयत्न केले, आव्हाने केली, परिषदा भरविल्या, पत्रके काढली. पण त्यांना त्यात यश आले नाही. बाबासाहेबांची पोलादी संघटना फुटली.

त्यामुळे सामाजिक चळवळीतही कोणतीच एकसूत्रता व कार्यक्रम राहिला नाही. संघटना फुटल्यामुळे सवर्ण हिंदूंकडून होणारे अन्याय–अत्याचार वाढले. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर व या संघटनेच्या फाटाफुटीनंतर बामणगाव, शिरसगाव येथे दलित स्त्रियांची नग्न धिंड काढण्यात आली, धाकलीला गवई-बंधूंचे डोळे फोडण्यात आले. किलावेनमानीला चाळीस दलितांना एका खोलीत बंद करून जाळण्यात आले. आग्रा येथील महाविद्यालयात ओम प्रकाश नेटा नावाच्या विद्यार्थ्याला प्राचार्यांच्या टेबलावर जीवंतपणी चिरण्यात आले. या व अशा कितीतरी अमानवी, क्रूर अत्याचारांच्या घटना घडल्या. पाणी बंद, कामधंदा बंद, दुकान बंद, गिरणीवर दळण बंद इत्यादी स्वरूपाचे बहिष्कार तर दररोज कोठे ना कोठे दलितांवर पडू लागले. मजबूत राजकीय पक्ष अस्तित्वात नाही, संघटना फुटलेली, सामाजिक कार्यक्रम नाही अशा वातावरणात समाजात निष्क्रियता, निरुत्साह आला नाही तर नवलच.

शैक्षणिक व आर्थिक चळवळीतही ही शिथिलता आली. शिक्षणाचे प्रमाण घटले, बेकारी वाढली. सवर्णांच्या शैक्षणिक संस्था म्हणजे पोट भरण्याची दुकाने झाली. मग दलितांच्या शैक्षणिक संस्था त्याला अपवाद कशा असतील ? नोकरी लागल्याने व कामधंद्यात यश प्राप्त झाल्याने ज्यांची आर्थिक परिस्थिती बदलली त्यांची समाजाशी नाळ तुटली. कोणत्याही चळवळीशी त्यांनी आपला संबंध ठेवला नाही. जो तो आपल्यापुरते पाहू लागला.

परंतु या सर्व दूषित वातावरणातही काही वैशिष्ट्ये दलित समाजात व पुढाऱ्यांमध्ये दिसतात. सर्व गट व संघटना डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनाच आपले प्रेरणास्थान व एकमेव नेते मानतात. अन्याय, अत्याचार कोठेही होवो वेगवेगळे का होईना सर्व त्याठिकाणी धावून जातात. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर सर्वस्व अर्पण करायला तयार असतात. या मुद्याचे प्रत्यंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या व वादग्रस्त ठरलेल्या "रिडल्स ऑफ

हिंदूइझम "च्या मोर्चाच्या वेळी दिसून आले. या मोर्चाने दलितांच्या शक्तीचे भव्य-दिव्य प्रदर्शन केले आणि या सर्व गटांच्या एकत्रिकरणाची आशा निर्माण केली. पण पुन्हा आपसातील हेवेदावे, नेतृत्वाची हाव आणि प्रत्येकातील अहंगंड इत्यादी कारणामुळे ते घडले नाही.

आज दलित चळवळीची स्थिती दिशाहीन, अशक्त आणि वादळात भरकटलेल्या, मोठे भगदाड पडलेल्या नावेसारखी झाली आहे. दूरदृष्टी असलेला परिपक्व कुशाग्र बुद्धीचा, सर्वांना सामावून घेणारा, सशक्त, सक्षम कप्तान या चळवळीच्या नावेला लाभल्याशिवाय ती किनाऱ्यावर पोहचणार नाही.

उद्याची दलित चळवळ

आज देशातील परिस्थिती चिंताजनक आहे. फुले, आंबेडकरांचा प्रबोधनाचा, लोकशाहीचा, समतावादी विचार मुळापासून उपटून फेकायला प्रतिगामी शक्ती एकत्रित झाल्या आहेत. काल झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालाने हे सिद्ध झाले आहे. अशावेळी दलित चळवळीच्या सर्व गटांच्या नेत्यांनी बिनशर्त संघटीत होणे अपरिहार्य आहे. या संघटनेने आपल्या कक्षा रुंदावून डाव्या विचारसरणीच्या समतावादी, धर्मनिरपेक्षता मानणाऱ्या व लोकशाहीवर दृढ विश्वास असणाऱ्या सर्वांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करणे किंवा बरोबर घेणे ही देशाच्या दृष्टीने व आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने आवश्यक आहे. जातीयवादी धर्मांधतेच्या नागाने भारतीय लोकशाहीला विळखा घातला आहे. अशावेळी आंबेडकरी समाजाची जबाबदारी खूपच वाढली आहे. कारण या नागाच्या विळख्यातून फक्त आंबेडकरी विचार व संघटनाच देशाला वाचवू शकेल.

दलित चळवळीने सर्व स्तरांवरील कार्यक्रम निश्चित करून ते राबविण्यासाठी आंदोलन उभे करण्याची गरज आहे. त्यात सर्व दलित आदिवासी, भटके विमुक्त अल्पसंख्यांक यांना सामावून घेऊन चळवळीची व्याप्ती वाढविली तरच हे लढे यशस्वी होणार आहेत. उद्याच्या दलित चळवळीच्या दिशा ठरवून त्यामार्गाने वाटचाल केली नाही तर मात्र उद्याचा सूर्य आमच्यासाठी प्रकाश आणण्याऐवजी अंधार घेऊन उगवणार आहे. आणि त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा दोष राहणार नाही तर ते तत्त्वज्ञान व कार्य अंमलात न आणणाऱ्या त्यांचा आम्हा अनुयायांचा दोष व गुन्हा असणार आहे.

"दलित चळवळ : काल, आज आणि उद्या" हा प्रबंधाचा विषय आहे. हा विषय मी अतिशय संक्षिप्तपणे या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावर विस्तृत लेखन व त्यातील विचारांवर कार्य झाले तरच बाबासाहेबांच्या या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल.

□

अस्मितादर्शची नऊ वर्षे

अस्मितादर्श या त्रैमासिकाला नऊ वर्षे पूर्ण झाली आणि त्याचे दहाव्या वर्षात पदार्पण व द्वैमासिकात रूपांतर होत आहे ही अभिनंदनाची बाब आहे, हे अभिनंदन करताना मन आनंदाने भरून आले आहे. कारण आपण लावलेल्या रोपटयाचे वृक्षात रूपांतर झाले, त्याला फुले, फळे आली किंवा आपला मुलगा मोठा होऊन नावारूपास आला यात वृक्ष लावणाराचा आनंद व मुलाला जन्म देणाऱ्या आणि त्याच्यासाठी खस्ता खाणाऱ्या मातेचा आनंद आहे. मात्र एका गोष्टीची खंत आहे ती ही की हा लेख अस्मितादर्शमध्येच प्रकाशित व्हावयास हवा होता. त्याचे कारण असे की मी अस्मितादर्शच्या जन्मापासून तर ह्या नऊ वर्षातील साडे आठ वर्षेपर्यंत त्याचा एक संपादक होतो. परंतु हा लेख पुस्तिकेच्या रूपाने प्रकाशित होत आहे याची मनाला व्यथित करणारी टोचणी आहे. हा लेख लिहून मला कोणाचा अवमान करायचा नाही किंवा कोणाची तरफदारीही करायची नाही. तसेच मला त्याचे श्रेयही घ्यावयाचे नाही. कारण चळवळ म्हटली की ती कोणा एकाच्या भरवशावर चालत नसते. तसा कोणी समजही करून घेऊ नये. परंतु समाजाला ज्या अनेक गोष्टी माहीत नसतात किंवा एखाद्या चळवळीचा होऊ घातलेला इतिहास खोटा लिहिल्या जात असेल तर तो वास्तव स्वरूपात समाजासमोर ठेवणे, त्याचे सुस्पष्ट चित्र रेखाटणे लेखकांचे कर्तव्य आहे आणि ते मी या लेखाद्वारे करीत आहे, एवढेच.

पहाटेपूर्वी

अस्मितादर्शची जन्मापासून ते आजवरच्या नऊ वर्षांची कारकीर्द सांगण्या-अगोदरची परिस्थिती, औरंगाबादचे वातावरण कसे होते, तेथे काय घडत होते याबद्दल लिहिले तर मला वाटते वावगे होणार नाही. कारण अस्मितादर्शशी त्याचा अतूट असा संबंध आहे.

औरंगाबाद, मिलिंदचा परिसरच नव्हे तर तेथला कण अन् कण हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावनपदस्पर्शाने पवित्र झालेला, चैतन्यमय झालेला.

प्रा. म. भि. चिटणीस व डॉ. म. ना. वानखडे यांच्यासारखे थोर शिक्षणतज्ञ, प्रख्यात विचारवंत, नाणावलेले प्रशासक व प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे अनुयायी असलेल्या समर्थ व्यक्ती प्राचार्य म्हणून मिलिंदला लाभलेल्या. अशा या महाविद्यालयाचा दरवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध देशभर असल्याने भारताच्या कानाकोपऱ्यातून मिलिंदकडे विद्यार्थ्यांचा ओढा असतो यात नवल नाही. मीही मिलिंदमध्ये पि. यु. सी. त प्रवेश मिळविला. तेव्हा प्रा. म. भि. चिटणीस हे विद्यापीठाचे पहिले कुलसचिव झाल्याने डॉ. म. ना. वानखडे हे त्यावेळी प्राचार्य होते. प्राचार्य वानखडे साहेबांचा सर्वत्र दरारा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फौजेतील हा कडक शिस्तीचा, आघाडीचा सरदार. त्यामुळे कॉलेजचे वातावरण अतिशय शिस्तबद्ध. साहित्य, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, वादविवाद स्पर्धा इत्यादी कार्यक्रमांची कॉलेजमध्ये रेलचेल असायची– व कॉलेज अनेक महाविद्यालयीन स्पर्धांमधून पारितोपिके खेचून आणायचे. आजचे आघाडीचे लेखक व कवी प्रा. रा. रं. बोराडे, प्रा. प्रभाकर मांडे, प्रा. गजमल माळी, डा. चंद्रकांत धांडे, प्रा. भास्कर भोळे, प्रा. सुखराम हिवराळे, प्रा. यशवंत मनोहर हे मिलिंदचेच विद्यार्थी. अशा या कॉलेजात सुरवातीपासून असलेली माझी वाचनाची आवड वाढीस लागली.

आम्हा मित्रांचे देठोदेठी उमलणे

मी कविता अगोदरच लिहित होतो पण येथे अजून दोस्तकवी भेटले. त्यात सुखराम हिवराळे, यशवंत मनोहर, भगवान भटकर, नरेश इंगळे, डी. डी. घोडेराव आदी होते. सुप्रसिद्ध लेखक प्रा. भालचंद्र फडके यांचे मार्गदर्शन. त्यामुळे वाचन, लेखनाचा छंद वाढतच गेला. कवीमित्रांच्या कवितांनी, चर्चेने लिहिण्याचे प्रमाण वाढले व सा. गावकरी, रविवारचा मराठा, स्वराज्य, साधना, मनोहर, अंजिठा, पंचशील इत्यादी नियतकालिकांतून माझ्या कविता, लेख व कथा प्रकाशित होऊ लागल्या. सुखराम हिवराळे हा आमचा म्होरक्या. त्याचा वाचनाचा व्यासंग दांडगा, साहित्याची जाण व लेखनाचा आवाका मोठा. त्यामुळे तो आम्हाला आदरणीय असा. अशातच मराठीचे ख्यातनाम समीक्षक, विचारवंत प्रा. रा. ग. जाधव यांची मिलिंदला मराठीचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. त्यांचे मोहक व्यक्तिमत्व, प्रोत्साहन व योग्य मार्गदर्शनाने आम्हा मित्रांच्या लिखाणाला गती आली. याच काळात प्राचार्य म. ना. वानखडे हे अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी गेले होते. ते आपला अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करून व पीएच. डी. सारखी गौरवशाली पदवी घेऊन परतले. ते परत आले तोपर्यंत मी व माझ्या मित्रांचे कॉलेज सुटले होते. हिवराळे दै. अंजिठ्यात सह-

संपादक म्हणून काम करीत होते, मनोहर मराठीत म्. ए. करीत होते, मी 'भीमसंदेश' नावाचे साप्ताहिक चालवीत होतो, इंगळे सरकारी नोकरीत लागले होते. तरीही आम्हा मित्रमंडळीचे लिखाण चालूच होते. सुरवातीला आम्ही सारे पारंपरिक कथा, कविता लिहित होतो. मला वाटते आजचे आघाडीचे सर्व दलित लेखक व कवी प्रारंभी तसेच लिहित होते. या काळात सुखराम हिवराळे, यशवंत मनोहर, नरेश इंगळे, मी सारे कविमित्र आम्ही एकमेकांच्या खोलीवर आलटून-पालटून काव्यवाचनाच्या, लेखनाविषयी, चर्चेसाठी बैठका घेत होतो. व इतरत्र होणाऱ्या कविसंमेलनातून सहभागी होत होतो. सर्वांच्या लिखाणाला नियतकालिकांतून प्रसिद्धी मिळू लागली होती. १९६३-६४-६५ चा काळ हा आमच्या आयुष्यातील अस्वस्थ करणारा, संक्रमणाचा. आमच्या लहानपणापासूनचा आमचा भूतकाळ जणू आमच्या ह्या पारंपरिक लेखनाकडे, आमच्याकडे रोखून पाहत, आमच्या अपराधाची जाणीव आम्हाला करून देतो आहे की काय असे आम्हाला प्रकर्षाने जाणवू लागले. आमच्या मनात नव्या दिशांच्या वाटा उजळू लागल्या, अस्पष्ट, अंधुक आणि चुकत, माकत या मिलिंदच्या मातीने भरविलेल्या उजेडात आमच्या प्रतिभा पावले टाकू लागल्या. आम्ही सामाजिक आशयाची कथा, कविता लिहू लागलो. आमच्या लिखाणात फरक होत गेला. डॉ. वानखडे पुन्हा प्राचार्यपदी रुजू झाले. ते नुसतीच पदवी घेऊन आले नव्हते तर अमेरिकेतील निग्रो वाङ्मयाचा अभ्यास करून व ती वाङ्मय चळवळ डोळाभर पाहून आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान, आपल्या समाजाची स्थिती, आम्हा तरुण पोरांचे लिखाण या सर्वांचा मेळ घालून यावर वाङ्मयीन चळवळ कशी उभी करावी याचे वादळ त्यांच्या डोक्यात सुरू झाले. कारण डॉ. वानखडे हे स्वत:च लेखक व वाङ्मयाचे अभ्यासक आहेत. त्यांचे अत्यंत मूलगामी टीकात्मक लेखन त्यावेळी प्रतिष्ठानसारख्या दर्जेदार मासिकातून प्रकाशित झाले आहे. एवढेच नव्हे तर 'प्रबुद्ध भारता'च्या एका अंकात 'दलितांनो विद्रोही साहित्य लिहा!' या लेखाद्वारे त्या वादळाला त्यांनी शब्दाकार दिला. दलित वाङ्मयाला वाटा दिशा दाखविणारा हा अभ्यासपूर्ण, क्रांतिकारक लेख प्रकाशित झाल्यानंतर मिलिंद कॉलेजात प्रा. रा. ग. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हिवराळे, मनोहर, इंगळे व मी आमची वाङ्मयीन भूक भागविण्यासाठी डॉ. वानखडे यांची 'कविता' या विषयावर व्याख्यानमाला आयोजिली. या व्याख्यानांमधून, कलावंताने कलेच्या भ्रमात सापडून यापुढे दलितांनी स्वत:च्या अनुभवांशी बेईमान होऊ नये. या मातीच्या कणाकणात बाबासाहेबांची युगप्रवर्तक प्रेरणा उभी आहे. त्या प्रेरणेतून तेज घेऊन सामाजिक

विद्रोहाची कविता लिहावी. जिथे, जिथे प्रचलितांविषयी असंतोष माजला आणि प्रबोधनाच्या दिशा समाजाने स्वीकारल्या तिथे तिथे सामाजिक प्रखरतेची कविता, जीवननिष्ठ कविता जन्माला आली अशा आशयाचे विचार त्यांनी युरोपियन भाषातील आणि आपल्याकडील अनेक उदाहरणे देऊन सांगितले. त्यानंतर वाङ्मयासंबंधी चर्चा, बैठका होऊ लागल्या; औरंगाबादेला निश्चित असे वातावरण उभे राहिले आणि आम्हाला बळ येत गेले.

मुंबईच्या साहित्य–संमेलनाचा सांगावा

त्यानंतर मुंबईला महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभेचे पहिले साहित्य संमेलन झाले. या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. म. भि. चिटणीस होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान व आपले सामाजिक जीवन ललित साहित्यातून कसे रेखाटता येईल आणि ही वाङ्मयीन चळवळ कशी उभी करता येईल याचे सुंदर, स्पष्ट भाष्य केले. या संमेलनास हिवराळे, मी, इंगळे, शांताराम हिवराळे गेलो होतो. मुंबईस सुद्धा बाबुराव बागुल, दया पवार, दिनेश लखमापूरकर, घनश्याम तळवटकर आदी मित्र याच जाणिवेने पेटलेले आढळले व त्यांच्यापरीने कार्य करीत असतांना दिसले. 'आकार' नावाचा प्रातिनिधिक कविता–संग्रह याच संमेलनात प्रकाशित झाला आहे. आम्ही कविसमेलनात भाग घेतला. त्यावेळी औरंगाबादेचे लक्षणीय आणि नव्या जाणिवांनी झपाटलेले कवी म्हणून आमचा सत्कारही करण्यात आला होता

रणदुंदुभी ठरलेले भुसावळचे साहित्य–संमेलन

अशातच १९६७ च्या सुरवातीला माझे कविमित्र वि. ए. राजगुरू यांनी भुसावळला महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेचे साहित्य संमेलन घेण्याचे निश्चित केले. अध्यक्षपदाच्या नावाविषयी त्यांचा माझा जो पत्रव्यवहार झाला त्यात डॉ. वानखडे यांना अध्यक्षपद भूषवायला विनंती करावी असे ठरले. ती जबाबदारी राजगुरू यांनी माझ्यावरच सोपविली. माझी विनंती मान्य करून डॉ. वानखडे यांनी अध्यक्षपद भूषविण्याचे मान्य केले. मे १९७६ मध्ये भुसावळला झालेल्या ह्या संमेलनाचे उद्घाटक होते शाहीर अमरशेख. संमेलनास औरंगाबादवरून सुखराम हिवराळे, यशवंत मनोहर, प्रा. देवदास रामटेके, नरेश इंगळे, गायकवाड, सुरेश संसारे (जुन्या 'जयभीम'चे संपादक) व मी गेलो होतो. संमेलनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. वानखडे यांनी आपले सामाजिक जाणिवांचे प्रखर साहित्य लिहिल्या जावे, दलितांचे वास्तव चित्रण करावे, मराठी साहित्याने हे काम केले नाही म्हणून आपल्या साहित्यिकांच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत अशा आशयाचे प्रतिपादन करून त्यांनी पाश्चिमात्य साहित्य व साहि-

त्यिकांचे अनेक दाखले दिलेत. आम्हा तरुणांसमोर मुंबईच्या प्रा. चिटणीसांच्या भाषणाने, डॉ. वानखडे यांच्या भाषणाने दलित साहित्याच्या रेखा सुस्पष्ट झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या भक्कम पायावर उभे होऊ घातलेले दलित साहित्य व त्या चळवळीची जाणीव सर्व तरुण लेखक, कवींना झाली. भुसावळच्या संमेलनातील परिसंवाद, कथा-कथन, कवी संमेलन आम्ही गाजविले. आम्हा तरुणांमधील टॅलेन्ट पुन्हा एकदा डॉ. वानखडे यांना पाहावयास मिळाले. त्याचे त्यांनी तोंडभरून कौतुक केले. भुसावळचे संमेलन यशस्वी करण्यात श्री. व सौ. राजगुरू यांनी अपरंपार कष्ट घेतले.

मिलिंद साहित्य परिषदेचा जन्म

भुसावळवरून परतीचा प्रवास सुरू झाला. आपले नियतकालिक असावे असा सूर परतीच्या प्रवासात निघाला. चर्चा झाली, चर्चेत डॉ. वानखडे खूपच भारावून बोलत होते. त्यांच्या डोळ्यांपुढे आता मुंबई ते नागपूरपर्यंत दलितांमधील लेखकांच्या लेखनाचे, त्यांच्या नव्या स्फुरणांचे चित्र उभे राहिले होते. बाबासाहेबांनी दिलेल्या त्या युगंधर प्रेरणेच्या साहित्याला प्रकाशनपीठ नाही याची खंतही बोलून दाखविल्या गेली आणि नियतकालिकाची गरज प्रतिपादिल्या गेली. नियतकालिकाचे स्वरूप, ध्येय काय असावे, त्यातून दलित वाङ्मयीन व सांस्कृतिक संचिताचे प्रबोधन कसे होईल, याचा संकल्पित आराखडाही या आंबेडकरी प्रेरणेने झपाटलेल्या विचारवंताने आम्हापुढे चितारला. औरंगाबादला आम्ही परतलो तेच एका वेगळ्या, भारावलेल्या मनःस्थितीत. औरंगाबादला आल्यावर डॉ. वानखडे यांनी मिलिंद साहित्य परिषद स्थापनेसाठी बैठक बोलावली. 'मिलिंद साहित्य परिषद' नावाची संस्था स्थापन झाली. त्यात डॉ. वानखडे, प्रा. रा. ग. जाधव, प्रा. ल. बा. रायमाने, प्रा. भाऊसाहेब लोखंडे, प्रा. एस्. टी. प्रधान, प्रा. सुखराम हिवराळे, प्रा. म. आ. शिंदे, प्रा. आर. पी. नाथ, वामन निंबाळकर, प्रा. पानतावणे, प्रा. सौ. अरुणा लोखंडे, प्रा. मनोहर गरूड, प्रा. के. व्ही. सूर्यवंशी आदींचा समावेश होता. अध्यक्षस्थानी डॉ. वानखडे होते. मिलिंद साहित्य परिषदेचा भव्य उद्घाटन सोहळा ख्यातनाम लेखक ॲड. शंकरराव खरात यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. म. भि. चिटणीस होते. नंतर परिषदेने कार्यक्रम घेण्याचा सपाटा सुरू केला. त्यात ना. रा. सु. गवई यांचे व्याख्यान, मा. दा. ता. रूपवते यांची व्याख्यानमाला यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

अस्मितेची पहिली बैठक

मिलिंद साहित्य परिषदेच्या स्थापनेनंतर लवकरच डॉ. वानखडे यांनी मला बोलावून सांगितले की आपणाला एक नियतकालिक काढायचे आहे. त्याची बैठक बोलविण्यासाठी नोटिस काढा. मी नोटिस काढली. त्या नोटिसमध्ये रा. ग. जाधव, ल. वा. रायमाने, सुखराम हिवराळे यांना बैठकीसाठी निमंत्रिले आणि मिलिंद विज्ञान महाविद्यालयात दुय्यम भाषा शिकविणारे मराठीचे लेक्चरर पानतावणे हे या संदर्भात आजवर कोठेच दिसत नव्हते म्हणून त्यांनाही या प्रवाहात सामील करून घेतले तर बरे होईल या सद्हेतूने आणि अत्यंत निष्कपटमनाने मी त्यांचेही नाव या निमंत्रितांमध्ये अंतर्भूत केले.

मिलिंदची प्रचंड प्रेरणादायी वास्तू. समोर विस्तीर्ण मैदान, कोपऱ्यात भव्य रंगमंदिर, त्याच्यासमोर युगंधर बाबासाहेबांचा स्फूर्ती देणारा पुतळा. बैठकीच्या रूपाने आमच्या झपाटलेल्या मनाचे स्वप्नवेधी पक्षी या मैदानावर मनसुब्यांचे मोहोर घेऊन आले. सायंकाळच्या संधिप्रकाशात मिलिंदच्या मैदानावरच बैठक सुरू झाली. या मिलिंदच्या मातीला जणू ऐतिहासिक मोलाच्या वेणा सुरू झालेल्या. दलितांच्या वाङ्मयीन प्रेरणांना, नियतकालिकाच्या संकल्पांना पंख फुटण्याच्या या अपूर्व क्षणाचे सुख या मातीच्या मनात गाणी गाऊ लागलेले. बाबासाहेबांची या मातीच्या मनात उत्कटलेली प्रेरणा वाङ्मयाच्या वैभवी दिशेने झेपावण्यासाठी आतूर झालेली. दलितांच्या साहित्यिक भवितव्याचे भव्य चळवळीचे बांधकाम या मिलिंद मैदानावर पिसारलेले आणि बाबासाहेबांच्या प्रेरणेचे निष्ठावंत पाईक असलेले डॉ. वानखडे आम्हा सर्वांना एकदिलाने नायकपदी असलेले. जणू या अपूर्व घटनेच्या स्वागताचा सोहळाच यावेळी या मातीच्या कृतार्थ मनात रंगलेला असावा. ही ऐतिहासिक बैठक म्हणजेच अस्मितादर्शच्या जन्माविषयीची विचार करणारी, त्याची स्पष्ट वाटचाल रेखाटणारी, ध्येय, धोरण ठरविणारी बैठक होय. नंतर कधी डॉ. वानखडे यांचे ऑफीस, कधी घर आणि इतरत्र बैठकी सुरू झाल्या. संकल्प पुष्टावत गेला. त्रैमासिक लवकर सुरू करावे असे ठरले.

अस्मितेचा प्रथमांक

नावाबद्दल चर्चा झाली. 'सम्मादिठ्ठी' या नावाला मान्यता देण्यात आली. त्या नावाचे एक सायक्लोस्टाइल निवेदनही प्रकाशित करण्यात आले. परंतु 'सम्मादिठ्ठी' हे नाव बोजड वाटते म्हणून 'अस्मिता' नाव ठेवण्यात आले आणि दिल्लीला रजिस्ट्रार ऑफ न्यूज पेपर्स यांच्या मान्यतेसाठी (व्हेरिफिकेशन) ते पाठविण्यात आले. परंतु नावाची मान्यता (व्हेरिफिकेशन) येईपर्यंत अंक काढावा, आता थांबणे नाही असेही ठरले. संपादक डॉ. म. ना.

वानखडे, कार्यकारी संपादक प्रा. रा. ग. जाधव व साहाय्यक ल. बा. रायमाने, गंगाधर पानतावणे, वामन निंबाळकर, सुखराम हिवराळे अशी कामाची विभागणी करण्यात आली. पहिल्या अंकाची जुळवाजुळव सुरू झाली. साहित्यिकांना पत्रे पाठविण्यात आली. याच सुमारास डॉ. वानखडे यांनी 'महाराष्ट्रातील आज-उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या' या विषयावर दोन सत्रात चर्चा आयोजित केली. या चर्चेत प्रा. वा. ल. कुळकर्णी, प्रा. म. भि. चिटणीस, प्रा. मे. पु. रेगे, प्रा. रा. ग. जाधव व स्वत: डॉ. वानखडे यांनी भाग घेतला. ही चर्चा टेप करण्यात आली व नंतर 'अस्मिता'च्या पहिल्या अंकात प्रकाशित करण्यात आली. अनेकांची पत्रे आली. साहित्य आले, थोरामोठ्यांची प्रोत्साहन देणारी पत्रे आली. आम्ही सारे पेटलेले होतोच. पहिला अंक डिसें. १९६७ ला निघाला आणि त्यावर महाराष्ट्रातील अनेक प्रतिक्रिया व्यक्त झाल्या, खूप चर्चा झाली, तारीफ झाली. काही परंपरेने खुज्या असलेल्या व्यक्ती व नियत-कालिकांनी टीकाही केली. तशीच कोठवर चालेल अशी शंकाही व्यक्त केली. डॉ. वानखडे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमधून प्रत्येकी पाच रुपये द्या अशी हाक विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या हाकेला ओ दिली. आणि हा हा म्हणता चार-पाच हजार रुपये जमा झाले. ही रक्कम त्यावेळेचे मिलिंदचे कॅशियर रामचंद्र भरसाखळे व डॉ. वानखडे यांच्या नावावर बँकेत जमा करण्यात आली. पहिल्या अंकाची सर्वत्र चर्चा सुरू झाली. दलित साहित्याला एक भक्कम पीठ लाभले होते. सर्वांच्या चेहऱ्यावर एक वेगळा भाव, आशा, यशाचे तेज व समाधान झळकत होते. या साऱ्यांच्या मध्यभागी होते डॉ. वानखडे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा व तत्त्वज्ञानाच्या भक्कम पायावर साहित्याला एक दृष्टिकोन, दिशा मिळाली होती. हे होत असतानाच मधल्या काळात 'अस्मिता' नाव शासनाने नाकारले होते. त्यानंतर 'अस्मिता-दर्श' हे नाव पाठविण्यात आले.

दुसरा अंक व डॉ. वानखडेंची निवड, 'अस्मिता'चे 'अस्मितादर्श' झाले.

दुसऱ्या अंकाची सुरवात झाली, कामाला गती आली आणि तशातच आनंद देणारी व विचारात पाडणारी बातमी येऊन थडकली. डॉ. वानखडे यांची निवड महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्यपदी झाली होती. डॉ. वानखडे साहेब मोठ्या मानाच्या जागेवर जाणार हा आनंद, पण त्यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या ह्या वाङ्मयीन चळवळीचे काय हा मोठाच प्रश्न समोर उभा राहिला. एकीकडे वानखडे साहेबांचे अभिनंदन करीत असतांनाच दुसरीकडे विचारांचे काहूर मनात उठलेले. याच काळात, प्रा. रा. ग. जाधव यांची वाईस

नियुक्ती झाल्याने, प्रा. ल. बा. रायमाने यांनी थोडेसे लक्ष काढून घेतल्याने अस्मितादर्शची सर्व जबाबदारी मी, हिवराळे व पानतावणे यांच्यावर येऊन पडली. परंतु पानतावणे नेमके यावेळी औरंगाबादला नव्हते. ते दिल्लीला कोण्या नातलग मुलीच्या लग्नास गेले होते. मग डॉ. वानखडे यांनी अस्मितादर्श मुंबईस नेण्याचे ठरविले. तसे ते माझ्याजवळ व हिवराळे यांच्याजवळ बोलले. परंतु अस्मितादर्श मुंबईस नेऊ नका, ते औरंगाबादेवरून सुरू असू द्या, आम्ही लोक कष्ट उपासावयास तयार आहोत, तुमचे मार्गदर्शन आणि लक्ष मात्र असू द्या, अशी विनंती मी व हिवराळे यांनी डॉ. वानखडेंना केली. त्यांनी ती मान्य केली. मग डॉ. वानखडे, मी व हिवराळे यांच्या विचारांनीच पानतावणे यांच्या नावावर अस्मितादर्शचे डिक्लेरेशन करायचे ठरविले. कारण याच काळात अस्मितादर्श या नावास शासनाकडून मान्यता मिळाली होती. 'अस्मिता'चे 'अस्मितादर्श' झाले होते. मी पानतावणे यांच्या नागपूरच्या पत्त्यावर पत्र पाठवून (कारण तो पत्ता मला माहीत होता) त्यांना दिल्लीवरून लवकर बोलावून औरंगाबादला त्वरित पाठवून देण्याबद्दल लिहिले. पत्रव्यवहाराचे काम माझ्यावर सोपविण्यात आले. होते. तोपर्यंत ते काम प्रा. ल. बा. रायमाने पाहत होते. प्रा. रायमाने यांनी संबंधित कागदपत्रे मला सोपविली. ती कागदपत्रे घरी न ठेवता स्वतंत्र भाड्याचे कार्यालय घेतले. कार्यालयाचा पत्ता माहीत होईपर्यंत अस्मितादर्शवर माझ्या घराचा पत्ता देण्यात आला. तो अस्मितादर्शच्या दुसऱ्या अंकावर संपादकीयाच्या खाली छापलेला आहे. पानतावणे दिल्लीवरून आले. मी, हिवराळे व पानतावणे डॉ. वानखडे यांच्याकडे गेलो. त्यांनी अस्मितादर्शबद्दल अनेक सूचना दिल्या. अस्मितादर्श ही वाङ्मयीन चळवळ आहे, ती आपण अतिशय कष्टाने जोपासली पाहिजे, त्यात स्वार्थ येऊ देता कामा नये, ह्या चळवळीच्या भवितव्याचा समाज-मनावर ठसा उमटणार आहे, सामाजिक उत्तरदायित्व म्हणून मोठ्या दिलेरपणे हे कार्य आपण अहंकार न बाळगता सामुदायिकपणे तडीस नेले पाहिजे इत्यादी सूचक मार्गदर्शनपर गोष्टी त्यांनी आम्हाला सांगितल्या. आम्ही त्या निष्ठापूर्वक मान्य केल्या आणि त्यांनी लावलेले हे रोपटे आम्ही जतन करून त्याचे रूपांतर वृक्षात करू असा विश्वास दिला. त्यांनी आमच्यावर टाकलेल्या ह्या महत्त्वपूर्ण जबाबदारीने आम्ही कृतज्ञताही व्यक्त केली. वानखडेसाहेब मुंबईच्या जागेवर रुजू होण्यासाठी गेले. जाताना दुसऱ्या अंकासाठी रक्कम पानतावणे यांच्या स्वाधीन केली. दुसरा अंक निघाला.

मान्यवरांचे अभिप्राय

त्या अंकात आम्ही महाराष्ट्रातील मान्यवरांचे अभिप्राय प्रकाशित केले

होते त्यापैकी काहींचे थोडक्यात येथे उद्धृत केले तर मला वाटते वावगे होणार नाही.

* अस्मितेमधील परिसंवाद मी वाचला व मला तो महत्त्वाचा वाटला तुमच्या उपक्रमात तुम्हाला यश येवो. माझ्याकडून.....होईल तेवढे मी करीनच.

–दि. के. बेडेकर, पुणे

* तुमच्या त्रैमासिकाला मी यश चिंततो. साहित्याच्या सतत वाहणाऱ्या प्रवाहाला नवीन–नवीन झरे येऊन मिळावे लागतात. तरच तो विशाल आणि विशुद्ध होतो. तुमच्या त्रैमासिकात तरुण पिढीची अस्मिता प्रकर्षाने व सुंदर रीतीने प्रगट होवो, असे मनःपूर्वक इच्छितो.

–वि. स. खांडेकर, कोल्हापूर

* अभिनंदन ! अस्मिता त्रैमासिकास मी अवश्य लेखन सहाय्यकरीन.

–डॉ. मा. प. मंगुडकर, पुणे

* परिसंवाद, विद्वानांची चर्चा टेपवर उतरविण्याची योजना फार स्वागतार्ह आहे. चर्चेचा दर्जा वरचा आहे.....दलितांचे 'विदोही' वाङ्मय हे पांढरपेशांच्या विद्रोही वाङ्मयासारखेच असेल वा असावे हे पटत नाही. या दोन्ही वर्गांचे प्रश्न अगदी मूलतः वेगळे आहेत. आपण सुरवात चांगली केली आहे. आपल्याला सुयश लाभो ही इच्छा.

–वि. वा. शिरवाडकर, नाशिक

* आता कधी औरंगाबादला आलो की, अस्मितेच्या मैफिलीत येईन. अस्मितेला मनःपूर्वक सुयश चिंतितो.

–पु. ल. देशपांडे, मुंबई

* अंक मी वाचला व मला तो आवडला. हे नमूद करण्यास मला आनंद वाटतो. परिसंवादही आवडला. आपला उपक्रम यशस्वी होवी ही शुभेच्छा.

–डॉ. वि. भि. कोलते, नागपूर

* अंक दर्जेदार आहे. 'महाराष्ट्रातील आज उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या' या वरील तुम्हा विद्वान मंडळींची चर्चा अभ्यासपूर्ण व सखोल आहे. ते ह्या अंकाचे खास वैशिष्टय आहे. 'अमेरिकन निग्रो वाङ्मय' हा लेखही माझ्यासारख्याला मार्गदर्शक वाटला. एकूण अस्मिता हा सर्वच अंक चांगला आहे. यावर विचारवतांना विचार करणे भाग पडेल.

–ॲड. शंकरराव खरात, पुणे

* अस्मितेचा अंक मिळाला. मनःपूर्वक आभार.

–शिरिष पै, मुंबई

* अस्मिता ही एक गरज आहे. आपण सगळे ही वाङ्मयीन चळवळ गंभीरपणे चालवीत आहात यावद्दल समाधान वाटते.

–प्रा. केशव मेश्राम, मुंबई

* अस्मितेचा अंक आवडला. खूप आवडला. अस्मितेबद्दल इथे सर्वत्र खूपच चर्चा चालू आहे.

–बाबुराव बागुल, मुंबई

* .....अस्मिता त्रैमासिकाला दीर्घायुष्य चिंतितो, भरभराट इच्छितो. .....या अंकातील 'एक चर्चा' व 'अमेरिकन निग्रो वाङ्मय' हे लेख मी 'कार्तिकी' लिहिण्याच्या आधी वाचण्यात आले असते तर माझी कादंबरी आणखी तीव्र झाली असती.

–र. वा. दिघे, खोपोली

* अस्मितेचा अंक आवडला, अभिनंदन ! अस्मितेचे हेच स्वरूप मला योग्य वाटते.

–प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध, नागपूर

* अस्मितेचा सतत उत्कर्ष होवो, ही सदिच्छा.

–नारायण सुर्वे, मुंबई

* अस्मिताचा पहिला अंक खूप उद्बोधक वाटला, त्यातील साहित्य निर्विवाद दर्जेदार आहे. विशेषतः नवबौद्धांच्या संदर्भात जी साहित्यचर्चा आलेली आहे ती खचितच विचारप्रवर्तक आहे.

–प्रा. ज्ञा. का. गायकवाड, सोलापूर

* विशेषतः आपण सांस्कृतिक व वाङ्मयीन समस्यांवर आयोजित केलेला परिसंवाद आवडला. अस्मितेला दीर्घायुष्य चिंतितो.

–भास्कर जाधव, अहमदनगर

ह्या मान्यवर विचारवंतांच्या अभिप्रायावरोबरच अस्मितादर्शच्या दुसऱ्या अंकातील संपादकीय सुद्धा येथे देणे मी उचितच नव्हे तर आवश्यक समजतो. ते असे,

दुसऱ्या अंकाचे संपादकीय !

'अस्मितादर्श' संबंधाने

'अस्मितादर्श' हे अस्मितेचे नवे नामकरण, शासकीय यंत्रणेत कितीएक दिवस अडकून पडल्याने द्वितीय अंकाच्या प्रकाशनास उशीर झाला, त्यावद्दल

दिलगिरी. कितीएकांची पत्रे आली 'अस्मिते'चे काय झाले ? जोवर सुजाण मराठी वाचकांचा आमच्यावर लोभ आहे तोवर आम्ही निर्धास्त आहोत. म्हणून आमच्या प्रयत्नांना उचलून धरणाऱ्या तथा आस्थेने सहकार्य देणाऱ्या थोरा-मोठ्यांना पुनश्च विनंती, 'अस्मितादर्श' जगवावे. 'अस्मितादर्श' हा प्रयोग आहे. मराठीतील नव्या वाङ्मयीन प्रवृत्ती आणि त्याच्या मुळाशी संभवणाऱ्या जीवनविषयक नव्या जाणिवा समजावून घेण्यादेण्याचा हा उपक्रम असल्याने, आमच्या प्रयत्नांची वाटचाल समृद्ध ठरावी, त्यासाठी धडपड.

'अस्मितादर्श'च्या यंत्रणेत थोडासा बदल झाला. डॉ. म. ना. वानखडेंची महाराष्ट्र शासनाने, लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून नेमणूक केली, त्यामुळे संपादकीय व इतर कामकाज विभागले गेले. ह्यानंतर अंक प्रकाशन नियमितपणे व्हावे, असा आमचा प्रयत्न राहील. आपणा सर्वांकडून सहकार्याची व प्रोत्साहनाची अपेक्षा !

—संपादक

दुसऱ्या अंकातील वरील अभिप्राय व संपादकीय वाचल्यानंतर वाचकांच्या लक्षात येईल की वरील सर्व अभिप्राय हे 'अस्मितादर्शचे' संस्थापक व संपादक डॉ. म. ना. वानखडे यांना, त्यांच्या क्रांतिकारक कामगिरीला, उपक्रमाला व रा. ग. जाधव यांच्या समंजस संपादनास उद्देशून आहेत. हे निर्मळ मनाच्या कोणालाही पटण्यासारखेच आहे. अस्मितादर्श हे वेगळे नसून 'अस्मिता' ह्या वस्तुस्थितीला देणे भाग पडलेले नाव आहे. नाव बदलल्याने उगम, वस्तुस्थिती बदलत नसते. दुसऱ्या म्हणजे अस्मितादर्श या नावाने निघालेल्या अंकात अस्मितेला उद्देशून आलेले अभिप्राय छापलेले आहेत. त्यावरून आज वाकडी केली गेलेली परिस्थिती त्यावेळी तशी नव्हती. ती अत्यंत सरळ, सुस्वभावी होती हे स्पष्ट आहे. दुसऱ्या अंकात संपादकीयात संपादकाने वस्तुस्थिती मांडलेली आहे. ती डावलून कुणाही 'सरळ माणसाला' पुढे जाणे शक्य व्हायचे नाही. शिवाय ही वस्तुस्थिती इतकी बोलकी आहे, धडधडीत आहे की त्यावर खरे तर वेगळे भाष्य करण्याची काहीच गरज नाही. परंतु धादांत असत्याचार्य जेव्हा असत्यालाच प्रस्थापित करतात, हीच वस्तुस्थिती वंदनीय म्हणून सांगतात आणि त्यांचे अनेक भक्त जेव्हा ती सत्य धरून चालतात तेव्हा हे ऐतिहासिक वास्तव मांडणे भाग पडते. म्हणून वरील विवेचन केले. असो.

'अस्मितादर्श'चे कार्यालय घरात

पानतावणे यांच्या नावाचे डिक्लेरेशन (ठरल्याप्रमाणे) करताच त्यांनी अस्मितादर्शचे कार्यालय ३७, लक्ष्मी कॉलनी, छावणी म्हणजे स्वतःच्या राहत्या

घरी हलविले. त्याला हिवराळे व माझा विरोध होता. परंतु त्यावेळी आम्ही काहीही बोललो नाही. चळवळीत भांडणे किंवा क्षुल्लक कारणांवरून मतभेद नको ही त्यामागची भूमिका. नंतर अस्मितादर्शच्या पहिल्या दिवाळी अंकाची हिवराळे, मी व पानतावणे यांनी बसून रूपरेखा आखली. अंक सर्वांगसंदर निघावा ही तिघांचीही उत्कट इच्छा. कोणत्या विषयावर कोणाला लिहावयास लावावे, कुणाकडून साहित्य मागवावे याचा आराखडा तयार केल्यानंतर तो डॉ. वानखडे यांच्या संमतीसाठी पाठविण्यात आला. त्यांचे उत्तरे आले, त्यांना आम्ही आखलेली योजना अतिशय आवडली होती. अंकाची जुळवाजुळव सुरू झाली. साहित्यिकांना पत्रे गेली. त्यांची पत्रे व साहित्य येऊ लागले. मुखपृष्ठासाठी हिवराळे यांनी स्वतःच्या संग्रही असलेले वेरूळचे शिल्पचित्र दिले. अंकाची छपाई सुरू झाली. याच काळात सुटीत डॉ. वानखडे यांनी येऊन कामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. आणि अंकासाठी रक्कम पानतावणे यांना दिली. विद्यार्थी व इतरांकडून जमलेली सर्व रक्कम डॉ. वानखडे यांनी पानतावणेंना वेळोवेळी दिली. आता मात्र पानतावणे ते अत्यंत सफाईदारपणे नाकारतात. पहिला दिवाळी अंक निघाला आणि 'अस्मितादर्श' हे नाव मराठीच्या जाणकार वाचक, अभ्यासक, साहित्यिक, समीक्षक सर्वांच्या तोंडी झाले. अंक उत्कृष्ट निघाला होता. वृत्तपत्रांनी त्याची दखल घेतली. अशा रीतीने 'अस्मितादर्श'ची गौरवशाली वाटचाल सुरू झाली.

हिवराळे यांना गाळले

पण पुढील अंक निघण्याच्या अगोदर पानतावणे यांनी हिवराळे यांचे नाव संपादक मंडळातून काढण्याचा डाव टाकला. आणि त्यांनी ऐनवेळी संपादक मंडळातून हिवराळे यांचे नाव उडविले. हिवराळे गरम झाले. आणि त्यांनी पानतावणे यांना त्यांच्या घरी जाऊन चांगलेच खडसावले. येथून पानतावणे यांनी अस्मितादर्श स्वतःभोवती केंद्रित करण्यास, त्याचे सबकुछ आपण आहोत, आपण त्यासाठी आर्थिक झीज वगैरे सोसत आहोत, असे भासवायला सुरुवात केली. दोस्तांना तशी पत्रे ते पाठवू लागले. नंतर ते व मी अंकाच्या छपाईचा, साहित्याबद्दलचा निर्णय एकत्रित बसून घेऊ लागलो. परंतु थोडयाच काळात मलाही त्यांनी टाळावयास सुरुवात केली. डॉ. वानखडेंविषयी ते काहीतरीच बोलू लागले. (अर्थात ते कोणाविषयीच मागे कधीच चांगले बोलत नाही म्हणा) तरीही मी सर्व सहन करून चळवळ चालवायची म्हणून रात्रंदिवस अस्मितादर्शसाठी त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत होतो. त्या काळात मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, नांदेड, अमरावती, अकोला, भुसावळ, दर्यापूर आदि ठिकाणचे

आम्ही दौरे केले. वयाने पानतावणे मोठे म्हणून कष्टाची कामे मीच करायचो. याच काळात अस्मितादर्शला महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाचे अनुदान मिळण्याबाबत डॉ. वानखडे यांचे जोरदार प्रयत्न चालू होते. पानतावणे यांना मंडळाकडे अर्ज करायला त्यांनी सांगितले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पु. ल. देशपांडे, अ. भि. शहा, गोवर्धन पारिख, दि. के. बेडेकर, कुसुमाग्रज, शिरिष पै, वि. भि. कोलते आदींनी अस्मितादर्शला तोंडभरून शाबासकी दिली होती. मराठी नियतकालिकांच्या जगात अस्मितादर्शच्या आगमनाचे भरघोस अभिनंदन झाले. या सर्व मान्यवरांनी कोरडी वाहवा न करता जमेल तसे सहकार्य देण्याचे आश्वासन दिले, देणग्या येऊ लागल्या, वर्गण्या येऊ लागल्या. तसेच मान्यवरांचे मौलिक, विचारप्रवर्तक, अस्मितादर्शला प्रतिष्ठा मिळवून देणारे साहित्यही येऊ लागले.

प्रागतिक विचार संसदेची स्थापना !

डॉ. वानखडे व राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे पत्र आले की अस्मितादर्शचा ट्रस्ट करावा लागेल. कारण कोण्या एका व्यक्तीच्या नावावर चालविलेल्या नियतकालिकाला, संस्था असल्याशिवाय अनुदान मिळत नाही. मग मात्र पानतावणे यांना पंचाइत पडली. एव्हाना अस्मितादर्शसाठी आपण सर्व करीत आहोत, असे भासविण्यास शंभर टक्के यश त्यांना मिळाले होते. मात्र डॉ. वानखडे आणि मला पानतावणे यांच्या ह्या कूटनीतीचा फारसा सुगावा लागला नव्हता. कारण आम्हाला चळवळ महत्त्वाची वाटत होती. तरी त्या संस्था करण्याच्या अडचणीतून पानतावणेंनी मार्ग शोधून काढला. संस्थेची त्यांनी घटना केली व घटनेत नावाचेच अधिकार अध्यक्षांना देऊन अध्यक्ष डॉ. वानखडे यांना केले सेक्रेटरींकडे सर्वप्रकारचे अधिकार घेऊन स्वतः सेक्रेटरी झाले. कोषाध्यक्ष यांच्या नावावर पैशांचे सर्व व्यवहार असतात म्हणून ते पद त्यांनी स्वतःचे मेहुणे शिवचरण डोंगरे यांच्याकडे दिले. मला मात्र त्यांनी साधे सदस्यत्व बहाल केले. अशा रीतीने प्रागतिक विचार संसद ही संस्था (ट्रस्ट) स्थापन झाली. तरीही मी अत्यंत समंजसपणे कार्य करीत राहिलो. सभासद म्हणून जे पानतावणे यांना डिस्टर्ब करणार नाही अशांची वर्णी लागली. फ. मुं. शिंदे, दया पवार, केशव मेश्राम हे सभासद म्हणून घेतल्या गेले. याच काळात अंक निघत असतांना माझे व डॉ. वानखडे यांचे नाव ते अंकावरून गाळू लागले. आणि नंतर अशा आश्चर्यकारक घटना घडत असतानाच एका अंकावर फ. मुं. शिंदे व माझे साहाय्यक म्हणून नाव छापले गेले. मी संपादकाचा साहाय्यक का व कसा झालो, फ. मुं. शिंदेंना कोणाच्या विचाराने साहाय्यक संपादक करण्यात आले वगैरे गोष्टी फक्त

पानतावणे यांनाच ठाऊक होत्या. ते कोणाचाही विचार घेत नव्हते. पानतावणे यांना जबरदस्त स्वार्थाने पछाडले होते. ते सर्व गोष्टी अत्यंत धूर्तपणे करीत होते. हे घडत असतांनाच मी वेळोवेळी माझी नाराजी व प्रतिक्रिया व्यक्त करीत होतो. परंतु त्याला धार आणीत नव्हतो. कारण अस्मितादर्श वाढावे, त्याचे संगोपन व्हावे, असे सारखे मनापासून वाटत होते आणि आजही वाटते.

डॉ. वानखडे लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी

एके दिवशी डॉ. वानखडे साहेबांची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याची बातमी वृत्तपत्रातून झळकली. त्या बातमीत त्यांचा अल्पपरिचय देण्यात आला होता. त्यात ते अस्मितादर्शचे संस्थापक व संपादक असा रास्त मजकूरही होता. परंतु हा मजकूर वाचताबरोबर पानतावणे खवळले आणि चटकन ज्या वृत्तपत्रात (दै. मराठा, दै. मराठवाडा) ही बातमी प्रकाशित झाली होती त्यात खुलासा केला की, डॉ. वानखडे हे अस्मितादर्शचे कधीच संपादक नव्हे तर ते सल्लागारपदी पानतावणे यांच्या विनंतीवरून होते. हा खुलासा करून पानतावणे यांनी कृतघ्नपणाचे शिखरच गाठले.

राजीनामा प्रकरण

मात्र याचा परिणाम असा झाला की पानतावणे यांच्या ह्या कद्रुपणामुळे डॉ. वानखडे यांनी प्रागतिक विचार संसद या संस्थेच्या अध्यक्षपदाचा व अस्मितादर्शच्या सल्लागारपदाचा राजीनामा दिला. राजीनाम्यात त्यांनी, 'आपणच अस्मितादर्शचे सर्व करता, मी साधा सल्लाही देत नाही म्हणून राजीनामा देत आहे.' या आशयाचा सटायरिकल मजकूर लिहिला. मात्र त्यांच्या राजीनाम्यातील शेवटचे वाक्यही लक्षात घेण्याजोगे आहे ते हे की, 'साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळवून देण्यास मी प्रयत्न करीत आहे' पानतावणे हे अतिशय कावेबाज. त्यांना वानखडेंचा राजीनामा मिळताच, त्याचा आपल्या सोयीप्रमाणे अर्थ काढत, त्यांनी त्याच्या (राजीनाम्याच्या) फोटो स्टेट कॉपीज काढून त्या शक्य तेथे प्रकाशित करण्याचा सपाटा सुरू केला व अस्मितादर्शच्या हितचिंतकांना पाठवायला सुरवात केली. सबंध चळवळ मी एकटा कसा चालवीत आहे हे सप्रमाण सिद्ध करण्याची ते केविलवाणी धडपड करू लागले. डॉ. वानखडे यांचा राजीनामा ही चळवळीच्या दृष्टीने धक्कादायक बाब होती. कारण चळवळीत माणसे तोडून भागत नसतात, ती जोडावी लागतात. तसेच काही ध्येयवेडी माणसे एकाच दिशेने समाजाच्या उत्थानासाठी कार्य करीत असतील तर ती चळवळ होते. एकटा माणूस करत असेल ते काम होते व एकट्या माणसाच्या

करीत असलेल्या कामात स्वार्थ ही निश्चित येतोच. याच स्वार्थाने वेडे झालेल्या पानतावणेंना डॉ. वानखडे यांच्या राजीनाम्याने रान मोकळे झाले. त्यांनी प्रागतिक विचार संसदेच्या अध्यक्षपदी प्रा. केशव मेश्राम यांची नियुक्ती केली व खाली झालेल्या जागेवर आपल्या जवळच्या कु. सुशिला मूल यांना घेतले. हे सारे मला असह्य झाले होते म्हणून मीही राजीनामा दिला. पण तो राजीनामा डॉ. वानखडे यांच्या राजीनाम्यासारख्या सटायरिकल भाषेत न लिहिता, पानतावणे यांनी आजवर केलेल्या चुकांवर जळजळीत प्रकाश टाकला व त्यांच्यावर आरोप ठेवून कोरडे ओढले होते. हा माझा राजीनामा अंगलट येतो असे दिसताच (कारण राजीनाम्याची सत्यप्रत चॅरिटी कमिश्नर ऑफिसला द्यावी लागते) पानतावणेंनी पवित्रा बदलविला. त्यांनी घरी येऊन माझी समजूत काढली. राजीनामा देऊ नका, आपण चांगले काम करू असे म्हटले. पानतावणे दुरुस्त होतील या आशेने पुन्हा मी सारे विसरून जोमाने कामाला लागलो. याच काळात फ. मुं शिदेंनी पानतावणे यांचा स्वभाव, दुसऱ्यांना राववण्याची गोड (?) तऱ्हा आणि सबकुछ मैं ही वृत्ती पाहिल्यामुळे त्यांनीही प्रा. वि. संसदेच्या सदस्यत्वाचा व अस्मितादर्शच्या सहसंपादकत्वाचा राजीनामा दिला. त्या अगोदर फ. मुं. शिदेंनी माझ्याजवळ पानतावणे यांच्या ह्या असल्या स्वभावाबद्दल प्रतिक्रियाही व्यक्त केली होती. फ. मुं. शिदेनी राजीनामा दिल्यावर पानतावणे यांनी कोणालाही न दुखावणारा म्हणून भरपूर उपयोगाचा ठरणारा तायडे नावाचा सद्गृहस्थ प्रा. वि. संसदेच्या सदस्यपदी घेतला. आता दया पवारनेही राजीनामा दिल्याचे समजले. मग प्रागतिक विचार संसदेवर आपले संपूर्ण, निर्विवाद बहुमत झाल्याने पानतावणे निश्चित झाले आणि त्यांनी माझ्या विरोधात दोस्तांजवळ बोलण्यास सुरवात केली. स्टॅलीन नीती पानतावणेंनी पूर्णपणे आत्मसात केली आहे; संबंधितांशी नियमित पत्रव्यवहार हे त्यांचे खास वैशिष्ट्य. मग त्याद्वारेच मी अस्मितादर्शसाठी बरबाद झालो आहे, पदरमोड करीत आहे, झीज सोसून चालवीत आहे म्हणून मला मदत करा अशा आशयाचे ते मजकूर लिहून, भेटीगाठीत तोंडी सांगून सहानुभूती मिळवू लागले होते.

अस्मितादर्शची आर्थिक बाजू

अशा प्रकारच्या अफवा पानतावणे जेव्हा पसरवू लागले तेव्हा या चमत्काराचे तर्कशास्त्र न समजू शकलेला माझा एक भाबडा मित्र मला म्हणाला, 'काहो निंबाळकर हे उपास तापास पानतावणे यांना पडताहेत आणि ते बरबादही झालो म्हणतात पण मला तर हे समजले की पानतावणे यांनी याच काळात नागपूरला एक मोठे किंमती घर बांधले, औरंगाबादलाही तयार उभे घर विकत

घेण्याचे घाटत आहे व पंधरा-वीस एकर शेत घेतल्याचेही ऐकले आहे. तर यातील काय खरे आहे ?' तेव्हा मी मात्र मुद्दामच दलित साहित्य चळवळीचे अगत्य मनात बाळगून पानतावणे नावाच्या माझ्या सहकाऱ्याच्या संदर्भात बोलण्याचे टाळले. पानतावणेंच्या बगळेगिरीला या वेळपर्यंत चांगलीच सहानुभूती मिळालीही होती. मदतीचा ओघ वाढत होता. त्यातच राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान सुद्धा मंजूर झाले होते. डॉ. वानखडे यांनी सुरवातीसच भक्कमपणे टाकलेला अस्मितादर्शचा आर्थिक पाया अधिकच भक्कम झाला होता. ज्या आर्थिक कारणामुळे दलित नियतकालिके आजवर बंद पडतात असा अभनुव आहे त्यामुळे अस्मितादर्श बंद पडण्याचे कारणच नव्हते. आर्थिक बळ व साहित्याचा ओघ यामुळे वर्षातून चार अंक काढणे फारसे कठीण काम उरलेच नव्हते.

नागपूरचे दलित साहित्य संमेलन

मग पानतावणे यांनी स्वत:चे माहात्म्य वाढविण्यास सुरवात केली. दोन, चार चेले-चपाटे ते सोबत वागवू लागले. अस्मितादर्श मेळावा हा त्यातलाच एक भाग. अनुक्रमे औरंगाबाद, नांदेड येथे दोन मेळावे झाल्यावर तिसरा नागपूर मुक्कामी भरविण्याचे ठरले व तशी पत्रकेही प्रकाशित करण्यात आली. परंतु कोणाही एका व्यक्तीचे माहात्म्य न वाढविता साहित्यिकांचे सर्वसमावेशक विराट पीठ (स्टेज) असावे म्हणून शंकरराव सुरडकर, डॉ. प्रा. भाऊ लोखंडे, प्रा. यशवंत मनोहर, डॉ. मधुकरराव वासनिक, प्राचार्य सूर्यभान वाघमारे, प्रा. घोडेस्वार, पृथ्वीराज बन्सोड, प्रा. मा. फ. गांजरे, पी. टी. कांबळे, सी. टी. कांबळे, चित्रकार हेमंत नागदेवे, पत्रकार नाना शेंडे, प्रा. मधुकरराव डोंगरे, प्रा. जोगेन्द्र कवाडे इत्यादींनी आग्रह धरला. एवढेच नव्हे तर सदर मान्यवरांनी व समाजातील सर्व थरातील घटकांनी, साहित्यिकांनी, विचारवंतांनी अनेक संदर्भात नवा पायंडा पाडणारे क्रांतिकारक, दलित साहित्य संसदेला जन्म देणारे हे युगप्रवर्तक ऐतिहासिक दलित साहित्य संमेलन पार पाडण्यास अपार कष्ट घेऊन यशस्वीपणे पार पाडले. या संमेलनाची देशभर चर्चा झाली. या ऐतिहासिक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. वानखडे. त्यांनी आपल्या मननीय विचारप्रवर्तक भाषणात दलित साहित्याबद्दल बोलण्याअगोदर त्यांच्या चळवळीचा इतिहास सांगितला. त्यात त्यांनी मिलिंद साहित्य परिषद, अस्मितादर्श कसे स्थापन झाले याचा संक्षिप्त आराखडाही प्रतिपादन केला व असे म्हटले की, 'अस्मिता' व 'अस्मितादर्श', मिलिंद साहित्य परिषद आणि दलित साहित्याची चळवळ ह्या सर्व गोष्टी कुणा एका व्यक्तीमुळे नव्हे तर सर्वांच्या चळवळीतून, आंबेडकरी

ध्येयवादातून आणि सर्वांना पटलेल्या सामाजिक गरजेतून आलेल्या आहेत, हे स्पष्ट करणे जरूरीचे आहे.

पानतावणेंचा लेख व त्याला उत्तर

अस्मितादर्श मेळाव्याचे साहित्य संमेलनात रूपांतर झाल्याने, साहित्य संमेलनात आपणाला भाव मिळणार नाही हे ओळखून पाणतावणेंनी त्याच दिवशी (१८ जाने. ७६) नागपूरच्या दै. तरुण भारतात 'अस्मितादर्श आणि मी' या शीर्षकाचा लेख लिहून पुन्हा एकदा स्वत:चे माहात्म्य कथन करण्याचा जाहीर प्रयत्न केला. या लेखात माझा अपरिहार्य असल्याने ओझरता उल्लेख केला. नंतर साहित्य संमेलनातील डॉ. वानखडे यांच्या अध्यक्षीय भाषणातही या सांस्कृतिक, वाङ्मयीन चळवळीचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा, समाज, काळाची गरज यांनाच दिल्याने, कोण्या एका व्यक्तीचे गुणगान न केल्याने व पानतावणे यांना त्यांची जागा (स्टेजवर) दाखविल्या गेल्याने पानतावणेंची अस्मिता(?) दुखावल्या गेली. त्यामुळे संमेलनावरून औरंगाबादला परतल्यावरोबर त्यांनी, दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून गोळी झाडण्याच्या त्यांच्या नेहमीच्या नीतीप्रमाणे, मला नागपूर संमेलनाच्या विरोधात लेख लिहावयास सांगितले. परंतु आपल्या इतर चळवळीमध्ये झाले ते विघटन पुरे झाले, ते दलितांमधील आपल्या बोटावर मोजण्याइतक्या साहित्यिकांतही नको या सद्हेतूने मी ते मान्य केले नाही. मग मात्र पानतावणे यांनी स्वत:च नागपूर-वरून प्रकाशित होणाऱ्या 'मासेस' नावाच्या पाक्षिकात लेख लिहून चळवळीचे केन्द्रस्थान अस्मितादर्श आहे व सर्व काही मीच आहे, पर्यायाने मी दलित साहित्य चळवळीचा प्रेषित आहे, असे सांगण्याचा खटाटोप केला. तसेच अस्मिता व अस्मितादर्श हे वेगवेगळे आहेत. त्याच्या जन्मापासून ते आजपर्यंत पोषणाचे कार्यही मीच करीत आहे, असा कितीतरी खोटा, लोकांच्या डोळ्यात धूळ फेकणारा, सत्याचा विपर्यास करणारा मजकूर त्या लेखात पानतावणेंनी पेरला.

या लेखातील खोट्या, सत्याचा विपर्यास करणाऱ्या व सबंध साहित्य चळवळीला सुरूंग लावून चळवळीच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या करणाऱ्या या मजकूराने मी, पानतावणे यांच्या घरी जाऊन विचारणा केली. त्यांनी आजवर केलेल्या चुकांचा त्यांच्यासमोर पाढा वाचला. तुम्ही अस्मितादर्श नियमित काढता, आयत्या पिठावर रेघोट्या का असेनात त्या नीट ओढता या कारणांनी आम्ही आजवर चूप बसलो. याचा फायदा तुम्ही समाजाला चुकीची माहिती देऊन व अस्मितादर्श घशात घालून घेण्यात करून घेतला आहे, असे खडसावून सांगितले. पानतावणे यांना माझी अशा प्रकारची प्रतिक्रिया हवीच होती. ते म्हणाले,

'तुम्हाला काय म्हणायचे ते प्रागतिक विचार संसदेच्या कार्यकारिणीत लेखी द्या !' कारण माझे म्हणणे वा आरोप फेटाळून लावण्यास आपल्याकडे संसदेत बहुमत आहे, याची त्यांना खात्री होतीच. चळवळीला कलंकित करणाऱ्या गोष्टी जनतेसमोर याव्या व चळवळ निकोप राबविल्या जावी, या हेतूने मीही जिद्दीला पेटलो. 'मासेस' नागपूर, 'प्रबोधन' औरंगाबाद या नियतकालिकांमध्ये मी लेख लिहून पानतावणेंच्या लेखांमधील खोटेपणा सप्रमाण सिद्ध केला.

प्रागतिक विचार संसदेस माझे पत्र

एवढे करूनच मी थांबलो नाही तर अध्यक्ष, प्रागतिक विचार संसद यांना पत्र पाठवून त्यात खालील मुद्दे प्रा. वि. संसदेच्या कार्यकारिणीत चर्चिल्या जावे, अशीही विनंती केली.

(१) अस्मितादर्शमध्ये बऱ्याच मोठ्या रकमेचा घोळ आहे. त्याबद्दल चर्चा व्हावी.

(२) प्रागतिक विचार संसदेवर महाराष्ट्रातील अजून काही मंडळी घेण्यात यावी.

(३) अस्मितादर्शचे मासिक किंवा द्वैमासिकात रूपांतर करण्यात यावे.

(४) अस्मितादर्शचे संपादक मंडळ असावे व पानतावणे यांना कार्यकारी संपादक म्हणून नियुक्त करावे.

(५) प्रागतिक विचार संसदेतील पदाधिकारी हे एकमेकांचे नातलग नसावे.

(६) प्रा. वि. संसद व अस्मितादर्शचे कार्यालय कोणत्याही पदाधिकारी व सभासदाच्या घरात असू नये. ते स्वतंत्र असावे.

(७) अस्मितादर्शला अभिप्रायार्थ आलेल्या पुस्तकांची संपूर्ण सूची बनविण्यात यावी व त्यांचा उपयोग वाचकांसाठी करता येईल काय यावर विचार व्हावा.

(८) आपल्या (दलित) लेखक व लेखिकांना अस्मितादर्शमधून जास्तीत जास्त वाव द्यावा.

या पत्राची एक प्रत कार्यवाह प्रा. वि. सं. (म्हणजे, पानतावणे) यांनाही देण्यात आली. यावेळी मात्र पानतावणेंनी थोडी धावपळ केली. मुंबई व नागपूरला दौरे व वास्तव्य केले आणि प्रा. वि. सं. च्या पदाधिकारी व सदस्यांना निवाळकरांचे वरील मुद्दे फेटाळून लावण्याची तरतूद केल्यानंतर अस्मितादर्शचा ट्रस्ट झाल्यापासून प्रथमतःच (दि. २३-१-७६) ला पहिली कार्यकारिणीची बैठक बोलाविली. त्या बैठकीत माझ्या मुद्यांवर वरवरच चर्चा करून (द्वैमासिक

करण्याचा मुद्दा ग्राह्य मानून; बाकीचे मुद्दे फेटाळून लावले. वरील सर्व मुद्दे हे प्रा. वि. सं. व अस्मितादर्शच्या प्रगतीसाठी, भल्यासाठी असतानाही ते बहुमताने फेटाळून माझ्यावर असाही ठपका ठेवण्यात आला की मी हे मुद्दे स्वार्थापोटी व पानतावणे यांच्या वैयक्तिक द्वेषातून मांडले. याच बैठकीत माझे जे सहसंपादक पद उरले होते तेही उडवून लावण्यात आले. माझे मुद्दे मी भक्कमपणे मांडले. या बैठकीत दया पवार यांनी असा ठराव मांडला की ज्याअर्थी निंबाळकर एवढे सर्व सांगत आहेत त्याअर्थी त्यांच्या म्हणण्याचा आपण विचार करायला पाहिजे, आणि म्हणून मागील गोष्टी विसरून पुढे अस्मितादर्शचा व्यवहार नीट चालावा म्हणून पानतावणे, निंबाळकर व तायडे यांची एक आर्थिक समिती नियुक्त व्हावी. त्या समितीने अस्मितादर्शच्या प्रिंटींग व इतर खर्चाबाबत विचारविनिमय करून आर्थिक धोरण ठरवावे, हा पवारांचा ठराव पास करण्यात आला. आता या बैठकीला ९–१० महिने होऊन व त्यानंतर अस्मितादर्शचे तीन अंक निघूनही पानतावणे यांनी या आर्थिक समितीची ना बैठक बोलाविली ना कोणाला एका शब्दाने विचारले. अर्थात त्यांच्या स्वभावाला हे धरूनच असल्याने आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

माझी प्रतिक्रिया

या बैठकीनंतर मात्र पानतावणे माझ्याविषयी वैरभावनेने पेटले. 'मासेस' व 'प्रबोधन'मधील लेखांमध्ये मी त्यांचे पितळ उघड केल्याने व काही प्रश्न उपस्थित केल्याने, ज्यांची उत्तरे पानतावणे यांच्याजवळ नव्हती, ते माझ्या वैयक्तिक बाबीसंबंधी आणि 'अस्मितादर्श' हे पानतावणे यांचेच आहे, त्यांनीच ते काढले आहे, चालविले आहे अशा आशयाची पत्रे स्वतःच लिहून दुसऱ्याच्या नावावर छापण्याचा सपाटा लावला व आपली बाजू भक्कम करण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला. माझ्याविषयी अत्यंत गलिच्छ मजकूर लिहून, त्यांचे मित्रच चालवित असलेल्या एका लंगोटी पत्रात त्यांनी दुसऱ्या एका मित्राच्या नावावर प्रकाशित केला. जेव्हा मी ज्याच्या नावावर ते प्रकाशित करण्यात आले होते, त्यांना विचारले तेव्हा त्यांनी कानावर हात ठेवले व शपथपूर्वक सांगितले की मी ते लिहिले नाही. मी त्यांना विचारले की तुम्ही हे लिहून देता का? तर त्यांनी चटकन लिहूनही दिले. (येथे मी वृत्तपत्र, प्रकाशित करणाऱ्याचे नाव व ज्याच्या नावावर प्रकाशित केले त्याचे नाव मुद्दामच लिहिण्याचे टाळले आहे.)

पानतावणेंनी बाजू भक्कम व्हावी म्हणून काही मित्रांना लिहावयास लावले. त्यावेळी कोणी आईमुलाचा हवाला देऊन म्हटले की, 'संगोपनाची जबाबदारी

टाळून जन्माचा वाद कशाला' काढता. हे बोलणारे तिन्हाईत होते. त्यांना काहीच माहीत नव्हते की हा वादही पानतावणेंनीच उकरून काढला होता. ते बिचारे या चळवळीपासून खूप दूर होते. त्यामुळे त्यांनाही उत्तर देणे भाग होते. म्हणून माझ्या लेखातून त्यांना सवाल विचारला की आपण महत्त्व आईचे मानतो की दाईचे ? दाईने जरी मुलाला वाढविले असले तरी आईला मुलाला नऊ महिने उदरात वागवून जन्म देतांना काही मरणकळा सहन कराव्या लागत नाही काय ? दाईने मुलाला सांभाळले, वाढवले त्यामुळेच तेवढ्यानेच जन्मदात्री आई व तिने त्या मुलाला दिलेला जन्म ही वस्तुस्थिती काल्पनिक किंवा असत्य समजता येईल काय ? म्हणजे आई-मुलातील जन्माची प्रक्रिया नाकारता येईल काय ? एखाद्या नाठाळ, वांझ दाईला वाढविता वा संगोपिता येण्यासाठीही कोणा पोटी पिकू शकणाऱ्या आईने आतडी उपसून मुलाला जन्म देणे भागच असते. त्याशिवाय दाईच्या नंतरच्या प्रक्रियेला प्रारंभही होत नाही, दाईला अस्तित्व प्राप्त होत नसते. असे तयार मूल तिला मिळाल्याशिवाय दाईचे दाईपण सिद्ध होत नसते. ते अर्थपूर्णही होत नसते. ही बाब आई-दाईचा पक्षपाती दाखला देणाऱ्यांनी विचारात घेण्याचे बुद्धीचाच का टाळले असावे, ते आता सरळच समजून घेता येईल.

अस्मितादर्शचे लेखक कोण ?

एक अतिशय भ्रामक गोष्ट पानतावणे अस्मितादर्शबद्दल वेळोवेळी सांगत असतात व लिहितही असतात. त्यांचे म्हणणे असे की अस्मितादर्शने बरेच लेखक, कवी पुढे आणले. परंतु ही गोष्ट मला यापूर्वी दांभिकपणाची वाटत होती व आजही वाटते. म्हणूनच मी प्रा. वि. सं. च्या बैठकीत उपेक्षितांमधील लेखक, कवींचे लेखन प्रामुख्याने छापावे असा निकराचा आग्रह धरला होता. आता अस्मितादर्शमधून खरोखरच महत्त्वाचे लेखक, कवी पुढे आणले गेलेत का हा प्रश्न आहे, वस्तुस्थिती तर ही आहे की संपादक पानतावणे यांनी आपल्या अवती भोवतीच्या खुशमस्कऱ्या करणाऱ्या पोराटोरांचं सुमार लेखन प्रकाशित केले आहे. दलित लेखकांमधील काही तेजःपुंज लेखक, कवींना छापायचे कटाक्षाने टाळले आहे. परंतु हे नाकारून किंवा आत्मपरीक्षण न करता मी लेखकांना पुढे आणले हा अहंकार कधीतरी समजावून घ्यावा असा निश्चितच दुःखदायक आहे. कारण कोणत्याही लक्षणीय आणि स्वयंतेज लेखक, कवीला कोणतेही नियतकालिक पुढे आणितच नसते तर स्वयंतेज कलावंतच त्या नियतकालिकाला आपल्या मौलिक लेखनाने प्रतिष्ठा, दर्जा प्रदान करीत असतो. हेच एखादे उदाहरण देऊन म्हणता येईल की सूर्य ज्या क्षितिजातून उगवला त्या क्षितिजाने

म्हणावे की मी सूर्याला पुढे आणले, माझ्यामुळेच तो जगाला दिसू शकला. एवं त्याला प्रकाश, तेज आले, तो मान्यवर झाला. असा पोकळ दिमाख क्षितिजाने वागविणे जसे रास्त नाही, हास्यास्पद आहे, तद्वतच वरच्या संदर्भात समजावे. उलट दलितांमधील अत्यंत प्रतिभावान, ताकदीचे काही कवी व कथाकार बाबुराव बागुल, सुखराम हिवराळे, यशवंत मनोहर, नामदेव ढसाळ, नरेश इंगळे, प्र. ई. सोनकांबळे इत्यादी सुरवातीच्या काही अंकांनंतर अस्मितादर्शमध्ये दिसतच नाही–किंवा क्वचित दिसतात. मात्र याच कवी लेखकांचे लक्षणीय, दर्जेदार साहित्य ह्याच काळात इतरत्र दुसऱ्या वाङ्मयीन नियकालिकांतून प्रकाशित होत असते, याचा योग्य अर्थ वाचक निश्चितच लावू शकतात असे मला वाटते.

नऊ वर्षांची फलश्रुती व पानतावणेंचे मौलिक कार्य

हे सारे घडत असतांना आपणाला असेही दिसून येईल की, अस्मितादर्शचा वाङ्मयीन मराठी नियतकालिकांच्या जगात या नऊ वर्षात बराच बोलबाला झाला. अस्मितादर्शमधील लेखातील वैचारिक लेखनामुळे मराठी साहित्यातील नव्या वाङ्मयीन जाणिवा व सामाजिक लोकशाही विचाराला फार मोठी मदत झाली. अस्मितादर्शचा आर्थिक प्रश्न जन्मताच सुटल्यानंतर त्याला स्थैर्य आणि सातत्य मिळाले. त्यामागे कोणा सामान्य माणसाची पुण्याई नव्हती तर समग्र आंबेडकरी प्रेरणेची पुण्याई होती. त्यामागे अनेकांच्या सद्भावना होत्या. नव्या सामाजिक व वाङ्मयीन गरजेचे त्यामागे पाठबळ होते. शिवाय संपादकाने जो लेखकवर्ग जमविला त्यामुळे अस्मितादर्शला काही रूप प्राप्त झाले पण इथे प्रश्न असा की अस्मितादर्शला आज आलेले रूप सर्जनात्मक लेखनाचे आहे का ? की वैचारिक जाणिवेचे आहे ? तर हे स्वरूप मुख्यत्वे वैचारिक जाणिवेचे आहे हेच मनात ठसते आणि हे रूप सिद्ध करणारा लेखकवर्ग बहुतांश दलितेतर आहे. अस्मितादर्शच्या प्रवासातील हा एक टप्पा झाला. पुढे दलितांमधील विचारवंतांच्या लेखनाचा रंग अस्मितादर्शला मिळायला हवा असे वाटते.

कविता किंवा कथा या ललित वाङ्मयाच्या संदर्भात मात्र परिस्थिती वेगळी आहे, आधीच नाव असलेले कवी–कथाकार सोडले, अस्मितादर्शच्या शिवाय इतर मासिकातून गाजणारे लेखक-कवी सोडले तर अस्मितादर्शमधून संपादकाने ज्या कवी–कथाकारांचे लेखन छापले ते फारसे लक्षणीय होते असे दिसत नाही. काही अपवाद वगळून या सर्वच कवितांवरची नावे काढली तर या सर्वच कविता, कथा कुणातरी एकाच लेखकाने लिहिल्यासारख्या भासतात. याला कारण अस्मितादर्शचा हा कथाकार किंवा कवीवर्ग अस्मितादशच्या बाहेर

न जाणारा, आपले वाचन अस्मितादर्शपुरतेच मर्यादित ठेवणारा आहे. त्यामुळे त्याला त्यातलेच कथा–कविता लेखन आदर्श वाटत गेले. त्यातून झापडबंद मने साकार झाली. म्हणून विशिष्ट चेहरा–मोहरा नसलेले हे कथा, कविता लेखन पुन्हा पुन्हा अस्मितादर्शमधून येऊ लागले. प्रतिक्रियांना, भावनांना, अभिव्यक्तीला, साचेबंदपणा प्राप्त झाला. त्यातील कथा, कविता एकसूरी झाल्या. एकसाची, एकरंगी झाल्या. एका अर्थाने स्वत्वशून्य शब्द व्यवहार अस्मितादर्शमधून सुरू राहिला. हे कळण्याजोगी, चोखंदळ वृत्ती अस्मितादर्शच्या संपादकाजवळ होती की नाही कळत नाही. पण संपादकाने या सर्व नवोदित लेखक, कवींना या एकरंगीपणाची जाणीव वेळोवेळी देणे चळवळीच्या आणि वाङ्मयीन सकसतेच्याही दृष्टीने आवश्यक होते. पण भक्तवर्गाची संख्या कमी होऊ नये किंवा आपल्यासंबंधीच्या आंधळ्या आदराला झळ पोहचू नये म्हणून संपादकाने हा बेडरपणा दाखविला नाही. या लेखक–कवींपुढे त्या त्या क्षेत्रातील मानदंड उभे करणे त्यांच्या लेखनाची वाङ्मयीन चिकित्सा मांडणे, त्यांचे बळ आणि त्यांच्या मर्यादा, त्यांच्या लेखनातील हौसेचा आणि फॅशनचा भाग, लेखनातील समज आणि उत्साही अपसमज स्पष्ट होणे आवश्यक होते– तसे झाले नाही. परिणामतः केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, दया पवार व इतर दोघा–तिघांचे बाहेरून लिहून नावारूपाला आलेल्यांचे लेखन वजा केले. कविता किंवा कथाक्षेत्रात नाव घ्यावे असे कुणाचेही लेखन अस्मितादर्श जवळ जवळ छापू शकले नाही असेच म्हणावे लागते. पण पानतावण्यांचे तथाकथित वैचारिक लेखन तपासले तर वरील संदर्भात त्यांना स्वतःला काही करता येणे शक्य होते काय हाही प्रश्नच आहे. त्यांनी इतरांकडून हे करून घ्यायला हवे होते. बाबूराव बागूल, केशव मेश्राम, सुखराम हिवराळे, यशवंत मनोहर, दया पवार किंवा आणखी काही नावे घेता येतील. ही कितीतरी महत्त्वाची नावे होती. पण पानतावण्यांना हेही न सुचावे, याचे कारण मात्र नक्कीच समजून घेता येईल. तेव्हा आजवरच्या अस्मितादर्शला वैचारिक जाणिवांचे रूप बहुतांश दलितेतर लेखकांच्या लेखनाकरवी प्राप्त करून देण्यात पानतावणे यांनी यश मिळविले आहे. यापुढे दलितांमधील विचारवंतांच्या जाणिवांचे रंग अस्मितादर्शमधून सांडावेत आणि कवी, कथाकारांचे ललितलेखनाचे स्वरूप त्याला प्राप्त व्हावे, त्यासाठी त्यांना खऱ्याच कथा, कविता छापाव्या लागतील. त्यासाठी आपल्या अभिरुचीलाही प्रशिक्षण द्यावे लागेल आणि ते हे करू शकतील, हा विश्वास त्यांनी आजवर केले त्यावरून वाटावा असे निश्चित वाटते.

मला या लेखात जे सत्य सांगायचे होते ते मी संक्षिप्तपणे सांगितले. माझा हा लेख वाचतांना काही लोक अस्वस्थ होतील. काही त्यावर खोट्या-नाट्या गोष्टी स्वभावानुसार सर्जीत करून रक्तात मुरलेली मुजोरी करू लागतील. पण हे सर्व करीत असतांना त्यांचे मन त्यांना ग्वाही देत राहील, ते त्यांच्या कानात ओरडून सांगत राहील की, निंबाळकरांनी लिहिले त्यात कुठलीही चूक नाही आणि स्वच्छ निर्विकारपणे पाहिले तर ते सत्याचेच निःपक्षपाती शब्दरूप आहे. अस्मितादर्शच्या मागे समग्र आंबेडकरी प्रेरणा, त्यांच्या तत्त्वज्ञानाची भक्कम बैठक, काळाची सामाजिक गरज, डॉ. वानखडे यांनी दिलेला जन्म व चळवळीची योग्य दिशा, समाजाचे व इतरांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य वा सर्व गोष्टी जुळून आल्याने पानतावणे, मी, हिवराळे व इतर मित्र अस्मितादर्शला येथवर आणू शकलो. आज जरी अस्मितादर्श स्वतःभोवती केंद्रीत करून पानतावणे त्याचा स्वतःच्या प्रसिद्धीसाठी, मोठेपणा वाढविण्यासाठी या हारतुरे स्वीकारण्यासाठी उपयोग करून घेत असले तरी त्याचे आम्हाला दुःख वाटण्याचे कारण नाही. अस्मितादर्श ह्या आपण लावलेल्या, खतपाणी घातलेल्या अंकुराचे वृक्षात रूपांतर झाले, त्याला फुले, फळे आली किंवा आपण जन्म दिलेल्या व त्याच्यासाठी खस्ता खाल्लेल्या कोणत्या आईस मुलगा मोठा होऊन नावारूपास आलेला पाहून आनंद होणार नाही ? म्हणूनच आम्ही अस्मितादर्शचे हार्दिक अभिनंदन करतो.

तगमग व खंत

लेख तसा संपला आहे. पण जाता जाता जीवाला व्याकुळ करणारी एक खंत मांडावीशी वाटते. आम्ही नऊ वर्षांपूर्वी एका सामाजिक आणि उपेक्षितांच्या वाङ्मयीन उत्थापनाच्या जिद्दी प्रवासाला निघालो. त्यात आम्ही अनेक होतो. आमचा एकदिलाचा तो गोतावळा होता. जळत्या जाणिवेने झपाटलेले ते आमचे जणू एक कुटुंबच होते. त्यावेळी आम्ही एक होतो. ध्येयार्थी होतो. परस्परांत सहभाव, सहकार्यभाव, परस्परसद्भाव होता प्रतिज्ञांची निशाणे खांद्यावर घेऊन उज्ज्वल ध्येयांची क्रांतीमानलेली गाणी गात आमचा ताफा निघाला होता. या प्रमाणे हातात हात घालून निघालेला, गळ्यात गळा मिळवून चाललेला हा आमचा अपूर्व काफिला पाहून मराठी साहित्याला, इथल्या सामाजिक तृप्ततेला, सांस्कृतिक निबरपणाला धसका बसला असेल. हेवा वाटावा असेच ते उजडाचे मोहोरणे होते. एकजिवाने घडलेले ते आमच्या मनगटांचे बहरणे होते. आम्ही त्यावेळी पाईक होतो; सैनिक होतो. व्यक्ती नव्हतो. चळवळ होतो, काम नव्हतो. वेगळे दांभिक नव्हतो. पृथक-पृथक नव्हतो, आम्ही एका सागराच्या

लाटांसारखे अभिनव होतो त्यावेळी. एका फुलाच्या पाकळ्यांसारखे संवाद साधून सुंदर होतो त्यावेळी. एकाच चुलीतील लाकडांसारखे आम्ही धगधगत होतो त्यावेळी. आम्ही त्यावेळी एकाच सूर्याच्या किरणांसारखे, एकाच ज्वालामुखीच्या स्फुरणांसारखे होतो. पण आज आम्ही विखुरले गेलो आहोत. डॉ. वानखडे, रा. ग. जाधव, रायमाने, हिवराळे, मनोहर, इंगळे, मी हे सर्व दिशादिशांना झालो आहोत.

अस्मितादर्शपासून अस्मितादर्शबद्दल सदिच्छा बाळगणारे आम्ही दूर झालो आहोत. आम्ही वेगळे पाडलो गेलो आहोत. याची कारणे कोणती ? हे असे का झाले. एकटे पानतावणेच तिथे आहेत. त्यांनी दर वळणावर नवे साथी घेतले. जुने गमावले. अस्मितादर्श हे आमचे होते. आम्ही आमच्या अस्मितादर्शपासून दूर का झालो, वेळोवेळी तिथे आलेले काही वेळ राहून तिथून दूर का गेले ?

बांधल्या तळ्याचा फुटलासे बांध
ओघ बारा वाट मुरडताती ।।
बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा
तृण रानोमाळा पांगलेसे ।।

असेच काहीसे हे सर्व दुर्दैवी घडले आहे. आणि हे असे का घडले असावे ? याची सूचक उत्तरे या लेखात कुठे मिळाली तर फारच उत्तम होईल. पण काही का असेना हे दळभद्री विघटन पाहून, ही करंटी फाटाफूट पाहून आज जीव गलबलून येत आहे. तेव्हाचे ते प्रवासी कुठल्या दिशांनी आणि का गेले ? आम्हा त्यावेळच्या एकजीव प्रवाशांचा असा अनंतादि अंगानी भंगलेला, असा रानोमाळ झालेला हा जत्था, हा पांगलेला काफिला पाहून माझे चळवळवेडे, अस्मितादर्शवेडे आणि साहित्यवेडे मन आज दुःखाने भरून, अनावर दाटून येत आहे.

□

आंबेडकरी चळवळीचा कृतिकार्यक्रम

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहा डिसें. १९५६ ला महापरिनिर्वाण झाले आणि एका युगचळवळीचा शेवट झाला. बाबासाहेबांनी त्यांच्या हयातीत सामाजिक समतेचे आंदोलन उभे केले. पोटाच्या भुकेपेक्षा मनाची भूक फार मोठी असते. या तत्त्वाप्रमाणे प्रथम दीनदलित समाजात जागृती निर्माण केली आणि त्यांना स्वाभिमान शिकविला. स्वाभिमानाची शिळीभाकर सुद्धा गोड लागते हे त्यांचे विचार त्यांच्या सामाजिक चळवळीचे मर्मस्थान होते. महाडच्या चवदार तळ्याचा पाणी सत्याग्रह, काळाराम मंदिराचा प्रवेश सत्याग्रह इत्यादी कार्यक्रम हे त्यांच्या सामाजिक समतेच्या चळवळीचा इतिहास कथन करतात. या सामाजिक समतेच्या आंदोलनातच त्यांचे राजकीय आणि आर्थिक आंदोलन यांचा अंतर्भाव होता. घटनेचे लिखाण आणि त्यात मागासवर्गीयांना समाविष्ट केलेल्या राखीव जागा व सवलती ही त्यांच्या अनुक्रमे राजकीय आणि आर्थिक चळवळीची बीजे होती. मजूरमंत्री असतांना कामगारांच्या व श्रमिकांच्या हितासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आणि मांडलेल्या मौलिक विचारांचा परामर्श घेणे हा वेगळा व विस्तृत विषय आहे.

परंतु कामगार मालकाचे हितसंबंध, कामगारांचे उत्पादनातील योगदान आणि त्याचा त्यांना मिळणारा लाभ कामगारांच्या हक्कांची सुरक्षितता, मालकांची कर्तव्ये व हक्क इत्यादी आजही भेडसावणाऱ्या प्रश्नांचा त्या वेळीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार केला. त्या विचारात त्यांचे आर्थिक ध्येय धोरणही स्पष्ट होत जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली होती की, आमच्या देशात फक्त श्रमाची विभागणी नाही तर श्रमिकांची विभागणी आहे. एका मिलातील एकाच खात्यात काम करणारे कामगार मिल चालीत गेल्यानंतर उच्चनीच जातीचे होतात. त्यांच्यात विभागणी होते. तसेच मिलातील त्रासन खात्यात मागासवर्गीय कामगार ठेवल्या जात नाही.

कारण बॉबीनमध्ये येणारा धागा हा तोंडाने ओढावा लागतो. त्यामुळे त्याला त्या कामगाराची थुंकी लागते आणि नंतर तो धागा इतर सर्व कामगारांना हाताळावा लागतो. त्यामुळे थुंकीचा विटाळ होतो या भावनेने दलित कामगारांना त्या खात्यात ठेवल्या जात नाही. येथे हे स्पष्ट होते की आम्ही सामाजिक उच्चनीचतेचे इतके गुलाम आहोत की आर्थिक परिस्थिती ही गौण समजली जाते. आर्थिक दृष्ट्या संपन्न असलेल्या दलित माणसालाही उच्चनीचतेचे चटके बसतात ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे बाबासाहेबांनी सर्वप्रथम या उच्चनीचतेच्या चिखलातून आम्हाला काढण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी आंदोलने केली.

त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरही, दलित समाजात त्यांनी निर्माण केलेले चैतन्य आणि चळवळ उभी करण्याची शक्ती होती. जरी समाज दुभंगला, नेते फुटले, जनता विखुरली आणि संघर्षाची धार बोथट झाली. परंतु १९६३–६४ चा भूमीहीनांच्या सत्याग्रहाने सबंध देश घुसळून काढला. लक्षावधी लोक या सत्याग्रहात भाग घेऊन कारावासात गेले. या सत्याग्रहाचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्याकडे होते. आणि या सत्याग्रहात सर्व नेत्यांनी अत्यंत उत्साहाने भाग घेतला होता. गावरानं, पडित जमिनी, वनविभागाच्या अन्तर्गत येणाऱ्या जमिनी भूमीहीन मजूरांना, मागासवर्गीय गोरगरीबांना मिळाव्या ही त्या आंदोलनातील प्रमुख मागणी होती. या आंदोलनाचे यशापयश पाहण्यापेक्षा यामागील एक मुद्दा आपल्या लक्षात येतो की आंबेडकरी चळवळ सामाजिक विषयावरून आर्थिक विषयाकडे वळली होती. तिचा परिघ वाढला होता. व्याप्ती वाढली होती. संदर्भ बदलू लागले होते. यानंतर राजकीय ध्रुवीकरण सुरू झाले. रिपब्लीकन पक्ष आणि काँग्रेसची युती झाली. यानंतर मात्र चळवळ अशी उभी राहिलीच नाही. नेत्यांचे हेवेदावे, स्वार्थ आणि अहंभाव यामुळे पक्षाची शिस्त, ऐक्य याची वासलात लागली. त्याचा परिणाम चळवळीवर झाला. चळवळीचा आणि आंबेडकरी जनतेचा संबंध तुटत गेला. फक्त नाही म्हणायला जर कोठे समाजावर अन्याय, अत्त्याचार झाला तर मात्र मोर्चे निघत राहिले आणि वेगवेगळे गट, संघटना त्या कृत्याचा वृत्तपत्रीय निषेध करू लागल्या.

१९७२ नंतर मात्र दलित पँथरच्या जन्माने पुन्हा चळवळीला जोर चढला. सामाजिक अन्याय असो की नोकरी–चाकरीतील वैयक्तिक अन्याय असो दलित पँथर झेप घेऊ लागले. आणि नंतर दलित पँथरने मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे, या मागणीसाठी १९७७ पासून आंदोलन सुरू केले.

नामांतराचे आंदोलन भावनिक होते हे जरी खरे असले तरी या आंदोलनाने एक गोष्ट सिद्ध झाली की समाजातील जातीयवाद यत्किंचितही कमी झाला नाही, जातीयवादापोटी येथे लोकशाहीमूल्ये सुद्धा पायदळी तुडविली जाऊ शकतात हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. दलित पँथरने नामांतराच्या आंदोलनात इतरही मागण्यांवर भर दिला होता. महारांच्या वतनी जमिनींचा प्रश्न होता; अतिक्रमणाने मिळालेल्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचा मालकी हक्कांचा प्रश्न होता, बेरोजगारांना रोजगार मागणीचा प्रश्न होता, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाढीचा प्रश्न होता, आदिवासी, भटके, विमुक्त इत्यादीचे प्रश्न आणि इतरही महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांवर दलित पँथरने आपल्या आंदोलनात भर दिला होता. त्यामुळे साहजिकच या आंदोलनाला व्यापकता आली होती. परंतु राजकीय अपरिपक्वता आणि नंतर नामांतरावरच दिल्या गेलेला जास्त भर यामुळे इतर मागण्या व प्रश्न गौण झाले. वास्तविक त्या प्रश्नांचे गांभीर्य आणि महत्त्व अधिक होते. पँथरही अगोदरच गटागटांच्या राजकारणाने रोगग्रस्त झाली होती. आणि या सर्व प्रकारांत आंबेडकरी चळवळीचा कृतिकार्यक्रम (Action Programme) ठरलाच नाही. कोणत्याही योजना चळवळीच्या रूपाने राबविल्या गेल्या नाही. म्हणून काल–परवाचा समाज, जसा होता, तसाच राहिला. आता मात्र डोक्यावरून भरपूर पाणी वाहून गेले आहे. पुन्हा एकदा पुनरुज्जीवनवादी, जातीयवादी धर्ममार्तंड मंडळी डोके वर काढू लागली आहे. धर्म, जात, देवाच्या नावावर लोकांच्या भावना पेटवून मागासवर्गीयांची सर्व पातळ्यांवर कोंडी करण्याचे त्यांचे प्रयत्न जोमाने सुरू झाले आहेत. लोकशाही शासनव्यवस्थेला त्यांनी वेठीस धरले आहे. अशा आणिबाणीच्यावेळी आंबेडकरवाद्यांनी चळवळ उभी करून कृतिकार्यक्रम ठरविला नाही आणि तो राबविण्यासाठी वाटेल तो त्याग केला नाही, समंजसपणा दाखविला नाही तर मात्र भविष्यात आम्ही कोणत्याही पातळीवर उभे राहू शकणार नाही, अशी आजची परिस्थिती आहे. हा कृतिकार्यक्रम कोणता या संबंधी विचार करणे आज आवश्यक झाले आहे.

कृतिकार्यक्रमाचा विचार करताना एक बाब लक्षात येते की एका कोणत्याही पातळीवर हा कार्यक्रम आम्हाला राबविता येणार नाही. त्यासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादि पातळ्यांवर एकाच वेळी काम सुरू केले पाहिजे.

सामाजिक

सामाजिक चळवळीची पाळेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृती आणि विचारांनी आमच्या मनात अगोदरच रुजली आहेत. आजही अन्याय–अत्याचार

झाला की, आम्ही वेगवेगळे कां होईना, त्याच्या विरुद्ध आवाज उठवितो, कुवती-प्रमाणे निषेध, निदर्शने करतो आणि न्याय्य मागण्यासाठी आम्ही लढाई करतो. आता या लढाईची ताकद आम्ही वाढविली पाहिजे. या लढाईत आमच्याबरोबर आमच्या ध्येयधोरणांना मान्य करून जे येतील त्यांना घ्यावयास पाहिजे. आमची ही लढाई दीर्घ मुदतीची आणि लांब पल्ल्याची आहे. कदाचित आमच्या बरोबर येणारी इतर मंडळी, दीर्घकाळ आणि अंतिम टोकापर्यंत येणार नाही, म्हणून त्यांच्यावर अविश्वास दाखवून भागणार नाही. त्यांना समजावून घेतलं पाहिजे आणि आमचीही भूमिका इतरांना समजावून सांगितली पाहिजे, नव्हे आम्हाला ती तशी सांगता आली पाहिजे. या आमच्या वागण्याने व भूमिकेने काही लोक या लढाईत आमच्या बरोबर येणार नाहीत. परंतु त्यांना भूमिका पटली तर ते किमान विरोध तरी करणार नाहीत. सामाजिक चळवळीत अजून आम्ही मागासवर्गीय समाजातील सर्व जातींच्या लोकांना एकत्रित करू शकलो नाही. यात जशा त्यांच्या चुका आहेत तशा आमच्याही आहेत. इतर मागासवर्गीय जाती म्हणजे मांग, चांभार, भंगी, ढोर किंवा भटके आदिवासी इत्यादि लोक आपल्या बरोबर सामाजिक आणि कोणत्याच लढ्यात सामील झाले नाहीत, आजही होत नाहीत. त्यांनी सुरुवातीच्या काळापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत सहभाग घेतला नाही. त्याला काही अपवाद होते व आजही आहेत. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांनी बाबासाहेबांना आपला नेता मानला नाही. त्यामुळे आपल्या चळवळीची व्यापकता वाढली नाही. हे आपलं आणि चळवळीचं नुकसान झालं. तसंच त्यांचं मात्र मोठं नुकसान झालं. त्यांना स्वतःचे प्रश्न समजले नाहीत, त्यांच्यात स्वाभिमान आला नाही; परंपरा, रूढी, धर्म आणि अंधश्रद्धा यातून बाहेर पडण्याची त्यांना दृष्टी मिळाली नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनाही शिक्षणाचे दरवाजे बाबासाहेबांनी मोकळे करून दिल्यानंतरही ते शिकू शकले नाहीत. त्यांचे शिक्षणाचे प्रमाण आंबेडकरी अनुयायांच्या प्रमाणात फारच कमी किंवा नाहीच्या बरोबर राहिले. त्यामुळे वरील सर्व जाती–जमाती संधी मिळूनही फारशा बदलल्या नाहीत. या सर्व जाती जमातींना एकत्रित करण्यात आम्ही कमी पडलो. त्यांच्याजवळ जाऊन, त्यांच्या अडी अडचणी समजावून घेऊन, त्यांच्यात आमच्याबद्दल विश्वास निर्माण करून त्यांना चळवळीत सामील करून घेण्याचे आम्ही प्रयत्न केले नाहीत. वास्तविक हे काम आमचे होते. आम्ही मोठे भाऊ होतो. त्यात दोन्हीही बाजूच्या चुका आहेत. पण आता तरी त्या दोन्ही बाजूंनी सुधारल्या पाहिजेत आणि आमच्या चळवळीची व्यापकता वाढवून बलाढ्य शक्ती निर्माण केली पाहिजे.

सामाजिक चळवळीचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे या संपूर्ण समाजाला देव, धर्म, रूढी, परंपरा, कर्मविपाक, अंधश्रद्धा चमत्कारांवरील विश्वास जाती-जातीची विषमता इत्यादी गोष्टींच्या चिखलातून बाहेर काढून त्यांना विज्ञान-निष्ठ दृष्टी देणे, हा होय. आजच्या सामाजिक परिवर्तनासाठी त्याची सर्वात मोठी आवश्यकता आहे. हे अत्यंत जटील आणि कठीण काम आहे. पण आंबेडकरी चळवळीचा हा कृतिकार्यक्रम झाला पाहिजे. काही कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमास वाहून घेण्याची नितांत गरज आहे.

आर्थिक

सामाजिक कार्यक्रमाला अग्रक्रम जरी असला तरी आर्थिक कार्यक्रम तेवढाच महत्त्वाचा आहे. किंबहुना तो जास्त जलद गतीने राबविला गेला पाहिजे. येथील धर्माने आजवर आमच्या आर्थिक नाड्याही बांधून ठेवल्या होत्या. बाबा-साहेबांनी लिहिलेल्या घटनेने आता आम्हाला व्यवसाय, धंदा आणि करू त्या कामाची समान संधी दिली आहे, स्वातंत्र्य दिलं आहे. म्हणून पिढ्यान पिढ्या आमची जी आर्थिक कोंडी करण्यात आली होती. ती आता फुटली आहे. आमच्या तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता, स्वतःचे लहान मोठे उद्योगधंदे उभारावयास पाहिजेत. त्यात आम्हाला इतरांपेक्षा जास्त अडीअडचणी आहेत, परंतु जिद्द, चिकाटी व व्यवसायातील निष्ठा या गुणांनी अडचणींवर मात करता येते. आणि राज्यशासनाच्या त्या संदर्भात काही योजना आहेत. त्या समजावून घेऊन त्या राबविण्याचा प्रयत्न केला तर काही टक्के यश हे निश्चितपणे मिळणार आहे. ते करतांनाही अडचणी येतील परंतु आंबेडकरी जिद्द त्यावर मात केल्याशिवाय राहणार नाही.

आमचा समाज सहकारी तत्त्वाकडे वळलेला नाही. आम्ही पाहतो की, मराठा, कुणबी, देशमुख, पाटील हा मधला समाज, सहकारी तत्त्वावर संस्था, बँका, उद्योग-धंदे, कारखाने इत्यदि काढून आर्थिकदृष्टया कसा प्रबळ झाला आहे. आर्थिकदृष्टीने शक्तिशाली झालेल्या या समाजाने आपोआपच सर्व राज्याची राजकीय, आर्थिक आणि सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली आहेत. सहकारी तत्त्वावर लहानलहान उद्योग जरी खेड्यापाड्यातून, शहरातून सुरू केले तरी बेरोजगारीचा, रोजंदारीचा प्रश्न सुटणार आहे. मात्र सहकारी कामासाठी लागणारी निष्ठा, प्रामाणिकपणा व सामंजस्य आमच्या चळवळीत आले पाहिजे.

खेड्यापाड्यातून दोन दोन, तीन तीन, एकर जमीन (शेती) आमच्या लोकांकडे आहे. काहींजवळ जास्त सुद्धा आहे. ही शेतीसुद्धा सहकारी तत्त्वावर

प्रयोग म्हणून करून पाहण्यास हरकत नाही. त्यामुळे एक-दुसऱ्याला मिळणारे फायदे आणि उत्पादनात वाढ निश्चितच होईल. आम्ही बहुतांश, आर्थिक दुर्बल घटकांमध्ये येणारे लोक आहोत. त्यांच्या आर्थिक उत्थानासाठी सरकारच्या असलेल्या योजना पदरात पाडून घेणे आणि अजून नवीन व जास्त चांगल्या योजना सरकारला आखायला भाग पाडणे हाही आमच्या आर्थिक चळवळीचा भाग असायला हवा.

महार वतनी जमिनी, पडीत गायरानं यांची मागणी आणि अतिक्रमणाने मिळविलेल्या सरकारी जमिनीचे पट्टे यासाठी आंदोलन उभे होणे आवश्यक आहे. या आंदोलनात सर्व जाती, धर्माचे गोरगरीब, आदिवासी, भटके आणि विमुक्त सहभागी होतील. नाही झाले तर त्यांना प्रश्न समजावून सांगून त्यात सहभागी करून घेणे चळवळीच्या व्याप्तीच्या आणि कृतिकार्यक्रमाला शक्तिशाली करण्याच्या दृष्टीनेही गरजेचे आहे. आदिवासी, भटके आणि विमुक्त आमच्या सर्व आंदोलनात येणे त्यांच्या प्रगतीच्या, विकासाच्यासाठी फारच आवश्यक आहे.

आर्थिक चळवळ राबवितांना किमान रोजंदारी कायदा, असंघटित श्रमिक-मजूरांचे संघटन, शेतमजूरांसाठी संघटना, स्त्रियांना मजूरीत मिळणारी दुय्यम दर्जाची वागणूक यावरही लक्ष दिल्या गेले पाहिजे. काही तरुणांनी या कामाला वाहून घेणे जरूरी आहे.

आमच्या सुशिक्षित तरुणांचा नोकरीकडे ओढा जास्त आहे. नोकरीच्या भरतीत लागणारे वशीले भ्रष्टाचार आणि जातीयवादी अधिकाऱ्यांकडून न भरल्या जाणाऱ्या राखीव जागा हाही आमच्या आंदोलनाचा भाग असावा. नोकरीतील आमच्या कर्मचाऱ्यांचा आणि अधिकाऱ्यांचा होणारा छळ हा तर स्वतंत्र विषय आहे. राखीव जागा भरतेवेळी जातीयवादी अधिकारी त्या भरत नाहीत. मुलाखतीसाठी आलेले मागास जाती-जमातीचे सर्व उमेदवार अपात्र आहेत असा अहवाल सादर केल्या जातो. चुकूनमाकून भरती करण्यात आलेच तर त्यांचा परिविक्षा काल (Probation period) संपवीतच नाही. त्यामुळे त्या उमेदवाराला वार्षिक वाढही मिळत नाही. परिविक्षा कालाची डोक्यावर टांगती तलवार ठेवून, तुमचे परिविक्षा कालातील काम समाधानकारक नव्हते असे कारण सांगून त्यांना कामावरून कमी करण्यात येते. जे नोकरीत आहेत त्यांच्या बढतीच्या अगोदरचे दोन तीन वर्षे गोपनीय अहवाल वाईट लिहिले जातात किंवा त्याच्यामागे विभागीय चौकशी लावली जाते आणि त्या कारणावरून त्यांना

पदोन्नती (Pramotion) नाकारली जाते. विनाकारण ज्ञापन (Memo) देणे समज (warning) देणे इत्यादी प्रकारे छळ केल्या जातो. अशारीतीने नोकरीत मागासवर्गीय जाती–जमातींच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना भयंकर त्रास दिल्या जातो. या सर्व अन्यायांच्या विरुद्ध काम करणारी जबरदस्त संघटना आणि चळवळ उभी करण्याची नितांत आवश्यकता आहे. कृती कार्यक्रमाचा हा एक महत्त्वाचा भाग राहील. अशा वेगवेगळ्या प्रकारे आर्थिक कार्यक्रम राबविल्या गेला पाहिजे तरच आंबेडकरी चळवळीला जोश व ताकद येईल.

राजकीय

आपआपसांतील गटबाजी नष्ट करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लीकन पक्ष उभा करण्याची गरज आहे. पण हे काम अगोदर कमी अवघड होते. आता खूपच कठीण झाले आहे. ऐक्याच्या आणा–भाका आणि नाटके इतक्या वेळा झाली की आता ते प्रयोग पाहण्यास जनता कंटाळली आहे. शिळचा कढीला ऊत आणण्यात काहीच अर्थ उरला नाही. आता ऐक्याचे कोणी बोलूही नये. तो एक टवाळी, टिंगलीचा आणि हास्यास्पद विषय झाला आहे. सद्य परिस्थितीत कोणते निर्णय हितकारक ठरतील, हे ज्या नेत्यांना कळत नाही त्यांना जनतेने त्यांची जागा दाखवावयास हवी. याचा अर्थ असाही नव्हे की जनतेलासुद्धा सारेच निर्णय योग्यप्रकारे घेता येतात. परंतु अशावेळी सांघिक निर्णयच हितकारक असतात. रिपब्लिकन पक्षाच्या ज्या गटाचे निर्णय पुरोगामी, लोकशाही टिकविण्यासाठी पूरक किंवा योग्य, आंबेडकरी विचारांना तडा न जाणारे असतील त्या गटाला जनतेने भक्कमपणे साथ दिली पाहिजे. अशावेळी सत्तेत सहभागी कसे होता येईल याचेही भान ठेवावयास हवे. सत्तेत सहभागी होतांना तत्त्वांशी तडजोड करता कामा नये, आपल्या गोरगरीब जनतेला विसरता कामा नये. सत्तेत राहून त्यांच्या भल्याचे निर्णय घेता आले नाही तर सत्तेचा त्याग करण्यास कचरू नये. तेच खऱ्या आंबेडकरवाद्याचे कर्तव्य आणि ओळखही आहे. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता जेव्हा राज्याच्या किंवा केन्द्राच्या सर्वोच्च सभागृहात निवडून जातो तेव्हा त्याची एकच ओळख असते, ती म्हणजे सभागृहात होणारी चर्चा, घेण्यात येणारे निर्णय व होणारे कायदे हे सर्वसामान्य माणसाच्या हिताचे असतील तर त्याला भक्कमपणे पाठिंबा देणे आणि हितकारक नसतील तर मात्र कडाडून विरोध करणे, विरोधासाठी विरोध न करता तत्त्वांसाठी विरोधाची कृती असायला हवी.

आज राजकारणात भ्रष्टाचार, स्वार्थ, वशिलेबाजी, ढोंगबाजी इत्यादी दुर्व्यवहाराची बजबजपुरी माजली आहे. आंबेडकरवाद्यांनी याविरुद्ध चळवळ

उभी करण्याची गरज आहे. त्यासाठी पक्षाला कार्यक्रमच राबविता येईल. निवडणूक लढवितांना उमेदवाराची सांसदीय योग्यता, शैक्षणिक गुणवत्ता, आकलन पात्रता, चारित्र्य ह्या गोष्टी पाहावयास हव्या. गुणवत्तापात्र योग्य उमेदवारांचीच पक्षाने निवड करावी व त्यांना निवडून आणण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी झटून काम करावे.

लोकशाही शासनप्रणालीत पक्षीय राजकारण हे फारच महत्त्वाचे आणि सर्वव्यापी असते. आमच्या दैनंदिन जीवनातही राजकारणाचा प्रवेश झालेला असतो. आज तसा तो झालेला आहे. कोणतीही गोष्ट करायची असेल तर तुमच्या नेतृत्वाचे आणि पक्षाचे सामर्थ्य पाहिल्या जाते. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला पक्ष जर अस्तित्वात आला तर त्याच्यासारखा बलाढ्य पक्ष या देशात दुसरा नसणार. ते करण्यासाठी त्याग करणाऱ्या, सर्वस्व टाकून त्याच कामासाठी वाहून घेणाऱ्या निष्ठावान, समंजस, कर्तबगार कार्यकर्त्यांनी पुढे येण्याची गरज आहे. असे कार्यकर्ते आंबेडकरी चळवळीत नाहीत असे नाही. परंतु त्यांचे लहानसे स्वार्थ त्यांच्या ध्येयवादाच्या आड येतात. म्हणून राजकारणात आम्ही नीट उभे राहू शकलो नाही आणि राजकीय चळवळीही उभ्या करू शकलो नाहीत.

शैक्षणिक

आंबेडकरी चळवळीचा कृतीकार्यक्रम ठरवितांना शिक्षण क्षेत्रात आम्ही काय करणे आवश्यक आहे, याचाही गंभीरपणे विचार झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अडाणी जनतेला पहिला कोणता मूलमंत्र दिला असेल तर तो होता शिक्षणाचा. शिक्षणाने मनुष्य शहाणा होतो, त्याला ज्ञानाचा तिसरा डोळा मिळतो, त्यामुळे तो सुसंस्कृत बनतो, शिक्षणाने माणूस स्वाभिमानी होतो, शिक्षण न घेतल्याने आम्ही हजारो वर्षे गुलाम राहिलो या कारणामुळे तुम्ही मुलामुलींना शाळेत घाला, असा संदेश बाबासाहेबांनी दिला आणि त्यांच्या अनुयायांनी परिस्थितीवर मात करून मुलांना शाळेत घातले. त्यामुळे बाबासाहेबांच्या हयातीत शिक्षणाची एक प्रचंड लाट येऊन गेली. आता आमच्या शैक्षणिक चळवळीतही शैथिल्य आले आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढण्याऐवजी घटत आहे की काय हे पाहिले पाहिजे. शिक्षणाची टक्केवारी काढणे जरुरीचे आहे. हे करीत असतानाच ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी उत्तम दर्जाच्या शिक्षणसंस्था काढणे, चालविणे तितकेच महत्त्वाचे आहे. आमच्या ज्या शिक्षण संस्था अस्तित्वात आहेत, चालू आहेत त्यांची अवस्था पाहिली तर मन विषण्ण होतं. आमच्या शिक्षणसंस्थांच्या इमारती, त्यातील फर्निचर, लायब्ररी आणि शिकविणारे शिक्षक किंवा व्याख्याते, अधिव्याख्याते कितपत आहेत चांगले

याचीही, आम्हीच आमची अन्तर्मुख होऊन, तपासणी केली पाहिजे. आमच्यासाठी तरी शिक्षणसंस्था ह्या पोट भरण्याची दुकाने नसावी. कारण जीवनातील सर्व क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर शाळा आणि महाविद्यालयांतच विद्यार्थ्यांचा पाया मजबूत करता येतो. त्यांच्या मनाची, बुद्धीची, शरीराची जडण–घडण तेथेच करण्यात येते. म्हणून ध्येयवादी संस्थाचालक, आणि अध्यापकांची आंबेडकरी चळवळीत वाण भासायला नको. परंतु घडत आहे याच्या विपरीतच.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४६ साली पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे त्या काळात मुंबईला सिद्धार्थ कॉलेज आणि औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय काढले. गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावं, त्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तयार करता यावं यासाठी जीवाचं रान करून, रक्त आटवून, डोक्यावर कर्ज करून बाबासाहेबांनी त्या महाविद्यालयांच्या उत्तम प्रतीच्या इमारती, फर्निचर आणि कर्तबगार, हुशार आणि ध्येयवादी प्राध्यापक इत्यादी आवश्यक बाबी उपलब्ध केल्या. त्यांच्या हयातीत या संस्थेचा कारभार व्यवस्थित, शिस्तशीर आणि प्रगतीपथावरच चालू होता. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरही काही काळ बरे चालू होते. पण या संस्थेची काय अवस्था आहे ? तेथे शिकवणीचे स्तर बरे आहेत का, या संस्थांची प्रगती होत असेल तर कोणत्या दिशेने व कितपत होत आहे की आहेत तशाच आहेत, त्यांची अधोगती चालू आहे, याचा संबंधितांनीही विचार करणे जरूरीचे आहे, जनतेला सुद्धा याकडे दृष्टीआड करून चालणार नाही. कारण विश्वस्तांएवढीच ती जनतेचीही जबाबदारी आहे. या व इतरही संस्थांचे काय काय हाल व स्थिती आहे हे पाहिले पाहिजे आणि त्यांची कारणमीमांसाही केली पाहिजे.

आज शिक्षणाची पद्धत, शैक्षणिक धोरण संपूर्णपणे बदलले आहे. ते श्रीमंतांच्या मुलांच्या सोयीचे आहे. गरीबांची मुले उच्च शिक्षण घेऊच शकणार नाहीत अशी परिस्थिती आजच्या शैक्षणिक धोरणाने आणून ठेवली आहे. असे असतांना आम्ही निमूटपणे पाहणे आणि सर्व सहन करणे कितपत बरोबर आहे ? विना अनुदान तत्त्वावर निघत असलेल्या तांत्रिक व व्यावसायिक यहाविद्यालयातील फी ची प्रचंड रक्कम, प्रवेशासाठी लाखो रुपयांची देणगी देणे हे अनुसूचित जाती, जमातींच्या आणि गरीब विद्यार्थ्यांना कसे परवडणार आहे ? त्यात मागास जाती–जमातींच्या विद्यार्थ्यांना राखीव जागा ठेवलेल्या नाहीत. मग गरीब विद्यार्थ्यांनी कसे शिकावे हा प्रश्न आहे, त्यासाठीही मोठी चळवळ उभी करणे आज आवश्यक आहे. आमची तांत्रिक आणि व्यावसायिक महाविद्यालये निघणेही

तिककेच जरूरीचे आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुस्तकपेढ्या, वाचनालये, मार्गदर्शन करणारे वर्ग काढणे, स्पर्धात्मक परीक्षांसाठी कोचिंग क्लासेस, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व निर्माण करण्यासाठी शिबिरे इत्यादींचीही गरज आहे. ह्या गरजा भागविण्यासाठी समाजातील सुशिक्षित, श्रीमंत आणि अधिकारी वर्गाने पुढे येण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे. उत्तम बालक मंदिरे, प्रायमरी शाळा आणि हायस्कुले ही तर वरच्या इमारतीचा पायाच असल्याने त्याकडे जास्त लक्ष द्यावे लागेल.

साहित्य आणि सांस्कृतिक

आंबेडकरी चळवळीत सर्वात मोठे यश पदरात पडले असेल तर ते साहित्य चळवळीचे. दलित साहित्य या नावाने प्रभावीपणे वर आलेल्या या चळवळीने नेमक्या दिशेने सुरवात केली आहे. काही दुर्गधीत प्रवाह या शुद्ध प्रवाहात मिसळण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु दलित साहित्याची भूमिका स्पष्ट असल्याने त्या प्रवाहात कोणीही ढवळाढवळ करू शकत नाही. किंवा ते फारसे कुणाला शक्यही नाही. तरी पण दलित साहित्य जे आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य आहे त्यात अजूनही वेगवेगळ्या अंगांनी भर पडणे आवश्यक आहे. ती संथपणे का होईना पडत आहे ही त्यातल्या त्या समाधानाची बाब आहे. आमचे साहित्य व इतर कलांनीच आमची संस्कृती बनणार आहे. म्हणूनच चळवळीचा भाग म्हणून याही क्षेत्रात तितकेच ध्येयवादाने काम होणे आवश्यक आहे. ते काम प्रतिभावंत साहित्यिक आणि कलावंतांचे आहे.

आंबेडकरी चळवळीच्या हा कृतीकार्यक्रमाचा संक्षिप्त विचार करण्याचा या लेखात प्रयत्न केला. हा विचार कागदावर न राहता कृतीत आला तरच याला कृती कार्यक्रम म्हणता येईल. वर विचार करण्यात आलेला कार्यक्रम राबविण्यासाठी शिस्त, ध्येयवाद, सामंजस्य, हुशारी-कर्तबगारी, जिद्द, चिकाटी इत्यादी गुण असलेल्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आणि त्यांना तन, मन, धनाने साथ देणारी जनता असा मेळ जमला तरच आंबेडकरी चळवळीचा कृतीकार्यक्रम राबविता येईल. यात जनतेचा सहभाग हा अत्यत महत्त्वाचा आहे, जनतेतूनच नेते आणि कार्यकर्ते निर्माण होत असतात. म्हणून वरील सर्व पातळ्यांवर एक मनाने व विचाराने काम करण्याची गरज आहे.

□

राखीव जागा : काही प्रश्न काही उत्तरे

मागील पंधरा वीस वर्षांत राखीव जागांविरुद्ध हळहळू वातावरण तापत आहे. गुजरात, बिहार मध्ये राखीव जागांच्या विरोधात आंदोलने झालीत. त्यात राखीव जागांच्या विरोधकांनी त्यांच्या सर्व राग मागास जातींच्या लोकांवर काढला. त्यांची घरे पेटविली. त्यांच्या वस्त्यांवर हल्ले केलेत. मागास जाती–जमातींच्या लोकांना मोठ्या प्रमाणात प्राणहानी व वित्तहानी सहन करावी लागली. त्यांचे अपरिमित नुकसान झाले.

या राखीव जागांबाबत आणि मागास जाती-जमातींना मिळणाऱ्या सवलतींबाबत अडाणी जनतेबरोबर शिकले–सवरलेले लोकसुद्धा अनभिज्ञ आहेत. त्यांना याविषयी थोडीही माहिती नाही. त्यामुळे त्यांच्या मनात राखीव जागा आणि सवलतींबद्दल अनेक गैरसमज, प्रचंड अज्ञान व भयंकर राग आहे. याच गैरसमज व अज्ञानातून ते राखीव जागा, सवलतींना आंधळा विरोध करतात. त्याबाबतची वस्तुस्थिती, घटनेतील तरतुदी, त्यांची अपरिहार्यता, त्यातील सामाजिक, आर्थिक न्यायाची बाजू इत्यादी गोष्टी ही विरोधक मंडळी काहीही जाणून घ्यावयास तयार नाहीत. त्यांच्या या अज्ञानातून आणि अविवेकातून भारतीय एकसंघ समाज दुभंगू शकतो, त्यामुळे राष्ट्राच्या ऐक्याला, शांततेला धोका निर्माण होऊ शकतो याचे थोडेही भान विरोधकांना नाही.

राखीव जागा व सवलतींना पात्र असलेल्या जातीजमातींना सुद्धा यातील बारकावे, त्यांचे अधिकार, हक्क आणि कर्तव्य याविषयी पाहिजे तशी माहिती नसते. त्यामुळे तेही वेगळ्या अर्थाने आंधळेच असतात. म्हणून राखीव जागा व सवलती यांचा संक्षिप्त पण महत्त्वपूर्ण आढावा या लेखात घेण्यात आला आहे. तसेच राखीव जागांबद्दल नेहमी विचारल्या जाणाऱ्या आणि जाणीवपूर्वक निर्माण करण्यात येणाऱ्या प्रश्नांची, शंकांची उत्तरे देण्याचाही प्रयत्न केला आहे.

राखीव जागा कुणाला व का ?

राखीव जागा कुणाला व का असा प्रश्न बहुधा विचारला जातो. त्याचे

उत्तर असे की, प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेने काही समाजघटकांचे वर्ण-व्यवस्थेच्या नावाखाली हजारो वर्षे शोषण केले. चातुर्वर्ण्य आणि जाती-जातींची उतरंड रचून खालच्यांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक यांपैकी कोणताच फायदा मिळू दिला नाही. या व्यवस्थेत खालच्या वर्गांना मनाप्रमाणे काम-धंदा करू दिला नाही. त्यांना आर्थिक व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. एकंदरीत त्यांचे जीवन उद्ध्वस्त केले. देव, धर्माच्या नावावर त्यांना दैन्य, दास्य, लाचारी आणि अन्यायाचे पर्यायाने दु:खाचे धनी केले. या देशावर प्राचीन काळापासून परकियांनी राज्य केले. पण त्या राज्यकर्त्यांनाही हे सामाजिक शोषण दिसले नाही. किंवा दिसले असेल तर त्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केली. एवढेच नव्हे तर वेळोवेळी भारतावर आक्रमण केलेल्या परकिय राज्य-कर्त्यांनी देखील विषमतावाद्यांबरोबर संगनमत करून मागास जाती-जमातींच्या लोकांना छळले, त्यांची कुंचबणा केली. त्यामुळे ते सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टीने इतरांच्या खूपच मागे पडले. त्यांची प्रगती, विकास झाला नाही. ही अवस्था हजारो वर्षे राहिली आणि आजही आहे. या सामाजिक विषमतेने येथील समाजात एकजिनसीपणा राहिला नाही. तसेच या विषमतेने नुसताच वर्गीय विषमतेला जन्म दिला नाही तर भयावह जातीय, वर्णीय विषमता निर्माण केली. ती जगातील कोणत्याही विषमतेपेक्षा आणि शोषणापेक्षा भयंकर स्वरूपाची होती. या शोषितांना त्यांच्या मूलभूत मानवी हक्कांपासूनही वंचित ठेवण्यात आले होते. या विषमता व शोषणाविरुद्ध काही प्रयत्न झाले. पण त्यांना राजाश्रय कायद्याचा आधार म्हणजेच वैधानिक मान्यता न मिळाल्याने त्या स्थितीत फारसा फरक पडला नाही. त्यामुळे येथील तथाकथित उच्चवर्णीय आणि दलित समाज या दोहोंमध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यादी पातळ्यांवर प्रचंड दरी निर्माण झाली. ही दरी भरून काढणे देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने क्रमप्राप्त होते व आहे. इंग्रजांच्या काळात या परिस्थितीत थोडा फरक पडला. पण तो नगण्य स्वरूपाचा, फारच जुजवी होता. नोकरीत चतुर्थ श्रेणीत अतिशय कष्टांच्या जागांवर मागासवर्गीयांची भरती झाली. उदा. रेल्वेत गँगमन वगैरे. परंतु तीन हजार वर्षे प्रगतीपासून वंचित ठेवलेल्या समाजाची प्रगती, विकास अशा तकलादू उपायांनी होणार नव्हता. त्यासाठी स्पष्ट आणि कणखर भूमिका स्वीकारून ठोस निर्णय घेणे आवश्यक होते. पुढे गेलेल्या समाजाबरोबर या मागे पडलेल्या समाजाला आणणे सर्वांच्याच पर्यायाने देशाच्या हिताचे होते. ते प्रगतीचे मोजमाप होते. जसा आपल्या शरीराचा एखादा अवयव कमजोर किंवा अधू असला तर सबंध शरीर सदृढ आहे असे म्हणता येणार नाही. तद्वतच समाजाचा एक घटक

हा कमजोर असेल तर तो समाज सशक्त म्हणता येणार नाही. या अर्थाने भारतीय समाज कधीच सशक्त, बलवान व निरोगी नव्हता. म्हणूनच भारतीय समाजाला निरोगी, एकसंघ आणि बलवान करण्यासाठी शतकानुशतके जाणीवपूर्वक दुर्लक्षित म्हणून अपंग, मागास असलेल्या समाजावर जाणीवपूर्वकच लक्ष केंद्रीत करून त्याला काही सवलती, सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हे धोरणात्मक तत्त्व आपल्या राज्यघटनेने स्वीकारले. म्हणून येथील अनुसूचित जाती व जमातींना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक उन्नतीसाठी विकासासाठी आणि सामाजिक न्याय मिळावा म्हणून राखीव जागांच्या तरतुदी करण्यात आल्या. हे राखीव जागांचे धोरण भरपाईच्या तत्त्वावर आकारण्यात आले.

स्वातंत्र्यपूर्व परिस्थिती

स्वातंत्र्यपूर्व सरकारने (इंग्रज) देखील राखीव जागांचे धोरण १९२५ पासूनच स्वीकारले होते. सरकारी नोकऱ्यांमध्ये अल्पसंख्याक जातीकरिता राखीव जागा ठेवण्यात आल्या होत्या. १९३४ साली मुसलमान समाजासाठी २५ टक्के नोकऱ्या राखीव होत्या. आणि इतर अल्पसंख्य जातींकरिता साडे आठ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या. परंतु त्या काळात अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणाची टक्केवारी जवळ-जवळ नसल्यासारखी होती. म्हणूनच सरकारी नोकऱ्यामध्ये त्यांचे प्रमाणही शून्यच होते. भारतात पहिल्या प्रथम राखीव जागांची तरतूद राजर्षी शाहू छत्रपतींनी आपल्या राज्यात केली. त्यासाठी त्यांनी कायदे केले. हुकूम काढले. ते येणेप्रमाणे :–

राजर्षि शाहू छत्रपतींनी काढलेले काही हुकूम

"कोल्हापूर इलाख्यातील रेव्हिन्यू, ज्युडिशयल आदि करून सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्याची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्याने हा हुकूम पोहचल्यापासून सहा आठवड्याच्या आत नोटीस देऊन राजीनामा द्यावा. त्याला पेन्शन मिळणार नाही.

"हूजूरची अंत:करणपूर्वक इच्छा आहे की, शाळा खात्यातील ज्या खाजगी किंवा सरकारी संस्थांना ग्रँट किंवा इमारती किंवा प्ले ग्राऊंड वगैरे रूपाने मदत मिळते, त्यांनी स्पृश्य वर्गापेक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे. कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात. परंतु अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही. शाळा खात्यातील कोणा इसमाची असे करण्यास हरकत असेल तर त्याने हा हुकूम झाल्यापासून

सहा आठवड्याचे आत आपला राजीनामा पाठवावा. अर्थात त्याला पेन्शन मिळणार नाही. मदत मिळणाऱ्या शिक्षण संस्थेची हरकत असेल तर त्याचीही ग्रँट किंवा इतर मदत दरबार बंद करील."

"हल्ली तलाठ्यांच्या नेमणूका चालल्या आहेत. त्यांत अस्पृश्य जातीच्या लोकांना प्रिफरन्स देण्यात यावे व तसेच या जातीच्या लोकांस योग्य ती लायकी असल्यास दरबारातील कोणत्याही योग्यतेच्या जागेवर म्हणजे रेव्हिन्यू, ज्युडिशियल, पोलीस व जनरल आदी कोणत्याही डिपार्टमेंटच्या मुख्याच्या जागेवरही नेमण्यात येईल." ("राजर्षि–एक व्यक्तिदर्शन" हा प्रा. श्याम येडेकर यांचा ग्रंथ, पृ. ५०, ५१, ५२)

कोल्हापूरच्या राजर्षि शाहू छत्रपतींनी संस्थानच्या नोकरीत शेकडा ५० जागा राखीव ठेवल्या होत्या. हा हुकूम २६ जुलै १९०२ रोजी काढण्यात आला होता.

या हुकूमातील संबंधित काही भाग "ही परिस्थिती काही अंशी दूर करण्यासाठी व संस्थानामध्ये महाराजांच्या प्रजाजनांना उच्च शिक्षण संपादण्यास उत्तेजन देण्यासाठी या वर्गाकरिता आजपर्यंतच्या प्रमाणापेक्षा विस्तृत प्रमाणात संस्थानच्या नोकरीत जागा राखून ठेवण्याचा महाराजांचा कृत निश्चय झाला आहे."

"या धोरणाला अनुसरून या हुकूमाच्या तारखेपासून ज्या जागा मोकळ्या पडतील, त्यापैकी शेकडा ५० जागा मागासलेल्या वर्गांतील उमेदवारांना देण्यात येतील. अशी महाराजांची अनुज्ञा झाली आहे. ज्या ज्या ऑफिसांत मागासलेल्या लोकांचे प्रमाण हल्ली शेकडा ५० पेक्षा कमी आहे, त्या त्या ऑफिसातील झटपट मोकळी पडणारी जागा मागासलेल्या वर्गांतील इसमाला देण्यात येईल."

"प्रत्येक खात्याच्या मुख्यांनी या हुकूमानंतर भरलेल्या जागांचा तिमाही अहवाल सादर केला पाहिजे."

वरील सर्व माहिती लेखक प्रा. श्याम येडेकर यांच्या 'राजर्षि एक व्यक्तिदर्शन' या ग्रंथात सापडते. वरील हुकूमांवरून एक गोष्ट स्पष्ट होते की राजर्षि शाहू महाराजांनी राखीव जागांचे प्रमाण भरण्यासाठी अतिशय कडक धोरण स्वीकारले होते. त्याची अंमलबजावणी ते अतिशय कठोरपणे करीत होते. राखीव जागा आणि सवलतींची आवश्यकता सांगणारी त्यांच्या संदर्भात एक गोष्ट प्रसिद्ध आहे. या राखीव जागांबाबत त्यांच्या दरबारातील काही मंडळींचा विरोध आहे, अशी कुणकुण महाराजांच्या कानावर गेली. महाराजांसमोर बोलावयास कोणाची हिंमत नव्हती. पण महाराज अतिशय चाणाक्ष आणि हुशार होते.

त्यांनी दरबारातील विरोधक अधिकाऱ्यांना एके दिवशी सकाळीच दरबारात बोलाविले. सांगितल्याप्रमाणे सर्व जण सकाळी आले. कशासाठी महाराजांनी बोलाविले हे मात्र कुणालाच ठाऊक नव्हते. महाराज त्या अधिकाऱ्यांना घेऊन फिरायच्या निमित्ताने बाहेर निघाले. चालता, चालता घोड्यांच्या पागे जवळ आले. घोड्यांची वर्गवारी केलेली होती. प्रकृतीने उत्तम घोडे वेगळे आणि आजारी अशक्त वेगळे ठेवलेले होते. महाराज आणि अधिकारी पागेच्या पटांगणासमोर येताच पटांगणाच्या मधोमध ठेवलेल्या दाण्यावर सर्व घोड्यांना एकत्रित सोडण्यात आले. जे मजबूत, दणकट घोडे होते ते धावत धावत जाऊन दाणा खाऊ लागले. अशक्त व आजारी मागे पडले, एवढेच नव्हे तर ते दाण्याजवळ गेल्यावर त्यांना मजबूत घोड्यांनी लाथा मारल्या. त्यामुळे ते बिचारे लांबच उभे राहिले. दाणा संपला तेव्हा महाराजांनी राखीव जागांच्या विरोधात असलेल्या अधिकाऱ्यांना सांगितले की, त्या घोड्यांसारखेच समाजाचे आहे. समाजात जे श्रीमंत, मजबूत, सशक्त आहे त्यांना वेगळं देण्याची गरज नाही. पण जे अशक्त, कमजोर, दुबळे आहेत त्यांना वेगळं, चांगलं, देण्याची गरज आहे. अधिकारी खजील झाले.

१९२८ साली लेजिस्लेटीव्ह कौन्सिलमध्ये ठराव मांडण्यात आला की, मागास जाती-जमातींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. यांची फलश्रुती म्हणून ५ नोव्हे. १९२८ साली श्री. ओ. एच. बी. स्टार्ट नावाच्या आय. सी. एस्. अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली तशी समिती नेमण्यात आली. त्या समितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पी. जी. सोळंकी, श्री. पी. आर. चिकोंडी, श्री. एल. एम. देशपांडे, ए. व्ही. ठक्कर, ए. ए. थोरात यांचा सदस्य म्हणून समावेश होता. या समितीने ३१ मार्च १९३० ला आपला धक्कादायक अहवाल सरकारला सादर केला. समितीला आपल्या पाहणीत असे आढळून आले की, १९२७ साली सबंध प्रांतात मिडलस्कूल मध्ये अस्पृश्यांच्या फक्त १५९ मुली होत्या. हायस्कूलमध्ये फक्त एक मुलगी शिकत होती. सांगायचे तात्पर्य हे की, समाजातील दुर्बल घटकांना सशक्त करायचे, इतरांबरोबर आणायचे असेल तर त्यांना राखीव जागा दिल्याच पाहिजेत. मग महाविद्यालयात एकही मुलगी नसल्याने आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. याच वर्षी अनुसूचित जातीचे फक्त नऊ विद्यार्थी महाविद्यालयात शिकत होते, अनुसूचित जमातीचा मात्र एकही विद्यार्थी नव्हता. १९४४-४५ साली अनुसूचित जातीचे ११९ आणि जमातीचे ८४ विद्यार्थी महाविद्यालयात शिकत होते. त्यामुळे समितीने सरकारला शिफारसी केल्या की, अनुसूचित जाती-

जमातीच्या मुलांमुलींसाठी शिष्यवृत्ती देण्यात याव्या, प्रौढ शिक्षण सुरू करावे, रात्रीच्या शाळा सुरू कराव्या. याचा अर्थ असा की स्वातंत्र्याची पहाट आमच्या दरवाजापर्यंत येईस्तोवर आमच्या देशातील मागासवर्गीय जाती–जमातींच्यासाठी शिक्षणाचे दरवाजे बंदच होते.

या समितीने नोकऱ्यांची जी पाहणी केली तीही तितकीच धक्कादायक होती. या समितीच्या पाहणीत असे आढळून आले की अस्पृश्यांना १८९१ सालापासून सैन्यात भरती करण्यास सरकारने बंदी घातली होती. ती सैन्यभरतीबंदी तावडतोब उठविण्याची समितीने शिफारस केली. १९२७ ते १९२९ या दोन वर्षांच्या काळात फक्त ६६ पोलीस (शिपाई) भरती करण्यात आले होते. मात्र त्यांना पोलीस राहतात त्या 'पोलीस लाइन्स' या शासकीय निवासस्थानामध्ये राहण्याची मुभा नव्हती. या बाबत पोलीस अधिक्षकाने लक्ष घालावे, अशी शिफारस समितीने केली होती. पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक या पदांवर तर मागास जाती–जमातींतील एकही उमेदवार नव्हता. १९३० साली मुलकी सेवेत श्री एम. के. जाधव नावाचे पहिले उपजिल्हाधिकारी नियुक्त करण्यात आले. त्याच काळात श्री. डी. आर. घाटकांबळे नावाचे पहिले अव्वल कारकून झाले. १९४२–४३ ला श्री. मलिक हे पहिले आय. ए. एस्. अधिकारी झालेत. या समितीने आपला अहवाल तत्कालीन सरकारला (इंग्रज) सादर केल्यानंतर अनुसूचित जाती–जमातींच्या लोकांना नोकरीत राखीव जागा ठेवण्याचे आदेश काढण्यात आले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर

१५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यघटना तयार करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली त्यात घटनेचा मसुदा तयार करणाऱ्या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची नियुक्ती झाली. त्यावेळी ते केंद्रीय मंत्रिमंडळात कायदेमंत्री होते. तेव्हा राखीव जागांचा पुन्हा विचार करण्यात आला. कारण त्या अगोदर शिक्षणात आणि नोकऱ्यांमध्ये काहीच फरक पडला नव्हता. घटनेच्या मसुद्यातील राखीव जागांसंबंधी भूमिका घेतांना असे स्पष्ट सांगण्यात आले की ह्या राखीव जागांचा उद्देश समाजा–समाजामध्ये पडलेली प्रगतीची दरी कमी करणे, असा आहे. कारण प्रगतीच्या शर्यतीत दलितेतर समाज फारच पुढे गेलेला आहे. दलित समाजाला इतर समाजाबरोबर आणण्याचा या राखीव जागा आणि सवलतींचा मुख्य उद्देश मानण्यात आला. त्यामुळे इतर समाजाची प्रगती थांबणार नव्हती. पण दलित

समाजाच्या प्रगतीला थोडा वेग येणार होता. ह्या सवलती आणि राखीव जागा शैक्षणिक, नोकरी आणि राजकीय प्रतिनिधीत्व यासाठी होत्या. सवलतींसाठी पात्र असलेल्या मागासवर्गीय जाती–जमातींची एक अभ्यासपूर्ण 'सूची' (Scheduled) बनविण्यात आली त्यालाच आपण 'शेड्यूल्ड कास्ट' म्हणजे अनुसूचित जाती आणि 'शेड्यूल्ड ट्राईब' म्हणजे अनुसूचित जमाती म्हणतो. त्याचप्रमाणे राज्य शासनाला त्या त्या राज्यातील भटके, विमुक्त व इतर मागासवर्गीयांनाही राखीव जागा, सवलती देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरविली आहेत. महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती, जमातीबरोबर विमुक्त जाती, भटक्या जमाती (नोमॅडीक ट्राईब) आणि इतर मागासवर्गीय यांनाही राखीव जागा, सवलतीचा फायदा दिला आहे. विरोधकांचा गैरसमज असा आहे की, हा फायदा फक्त महारांना, फार झाले तर चांभार व मांगांनाच मिळतो. ह्या राखीव जागांच्या लाभास पात्र असलेल्या जाती, जमाती, भटके, विमुक्त आणि इतर मागासवर्गीयांची महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेली यादी मुद्दाम या लेखाच्या शेवटी देत आहे.

घटनेतील तरतुदी

भारताच्या राज्य घटनेत निरनिराळ्या भागातील अनुच्छेदात मागासवर्गीयांसाठी खास सवलती, अधिकार देण्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. या सवलती व राखीव जागा शैक्षणिक, नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्व यांत देण्यात आल्या आहेत. या राखीव जागा व सवलतींमुळे अनुसूचित जाती–जमातींच्या हक्कांचे संरक्षण, संवर्धन होणार आहे व व्हावे असा त्या तरतुदीमागील दृष्टिकोन आहे. घटनेतील ह्या तरतुदी समजावून घेणे अगत्याचे असल्याने त्या जशाच्या तशा खाली देत आहे.

भाग ३ रा

मूलभूत अधिकार

समानतेचा अधिकार

१४. राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.

१५. (१) राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून कोणताही नागरिक–

(क्) दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहे, हॉटेले आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यांत प्रवेश; अथवा

(ख्) पूर्णतः किंवा अंशतः राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरता समर्पित अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा याचा वापर,

याविषयी कोणतीही निःसमर्थता, दायित्व, निर्बंध किंवा शर्ते यांच्या अधीन असणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

भाग ३ रा–मूलभूत अधिकार–अनुच्छेद १५–१८

[(४) या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.]

१६. (१) राज्याच्या अखत्याराखालील सेवायोजन किंवा कोणत्याही पदावरील नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकास समान संधी असेल.

(२) कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यांपैकी कोणत्याही कारणावरून राज्याच्या अखत्याराखालील कोणतीही नोकरी किंवा पद यांच्याकरता अपात्र असणार नाही अथवा त्यांच्या बाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, [एखादे राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र यांच्या शासनाच्या अथवा त्यांच्यातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या अखत्याराखालील एखाद्या प्रकारचे किंवा अनेक प्रकारचे सेवायोजन किंवा पदनियुक्ती यांच्या संबंधात अशा सेवायोजनाच्या किंवा नियुक्तीच्या पूर्वी त्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील निवासाविषयी एखादी आवश्यकता विहित करणारा] कोणताही कायदा करण्यास संसदेला प्रतिबंध होणार नाही.

(४) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांपैकी ज्या कोणत्याही मागास वर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही अशा वर्गाकरता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(५) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेच्या कारभाराशी संबंधित असलेल्या पदाचा धारक किंवा तिच्या शासक मंडळाचा कोणताही सदस्य म्हणजे विशिष्ट धर्म प्रतिज्ञापित करणारी किंवा एखाद्या विशिष्ट संप्रदायाची व्यक्ती असली पाहिजे असा उपबंध करणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही.

१७. "अस्पृश्यता" नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

भाग ३ रा–मूलभूत अधिकार–अनुच्छेद २३–२४

शोषणाविरुद्ध अधिकार

२३. (१) माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठ मना करण्यात आली आहे आणि या उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

(२) सार्वजनिक प्रयोजनाकरता सक्तीने सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही व असे सेवाबंधन लादतांना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.

२४. चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीस ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्याची योजना केली जाणार नाही.

भाग ३ रा-मूलभूत अधिकार-अनुच्छेद २९–३०

सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार

२९. (१) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिकगटाला आपली स्वतःची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा अधिकार असेल.

३०. (१) धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व समाजांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

[(१क) खंड (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे एखाद्या अल्पसंख्याक समाजाने स्थापन केलेल्या व प्रशासिलेल्या शैक्षणिक संस्थेच्या कोणत्याही संपत्तीचे सक्तीने संपादन करण्याचा उपबंध करणारा कोणताही कायदा करताना, राज्य हे अशा संपत्तीच्या संपादनाबद्दल अशा कायद्याने निश्चित केलेल्या किंवा त्याखाली ठरवलेल्या रकमेमुळे त्या खंडाखाली हमी दिलेला अधिकार निर्बंधित किंवा निराकृत होणार नाही अशा प्रकारची ती रक्कम असेल अशी खात्रीलायक तजवीज करील.]

(२) शैक्षणिक संस्थांना साहाय्य देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

भाग ४ था–राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे–अनुच्छेद ४६

४६. राज्य हे दुर्बलतर जनवर्ग, आणि, विशेषत:, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील, आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे संरक्षण करील.

भाग १६ वा

विवक्षित वर्गांसंबंधी विशेष उपबंध

३३०. (१) लोकसभेत–

(क) अनुसूचित जाती;

(ख) [(एक) आसामच्या जनजाति–क्षेत्रांमधील;

(दोन) नागालँडमधील;

(तीन) मेघालयामधील;

(चार) अरुणाचल प्रदेशामधील; आणि

(चाच) मिझोरममधील,

जनजाती खेरीजकरून अनुसूचित जनजाती; आणि]

(ग) आसामच्या स्वायत्त जिल्ह्यांमधील अनुसूचित जनजाती,

यांच्याकरता जागा राखून ठेवल्या जातील.

(२. ज्याच्या संबंधात खंड (१)खाली अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवल्या आहेत असे, प्रकरणपरत्वे, कोणतेही राज्य [किंवा संघ राज्यक्षेत्र] यामधील अनुसूचित जातींच्या अथवा असे राज्य [किंवा संघ राज्यक्षेत्र] अथवा अशा राज्याचा [किंवा संघ राज्यक्षेत्राचा] भाग यांमधील अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या [किंवा संघ राज्य-क्षेत्राच्या] एकूण लोकसंख्येशी जितके प्रमाण असेल तितकेच जवळजवळ, त्या राज्यात [किंवा संघ राज्यक्षेत्रात] अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे लोकसभेत त्या राज्यास [किंवा संघ राज्यक्षेत्रास) नेमून दिलेल्या जागांच्या एकूण संख्येशी प्रमाण असेल.

[(३) खंड (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आसामच्या स्वायत्त जिल्ह्यांमधील जनजातींसाठी लोकसभेत राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे त्या राज्याला नेमून दिलेल्या जागांच्या एकूण संख्येशी असावयाचे प्रमाण हे कमीत कमी उक्त स्वायत्त जिल्ह्यांमधील जनजातीच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणाइतके असेल.]

[स्पष्टीकरण–या अनुच्छेदात व अनुच्छेद ३३२ मध्ये "लोकसंख्या" या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्या जनगणनेची संबद्ध आकडेवारी प्रकाशित झालेली आहे अशा लगतपूर्व जनगणनेमध्ये अजमावलेली लोकसंख्या असा आहे :

परंतु, या स्पष्टीकरणातील 'ज्या जनगणनेची संबद्ध आकडेवारी प्रकाशित झालेली आहे अशी लगतपूर्व जनगणना' या उल्लेखाचा अर्थ, सन २००० नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेची संबद्ध आकडेवारी प्रकाशित होईपर्यंत १९७१ सालच्या जनगणनेचा उल्लेख म्हणून लावला जाईल.]

३३१. अनुच्छेद ८१ मध्ये काहीही असले तरी, जर आंग्लभारतीय समाजाला लोकसभेत पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नाही असे राष्ट्रपतीचे मत असेल तर, त्याला त्या समाजाचे जास्तीत जास्त दोन सदस्य लोकसभेवर नामनिर्देशित करता येतील.

भाग १६ वा

विवक्षित वर्गांसंबंधी विशेष उपबंध–अनुच्छेद ३३२–३३४

३३२. (१) अनुसूचित जाती व (आसामच्या जनजाती-क्षेत्रामधील, नागालँडमधील व मेघालयामधील अनुसूचित जनजाती खेरीजकरून) अनुसूचित जनजाती यांच्याकरता..... प्रत्येक राज्याच्या विधानसभेत जागा राखून ठेवल्या जातील.

(२) आसाम राज्याच्या विधानसभेत स्वायत्त जिल्ह्यांसाठीदेखील जागा राखून ठेवल्या जातील.

(३) ज्याच्या संबंधात खंड (१) खाली अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवल्या आहेत अशा, प्रकरणपरत्वे, कोणत्याही राज्यातील अनुसूचित जातींच्या अथवा, अशा राज्यातील किंवा राज्याच्या भागातील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल तितकेच जवळजवळ, त्या राज्याच्या विधानसभेत अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे विधानसभेतील जागांच्या एकूण संख्येशी प्रमाण असेल.

(४) आसाम राज्याच्या विधानसभेत एखाद्या स्वायत्त जिल्ह्याकरता राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे त्या विधानसभेतील जागांच्या एकूण संख्येशी असावयाचे प्रमाण हे कमीत कमी त्या जिल्ह्याच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसख्येशी असलेल्या प्रमाणाइतके असेल.

(५) .....आसामच्या कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याकरता राखून ठेवलेल्या जागांच्या मतदारसंघात त्या जिल्ह्याबाहेरील कोणतेही क्षेत्र समाविष्ट असणार नाही.

(६) आसाम राज्याच्या कोणत्याही स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजातींचा घटक नसलेली अशी कोणतीही व्यक्ती त्या जिल्ह्यातील... कोणत्याही मतदारसंघातून होणाऱ्या त्या राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीस पात्र असणार नाही.

३३३. अनुच्छेद १७० मध्ये काहीही असले तरी, जर एखाद्या राज्याच्या विधानसभेत आंग्लभारतीय समाजास प्रतिनिधित्व मिळण्याची गरज आहे व तीत त्यास पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नाही असे त्या राज्याच्या राज्यपालाचे ..... मत असेल तर, त्याला (त्या समाजाचा एक सदस्य विधानसभेवर नामनिर्देशित करता येईल).

३३४. या भागाच्या पूर्वगामी उपबंधांमध्ये काहीही असले तरी–

(क्) लोकसभेत व राज्यांच्या विधानसभांत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवणे; आणि

(ख्) लोकसभेत व राज्यांच्या विधानसभांत आंग्लभारतीय समाजाला नामनिर्देशनाद्वारे प्रतिनिधित्व असणे.

यांविषयीचे या संविधानाचे उपबंध या संविधानाच्या प्रारंभापासून (तीस वर्षाचा) कालावधी संपताच परिणामक असण्याचे समाप्त होईल.

परंतु, या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे लोकसभेतील किंवा राज्याच्या विधानसभेतील कोणत्याही प्रतिनिधित्वावर, त्यावेळी अस्तित्वात असलेल्या लोकसभेचे किंवा, प्रकरणपरत्वे, विधानसभेचे विसर्जन होईपर्यंत, परिणाम होणार नाही.

भाग १६ वा

विवक्षित वर्गासंबंधी विशेष उपबंध–अनुच्छेद ३३५–३३९

३३५. संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराच्या संबंधातील सेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करतांना अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांमधील व्यक्तीचे हक्क प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशा रीतीने विचारात घेतले जातील.

३३६. (१) या संविधानाच्या प्रारंभानंतर पहिल्या दोन वर्षात आंग्ल-भारतीय समाजातील व्यक्तींच्या नियुक्त्या संघराज्याच्या रेल्वे, सीमाशुल्क, डाक व तार सेवांमधील पदांवर पंधरा ऑगस्ट, १९४७ या दिवसाच्या निकटपूर्वी जशा केल्या जात होत्या तशाच तत्त्वावर केल्या जातील.

दर दोन वर्षांच्या अनुवर्ती कालावधीमध्ये, उक्त समाजातील व्यक्तींकरता उक्त सेवांमध्ये राखून ठेवलेल्या पदांची संख्या निकटपूर्व दोन वर्षाच्या कालावधीत याप्रमाणे राखून ठेवलेल्या पदसंख्येहून शक्य तितपत जवळजवळ दहा टक्क्यांनी कमी असेल.

परंतु, या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षांच्या अखेरीस अशा सर्व जागा राखून ठेवणे समाप्त होईल.

(२) जर आंग्लभारतीय समाजातील व्यक्ती, अन्य समाजातील व्यक्तींशी तुलना करता, गुणवत्तेच्या आधारे नियुक्तीस अर्ह असल्याचे आढळून आले तर, खंड (१) खाली त्या समाजाकरता राखून ठेवलेल्यांहून अन्य किंवा अधिक पदांवर अशा व्यक्तींची नियुक्ती करण्यास त्या खंडातील कोणत्याही गोष्टीमुळे आडकाठी होणार नाही.

३३७. आंग्लभारतीय समाजाच्या हिताकरता शिक्षणाबाबत एकतीस मार्च, १९४८ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षात दिली गेली होती अशी काही अनुदाने असतील तर, तीच या संविधानाच्या प्रारंभानंतर पहिल्या तीन वित्तीय वर्षांत संघराज्य व.....प्रत्येक राज्य यांच्याकडून दिली जातील.

दर तीन वर्षांच्या अनुवर्ती कालावधीत निकटपूर्व तीन वर्षांच्या कालावधीच्या अनुदानांहून ती दहा टक्क्यांनी कमी असावीत.

परंतु, या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षांच्या अखेरीस अशी अनुदाने, जेथवर ती आंग्लभारतीय समाजाला विशेष सवलत म्हणून असतील तेवढ्या व्याप्तीपुरती बंद होतील.

परंतु आणखी असे की, कोणतीही शिक्षणसंस्था, तिच्यात द्यावयाच्या वार्षिक प्रवेशांपैकी कमीत कमी चाळीस टक्के प्रवेश आंग्लभारतीय समाजाहून अन्य समाजातील व्यक्तींना उपलब्ध केल्याखेरीज या अनुच्छेदाखाली कोणतेही अनुदान मिळण्याला हक्कदार होणार नाही.

३३८. (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता एक विशेष अधिकारी असेल व तो राष्ट्रपतीने नियुक्त करावयाचा असेल.

(२) अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्यासाठी या संविधानाखाली उपबंधित केलेल्या संरक्षक तरतुदींसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण करणे व राष्ट्रपती निदेशित करील अशा कालांतरागणिक त्या संरक्षक तरतुदींच्या कार्यवाहीबाबत राष्ट्रपतीस अहवाल देणे हे विशेष अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल, आणि राष्ट्रपती असे सर्व अहवाल संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेववील.

(३) या अनुच्छेदात अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यासंबंधीच्या निर्देशांमध्ये, अनुच्छेद ३४० च्या खंड (१) खाली नियुक्त केलेल्या आयोगाचा अहवाल मिळाल्यावर राष्ट्रपती विनिर्दिष्ट करील अशा अन्य मागासवर्गांच्या व आंग्लभारतीय समाजाच्याही संबंधीचे निर्देश समाविष्ट आहेत असा त्यांचा अर्थ लावला जाईल.

३३९. (१) राष्ट्रपतीला आदेशाद्वारे,.....राज्यांमधील अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन व अनुसूचित जनजातींसंबंधीचे कल्याणकार्य यांवर अहवाल देण्याकरता एक आयोग कोणत्याही वेळी नियुक्त करता येईल, मात्र या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षे संपताच तो नियुक्त करावाच लागेल.

त्या आदेशाद्वारे आयोगाची घडण, शक्ती व कार्यपद्धती निश्चित करता येईल आणि त्यात राष्ट्रपतीस आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे आनुषंगिक किंवा साहाय्यभूत उपबंध अंतर्भूत असू शकतील.

भाग १६ वा

विवक्षित वर्गासंबंधी विशेष उपबंध–अनुच्छेद ३३९–३४१

(२) (एखाद्या राज्याला) निदेश देऊन, त्यांमध्ये त्या राज्यातील जन-

जातीच्या कल्याणाकरता ज्या योजना अत्यावश्यक असल्याचे विनिर्दिष्ट केलेले असेल त्या योजनांचा मसुदा तयार करणे व अंमलबजावणी करणे यासंबंधी त्याद्वारे निदेशन करणे हेसुद्धा संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येईल.

३४०. (१) भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या स्थितीचे व त्यांना ज्या अडचणी सोसाव्या लागतात त्यांचे अन्वेषण करणे आणि अशा अडचणी दूर करण्यासाठी व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणत्या उपाययोजना कराव्या त्यासंबंधी व त्या प्रयोजनाकरता संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणती अनुदाने द्यावीत व कोणत्या शर्तींच्या अधीनतेने अशी अनुदाने द्यावीत त्यासंबंधी शिफारशी करणे याकरता राष्ट्रपतीला त्यास योग्य वाटतील अशा व्यक्ती मिळून बनलेला आयोग आदेशाद्वारे नियुक्त करता येईल, आणि असा आयोग नियुक्त करणाऱ्या आदेशाद्वारे, आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल.

(२) याप्रमाणे नियुक्त केलेला आयोग त्याच्याकडे निर्देशिलेल्या बाबींचे अन्वेषण करील, आणि त्यास आढळून येईल अशी वस्तुस्थिती मांडणारा व त्याला उचित वाटतील अशा शिफारशी करणारा अहवाल राष्ट्रपतीस सादर करील.

(३) राष्ट्रपती याप्रमाणे सादर केलेल्या अहवालाची प्रत, केलेल्या कारवाईचे स्पष्टीकरण करणाऱ्या निवेदनासहित, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेववील.

३४१. (१) राष्ट्रपतीला [कोणत्याही राज्याच्या (किंवा संघ राज्यक्षेत्राच्या) बाबतीत, आणि ते.....राज्य असेल तर त्याच्या राज्यपालाचा..... विचार घेतल्यानंतर] जाहीर अधिसूचनेद्वारे, त्या राज्यात (किंवा, प्रकरणपरत्वे, संघ राज्यक्षेत्रात) या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जाती म्हणून मानल्या जातील त्या जाती, वंश किंवा जनजाती अथवा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यांतील गट विनिर्दिष्ट करता येतील.

(२) संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जात, वंश किंवा जनजाती अथवा कोणतीही जात, वंश किंवा जनजाती यांचा भाग किंवा त्यांतील गटखंड (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जातींच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा तीमधून वगळता येईल, पण उक्त खंडाखाली काढलेल्या अधिसूचनेत नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे पूर्वोक्तानुसार असेल त्याहून अन्यथा फरक केला जाणार नाही.

भाग १६ वा

विवक्षित वर्गासंबंधी विशेष उपबंध–अनुच्छेद ३४२

३४२. (१) राष्ट्रपतीला [कोणत्याही राज्याच्या (किंवा संघ राज्यक्षेत्राच्या) बाबतीत, आणि ते.....राज्य असेल तर त्याच्या राज्यपालाचा..... विचार घेतल्यानंतर], जाहीर अधिसूचनेद्वारे, त्या राज्यात (किंवा प्रकरणपरत्वे, संघ राज्यक्षेत्रात) या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जनजाती म्हणून मानल्या जातील त्या जनजाती किंवा जनजाती-समाज, अथवा जनजाती किंवा जनजाती–समाज याचे भाग किंवा त्यातील गट विनिर्दिष्ट करता येतील.

(२) संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जनजाती किंवा जनजाती–समाज अथवा कोणतीही जनजाती किंवा जनजाती–समाज याचा भाग किंवा त्यांतील गट खंड (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जनजातींच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा तीमधून वगळता येईल, पण उक्त खंडाखाली काढलेल्या अधिसूचनेत नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे पूर्वोक्तानुसार असेल त्याहून अन्यथा फरक केला जाणार नाही.

जात हा निकष का ?

मागासलेपणा ठरविण्यासाठी आर्थिक निकष लावावा, जातीचा निकष लावू नये अशी विरोधकांची मागणी असते. विरोधकांचा हा सर्वात महत्त्वाचा व वरवर पटणारा असा मुद्दा आहे. परंतु असे म्हणत असताना विरोधक मागील पार्श्वभूमी संपूर्णपणे विसरून जातात. या समाजात जातियव्यवस्थेचे तीन हजार वर्षांपासून कठोरपणे पालन होत आहे. या व्यवस्थेने तितक्याच निष्ठूरपणे व क्रूरपणे एका समाजघटकाला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक पातळीवर दाबून ठेवले आहे. 'जात' हे मानवनिर्मित क्रूर तितकेच भयावह वास्तव आहे. असे असूनही या क्रूर वास्तवाचे समर्थन करण्यासाठी येथील धर्मग्रंथांना आणि देवांनाही उच्चवर्णीयांनी कामाला लावले आहे. जातीयव्यवस्थेने उच्चवर्णीयांचे वर्चस्व, श्रेष्ठत्व तर टिकवून धरलेच परंतु खालच्या जातीतील लोकांमध्ये कायमचा न्यूनगंड निर्माण केला. मागील जन्माच्या पापानेच आपणास खालच्या जातीत जन्म मिळाला अशी न्यूनगंडाची भावना हजारो वर्षे त्यांच्या मनात टिकून होती. त्यामुळे प्रगतीच्या शर्यतीत ते शेकडो मैल मागे पडले. ज्ञान, पैसा मिळविणे म्हणजे देवा–धर्माच्या विरुद्ध वागणे असे त्यांना सांगण्यात आले आणि त्यांनी ते निमूटपणे मान्य केले परंतु हे श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व मानवनिर्मित आहे, ते तुमच्यावर लादल्या गेले आहे. ज्ञान मिळविणे, पैसा मिळविणे, इच्छा व मनाप्रमाणे व्यवसाय करणे हा तुमचा जन्मसिद्ध अधिकार आहे हा विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालच्या जाती जमातीत मनात रुजविला. त्यांचा न्यूनगंड दूर करून त्यांचा स्वाभिमान जागविला.

याच जातीयव्यवस्थेने येथील वेगवेगळ्या जातीच्या माणसांसाठी निरनिराळे नियम केले. काही जातींना त्यांनी गुन्हेगार म्हणून शिक्का मारून ठेवला. गावात जातींची घरे कोणत्या दिशेला, कोणत्या ठिकाणी व कशी असावी, मेल्यावर अंत्यसंस्काराची ठिकाणे वेगळी असावी, रोटी-बेटी व्यवहार नसावा, खालच्या जातीच्या लोकांना त्यांच्या थोड्याशा चुकीबद्दल कठोरपणे व क्रूरपणे शिक्षा द्यावी इत्यादि नियमांचे हजारो वर्षे काटेकोरपणे पालन झाले. त्याचे प्रतिबिंब आजही ठिकठिकाणी दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या रूपाने दिसून येते.

जातीव्यवस्थेने हजारो वर्षे उच्चवर्णीयांना राखीव जागा खास सवलती, जगण्याचे सर्व मानमरातब, फायदे, अमर्याद अधिकार, हक्क दिले. जातीच्या नावावरच ज्ञान मिळविले, पैसा जमविला आणि इतरांना त्यापासून वंचित ठेवले. स्वतःची प्रगती केली, दुसऱ्यांना अधोगतीला नेले. अजूनही आमच्या स्वतंत्र भारताच्या समाज व्यवस्थेतून 'जाती' गेलेल्या नाहीत. त्यांविरुद्ध कायदे झाले परंतु मनात रुजलेले जातीयतेचे विष अद्यापही कमी होत नाही. असे असताना राखीव जागा व सवलतीचा निकष 'जात' लावला तर त्यात बिलकूल चूक नाही. हे विरोधकांना जेव्हा त्यांच्या मनातील जात जाईल तेव्हाच पटू शकेल.

शैक्षणिक सवलती

आर्थिक निकषावरही सवलत आहे

आर्थिक निकषाची भाषा करणारे हे पूर्णपणे विसरतात की शिक्षण घेतांना आर्थिक निकषावरही फीची सवलत आधारलेली आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांना फी भरताना सवलत आहे आणि या सवलतीचा फायदा, उत्पन्नाची खोटी प्रमाणपत्रे सादर करून आर्थिकदृष्टीने भक्कम असलेली श्रीमंताची मुले, जास्त प्रमाणात घेतात हे जगजाहीर आहे. मात्र आर्थिक परिस्थिती बरी झाली, मध्यम गटाचेही उत्पन्न झाले तर अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही, एवढेच नव्हे तर फक्त दोनच भावांना किंवा बहिण-भावाला शिष्यवृत्ती मिळते. तिसरा भाऊ किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेत असेल तर मात्र शिष्यवृत्ती मिळत नाही. चोवीस हजार रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

मिळत नाही. फक्त ट्यूशन फीचीच सवलत मिळते. वरील सर्व बारकावे विरोधकांना माहीत आहेत काय ? विरोधकांचा असा समज झालेला आहे की सर्व मागास जाती–जमातींच्या विद्यार्थ्यांना सरसकट सवलती, राखीव जागांचे फायदे मिळतात. पण वस्तुस्थिती मात्र निराळीच आहे. विरोधकांना यातील बारकावे माहित नसल्यामुळे ते वाटेल ते आरोप करीत असतात.

प्रवेशाची सवलत

शास. वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा तत्सम प्रतिष्ठाप्राप्त व्यावसायिक अथवा तांत्रिक महाविद्यालयात अथवा कोणत्याही विभागाच्या महाविद्यालयात मागास जाती-जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती आणि इतर मागासवर्गीय जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी राखीव जागा व सवलत असते. पण ती पाळल्या जात नाही ही गोष्ट निराळी. या सवलती व राखीव जागांचे प्रमाण खालील टक्केवारीत आहे. मागासवर्गीय जातींना १३ टक्के, मागासवर्गीय जमातींना ७ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातींना ४ टक्के आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १० टक्के असे एकूण ३४ टक्के राखीव जागांचे प्रमाण आहे. ही टक्केवारी भरताना नियम असा आहे की या वरील सवलतीस पात्र असलेल्या सर्व अनुसूचित जाती–जमातीच्या विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांना जर गुणवत्तेने प्रवेश मिळत असेल तर त्यांना गुणवत्ता यादी-नुसार प्रवेश द्यावा. राखीव जागांच्या टक्केवारीत त्यांना घेता कामा नये. मग उर्वरित मागास जाती–जमातीच्या विद्यार्थ्यांना राखीव जागा सवलतीच्या टक्के-वारीने भराव्या, असा नियम असूनही जाणीवपूर्वक तो डावलून गुणवत्तेने प्रवेश मिळविणाऱ्या मागासवर्गीय जाती–जमातींच्या विद्यार्थ्यांना राखीव जागांच्या कोटचात घेतल्या जाते. त्यामुळे जाती–जमातीच्या विद्यार्थ्यांचे नियमाप्रमाणे प्रमाण (टक्केवारी) भरल्या जात नाही. मात्र याला फारच थोड्या शिक्षण संस्था अपवाद आहेत. जेथे जातीयवादी अधिकारी नाहीत तेथे मात्र नियमा-प्रमाणे प्रवेश दिला जातो.

अनुसूचित जाती–जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळवितांना अनेक संकटांना, समस्यांना तसेच अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यांची गुणवत्ता व पात्रता असूनही चांगल्या महाविद्यालयांमधून त्यांना हव्या असलेल्या विषयात प्रवेश मिळत नाही. 'सरकारचे जावाई' म्हणून त्यांची पदोपदी टिंगल करण्यात येते, टोमणे मारले जातात आणि हिणविण्यात येते. लेखी परीक्षेत उत्तम गुणांनी पास होणारा मागासवर्गीय विद्यार्थी प्रॅक्टीकलमध्ये हमखास नापास केल्या जातो. त्याला निरुत्साह वाटावा आणि त्याने मध्येच शिक्षण सोडावे म्हणून त्याचा सतत

अपमान केल्या जातो, जाच केल्या जातो. सवलत व शिष्यवृत्तीसाठी लागणारी आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित अधिकाऱ्यांकडून त्याला सहज मिळत नाहीत. शिष्यवृत्ती वर्षाच्या शेवटी मिळते. खरं म्हणजे ही शिष्यवृत्ती म्हणजे निर्वाह भत्ता (Maintainance grant) असतो. म्हणून ती प्रत्येक महिन्यात दिल्या जावी. परंतु तसे होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा डोंगर पार करावा लागतो आणि मानसिक छळाला सामोरे जावे लागते.

राखीव जागांवर प्रवेश मिळविणारे वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी पुढे गुणवत्तेने व कार्यक्षमतेने अपात्र डॉक्टर अथवा इंजिनिअर होतात, हा विरोधकांचा आरोप चुकीचा व खोडसाळपणाचा आहे. विरोधक वस्तुस्थिती समजावून घ्यावयास तयार नसतात किंवा वस्तुस्थितीकडे डोळेझाक करतात.

कोणत्याही अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व इतर मागास जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी काही ठराविक गुणांची टक्केवारी लागतेच आणि मग त्यांच्यातही स्पर्धा असते. आजकाल तर हे सर्व सवलतीस पात्र असलेले वरील जाती-जमातीचे विद्यार्थी इतर सर्वसामान्य गुणांमध्ये किंवा गुणवत्तेत फारसे कमी नाहीत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांना वार्षिक परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना देतात त्याच प्रश्नपत्रिका देतात आणि परीक्षेत पास होण्यासाठी लागणारे कमीत कमी गुण इतरांएवढेच गुण मिळवावे लागतात. प्रश्नपत्रिका आणि पास होण्यासाठी लागणाऱ्या कमीत कमी गुणात मात्र कोणतीच सवलत नाही. मग अपात्र डॉक्टर आणि इंजिनियर कसे निर्माण होतील. उलट ज्यांच्याजवळ पैसा, सत्ता आहे अशी उच्चवर्णीयांची मुले कशी गुणवत्ता यादीत येतात याचे स्पष्टीकरण करण्याची वेगळी गरज नाही.

नोकरीतील सवलती

वर नमूद केलेले राखीव जागांचे ३४ टक्के प्रमाण नोकरीमध्ये सुद्धा आहे. १३ टक्के अनुसूचित जाती, ७ टक्के अनुसूचित जमाती, ४ टक्के विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि १० टक्के इतर मागासवर्गीय जाती. सुरवातीच्या दहा वर्षात वरील सर्वांचे शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने ही टक्केवारी भरण्यात आली नाही. नंतर काही प्रमाणात पात्रता पूर्ण करणारे उमेदवार मिळू लागले-तेव्हा योग्य उमेदवार मिळत नाहीत, या सबबीखाली जागा रिक्त ठेवणे किंवा त्यांच्या जागी उच्चवर्णीयांना घेणे इत्यादी गोष्टी घडू लागल्या. त्यामुळे नोकऱ्यात भरमसाठ बॅकलॉग राहिला. आणि म्हणून केन्द्र

शासनाला दर दहा वर्षांनी ह्या राखीव जागा व सवलतींची मुदत वाढवावी लागत आहे.

योग्य उमेदवार मिळत नाहीत, असलेले उमेदवार अपात्र आहेत ही कारणे सांगून जसे राखीव जागांचे उमेदवार डावलले जातात, तसेच घातलेल्या अटी पूर्ण करीत नाहीत म्हणूनही उमेदवार वगळले जातात. याशिवाय मागास जाती-जमातीचे उमेदवार मिळू शकणार नाहीत अशाच विषयाच्या जागा राखीव ठेवण्यात येतात. उदा. कॉलेजमध्ये लेक्चरर, रीडर किंवा प्राध्यापकाच्या सर्व विषयांच्या जागा भरावयाच्या असल्या तर नेमकी संस्कृतची जागा राखीव ठेवतात. हे सांगण्याचे तात्पर्य हे की राखीव जागा भरल्या जाणार नाहीत याची पूर्ण खबरदारी उच्चवर्णीय अधिकारी व संबधित सतत घेत आले आहेत. त्यामुळे प्रचंड बॅकलॉग पडून आहे. (शेवटी तक्ता पहा)

ही सर्व कारणे शोधून जागा भरावयाच्याच असल्या तर फक्त चतुर्थ वर्गाच्या नावाला जागा भरल्या जातात.

या व्यतिरिक्त ज्या अनुसूचित जाती-जमातीच्या उमेदवारांची वर्ग १ किंवा २ म्हणून राजपत्रित अधिकारी पदावर निवड होते त्यांना अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागते. त्यांचा सामान्यत: दोन वर्षांचा परिविक्षा काळ (Probation Period) असतो पण तो वेळेवर कधीच समाप्त होत नाही. दहा-पंधरा वर्षे परिविक्षा काळ न संपलेले. अधिकारी मी पाहिले आहेत. एक उदाहरण तर मला असे पाहावयास मिळाले की कुणालाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. एका मागासवर्गीय डॉक्टरची, वैद्यकीय अधिकारी वर्ग २ या पदावर म. राज्य लोकसेवा आयोगाकडून नियुक्ती झाली. यांचा परिविक्षाकाल (Probation Period) सेवानिवृत्त होईपर्यंत संपला नाही. परिविक्षा काल न संपल्याने त्यांना वार्षिक वेतन वाढीही मिळाल्या नाहीत, पदोन्नती नाही आणि आयुष्यभर एकाच पदावर व सारखाच पगार घेत राहिले. बरं या अन्याबाबत त्यांनी शेकडो विनंत्या-अर्ज केले. संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटले पण सारेच व्यर्थ. त्यांना शेवटपर्यंत न्याय मिळाला नाही.

सामान्यत: दोन वर्षांचा परिविक्षा काल असतो. त्या काळात त्या अधिकाऱ्याचे गोपनीय अहवाल विरुद्ध असतील तर (ते जाणीवपूर्वक विरुद्धच लिहिल्या जातात) ते त्याला कळवावे लागतात. नंतर परिविक्षा काल वाढवावयाचा असेल तर तो फक्त एका वर्षानेच वाढविता येतो आणि तेही सदर अधिकाऱ्यास अगोदर कळवावे लागते. तो का वाढविला याची कारणेही द्यावी

लागतात. यातील कोणताच नियम न पाळता अनुसूचित जाती–जमातीच्या अधिकाऱ्यांचा परिविक्षा काळ आठ–दहा वर्षे संपविल्या जात नाही. वास्तविक वरील नियम पाळले नाही तर परिविक्षाकाळ नियमाप्रमाणे त्यांना आपोआपच रद्द होते. परिविक्षा काळात काम समाधानकारक नव्हते या कारणावरून जाणीवपूर्वक कामावरून कमी करण्यात आल्याची कितीतरी उदाहरणे दिसून येतात.

तसेच पदोन्नती (Promotion) आली की त्यांच्या मागे विभागीय चौकशीचे भूत लावणे, वेगवेगळे आरोप लावून पदोन्नती थांबविणे, पदावनत (Reversion) करणे, सेवाकाळात मानसिक छळ करणे, त्यांना महत्त्वाच्या कामाची जवाबदारी न देणे किंवा त्यात हस्तक्षेप करू न देणे सेवानिवृत्तीच्या काळात मुद्दाम खोटे नाटे आरोप लावून चौकशी मागे लावून सेवानिवृत्ती भत्ता व भविष्य निर्वाह निधीची रक्कम न देणे किंवा ती देण्यास अडथळे आणून त्यांना त्रास देणे इत्यादी कारणांनी मागासवर्गीयांचा छळ होत राहतो

राजकीय सवलती

मागास जाती–जमातीचे राखीव मतदार संघ ठेवून त्यांना राजकीय फायदा मिळावा, त्याचा आवाज विधानसभा, लोकसभा या अनुक्रमे राज्याच्या व देशाच्या सर्वोच्च सभागृहात उमटावा, असा त्या मागील हेतू आहे. परंतु त्यातही सोयीनुसार अनेक प्रकारचे राजकारण खेळण्यात येते.

विरोधकांचे आरोप आणि मुद्दे

राखीव जागा आणि सवलतींना विरोध करणाऱ्यांचे मुद्दे, आरोप किंवा प्रश्न सामान्यतः असे असतात–

(१) राखीव जागांमुळे बेकारी वाढली आहे. उच्चवर्णीयांच्या मुलांना नोकऱ्या लागत नाहीत.

(२) पूर्वजांनी केलेल्या पापाची शिक्षा या पिढीला का ?

(३) राखीव जागांमुळे अपात्र अधिकारी निर्माण होतात.

(४) राखीव जागा किती काळ चालू राहणार ?

या व अशाच मुद्यांचा विरोधक पाठपुरावा करतात. परंतु हे मुद्दे व प्रश्न अतिशय ठिसूळ व अविचाराने केलेले असतात.

बेकारी वाढण्याचे कारण राखीव जागा नसून भरमसाठ वाढणारी शिक्षित तरुणांची संख्या आणि नोकरीच्या ठराविक मर्यादित जागा हे आहे. ३४ टक्के राखीव जागांबाबत जसा विचार होतो तसा उरलेल्या ६६ टक्के जागांबाबत का

होत नाही ? त्या कोणत्या जातीच्या लोकांनी बळकाविल्या आहेत ? आणि अजूनही कोण बळकावीत आहेत ? राखीव जागा व त्यांचे प्रमाण खरोखरच भरल्या जाते का ? की नुसत्याच जाहिराती दिल्या जातात ? हे शोधण्याचा प्रयत्न विरोधक करीत नाहीत. किंवा यासंबंधी माहिती असूनही हेतुपुरस्सर खोडसाळ प्रचार व प्रश्न करीत असतात.

'राखीव जागा' म्हणजे पूर्वजांच्या पापाची या पिढीला शिक्षा आहे असे म्हणणे चुकीचे आहे. कुटुंबातील एखादा सदस्य आजारी असला आणि त्याला वेगळे औषधपाणी, जेवण दिलं ते इतरांना मागील पापाची शिक्षा वाटते काय ? आणि त्या सदस्याला थोडं चांगलं, वेगळं दिलं तर इतरांच्या खाण्या-पिण्यात कसलाच फरक पडत नसतांना ते ओरड करतात काय ? तसेच राखीव जागांचे आहे. राखीव जागांमुळे उच्चवर्णीयांच्या हक्कात, प्रगतीत कोणताच फरक पडत नाही. राखीव जागांमुळे अपात्र अधिकारी निर्माण होतात या आरोपाचे खंडण या लेखात इतरत्र केलेले आहेच.

राखीव जागा किती काळ ठेवण्यात याव्या याबाबत राज्यघटनेत स्पष्ट उल्लेख नाही. परंतु समाजातील मागासवर्गीयांची नोकरीची, शिक्षणाची टक्केवारी इतरांच्या बरोबरीत जोपर्यंत येत नाही. तोपर्यंत राखीव जागा राहाव्या असा अलिखित संकेत आहे. गेल्या चाळीस वर्षांत वेळोवेळी दहा दहा वर्षांनी राखीव जागांची मुदत वाढविण्यात आली आहे आणि ती यापुढेही वाढविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी

[अनुसूचित जाती व अनूसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा १९७६ (१९६७ चा १०८ वा) मधील परिशिष्ट १ मधील भाग १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे]

अनुसूचित जाती

१. अगेर.
२. अनमुक.
३. आरेमाला.
४. आरवा माला,
५. बहना, वहाना.
६. बाकड, बंट.
७. बलाही, बलाई.

८. वसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी.
९. बेडा जंगम, बुडगा जंगम.
१०. बेडर.
११. भांबी, भांभी, असादरु, असोदी, चामडिया, चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळय्या, हराळी, खालपा, माचीगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाटी मोची, राणीगार, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित, समगार, सतनामी, सूरज्यबंशी, सूरज्य-रामनामी.
१२. भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मिकी, कोरार, झाडमल्ली.
१३. विंदला.
१४. ब्यागारा.
१५. चलवादी, चन्नय्या.
१६. चेन्नदासर, होलया दासर, होलेया दसारी.
१७. डक्कल, डोक्कलवार.
१८. ढोर, कक्कय्या, कंकय्या, डोहोर.
१९ डोम, डुमार.
२०. येल्लमलवार, येल्लमलवंडलु.
२१. गंडा, गंडी.
२२. गरोडा, गारो.
२३. घासी, घासीया.
२४. हल्लीर.
२५. हलसार, हसलार, हुलसवार, हलसवार.
२६. होलार, व्हलार.
२७. होलय, होलेर, होलेया, होलिया.
२८. कैकाडी (अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूर तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यांत)
२९. कटिया, पथरिया.
३०. खंगार, कनेरा, मिरधा.
३१. खाटिक, चिकवा, चिकवी.
३२. कोलुपूल वंडलु.
३३. कोरी.

३४. लिंगडेर.
३५. मादगी.
३६. मादिगा.
३७. महार, मेहरा, तराळ, धेगू-मेगू.
३८. माह्यावंशी, धेड, वणकर, मारु-वणकर
३९. माला.
४०. माला दासरी.
४१. माला हन्नाई.
४२. माला जंगम.
४३. माला मस्ती.
४४. माला साले, नेटकानी.
४५. माला सन्यासी.
४६. मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग.
४७. मांग-गारोडी, मांग-गारुडी.
४८. मन्ने.
४९. मस्ती.
५०. मेंघवाल, मेंघवार.
५१. मिठा अयलवार.
५२. मुक्री.
५३. नाडिया, हादी.
५४. पासी.
५५. साँसी.
५६. शेणवा, चेणवा, सेडमा, रावत.
५७. सिंधोल्लू, चिंदोल्लू.
५८. तिरवार; तिरबंदा.
५९. तुरी.

अनुसूचित जमाती

[अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश सुधारणा कायदा, १९७६ (१९७६ चा १०८) मधील परिशिष्ट १ मधील भाग ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे]

१. आंध.
२. बैगा.

३. बरडा.

४. बावचा, बामचा.

५. भैना.

६. भारिया भूमिया, भुईनहार-भमिया, पांडो.

७. भात्रा.

८. भिल, भिल-गरासिआ, ढोली भिल, डुंगरी भिल, डुंगरी गरासिया, मेवासी भिल, रावल भिल, तडवी भिल, भगालिया, भिलाला, पावरा, वसावा, वसावे.

९. भुंजिया.

१०. बिंझवार.

११. बिरहुल, बिरहोर.

१२. चोधरा (अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्हे सोडून).

१३. धाणका, तडवी, तेतारिया, वळवी.

१४. धनवार.

१५. धोडिया.

१६. दुबळा, तलाविया, हलपति.

१७. गामित, गामटा, गावित, मावची, पाडवी.

१८. गोंड किंवा राजगोंडा, आरख, अराख, अगारिया, असूर, बडीमारिया, बडामारिया, भाटोला, भिम्मा, भूता, कोईलाभूता, कोयलाभूती, भार, बिसन हॉन मारिया, छोटा मारिया, दंडामी मारिया, धुरु, धुरवा, धोबा, धुलिया, डोरला, गायकी, गट्टा, गट्टी, गायता, गोंड गोवारी, हिल मारिया, कांदरा, कलंगा, खटोला, कोयतार, कोया, खिरवार, खिरवारा, कुच मारिया, कुचकी मारिया, माडिया, मारिया, माना, मन्नेवार, मोघ्या, मोमिया, मोंघ्या, मुडिया, मुरिया, नागरची, नाईकपोड, नागवंशी, ओझा, राज, सोनझारी झरेका, थाटिया, थोटचा, वाडेमारिया, वडेमारिया.

१९. हलबा, हलबी.

२०. कमार.

२१. काथोडी, कातकरी, ढोर काथोडी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी.

२२. कवर, कांवर, कोर, चेरवा, राटिया, तन्वर, छट्री.

२३. खैरवार.

२४. खरिया.

२५. कोकणा, कोकणी, कुकना.

२६. कोल.

२७. कोलाम, मन्नेरवारलु.

२८. कोळी ढोर, टोकरे कोळी, कोलचा, कोलघा.

२९. कोळी महादेव, डोंगर कोळी.

३०. कोळी मल्हार.

३१. कोंध, खोंड, कांध.

३२. कोरकू, बोपची, मोवासी, निहाल, नहूल, बोंधी, बोंडया.

३३. कोया, भिनेकोया, राजकोया.

३४. नगेसिया, नगासिया.

३५. नाइकडा, नायका, चोळीवाला नायका, कापडिया नायका, मोटा नायका, नाना नायका.

३६. ओरांव, धनगड.

३७. परधान, पाथरी, सरोटी.

३८. पारधी, आडवी चिचेर, फास पारधी, फांसेपारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, बहेलियां, चिता पारधी, शिकारी, टाकणकर, टाकिया.

३९. परजा.

४०. पटेलिया.

४१. पोमाला.

४२. राठवा.

४३. सवर, सवरा.

४४. ठाकूर, ठाकूर, का–ठाकूर, का–ठाकर, मा–ठाकूर, मा–ठाकर.

४५. थोटी (औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यात व चंद्रपूर जिल्ह्याच्या राजूरा तहसीलमध्ये).

४६. वारली.

४७. विटोलिया, कोटवालिया, बारोडिया.

विमुक्त जाती

जाती	तत्सम
१. बेरड	१. (अ) * *
	(ब) नाईकवाडी
	(क) तलवार

* * वगळले

जाती	तत्सम
	(ड) वाल्मिकी
२. वेस्तर	२. संचलू वड्डार
३. भामटा	३. (अ) भामटी
	(ब) गिरणी वड्डार
	(क) कामाटी
	(ड) पाथरूट
	(इ) टकारी
	(फ) उचले
४. कैकाडी (मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड जिल्हे व चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुका यात)	४. (अ) धोंतले
	(ब) कोरवा
	(क) माकडवाले किंवा कोंचीकोरवा
	(ड) पामलोर
	(इ) कोरवी
५. कंजारभाट	५. (अ) छारा
	(ब) कंजार
	(क) नात
६. कटाबू	६. ... ...
७. बंजारा (शा. प., शि. व स. क. वि. क्र., सीबीसी १४६४/१४६९१–म, दिनांक १८ फेब्रुवारी १९६५ अन्वये सुधारल्याप्रमाणे)	७. (अ) गोर बंजारा
	(ब) लंबाडा/लंबारा
	(क) लंभाणी
	(ड) चरण बंजारा
	(इ) लभाण
	(फ) मथुरा लभाण
	(ग) कचकीवाले बंजारा
	(ह) लमान बंजारा
	(इ) लमाण/लमाणी
	(ज) लबान
	(क) वगळण्यात आले.
	(ल) धाली/धालीया

जाती	तत्सम
	(म) धाडी/धारी
	(न) सिंगारी
	(व) नावी बंजारा
	(प) जोगी बंजारा
	(क्यु) * *
	(र) * *
	(स) बंजारी (शा. प. क्र. सीबीसी १४७७/३५५१२/का-५, दि. १८ ऑगस्ट १९७७).
८. * *	... ८. पाल पारधी
९. राज पारधी	... ९. (अ * *
	(ब) गाव पारधी
	(क) हरण शिकारी
	(ड) * *
१०. राजपूत भामटा ...	... १०. (अ) परदेशी भामटा
	(ब) परदेशी भामटी
११. रामोशी	... ११. ... ...
१२. वडार	... १२. (अ) गाडी वड्डर
	(ब) जाती वड्डर
	(क) माती वड्डर
	(ड) पाथरवट
१३. वाधरी	... १३. (अ) सलात
	(ब) सलात वाधरी
१४. छप्परबंद (मुस्लीम धर्मीयासह) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी-१४७७/५८४६३/का-५, दिनांक २० मार्च १९७८).	

* * वगळले

भटक्या जमाती

जाती	तत्सम
१. ०गोसावी	१. (१) बावा, (२) बैरागी, (३) भारती, (४) गिरी गोसावी, (५) भारती गोसावी, (६) सरस्वती पर्वत, (७) सागर, (८) बान किंवा वान, (९) तीर्थ आश्रम, (१०) अरण्य धरभारी, (११) संन्यासी, (१२) नाथपंथी गोसावी.
२. बेलदार	२. ओड
३. भराडी	३. (अ) बाळ संतोशी (ब) किंगरीवाले (क) नाथबावा (ड) नाथ जोगी (इ) नाथपंथी डवरी गोसावी
४. भुते	४. भोपे
५. * *	५. ...
६. चित्रकथी	६. ...
७. गारुडी	७. ...
८. घिसाडी	८. घिसाडी लोहार किंवा गाडी लोहार किंवा चितोडी लोहार, रजपूत लोहार. (शा. प., शि. क्री, व स. क. वि., क्रमांक सीबीसी– १४७०/१०२६९/ज. दिनांक १४ ऑगस्ट १९७०).
९. गोल्ला (शा.नि., स.क. सां. का.क्री. व प.वि., क्रमांक सीबीसी–१४८८/ ४१०७९/का–५, दिनांक २९ नोव्हें-	९. गोल्लेवार, गोलेर (शा. नि., स.क.सां.का. क्री. व प. वि., क्रमांक सीबीसी–१४७९/६६/

० दि. ९–१२–१९७७ चा शा. नि. व १०–४–१९८७ च्या शुद्धीपत्रकान्वये सुधारल्याप्रमाणे.

* * वगळले

जाती	तत्सम
बर १९७८ अन्वये "सोलापूर व सांगली जिल्ह्यात" हे शब्द वगळले आहेत).	का–५, दिनांक १२ जुलै १९७९). गोलकर. (शा.नि. क्र. सीबीसी-१४७९/६६/का–५, दिनांक ४ सप्टेंबर १९७९).
१०. गोंधळी	... १०. ...
११. गोपाल	... ११. (अ) गोपाल भोरपी (शा.प., व स.क.वि., क्रमांक सीबीसी-१४६४/९३३४३ म दिनांक १३ ऑगस्ट १९६५).
	(ब) खेळकरी. (शा. नि. दिनांक ९–१२–१९७७)
१२. हेळवे	... १२. (१) हिलव
१३. जोशी	... १३. (अ) बुडबुडकी
	(ब) डमरुवाले
	(क) कुडमुडे
	(ड) मेढंगी
	(इ) सरोदे
	(फ) सहदेव जोशी
	(म) सरवदे
	(ह) सरोदा
१४. काशी कापडी	... १४. ...
१५. कोल्हाटी	... १५. डोंबारी
१६. मैराळ	... १६. (अ) दांगट
	(ब) वीर
१७. मसणजोगी	... १७. (१) सुदगडसिद्ध
	(२) मपनजोगी
१८. नँदीवाले	... १८. तिरमल
१९. पांगूळ	... १९. ...

जाती	तत्सम
२०. रावळ	२०. राऊळ किंवा रावळयोगी (शा. प., शि. व स.क. वि. फ. १४६५/ १५१००५–म, दिनांक २१ मे १९६६).
२१. सिक्कलगर	२१. कटारी
२२ ठाकर (फक्त रत्नागिरी जिल्ह्यात)	२२. ...
२२. वैदू	२३. * *
२४. वासुदेव	२४. ...
२२. भोई* (शा.नि., स.क., सां.का., क्री व प. वि., क्र. सीबीसी–१०७३/ १०६१५/ज–१, दिनांक २९ मे १९७४, शा. शुद्धिपत्र समक्रमांक, दिनांक ७ जून १९७४)	२५. (१) झिंगा भोई (२) परदेशी भोई (३) राजभोई (४) भोई (५) कहार (६) गोडिया कहार (७) धुरिया कहार (८) किरात (९) मछुआ (१०) मांझी (११) जातिया (१२) केवट (१३) ढीवर (१४) धीवर (१५) धीमर (१६) पालेवार (१७) मछेंद्र (१८) नावाडी (१९) मल्हार (२०) मल्हाव (२१) बोई

* * वगळले

जाती	तत्सम
	(२२) गाढव भोई
	(२३) खाडी भोई
	(२४) खारे भोई
	(२५) ढेवरा (शा.नि., स.क., सां.का., क्री. व प. वि., क्र. सीबीसी १०७३ / १०६१५/ज-१, दिनांक २४ ऑक्टोबर १९७४).
२६. बहुरुपी	२६. ... ...
२७. ठेलारी (धुळे, नासिक, जळगाव व औरंगाबाद जिल्ह्यात)	२७. ... ...
२८. ओतारी	२८. (अ) ओतनकर (ब) ओतकर (क) वतारी (ड) ओझारी (शा.नि., सां.का., क्री. व प.वि., क्र. सीबीसी १४७७/ ४०९५०/का-५, दिनांक १३ डिसेंबर १९७७).

सर्व महाराष्ट्राकरिता इतर मागासलेल्या वर्गाची यादी

[१७ ऑगस्ट १९८४ पर्यंत सुधारल्याप्रमाणे]

१. अलितकार
२. बागडी
३. * *
४. बडीआ
५. बजानिया
६. बाजीगर
७. बुट्टाल
८. भींड
९. भवैया किंवा तारगल
१०. भाविण

---

* * वगळले

११. भिस्ती किंवा पखाली
१२. * *
(शा. नि., स. क., सां. का., क्री. व प. वि., क्रमांक सी. बी. सी–१०७३/१०६१५/ज–१, दिनांक २९ मे १९७४).
१३. बारी किंवा बारई
१४. बेरीया
१५. बेसदेवा
१६. भडभुंजा
१७. भांटा
१८. भाट
(शुद्धिपत्र, शि. व स. क. वि., क्रमांक सीबीसी–१४७९/ ९४७ –ज, दिनांक २७ जानेवारी १९७० नुसार सुधारल्याप्रमाणे).
१९. चमथा
२०. चांगलगडा
२१. चरण किंवा गडवी
२२. चारोडी
२३. चिमा
२४. दास किंवा दांगडीदास
२५. दावगर
२६. देपला
२७. देवळी
२८. देवदिग
२९. * *
३०. ढोली
३१. * *
३२. धनगर
३३. * *
३४. देवांग
३५. गंधारप
३६. गुजराथ बावरी
३७. गडारिया
३८. गड्री
३९. गढवी
४०. गारपगारी
४१. * *
४२. गोचाकी
४३. गुरव
४४. गवळी
४५. गवंडी
४६. हलेपैक
४७. * *
४८. हटकर
४९. जगीयासी
५०. जजाक
५१. जतिया
५२. जातिगर
५३. जव्हेरी
५४. जोगी
५५. जोगीण
५६. जोहारी
५७. जुलाहा
५८. जंगम
५९. जिगनर
६०. जाडी
६१. * *
६२. कम्मी

* * वगळले

६३. कापडी
६४. खारवा किंवा खारवी
६५. खाटी
६६. * *
६७. * *
६८. कोळी सूर्यवंशी
६९. कोंगाडी
७०. कोरचर
७१. * *
७२. कचोरा
७३. कदैरा
७४. कामाटी
७५. कसबी
७६. * *
७७. * *
७८. कोळी
७९. कोष्टी
८०. कुचबंध
८१. कुछारिया
८२. कुंभार किंवा कुम्हार
८३. कुणबी (पोट-जाती—लवा-कुणबी, लवा-पाटील, लेवा पटीदार)
८४. कुरमार
८५. काची
८६. काठी
८७. कासार (पोट-जाती—कंचार, कचारी)
८८. लाभा
८९. लडीया, लढीया, लरिया
९०. लडाफ किंवा लड्डाफ
९१. लखेरा
९२. लोहार
९३. माच्ची
९४. मानभाव
९५. मंगेला
९६. मारवार बावरी
९७. मे
९८. मिना
९९. महली
१००. मेदर
१०१. म्हाली
१०२. मिठा
१०३. * *
१०४. मथुरा
१०५. नामधारी
१०६. नामधारीपैक
१०७. निरशिकारी
१०८. नावी, न्हावी
१०९. नेथुरा
११०. नोनीया
१११. नक्काशी
११२. नीली
११३. नीलकांती
११४. नेकार जाडा
११५. पधारिया
११६. पडीयार
११७. पात्रदावरू
११८. फासेचरी
११९. फुडगी
१२०. पखाली
१२१. पांचाळ

* * वगळले

१२२. पांका
१२३. पेरकी, पेरकेवाड
१२४. पुतलीगर
१२५. परीट किंवा धोबी
१२६. पाटकर
१२७. फुलारी
१२८. राचेवर
१२९. राईकरी
१३०. बंडी
१३१. रचबंधिया
१३२. रंगारी
१३३. रँग्रेझ
१३४. राओत, रावत, राऊतीया
१३५. रँग्रेज (भावसार, रंगारी)
१३६. * *
१३७. * *
१३८. * *
१३९. सनगर
१४०. संजोगी
१४१. सरानिया
१४२. * *
१४३. * *
१४४. * *
१४५. सुप्पालिग
१४६. सुथारिया (सिंधमधील)
१४७. साहिस, साईस, शिस
१४८. सपेरा, नाथ
१४९. शिलावट
१५०. सिंगीवाला
१५१. स्वकुलसाळी
१५२. साळी, पद्मशाली
१५३. शिंपी
१५४. सोनार
१५५. तांडेल
१५६. * *
१५७. तारगला
१५८. थेटवार
१५९. थोरीया
१६०. तांवट
१६१. थोगती
१६२. वडी
१६३. वेती
१६४. वसफोड
१६५. वधाई (सुतार)
१६६. वर्धी
१६७. वंजार, वंजारा, वंजारी
१६८. येरकुला
१६९. आगरी, आगळे किंवा काळण
१७०. भावसार
१७१. कुरहीन शेट्टी
१७२. नीलगार, निली, निराळी
१७३. कोसकांती देवांग (क्र. सीबी-सी–१४६८/८८४७५–ज, दिनांक १९ जानेवारी १९६८)
१७४. सुतार
१७५. फुलगुडी
१७६. * *
१७७. पिंजारा
१७८. * *
१७९. भिलाला
१८०. डवरी

* * वगळले

१८१. तेली (शा. नि., शि. व. स. क. वि., क्र. सीबीसी–१४६८ –म, दिनांक १३ एप्रिल १९६८, शुद्धिपत्र दिनांक २४ एप्रिल १९६८)

१८२. माळी (शा. नि., शि. व. स. क.वि.,क्र. सीबीसी–१४६८–म, दिनांक १३ एप्रिल १९६८, शुद्धिपत्र दिनांक २४ एप्रिल १९६८)
(पोटजाती–फुलमाळी, फुले, हळदे, काचा, कडू, बावने अधप्रभू, अधशेटी, जिरे, उंडे, लिंगायत माळी इ.)

१८३. लोणारी (शा. नि., शि. व. स. क. वि., क्र. सीबीसी–१४६९/५९२३५–ज, दिनांक २९ जानेवारी १९६९).

१८४. * *

१८५. तलवार कानडे (शा. नि., शि. व स. क. वि., क्र. सीबीसी–१४६९ /१६८७७–ज, दिनांक ८ ऑगस्ट १९६९).

१८६. राघवी (विदर्भजिल्ह्यातील). (शा.नि. क्र. सीबीसी-१४७०/३९५५१–ज, दिनांक जानेवारी १९७१).

१८७. भंडारी, शा. नि. क्र. विपठ–१७–सीबीसी–१४७१–१७१४, दिनांक २४ एप्रिल १९७१).

१८८. गानली किंवा गांडली (शा. नि., स. क. सां. का. क्री. व प. वि.,क्र. सीबीसी-१४७२/६०१६–ज, दिनांक १ नोव्हेंबर १९७२)

१८९. पोवार किंवा पवार (पोवार किंवा पवार आडनावे असलेले इतर मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट नाहीत.) (शा. नि., स. क. सां. का. क्री. व. प. विक्र–सीबीसी–१४७०/१३३९/का–५, दि. २६ जुलै १९७६).

१९०. काथार, काथार वाणी, कंठहार वाणी (लिंगायत वाणी किंवा लाड वाणी सोडून) (शा. नि., स. क. सां. का. क्री. व प. वि.,क्र. सीबीसी–१४७०/६३११७/ क-५, दि. १२ ऑक्टोबर १९७६).

१९१. मोमीन
१९२. फकीर बंदरवाला
(शा. नि., स. सां. क. क्री. व प.वि., क्र. सीबीसी–१४७७/३५२५६/का–५ दिनांक १६ ऑगस्ट १९७७).

१९३. * * (शा. नि., स. क. सां. का. क्री. व प. वि., क्र. सीबीसी–१४७९/६२/का–५, दिनांक १२ जुलै १९७९ अन्वये वगळले).

* * वगळले

१९४. घडशी (शा. नि., स. क. सां. क्री. व प. वि.,क्र. सीबीसी-१४७५/२७२/ का-५, दिनांक ९ डिसेंबर १९७७).

१९५. तांबोळी
१९६. अनुसूचित जातीतून ख्रिश्चन धर्म स्वीकारलेले } शा. नि., स. क. सां.क्री. व प. वि. क्र.-सीबीसी-१४७७/ ५११६५/का-५, दिनांक १३ फेब्रुवारी १९७८.

१९७. लंझाड (शा. नि., स.क्र.सां.का. क्री. व प. वि.,क्र. सीबीसी-१०७६/ ४७३२/ का-५, दिनांक ११ सप्टेंबर १९७९).

१९८. यादव, अहिर (शा. नि., स. क. सां.का.क्री. व प. विभाग, क्र. सीबीसी-१४७८/ ३५५०१/ का-५, दिनांक ५ ऑक्टोबर १९७९).

१९९. लाडसी (शा. परि. क्र. सीबीसी-१४७५/१९६०/ का-५, दिनांक ३ मार्च १९८२).

२००. ठाकर (शा. नि.क्र सीबीसी-१०८२/४८५६७ (१०६३)/ का-५, दिनांक ८ जुलै १९८२).

२०१. गाबित (शा. नि. क्र. सीबीसी-१०८३ ४९५६७/ (१०७५)/का-५, दिनांक २९ जुलै १९८३).

वर दर्शविलेल्या जाती, जमाती मागासवर्गात मोडतात. त्यांना घटनेने कोणत्या कलमांखाली कोणकोणत्या सवलती दिल्या, त्यांची टक्केवारी किती, त्याचे स्वरूप काय या संदर्भात आपण माहिती पाहिली. परंतु भारतीय राज्य घटनेत 'मागासवर्ग' या शब्दाचे मात्र कुठेच स्पष्टीकरण केलेले नाही. यासाठी राष्ट्रपतींना ३४० कलमान्वये आयोग नेमण्याचे अधिकार दिल्या गेले असून त्या आयोगाला सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागासवर्ग ठरविण्याचे आणि विकासासाठी शिफारस करण्याचे अधिकार दिले आहेत. तसेच राज्य सरकारांना त्यांच्या राज्यातील अनुसूचित जाती, जमाती, भटके विमुक्त व इतर मागासवर्गीयांची सूची बनविण्याचे अधिकारही सूची विकासाच्या गुणवत्तेनुसार कमी जास्त होत असते. विकासाप्रमाणे जातींची नावे सूचीतून काढल्या जातात, तर काही नवीन घातल्या जातात.

३४० कलमांन्वये आजपर्यंत १० राज्य सरकारांनी १५ आयोग नेमले. आणि वेळोवेळी अभ्यास करून मागासवर्गाचे निकष ठरविले. इतकेच नव्हे तर या आयोगानी अनुसूचित जातीचे आणि भटक्या जातीचे व इतर मागासवर्गीयांचे

राखीव प्रमाण किती असावे हे ठरविणाऱ्या शिफारशी केल्या. खाजगी उद्योग आणि विना अनुदान तत्त्वावर चालणाऱ्या व्यावसायिक महाविद्यालयातून मात्र राखीव जागा व सवलती नाहीत. त्या असाव्या अशी एक योग्य मागणी पुढे आलेली आहे.

इतके वर्षे या सवलती व राखीव जागा असूनही शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये वेगवेगळी कारणे दाखवून जातियवादी अधिकारी मागासजाती, जमातीची टक्केवारी भरत नाहीत. त्यामुळे या समाजघटकाचा विकास झाला नाही आणि शिक्षणाची टक्केवारी वाढली नाही. त्याचा बॅकलॉग मात्र पडून आहे. त्यांच्यासाठी असलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत, पोहचू दिल्या जात नाही. यासाठी खंबीर पावले उचलून त्याची अंमलबजावणी कठोरपणे झाली पाहिजे. तर या समाजाची प्रगती होऊन भारतीय समाजाचे स्पष्ट व स्वच्छ चित्र जगासमोर येईल.

□

REFBK-0026286

आज देशातील परिस्थिती चिंताजनक आहे. फुले आंबेडकरांच्या प्रबोधनाचा, लोकशाहीचा, समतावादी विचार मुळापासून उपटून फेकायला प्रतिगामी शक्ती एकत्रित आल्या आहेत. अशावेळी दलित चळवळीतील सर्वांनी बिनशर्त संघटीत होणे अपरिहार्य आहे. या संघटनेने आपल्या कक्षा रुंदावून डाव्या विचारसरणीच्या समतावादी, धर्मनिरपेक्षता मानणाऱ्या व लोकशाहीवर दृढ विश्वास असणाऱ्या सर्वांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करणे किंवा बरोबर घेणे हे देशाच्या दृष्टीने आणि आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने आवश्यक आहे. जातीयवादी धर्मांधतेच्या नागाने भारतीय लोकशाहीला विळखा घातला आहे. अशावेळी आंबेडकरी समाजाची जबाबदारी खूपच वाढली आहे. कारण या नागाच्या विळख्यातून आंबेडकरी विचार व संघटनाच देशाला वाचवू शकेल.

— वामन निंबाळकर